18-03-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

BGO/ 11:00

18-03-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

BGO/ 11:00

18-03-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A 1

BGO/ SBT/ MMP/ 11:00

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करू इच्छितो की, आजच्या कामकाज पत्रिकेवरील क्रमांक सहा वरील सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 1 - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, 2009 प्रथम घ्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सदर विधेयक अगोदर घेण्यास आमची हरकत नाही. सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक - 1 महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, 2009 आधी घ्यावे अशी विनंती सन्माननीय मंत्रिमहोदय डॉ.पतंगराव कदम यांनी केली आहे. पण कामकाज सल्लागार समितीमध्ये कोणतेही विधेयक न घेण्यासंबंधीचा निर्णय झाला आहे. अपवादात्मक परिस्थिती असेल तर विधेयक मांडायला आमचा काही विरोध नाही. सन्माननीय मंत्रिमहोदय आता जे विधेयक मांडू पहात आहेत ते धोरणात्मक बाबतीतले विधेयक आहे. तेव्हा विधेयक मांडण्यास आपण मंत्रिमहोदयांना अनुमती द्यावी अशी मी विनंती करीत आहे. मी येथे अशीही विनंती करणार आहे की, आज अर्थसंकल्पावर चर्चा ध्यावी व उद्या पुरवणी मागण्यांवर चर्चा घ्यावी.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, हे विधेयक लहान आहे. औरंगाबाद येथे न्यायाधिकरण आहे. आता आपल्याला पुणे येथे न्यायाधिकरण स्थापन करावयाचे आहे. त्यासंबंधातील हे विधेयक आहे. ते मांडण्यासाठी आपण मला अनुमती द्यावी.

उपसभापती : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक.

L. C. BILL NO. I OF 2009.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.)

डॉ.पतंगराव कदम (महसूल मंत्री) : सभापती महोदय, सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 1- महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक 2009 मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

डॉ.पतंगराव कदम : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि. क्रमांक - 1 मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक - 1 महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक -1 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडातो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 1 संमत झाले आहे.

.....

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नियम स्थगित ठेवणे

मु.शी. : नियम स्थगित करण्याबाबत वित्त मंत्र्यांचा प्रस्ताव

श्री.दिलीप वळसे - पाटील (वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधान परिषद नियम 289 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो. :-

" महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 228(1) मधील सात दिवसांच्या कालावधी बाबतची तरतूद सन 2009-2010 च्या अंतरिम अर्थसंकल्पावरील चर्चेच्या संदर्भात स्थगित करण्यात यावी "

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला

--

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चा आज होणार आहे की उद्या होणार आहे ?

श्री.दिलीप वळसे - पाटील : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चा दुपारी घ्यावी आता सभागृहात अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस सुरुवात होत आहे. पुरवणी मागण्यांवरील चर्चा दुपारी घ्यावी किंवा उद्या घ्यावी. सभागृह जे काही ठरविल त्याप्रमाणे पुरवणी मागण्यांवरील चर्चा घेण्यात यावी. परंतु त्या संदर्भात नियम स्थगित करण्यासंबंधीचा जो प्रस्ताव आहे तो मी आताच मांडू इच्छितो जेणे करुन त्यासाठी मला पुन्हा सभागृहात यावे लागणार नाही.

उपसभापती : ठीक आहे

श्री.दिलीप वळसे - पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 230(2) मधील पूरक मागण्यां सादर केल्यानंतर तीन दिवसांच्या आत त्यावरील चर्चा घेऊ नये अशा आशयाची तरतूद पूरक मागण्यांवरील चर्चेच्या संदर्भात स्थगित करण्यात यावी, असा प्रस्ताव नियम 289 अन्वये मी आपल्या अनुमतीने मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.ओटवणेकर

पृ.शी. : अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी. : सन 2009-2010 च्या अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

उपसभापती : आता अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस प्रारंभ होईल. ही चर्चा आज दिनांक 18 मार्च, 2009 रोजी होणार आहे. चर्चेसाठी एकूण जो वेळ उपलब्ध होईल त्यापैकी वित्त मंत्र्यांच्या उत्तरासाठी असलेला एक तास जमेस धरुन निम्मा वेळ सत्ताधारी पक्षांच्या सदस्यांकरिता आणि निम्मा वेळ विरोधी पक्षाचे सदस्य व स्वतंत्र सदस्य यांना देण्यात येईल. या अंतरिम अर्थसंकल्पावरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे. या चर्चेत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपली नावे आपल्या प्रतोदामार्फत माझ्याकडे त्वरित पाठवावी.

आता सन्माननीय विरोधी पक्ष नेते अर्थसंकल्पावर चर्चेला सुरुवात करतील.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, काल आघाडी सरकारने आपल्या सभागृहामध्ये जो अर्थसंकल्प मांडला आहे तो या सरकारचा शेवटचा अर्थसंकल्प आहे की काय अशा प्रकारचा भास आम्हाला झाला. देशामध्ये लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या म्हणून निवडणुकीच्या आचार संहितेचा भंग होऊ नये यास्तव या राज्याचा गाडा 3-4 महिने चालला पाहिजे म्हणून हा अंतरिम अर्थसंकल्प माननीय अर्थमंत्र्यांनी मांडला आहे. यामध्ये ज्या तरतुदी आहेत त्या केवळ कागदी तरतुदी ठरणार आहेत. म्हणजे या आर्थिक तरतुदींना तरतुदी न म्हणता निवडणुकीच्या तोंडावर केलेल्या भरमसाठ घोषणा म्हणावे लागेल. सभापती महोदय, काल माननीय अर्थमंत्र्यांचे अर्थसंकल्पाचे भाषण आम्ही मन लावून ऐकत होतो. त्यापूर्वी माननीय राज्यपालांनी केलेले अभिभाषण देखील आम्ही मन लावून ऐकले आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दे आणि या अंतरिम अर्थसंकल्पातील मुद्दे यामध्ये बरीच समानता होती. केव्हा केव्हा तर असे वाटत होते की, राज्यपालांचे अभिभाषणच अर्थसंकल्पीय भाषण म्हणून येथे वाचून दाखविण्यात येत आहे. खरे म्हणजे केवळ चारच महिन्यांसाठीचे हे अंतरिम बजेट आहे, असे असताना या चार महिन्यांसाठी कोठल्या तरतुदी यामध्ये करावयाच्या याचाच उल्लेख यात असला पाहिजे होता. परंतु तसे न करता लांबलचक भाषण माननीय अर्थमंत्र्यांनी केले आणि त्यात गेल्या चार वर्षातील आघाडी सरकारच्या कामांचा पाढा वाचला. म्हणजेच एक प्रकारे निवडणुकीच्या प्रचारामध्ये ज्या पद्धतीने भाषण करतात त्याच पद्धतीने येथे भाषण करण्यात आले. 2005 पासून या आघाडी सरकारने काय काय केले आहे, त्याचा किती लोकांना लाभ झालेला आहे आणि भविष्यात आमचे कोणते प्रस्ताव प्रस्तावित आहेत आणि त्याचा किती लोकांना लाभ होणार आहे याचा एक पाढाच या अंतरिम बजेटचा आधार घेऊन येथे मांडण्यात आला. या अर्थसंकल्पामध्ये माननीय वित्त मंत्र्यांनी नवीन असे काहीच दिलेले नाही. आम्हाला वाटत होते की, नव्या सरकारमध्ये नवे अर्थमंत्री आलेले आहेत तेव्हा ते नवीन पद्धतीने बजेट येथे मांडतील. परंतु गेल्या चार वर्षात या सरकारने काय काय केले, त्यातील किती असफल झाले याचे कागदी घोडे नाचविण्याचाच त्यांनी येथे प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, गेल्या चार वर्षात अंदाजपत्रके ही शिलकी मांडण्यात आली होती. परंतु या वर्षातील या अंदाजपत्रकामध्ये दाखविल्याप्रमाणे महसुली जमा ही 80,710.65 कोटी दाखविली

.... सी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे आणि महसुली खर्च हा 89,173.21 कोटी इतका दाखविला आहे. त्यामध्ये 8,462 कोटीची तूट दाखविली आहे. महसुली जमा आणि महसुली खर्च यामध्ये तफावत झाली आहे. हे खरे आहे की, जागतिक मंदीचा फटका साऱ्या देशाला बसला आहे तसाच तो या राज्यालादेखील बसला आहे. वार्षिक योजनेबाबत वस्तुत: आयोगाशी चर्चा आपली झालेली नाही. परंतु मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आणि आपण आपल्याच भाषणात सांगितल्याप्रमाणे या योजनेचे आकारमान 26 हजार कोटीचे दाखविण्यात आले. या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये या 26 हजार कोटी पैकी 10,606.74 कोटीच्या तरतुदी या ठिकाणी प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. त्यात 15,393.26 कोटीची ठोक तरतूद अजून प्रस्तावित केलेली आहे. सभापती महोदय, सुरूवातीलाच सांगितले आहे की, महसुली उत्पन्नात घट झाली आहे, मंदीची झळ निश्चितपणे आपल्यालाही पोहोचली आहे. त्यामुळे वर्ष अखेरीस जवळपास 2300 कोटीची घट येईल असा आपला अंदाज आहे. जानेवारी अखेर आपले अपेक्षित उत्पन्न 41,404 कोटी रूपयांचे आपण जमेस धरले होते. परंतु प्रत्यक्षात आपल्या तिजोरीत 39750 कोटी इतकी जमा झालेली आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे ... डी 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

यावरुन असे दिसून येते की, राज्याच्या उत्पन्नामध्ये घट झालेली आहे. ही घट याच वर्षी झाली आहे असे नाही तर गेल्या वर्षी सुध्दा झाली होती. गेली दोन वर्षे सतत या राज्याच्या उत्पन्नामध्ये घट होत आहे, अशाप्रकारची स्थिती या राज्यामध्ये निर्माण झाली आहे. ज्याप्रमाणे महसूली उत्पन्नातील घट वाढली आहे, त्याप्रमाणे राज्याच्या उत्पन्नामध्ये सुध्दा घट वाढलेली आहे. जानेवारी अखेर 1700 कोटी इतकी उत्पन्नामध्ये घट झाली असून मार्च अखेर 2500 कोटीपर्यंत ही घट जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सभापती महोदय, या राज्याचे तुटीचे अंदाजपत्रक सभागृहापुढे मांडीत असतांना आणि या राज्याला जागतिक मंदीचा फटका बसत असतांना राज्य शासनाने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींना मान्यता दिली आहे. एका बाजूला हे राज्य कर्जाच्या खाईत गेले असतांना दुसऱ्या बाजूला राज्यातील 14 लाख सरकारी कर्मचाऱ्यांकरिता सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. आणि त्याप्रमाणे 1 जानेवारी 2006 पासून या कर्मचाऱ्यांना वेतन संरचना लागू केली जाणार आहे. यामध्ये विना अनुदानित विद्यालये आणि महाविद्यालयातील कर्मचारी सोडून सर्व प्रकारच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये 20 ते 25 टक्के वाढ होणार आहे. सभापती महोदय, सन 2009-10 मध्ये सहाव्या वेतन आयोगाचा 8091 कोटींचा मोठा भार या शासनाला सोसावा लागणार आहे. त्याचप्रमाणे 1 जानेवारी 2006 पासून थकबाकीची रक्कम देण्याचे शासनाने मान्य केले असून थकबाकी रक्कमेच्या प्रदानापोटी 8370 कोटी रुपये या शासनाला द्यावे लागणार आहेत. या वेतन आयोगामुळे राज्याच्या तिजोरीवर जवळपास 26 हजार कोटींचा प्रचंड भार सहन करावा लागणार आहे. एका बाजूला राज्याचे कर्ज वाढत चालले असल्यामुळे हे राज्य आर्थिकदृष्टया दिवाळखोरीमध्ये चालले आहे. या राज्यावरील कर्जाचा बोजा 1 लाख 54 हजार कोटीपर्यंत गेला आहे. आणि दुसऱ्या बाजूला केंद्र शासनाने लागू केलेला सहावा वेतन आयोग आपल्या बोडक्यावर बसला आहे. यामुळे या राज्याच्या विकासासाठी आपल्या तिजोरीमध्ये पैसा शिल्लक राहणार आहे की नाही? असा प्रश्न सर्व सामान्य माणसाला पडला आहे. या राज्य शासनाला कर्जापोटी पैसे द्यावे लागणार आहेत, कर्जाचे हप्ते व त्यावरील व्याज द्यावे लागणार आहे. त्याचबरोबर आपल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये वाढ सुचविणारा सहाव्या वेतन आयोग लागू केल्यामुळे 8 हजार कोटी रुपयांचा भार आपल्याला सहन करावा लागणार आहे. अशापरिस्थितीत राज्याच्या विकासासाठी आपल्याकडे किती निधी शिल्लक राहणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. पांडुरंग फुंडकर....

आहे? एका बाजूला राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे घसघशीत वाढ देत असतांना आणि दुसऱ्या बाजूला घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे व व्याजाची परतफेड करणे यामधून आपण राज्याच्या विकास कामांसाठी किती निधी उपलब्ध करुन देणार आहात? याचा खुलासा मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये केला पाहिजे.

सभापती महोदय, गेल्या दोन वर्षापासून या राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत ढोल वाजविणे सुरु आहे. ही कर्जमाफीची संकल्पना कोठून आली? महाराष्ट्र राज्य हे देशामध्ये प्रगतिपथावरील अग्रगण्य राज्य असतांना गेल्या आठ वर्षात या राज्यात 5 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या. त्यामुळे हे महाराष्ट्र राज्य देशाच्या नाहीतर जगाच्या नकाशावर आले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या देशातील अन्नदाता शेतकऱ्याला आत्महत्त्या करावी लागत आहे. शेतकरी आत्महत्त्या कशासाठी करतो? यामागील कारण काय आहे? शेतकऱ्याकडे असलेल्या कर्जाची परतफेड न होणे हे एक प्रमुख कारण आहे. एकतर शेतकऱ्याला त्याच्या उत्पादन खर्चावर आधारित भाव दिला जात नाही. आणि त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला त्याचा उत्पादन खर्च वाढत चालला आहे. आणि तिसऱ्या बाजूला महागाई दिवसें दिवस वाढत चालली आहे. यामुळे उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ हा शेतकरी साधू शकलेला नाही. दिवसें दिवस हा शेतकरी कर्जामध्ये डुबत गेला आहे . त्यामुळे शेतकऱ्याला आत्महत्त्या कराव्या लागत आहेत. या आत्तमहत्त्येचा बोभाटा जगभर पसरल्यानंतर या देशाच्या माननीय पंतप्रधानांना जाग आली आणि या राज्य सरकारला जाग आली. खरे म्हणजे त्यावेळचे माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख हे सुरुवातीला जाहीरपणे सांगत होते की, या राज्यामध्ये शेतकरी आत्महत्त्या करीत नाहीत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पण नंतर वेगवेगळे आयोग स्थापन झाले, वेगवेगळया कमिट्या निर्माण झाल्या आणि जेव्हा या कमिट्यांनी आपापले अहवाल सादर केले, तेव्हा राज्य शासनाचे डोळे उघडले, केंद्र शासनाचे डोळे उघडले आणि मग या देशाच्या माननीय पंतप्रधानांना विदर्भामध्ये दौरा करावा लागला. माननीय पंतप्रधान विदर्भामध्ये तीन दिवस राहिले होते. मग त्यावेळी त्यांनी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. त्यानंतर राज्य शासनाने 1000 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. अशा प्रकारे एकंदर 4750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करुनही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नव्हत्या, त्यावेळी माननीय केंद्रीय अर्थमंत्र्यांनी बजेटच्या माध्यमातून 60 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर केली. परंतु ज्यादिवशी कर्जमाफी जाहीर झाली, त्याच दिवशी विदर्भातील 5 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.शेतकऱ्यांची अशी मागणी होती की, आमचा 7/12 चा उतारा कोरा करण्यात यावा आणि दुसरीकडे केंद्र शासनाने 5 एकराच्या आतील शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची योजना जाहीर केली. सुरुवातीला 60 हजार कोटी रुपयांची, त्यानंतर 71 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर केली. परंतु नंतर स्टेटमेंट बदलण्यात आले की, ही कर्जमाफी 3 टप्प्यामध्ये करण्यात येईल. म्हणजे सुरुवातीला असे सांगण्यात आले की, 5 एकराच्या आतील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार आहे. नंतर अशी घोषणा करण्यात आली की, 5 एकराच्या आतील शेतकऱ्यांना 3 टप्प्यामध्ये कर्जमाफी मिळणार आहे. मग ढोल वाजविण्यात आले, गुलाल उधळला गेला, पेढे वाटले गेले आणि या कर्जमाफीच्या घोषणेचे श्रेय घेण्यासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यामध्ये होड लागली.परंतु मी सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथीसाहेबांना सांगू इच्छितो की,कर्जमाफीची घोषणा झाल्यानंतर देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत.गेल्या वर्षी महाराष्ट्रामध्ये पुन्हा 1000 आत्महत्या झाल्या आणि माननीय अर्थमंत्री महोदय,आपण याठिकाणी बजेटमध्ये कर्जमाफीच्या बाबतीत लाखांची, कोटींची आकडेवारी देत आहात. माझी अशी मागणी आहे की, विदर्भातील, मराठवाड्यातील, पश्चिम महाराष्ट्रातील, उत्तर महाराष्ट्रातील एकंदर असे किती टक्के शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत याचा ब्रेक-अप देण्यात यावा. त्यावरुन असे लक्षात येईल की, या कर्जमाफीचा लाभ कोणाकोणाला झालेला आहे.विदर्भातील जिल्हा सहकारी बँकेमार्फत शेकऱ्यांना एकरी दोन हजार रुपये कर्ज दिले जाते.पण विदर्भामध्ये विद्युत नाही,सिंचन नाही आणि जे सिंचनाचे प्रकल्प हाती घेतलेले आहेत,त्यांची कामे रखडलेली आहेत.असे असताना 5 एकर जमीन

. . . .ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

असलेल्या शेतकऱ्याला 10 हजार रुपयांच्यावर कर्ज मिळत नाही. परंतु पश्चिम महाराष्ट्रामध्ये मात्र 2 एकर जमीन असलेल्या बागायतदार शेतकऱ्याला 4 लाख रुपयांचे कर्ज दिली जाते. आमच्याकडील आकडेवारीनुसार पश्चिम महाराष्ट्रातील पाच एकराच्या आतील जमीन असलेल्या शेतकऱ्यांना 5-10 लाख रुपयांची कर्ज माफी दिली, परंतु विदर्भातील शेतकऱ्याला 5-10 हजार रुपयांच्यावर कर्जमाफी दिली जात नाही. पश्चिम महाराष्ट्रामध्ये जमीनीची फोड झालेली आहे परंतु विदर्भामध्ये जमीनीची फोड झालेली नसल्यामुळे विदर्भामध्ये 5 एकराच्यावर जमीन असलेल्या शेतकऱ्यांची संख्या मोठया प्रमाणात आहे. त्यामुळेच विदर्भातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ झालेला नाही. राज्य शासनाने 6000 कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर केली. आपण अत्यंत हुशारीने जाहीर केले की, आम्ही 20 हजार रुपयापर्यंतचे कर्ज माफ करु. केंद्र शासनाच्या योजनेतून वगळलेल्या शेतकऱ्यांना ही कर्जमाफी दिली जाईल. तसेच 20 हजार रुपयापर्यंतचे कर्ज शासनाकडून भरले जाईल. परंतु हे कसे घडणार ? जर शेतकऱ्यावर 80 हजार रुपयांचे कर्ज असेल आणि त्यापैकी 60 हजार रुपये संबंधित शेतकऱ्याने भरले तरच उरलेले 20 हजार रुपये शासन भरणार आहे, अशा प्रकारची अट घालण्यात आली. परंतु विदर्भातील शेतकऱ्यांना या कर्जमाफी योजनेचा लाभ देखील मिळालेला नाही. आपल्याला असे वाटत असेल की, या कर्जमाफीच्या मुद्दा समोर ठेऊन आपण निवडणुकीला सामोरे जाऊ. पण जेव्हा तुमच्यावर विदर्भातील, मराठवाड्यातील गावा-गावांमध्ये जाण्याची वेळ येईल, तेव्हा माननीय अर्थमंत्री श्री.दिलीप वळसे-पाटीलसाहेब, आपल्या लक्षात येईल की, आपण केलेल्या घोषणा किती फसव्या ठरलेल्या आहत. जर शेतकऱ्यांना प्रामाणिकपणे कर्जमाफी द्यावयाची असेल तर आमची अशी मागणी आहे की, शेतकऱ्यांचा 7/12 कोरा करण्यात यावा आणि मगच आपण शेतकऱ्यांचे कैवारी असल्याचे श्रेय घ्यावे, असे मला सांगावयाचे आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा 7/12 कोरा केलाच पाहिजे.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

श्री. पांडुरंग फंडकर....

सभापती महोदय, बजेट मांडत असताना अर्थमंत्री श्री. दिलीप वळसे-पाटीलसाहेबांनी निश्चितपणे कर्जमाफीचा आढावा घेतलेला आहे. नैसर्गिक आपत्तीचा देखील त्यामध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे. सन 2005 पासून या महाराष्ट्रात महापूर आला, गारपीट झाली आणि महाराष्ट्रातील पीकांवर रोगराई आली. सन 2005 ते 2008 चा आढावा या ठिकाणी दिला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील शेतक-यांना एक हजार कोटीच्या वर पैसे दिले असे सांगण्यात आले आहे पण श्री. पाटीलसाहेब अजूनही विदर्भातील अनेक जिल्हे असे आहेत की, त्या ठिकाणी शेतकक-यांच्या खरडून गेलेल्या जमिनीचे पैसे पाच वर्षापासून त्यांना मिळालेले नाहीत. शेतक-यांच्या पीकावर लष्करीअळीचा प्रादुर्भाव झाला. संपूर्ण रेनापूर तालुक्यातील पीक लष्करीअळीने खाऊन टाकले. मी त्या तालुक्यात गेलो होतो. त्याठिकाणी 25 हजार शेतक-यांचा मोर्चा निघाला होता. त्या मोर्चातील लोकांनी लष्करीअळीच्या प्रादुर्भावाने झालेल्या नुकसानीच्या भरपाईची मागणी केली होती. लष्करीअळीचा प्रादुर्भाव केवळ लातूर जिल्हयातच झाला नाही. तुम्ही विदर्भापर्यंत आला नाहीत. विदर्भातील बुलढाणा जिल्हयात, अमरावती जिल्हयात, अकोला जिल्हयातही लष्करीअळीचा प्रादुर्भाव झालेला आहे. पण लातूर जिल्हयातील रेनापूर तालुक्यातील शेतक-यांनी मोर्चा काढला त्यामुळे माननीय विलासराव देशमुख यांनी परदेशातून फोन केला आणि दुस-याच दिवशी रेनापूर तालुक्यातील शेतक-यांना अनुदान मान्य झाले आणि आठ दिवसाच्या आत चेकचे वाटप करण्यात आले. लातूर जिल्हयातील रेनापूर तालुक्यातील शेतक-यांना लष्करीअळीमुळे झालेल्या नुकसानभरपाईचे पैसे मिळाले परंतु विदर्भातील शेतक-यांना अजूनपर्यंत लष्करीअळीमुळे झालेल्या नुकसानभरपाईचे पैसे मिळालेले नाहीत. लष्करीअळीच्या प्रादुर्भावामुळे झालेल्या नुकसानभरपाईसठी एक हजार ते बाराशे कोटी रुपये खर्च केल्याचे दाखविण्यात आले आहे. तेव्हा हे पैसे कोठे खर्च करण्यात आले आहेत ते सांगण्यात यावे. माननीय अर्थमंत्री यापूर्वी ऊर्जामंत्री होते. त्यामुळे त्यांना विजेची परिस्थिती माहीत आहे. या विजेचा विषय या सभागृहात गेल्या पाच-सहा वर्षापासून मांडण्यात येत आहे. खरे म्हणजे या विषयी कितीही बोला, कोळसा कितीही उगाळला तरी काळाच निघणार आहे. निवडणुकीला सामोरे जात असताना किमान या गोष्टीचा खुलासा करण्यात यावा. शासनाकडे महाराष्ट्रातील शेतक-यांचे विद्युत कनेक्शनचे किती अर्ज पेंन्डिग आहेत? पाच लाख शेतकरी विद्युत कनेक्शन मागत आहेत पण शासन त्या शेतक-यांना विद्युत कनेक्शन देऊ शकत नाही, अशी आज

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

महाराष्ट्र शासनाची परिस्थती आहे. असे असताना सांगण्यात येते की, विजेची परिस्थिती दुरुस्त होत आहे. पारस येथील विद्युत निर्मिती केंद्रातून 250 मेगॅवॅट इतक्या विजेची निर्मिती करण्यात येईल. परळी येथील विद्युत निर्मिती केंद्रातून 250 मेगॅवॅट इतक्या वीजेची निर्मिती करण्यात येईल, असे सांगण्यात येते. परंतु अद्याप पारस येथील विद्युत निर्मिती 70 मेगॅवॅटच्या पुढे गेलेली नाही. परळी येथील विद्युत निर्मिती 100 मेगॅवॅटच्या पुढे गेलेली नाही परंतु आश्वासन देण्यात येते की, महाराष्ट्राला नश्चितपणे विजेचा पुरवठा करण्यात येईल. संपूर्ण महाराष्ट्र अंधारात आहे. लोडशेडिंग अद्याप कमी झालेले नाही. लोडशेडिंग कमी करण्यासाठी सिंगलफेज योजना आणली. खेडयापाडयात फिडर योजना आणली परंतु ग्रामीण भागातील लोडशेडिंग अद्याप कमी झालेले नाही. ग्रामीण भागातील शेतक-यांना वीज मिळत नाही, दुस-या बाजूला शहरी भागातील उद्योगांना वीज मिळत नाही अशा पध्दतीची अवस्था निर्माण झालेली आहे. महाराष्ट्रातील माणसाला वीज देण्याच्या बाबतीत शासनाने कितीही भाषणे केली आणि ढोल बडवले तरी वीज मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा आमचे सरकार महाराष्ट्रातील शेतक-यांना गेल्या दहा वर्षात वीज देण्यास असमर्थ ठरले आहे, फेल झालेले आहे, परीक्षेत नापास झालेले आहे हे मोकळया मनाने एकदा मान्य करा. एका बाजूला विजेची ही परिस्थिती आहे तर दुस-या बाजूला कापसाच्या बाबतीत तीच परिस्थिती आहे. काल अर्थसंकल्पावरील भाषणात याबाबतचा उल्लेख करण्यात आलेला आहे. आम्ही दुर्दैवी लोक आहोत आम्ही कापूस पिकणा-या भागात राहतो. या वर्षी शेतक-यांचा कापूस कापूस पणन महासंघाने खरेदी केला नाही. शेतक-यांचा कापूस खरेदी करण्याची कापूस पणन महासंघाची दानत नव्हती म्हणून नाफेडने एजंट म्हणून कापूस खरेदी करायला सुरुवात केली आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

कापसाला 3 हजार रुपये भाव जाहीर केला परतु शेतकऱ्यांच्या हातामध्ये 2800 रुपये भाव दिला. चुकारे वेळेवर दिले नाहीत. शेतकऱ्यांना पंधरा पंधरा दिवस चकरा माराव्या लागल्या. शेतकऱ्यांना कापसाचे चुकारे मिळालेले नाहीत. त्यातून आत्महत्या वाढलेल्या आहेत. दुसऱ्या बाजूला पणन महासंघाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या कापसाची जी खरेदी झाली त्या योजनेमध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला, लुटालूट झाली. राष्ट्रीय उत्पन्न असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या कापसाला आगी लावण्यात आल्या. या शासनाने कापसाचे मातेरे केले. माझ्याकडे एका सुशिक्षित, ॲडव्होकेट असलेल्या शेतकऱ्याचे पत्र आहे. 'सकाळ' वर्तमानपत्रामध्ये 'ॲग्रोवन' नावाचे सदर असते. त्यामध्ये त्याने संपादकाला पत्र लिहिले आहे. त्या पत्रामध्ये त्याने असे म्हटले आहे की, " माननीय संपादक यांस, मी एक उच्चशिक्षित शेतकरी आहे. वकिलीची पदवी घेतली परंतु शेतीची आवड असल्यामुळे वकिलीची सनद घेतली नाही. शेती हाच धर्म स्वीकारला. 'ॲग्रोवन' मधील एका लेखाच्या आधारे दोन एकर द्राक्ष बाग लावली. शेतीचे हे पहिलेच वर्ष आहे. साधारणपणे 20 टन उत्पादन निघेल असा माझा अदांज आहे. शेतकऱ्यांना शेती करताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. माझ्या असे लक्षात आले की, एकीकडे नव्या शेतकऱ्यांना 'नव्या वाटा' दाखविल्या जातात तर दुसरीकडे जुन्या वाटेवर अनेक समस्या उभ्या केल्या जातात. सुशिक्षित तरुण पिढीच्या शेतकऱ्यांना एवढी हालअपेष्टा सोसावी लागत असेल तर मग अडाणी शेतकऱ्यांचे काय हाल झाले असतील याचा विचारच न केलेला बरा. 'ॲग्रोवन' च्या 3 मार्च रोजीच्या अग्रलेखात कापूस खरेदीच्या घोळावर प्रकाश टाकला आहे. कापूस खरेदीचा कोट्यवधी रुपयांचा घोळ घालून पैशांचा मेळ कसा लावला जातो याचा अनुभव एक शेतकरी या नात्याने आला. 26 फेब्रुवारी रोजी दुपारी 1.00 वाजता मी खरेदी केंद्रावर ट्रॅक्टर घेऊन गेलो. केंद्र गावापासून जेमतेम 20 कि.मी. वर आहे. 3.00 वाजेपर्यंत कोणताही कर्मचारी आला नाही किंवा विचारपूस झाली नाही. मी कार्यालयाकडे गेलो, विचारपूस केली. 'आवक रजिस्टरला नोंद करा' असे सांगितले. मी 3.00 वाजता नोंद केली. त्यानंतर वाहनांची संख्या थोडी असल्यामुळे मी 5.00 वाजता माझा क्रमांक कितवा आहे हे विचारण्यासाठी गेलो. विचारपूस केली तर उत्तर मिळाले, "विक्रीची गरज असेल तर थांबा, अन्यथा तुम्ही परत जा,

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

आम्हाला तुमच्यासारख्या शेतकऱ्यांची गरज नाही." मी पुन्हा नम्रतेने विचारले, माझा नंबर कितवा आहे ? त्यांनी बेधडक उत्तर दिले, "आपला 36 वा क्रमांक आहे." मला राग आला व मी प्रतिप्रश्न केला, "आवक रजिस्टरवर नोंद झालेल्या वाहनांचे क्रमांक दाखवा." त्या कर्मचाऱ्याने चिडून माझ्यासमोर रजिस्टर टाकले व म्हणाला, 'मोजा किती गाड्या आहेत.' मी गाड्या मोजल्या. माझा नंबर 36 वा होता पण खरेदी केंद्रावर उभ्या असलेल्या वाहनांची संख्या फक्त 12 होती. त्यांचे नंबर मी स्वत: टिपून घेतलेले होते. पुन्हा त्यांना विचारले की, थांबलेली वाहने 12 आहेत, माझा नंबर 36 वा कसा ? नंतर लक्षात आले की, वाहन आवक क्रमांक टाकताना मध्येच बोगस नंबर टाकलेले आहेत. मी विचारले की, मधली जागा रिकामी कशामुळे सोडली आहे ? त्यावर "आमचे काम आमच्या पध्दतीनुसार करु द्या, आम्ही साहेबांच्या आदेशानुसार काम करतो" असे उत्तर आले. पुढे त्यांनी असे लिहिले आहे की, "मी नंतर त्या बाराही वाहनचालकांना सोबत घेऊन कार्यालयीन प्रमुख ग्रेडर यांच्याकडे गेलो. ग्रेडर अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. त्यांनी "माझा काहीही संबंध नाही, तो प्रश्न कृषी उत्पन्न बाजार समितीचा आहे" असे उत्तर दिले. तितक्यात एक कर्मचारी मला म्हणाला, "तुझा रजिस्टर बघण्याचा काय संबंध आहे ?" हा प्रकार घडेपर्यंत मला तिथेच 6.00 वाजले. तोपर्यंत व्यापा-यांची दहा ते बारा वाहने बिनदिक्कत घुसली. वजने झाली व निघून गेली. दुसऱ्या दिवशी खरेदी केंद्रावर गेलो. माझा ट्रॅक्टर जागेवरच होता." ही अवस्था एका वकिलाची आहे. विदर्भामधील कापूस उत्पादक शेतकऱ्यांची अशीच अवस्था झाली आहे. माननीय वित्त मंत्र्यांना सांगू इच्छितो की, आतापर्यंतच्या इतिहासामध्ये मार्च महिन्यामध्ये कधीही कापूस खरेदी बंद झाली नाही. परंतु यावेळी विदर्भातील सर्व कापूस खरेदी मार्च महिन्यामध्ये बंद करुन टाकली आहे. सीसीआयची खरेदी बंद आहे. शेतकऱ्यांचा कोणताही कापूस पणन महासंघाच्या माध्यमातून खरेदी केला जात नाही.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेतक-याला वा-यावर सोडण्याचे काम या शासनाने केलेले आहे. आपण कापूस खरेदी योजनेचे श्रेय घेता. परंतु या वर्षाच्या हंगामामध्ये या कापूस खरेदी योजनेमध्ये कोटयवधी रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे. या भ्रष्टाचाराची चौकशी झाली पाहिजे अशा प्रकारची मागणी मी या ठिकाणी करीत आहे.

सभापती महोदय, मी आणखीन दोन-तीन महत्वाचे मुद्दे मांडणार आहे. आपण 81065कोटीची गुंतवणूक असणारे आणि 1.88 लाख लोकांना रोजगार देणारे 697 प्रकल्पांचे प्रस्ताव केन्द्र सरकारकडे पाठविण्यात आल्याचे सांगितले आहे. माझा प्रश्न असा आहे की, आपण नवीन 697 प्रकल्पांचे प्रस्ताव केन्द्राकडे पाठवित असताना किती जुने प्रकल्प बंद पडलेले आहेत याची आकडेवोरी मात्र दिलेली नाही. गेल्या दोन वर्षामध्ये महाराष्ट्रातील किती उद्योग विजेअभावी, भागभांडवला अभावी बंद पडलेले आहेत ? किती कामगार बेकार झालेले आहेत ? हे शासनाने आकडेवारीसहीत सांगितले असते तर बरे झाले असते. उद्योगाच्या बाबतीत ही दयनीय परिस्थिती, विजेच्या बाबतीतही तीच परिस्थिती आणि कापसाच्या बाबतीतही तशीच परिस्थिती आहे. वीज निर्मितीच्या बाबतीत या राज्याच्या विविध ऊर्जा मंत्र्यांनी हे मान्य केलेले आहे की, 2012 पर्यन्त हे महाराष्ट्र अंधारातून बाहेर पडू शकणार नाही.

सभापती महोदय, तंटामुक्त गावाची योजना या शासनाने जाहीर केली. या तंटामुक्त गाव योजनेमध्ये ज्या गावांचे नंबर आले त्या गावांना बक्षिसाच्या स्वरुपात धनादेश देण्यात आले. परंतु हे धनादेश जेव्हा बँकेत टाकण्यात आले त्यावेळी ते वठलेच नाहीत. अनेक जिल्ह्यामध्ये धनादेश न वठण्याचे प्रकार घडलेले आहेत. असे असताना हे शासन मात्र धनादेश वाटल्याचे सांगून आपली पाठ थोपटून घेत आहे.

सभापती महोदय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती यांच्या विषयी या शासनाला किती कळवळा ! सन 2004-05मध्ये अनुसूचित जातीसाठी 589 कोटी रुपयाची तरतूद दाखविलेली होती. कालच्या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये आम्ही किती उंच उडी मारलेली आहे हे अर्थ मंत्र्यांनी दाखवून दिलेले आहे. पण ही उंच उडी का मारलेली आहे ? तर महिन्याभरावर लोकसभेच्या निवडणुका आलेल्या आहेत म्हणून ही उडी मारलेली आहे. अनुसूचित

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

जाती, अनुसूचित जमातीच्या लोकांना आमिष दाखवून त्यांची मते घेण्याचा हा सरकारचा डाव आहे असे मी म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. अनुसूचित जातीसाठी सन 2004-2005मध्ये 589 कोटीची तरतूद करण्यात आली होती आणि आता सन 2009-2010साठी त्यांच्यासाठी 1300 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. अनुसूचित जमातीसाठी सन 2004-2005मध्ये 480 कोटीची तरतूद करण्यात आली होती आणि आता सन 2009-2010मध्ये 2200 कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. विमुक्त आणि भटक्या जातीसाठी सन 2004-2005मध्ये 404 कोटीची तरतूद करण्यात आलेली होती आणि सन 2009-2010मध्ये 726 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. अनुसूचित जाती जमातीसाठीची तरतूद एकदम शेकडो कोटीनी वाढविण्या इतपत असे काय घडले ? ही तरतूद वाढविण्या मागचे कारण एकच आहे आणि ते म्हणजे परवा होणा-या निवडणुका. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती आणि भटक्या जमातीच्या लोकांची मते पदरात पाडून घेण्यासाठी हजारो कोटी रुपयाची तरतूद या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये दाखविण्यात आलेली आहे. सभापती महोदय, मागील वर्षी समाजकल्याण विभागावरची तरतूद कृष्णा-खोरे प्रकल्पासाठी वळविण्यात आली. समाजकल्याणासाठी कागदोपत्री पैशाची तरतूद करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात ती त्याना मिळालीच नाही. याही वर्षी तीच पुनरावृत्ती होईल.

सभापती महोदय, तीर्थक्षेत्राच्या बाबतीत आपपर भाव केला जात आहे. देहू-आळंदी-भंडारा डोंगर या पालखी मार्गाला पैसे दिले. त्याचे मी समर्थन करतो. त्यासाठी पैसे दिलेच पाहिजे. कारण आम्ही देखील ती मागणी केलेली होती. हे पैसे दिलेत, फार चांगले केले. परंतु त्याच बरोबर ज्याला विदर्भातील पंढरी म्हटले जाते त्या संत गजानन महाराजांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. महाराष्ट्रातून रोज सरासरी 20 हजार भाविक शेगावला गजानन महाराजांच्या दर्शनासाठी येतात. हे जन्म शताब्दी वर्ष अल्यामुळे या तीर्थक्षेत्री जवळपास 2 कोटी भाविक येण्याची शक्यता आहे. शेगाव हे छोटेसे तालुका वजा खेड्याचे गाव आहे. त्या ठिकाणी येणा-या भाविकांसाठी पिण्याच्या पण्याची सोय नाही, राहाण्याची पुरेसी सोय नाही. देवस्थानने केलेल्या व्यवस्था ह्या तुटपुंज्या आहेत. येथील देवस्थान समितीने सरकारकडे एक प्रस्ताव पाठविलेला आहे. त्यामध्ये अशी विनंती केलेली आहे की, गजानन महाराजांचे हे शताब्दी वर्ष असल्यामुळे शेगाव येथे नांदेडच्या धर्तीवर एक प्राधिकरण करण्यात यावे.

...नंतर श्री. गिते....

अशोधित प्रत / अशोधित प्रत नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

स्वतंत्र प्राधिकरणासंबंधीचा 400 कोटी रुपयांचा प्रस्ताव राज्य सरकारकडे आलेला आहे त्यास तात्काळ मान्यता द्यावी अशा प्रकारची मी या ठिकाणी मागणी करतो. या ठिकाणी स्वतंत्र प्राधिकरण तयार करण्यासंसबंधीचा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर मान्यतेसाठी लवकर सादर करावा या अनुषंगाने संबंधित विभागाच्या अधिका-यांना सरकारने आदेश द्यावेत अशीही मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, काल माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी या सभागृहात अर्थसंकल्प सादर केला. त्यानंतर मी माननीय वित्त राज्यमंत्र्यांना सांगितले की, तुम्हाला पंढरपुर तीर्थक्षेत्राची आठवण झाली. तुम्हाला देहू तीर्थक्षेत्राची आठवण झाली. तुम्हाला तुळजापुर तीर्थक्षेत्राची आठवण झाली. ज्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी संपूर्ण देशाला जागवले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी या देशात समानतेची भावना या देशात रुजविली. त्यांनी या संपूर्ण देशात बंधूभाव रुजविला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून या देशातील सर्व समाजाला जागविण्याचे काम केले आहे. या देशात व्यसनमुक्त समाज निर्माण झाला पाहिजे असा प्रचार आणि प्रसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी केला. त्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे सुध्दा शताब्दीचे हे वर्ष आहे. त्यांचे शताब्दी वर्ष साजरे करण्यासाठी शासनाने कमिटी जाहीर केली आहे. परंतु त्या कमिटीची आजपर्यंत एकही बैठक झाली नाही. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाच्या जन्म गावातील लोक आम्हाला विचारतात की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जन्मशताब्दी वर्ष या सरकारने कसे साजरे करण्याचे ठरविले आहे. परंतु सरकारने यासंदर्भात काहीही भूमिका घेतलेली नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण या सभागृहात जाहीर केले तसेच एका मेळाव्यात जाहीर केले की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या समाधी शताब्दी वर्षामध्ये महाराष्ट्र सरकार पुढाकार घेणार असून शेगावच्या विकास आराखडयास मान्यता देण्याचा प्रयत्न करेल. परंतु जाहीर केलेल्या आश्वासनाची कोणत्याही प्रकारची पूर्तता झालेली नाही. या अनुषंगाने एकही बैठक सरकारकडून घेण्यात आलेली नाही. यासंदर्भात समित्या स्थापन केल्या, परंतु त्या समित्यांच्या देखील बैठका झालेल्या नाहीत. आपण राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना विसरलो की काय अशा प्रकारचा एक संभ्रम निर्माण झालेला आहे. संत गाडगे महाराज आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या नावाने सरकारकडून योजना चालविल्या जातात. दोन शैक्षणिक

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

विद्यापीठांना त्यांची नावे देण्यात आलेली आहेत. परंतु शासनाच्या गॅझेटमध्ये या दोघाही संताच्या पुण्यतिथीचा उल्लेख करण्यात आलेला नाही. या अनुषंगाने मी सरकारला अशी विनंती करतो की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराजांच्या पुण्यतिथीचा उल्लेख शासनाच्या गॅझेटमध्ये करावा.

सभापती महोदय, जगतगुरु तुकोबारायांच्या पुण्यतिथीला 400 वर्षे झाली आहेत म्हणून ते वर्ष आपण साजरे करीत आहोत. संत गाडगे महाराजांचे नाव अमरावती विद्यापीठाला दिले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नाव नागपूर विद्यापीठाला दिले, त्याप्रमाणे पुणे विद्यापीठाला "संत तुकाराम महाराज" यांचे नाव देण्यात यावे अशा प्रकारची मागणी या निमित्ताने करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, अंतरिम अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. अंतरिम अर्थसंकल्पात महसुली जमा किती, महसुली खर्च किती, त्या संदर्भातील तोटा किती यासंबंधीचे आकडे नमूद केलेले आहेत. सध्या फक्त चार महिन्याचा अर्थसंकल्प सभागृहात मांडण्यात आला आहे, त्यात वेतन, चालू असलेल्या योजना त्यासंदर्भातील आकडेवारी आपल्याला दिसून येईल. देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य आणि देशातील एकमेव राज्य आहे की, या महाराष्ट्र सरकारने शेतक-यांचे कर्ज माफ करण्यासंदर्भात 6208 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. एवढी प्रचंड तरतूद देशातील कोणत्याही राज्य सरकारने केलेली नाही. शेतक-यांचे कर्ज माफ करण्यासाठी प्रचंड तरतूद केली त्यामुळे मी राज्य शासनाने अभिनंदन करतो. या कर्जमाफीचा लाभ मोठया प्रमाणात शेतक-यांना मिळणार आहे. राज्य शासनाच्या या निर्णयाचे विरोधी पक्षाने अभिनंदन केले असते तर आम्हा सर्वांना जास्त आनंद झाला असता. ज्या शेतक-यांनी वेळेवर कर्ज भरलेले आहे, ज्या शेतक-यांचे 7/12 कोरे आहेत, अशा शेतक-यांना देखील 20 हजार रुपये मदत देण्यासंदर्भातला ऐतिहासिक आणि क्रांतीकारक निर्णय या सरकारने घेतला आहे.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भातील मुद्दा मांडला आहे. मी तो मुद्दा खोडून काढण्यासाठी उभा राहिलेलो नाही. त्या संदर्भात राज्य शासनाला आणखी काही करावयाचे असेल तर त्याचा जरुर विचार करावा. सर्वांची ती सामुदायिक जबाबदारी आहे. शेवटी शेतकरी हा आपला केंद्रबिंदू आहे, आपला प्राणबिंदू आहे. त्यादृष्टीने आणखी ज्या योजना आणावयाच्या असतील त्या आणण्याचा निश्चितपणे राज्य शासनाने प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, मी राज्य शासनाचे अभिनंदन करतो. शासनाने एकही कर वाढविलेला नाही. कोणत्याही करामध्ये वाढ केलेली नाही. नवीन कर आणलेला नाही. हे मंदीचे वर्ष आहे. वॅटचे उत्पन्न घटत आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन, मंदी हे आव्हान समजून उपाययोजना केल्या पाहिजेत. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी सांगू इच्छितो की, नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये मंदीच्या विषयावर आपण सभागृहात दोन-तीन तास वैचारिक चर्चा केली. त्या चर्चेला कोणतेही राजकीय स्वरुप दिले गेले नाही. राज्याला या मंदीच्या बाहेर काढण्याच्या संदर्भात कोणकोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत या संदर्भात चर्चा केली. मंदी असून देखील नवीन कर नाही, करामध्ये वाढ नाही आणि खर्च वाढलेला आहे. शेतकऱ्यांची 6208 कोटी रुपयांची कर्जमाफी करीत असताना राज्य शासनाच्या कर्मचारी आणि अधिकारी यांच्या वेतनवाढीमुळे देखील 6000 कोटी रुपयांचा खर्च वाढणार आहे. वेतन आयोगाची अंमलबजावणी भूतलक्षी प्रभावाने केली जाणार आहे. हा अधिक खर्चाचा आर्थिक बोजा राज्य शासनाला सोसावा लागणार आहे. माननीय वित्तमंत्र्यांनी नव्याने हे खाते स्वीकारले आहे. अत्यंत चांगली सुरुवात केलेली आहे. परंतु खर्च वाढत आहे. त्या संदर्भात मंत्रीमहोदयांना निश्चितपणे लक्ष द्यावे लागणार आहे. योजनेतर खर्चात वाढ झाली आहे. योजनेतर खर्चातील वाढ ही 12743 कोटी रुपये इतकी आहे. कर्ज वाढले आहे. 1.66 लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. योजनेतर खर्चात वाढ होत असताना हे मंदीचे वर्ष आहे तसेच शेतकऱ्यांचे 6208 कोटी रुपयांचे कर्जमाफ केले आहे. सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन वाढणार आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन उत्पन्न कसे वाढेल, महसूल कसा वाढेल आणि वाढलेल्या उत्पन्नाच्या माध्यमातून राज्यातील 10 कोटी जनतेला सामाजिक न्याय देण्याचा अत्यंत महत्वाचा विचार आपल्याला करावा लागणार आहे. योजनेतर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

खर्चात वाढ झाली असून त्यामध्ये वेतन 9397 कोटी रुपये, व्याज 2044 कोटी रुपये, निवृत्तीवेतन 499 कोटी रुपये आणि वेतनेतर सहाय्यक अनुदान 801 कोटी रुपये अशाप्रकारे 12743 कोटी रुपयांची योजनेतर खर्चात वाढ झाली आहे. याची गरज नव्हती असे मी म्हणणार नाही. हे करावेच लागणार आहे. परंतु यादृष्टीने निश्चितपणे राज्य शासनाला विचार करावा लागेल ही वस्तुस्थिती आहे. उत्पन्न वाढविण्याच्या संदर्भात विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी कापसाचा मुद्दा मांडला आहे. नाफेडने कापूस खरेदी सुरु केली. या विषयाचा अर्थसंकल्पाशी प्रत्यक्ष संबंध नसला तरी नाफेडने कापसाची खरेदी सुरु केली नसती तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना 2300 ते 2400 रुपये प्रती क्विंटल या दराने कापूस विकावा लागला असता. नाफेडने 2800 रुपये इतका दर दिला. एखाद दुसऱ्या शेतकऱ्याला 3000 रुपये इतका दर मिळाला असला तरी सर्वसाधारणपणे 3000 रुपये हा दर शेतकऱ्यांना मिळाला नाही. नाफेडने तो दिला नाही ही वस्तुस्थिती आहे. 2300 ते 2350 या दराने विकला जाणारा कापूस नाफेडने 2800 रुपये दराने खरेदी केला. त्यामुळे शेतकऱ्यांना मंदीच्या वर्षात आर्थिक सहाय्य मिळाले. गहू, सोयाबीन, धानाला शासनाच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य मिळाले. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मंदीचा फटका कमी प्रमाणात बसला ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

सभापती महोदय, विकास करावयाचा असेल तर स्थैर्य पाहिजे. स्थैर्यासाठी संरक्षणाची आवश्यकता आहे. मुंबईमध्ये 26 नोव्हेंबर, 2008 रोजी जी घटना घडली तिची पुनरावृत्ती होणार नाही या संदर्भातील दक्षता राज्य शासनाने घेतली पाहिजे. हे काम केवळ राज्य शासनाचे आहे असे मी म्हणणार नाही. सागरी क्षेत्राचे संरक्षण करीत असताना नेव्ही, कोस्टगार्ड आणि त्यानंतर राज्य शासनाचा यामध्ये संबंध येतो. राज्य शासनाने फोर्स-1 गटाची स्थापना केली आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

अशुद्धीत मत / शोधनेसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी शासनाने 126 कोटी रुपयाची अतिरिक्त तरतूद केली आहे. ही रक्कम त्वरित गृह विभागाला शासनाने द्यावी अशी माझी सूचना आहे. परंतु केवळ तरतूद करुन चालणार नाही कारण गुन्हेगारांजवळ असलेली शस्त्रे आपल्या पोलिसांकडिल शस्त्रांपेक्षा अत्याधुनिक स्वरुपाची आहेत. त्यासाठी आपल्या पोलिसांकडे सुध्दा अशीच अत्याधुनिक शस्त्रे पाहिजेत. म्हणून माननीय अर्थमंत्र्यांनी ही रक्कम गृह खात्याला देण्यासंबंधीची कार्यवाही करावी. त्याचबरोबर पोलीस दलात 11021 पदे निर्माण करावयाची आहेत त्याचाही विचार त्वरित होणे आवश्यक आहे.

महोदय, राज्यशासनाने मी पुन्हा मिहान प्रकल्पाच्या संदर्भात अभिनंदन करणार आहे. परंतु या मिहान प्रकल्पाची नेमकी गती काय आहे, सद्य:स्थिती काय आहे याची माहिती मिळणे आवश्यक आहे. शासनाने महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरण या कंपनीच्या माध्यमातून 5000 कोटी रुपये मिहानला देऊन नागपूर शहरात विशेषत: विदर्भातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने, औद्योगिक दृष्ट्या त्याचप्रमाणे रोजगार निर्मितीच्या संदर्भात या मिहान प्रकल्पाला गती देण्याचे काम केले आहे. हा मिहान प्रकल्प विदर्भासाठी अत्यंत चांगला व महत्वाचा प्रकल्प असून त्याचा फायदा सर्वसंबंधितांना मिळेल यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत, अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

महोदय, विजेच्या संदर्भात माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यांची बाजू सभागृहात मांडली. निश्चितपणे आज राज्यात विजेची टंचाई आहे व हे कोणालाही नाकारता येत नाही पण त्याच अनुषंगाने शासनाने यावर्षी पायाभूत सुविधांसाठी 163 कोटी रुपये दिलेले आहेत, त्याबद्दल माननीय अर्थमंत्र्यांचे मी अभिनंदन करुन पुढील अतिरिक्त अर्थसंकल्पात ही रक्कम वाढवावी अशीही मी त्यांना विनंती करतो. त्यात सिंगल फेजिंगसाठी 164 कोटी, सहवीज निर्मितीसाठी 11 कोटी दिलेले आहेत. म्हणजे शासनाने जी योजना आखली आहे, जी दिशा ठरविलेली आहे ती अत्यंत चांगल्या पध्दतीची आहे, असेच मी म्हणेन.

यानंतर आदिवासींच्या विकासासाठी गेल्या पाच वर्षात शासनाने 12920 कोटी रुपये एवढी रक्कम दिलेली आहे. त्यासंबंधी काही मुद्दे देखील या ठिकाणी मांडण्यात आले. माननीय विरोधी पक्षनेते म्हणाले की, डोळ्यासमोर आहेत म्हणून ही रक्कम देण्यात आली. परंतु मला या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

अनुषंगाने ही बाब निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, 12 वर्षापूर्वी माननीय शरद्चंद्रजी पवार मुख्यमंत्री होते त्याच वेळेस अर्थसंकल्पाच्या 9 टक्के रक्कम अनुसूचित जमातीच्या विकासासाठी राखीव ठेवण्यासंबंधीचा निर्णय घेण्यात आला होता. त्याची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे झाली. त्याचा निवडणुकीशी संबंधी जोडणे हे मला योग्य वाटत नाही. थोडक्यात आदिवासींच्या विकासाबाबत चांगल्या प्रकारचे कार्य राज्यशासनाच्या माध्यमातून चालू आहे, ही वस्तुस्थिती आहे.

महोदय, अल्पसंख्यांकांच्या विकासासाठी शासनाने 167 कोटीची तरतूद यावर्षी केली आहे. सच्चर समितीचा अहवाल आल्यानंतर आपणा सर्वांचे डोळे उघडले की अल्पसंख्यांक समाज आजही कुठल्या परिस्थितीत आहे? गेल्या 50-55-60 वर्षाच्या काळात देखील या समाजाचे हवे तसे उन्नयन झालेले दिसत नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. म्हणून या समाजाच्या विकासासाठी जी तरतूद केली ती अत्यंत योग्य आहे, असेच मी म्हणेन. रस्ते, आरोग्य, ग्रामीण व नागरी विकास, आदिवासींचा विकास यासंदर्भात राज्यशासनाने गेल्या पाच वर्षातील असेल अथवा मागील दोन तीन वर्षाच्या काळातील असेल ती तरतूद अत्यंत उच्च श्रेणीची आहे.

महोदय, औद्योगिक गुंतवणुकीसंबंधी वेगवेगळे आकडे पुढे येतात. वास्तविक औद्योगिक गुंतवणुकीच्या बाबतीत आपले राज्य पहिल्या क्रमांकावर आहे ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. यादृष्टीने औद्योगिक गुंतवणूक वाढली तरच रोजगारातही वाढ होईल व यासंदर्भात शासनाने प्रयत्न करावेत, अशी माझी विनंती आहे.

यानंतर कापसाच्या संदर्भात सांगायचे तर राज्यात 15 मार्च, 2009 पासून कापूस खरेदी करणे बंद झालेले आहे. माझी माननीय मुख्यमंत्र्यांना अशी विनंती आहे की, ही मुदत किमान 31 मार्चपर्यंत तरी वाढवून मिळावी. जर नाफेडने कापसाची खरेदी करणे बंद केले असेल तर राज्यशासनाने पुढे यावे आणि फेडरेशनच्या माध्यमातून किमान 15 दिवस तरी ही खरेदीची मुदत वाढवून कापूस खरेदी करावा त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होईल. अन्यथा 2850 रुपये प्रति क्विंटलचा भाव ज्या कापसाला मिळाला तो कापूस 2300 पर्यंत खाली येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ MMP/

श्री. अरुण गुजराथी .....

माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेल्या दोन मुद्यांशी मी सहमत आहे. कारण खान्देशनपासून बुलडाणा जिल्ह्यातील शेगांव हे अगदी जवळच आहे. चालू वर्ष हे गजानन महाराजांचे शताब्दी वर्ष असून त्या निमित्ताने माझी अशी सूचना आहे की, शेगावला आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे. परंतु ज्याप्रमाणे शिर्डी देवस्थानचे वैभव दिवसेदिवस वाढत आहे त्याचप्रमाणे शेगावचे वैभव देखील वाढत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ...

राष्ट्र संत तुकडोजी महाराजांचे हे शताब्दी वर्ष आहे. यासंदर्भातील समिती नेमली गेली परंतु पुढे काहीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे यासंदर्भात पुढे कार्यवाही व्हावी अशी शासनाला विनंती आहे. या अर्थसंकल्पाच्या संदर्भात फार काही बालावे असे मला वाटत नाही. परंतु महत्वाच्या मुद्यांचा परामर्श घेण्याची आपण मला संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : माननीय सभापती महोदय, या सदनामध्ये काल अर्थसंकल्प आपल्या पुढे सादर झाला. हा अर्थसंकल्प सादर करतांना गफलत कशी झाली हे मी येथे सांगणार आहे. केंद्र शासनाचा हवाला आणि आम्ही आतापर्यंत जे काही केले ते या चार दिवसात सांगणे, असा प्रकार या ठिकाणी झालेला आहे. केंद्र शासनाच्या निवडणुका जाहीर झालेल्या नव्हत्या किंवा आचार संहितेचा विषय नव्हता त्याच्या अगोदर त्यांनी म्हणजे केंद्रशासनाने चार दिवसांचे लेखानुदानाचे अधिवेशन घेतले. हे असे का झाले तर केंद्र शासनाच्या निवडणुका लागल्यामुळे नवीन सरकार येणार आहे आणि ते सरकार आल्यानंतर या देशाच्या अर्थसंकल्पाचा निर्णय घेण्याचा अधिकार त्या सरकारचा आहे म्हणून त्यांनी निवडणुका नसतांनाही लेखानुदान घेतले. आपल्या अर्थसकंल्पाची सुरवातही तशीच झाली. लोकसभेच्या नुकत्याच झालेल्या अधिवेशनामध्ये केंद्र शासनाने चार महिन्याच्या कालावधीतील लेखानुदान मंजूर करुन घेतले. सार्वत्रिक निवडणुकीच्या नंतर नवीन सरकार आल्यानतर ते नवीन अर्थसंकल्प सादर करणार असल्यामुळे आम्ही सुध्दा केंद्रशासनाच्या धर्तीवरच महाराष्ट्र शासन, चार दिवसांचे लेखानुदान मंजूर करणार असा निर्णय घेतला. लेखानुदानामध्ये केंद्रशासनाचा आणि आपल्या राज्याचा काही एक संबंध नाही. आपल्याकडे आता निवडणुका जाहीर झालेल्या असल्यामुळे आचारसंहिता लागू झालेली आहे त्यामुळे आचार संहितेच्या मर्यादेत राहून या शासनाला लेखानुदान मांडावयाचे आहे. लेखानुदानाचे चार दिवसाचे अधिवेशन घ्यावे असे तुम्हाला वाटले? कारण या निवडणुकीच्या दरम्यान हे सरकार जाईल आणि नवीन सरकार येईल असे आपल्याला वाटते परंतु असे काहीही होणार नाही. "असंगाशी संग " अशी आपल्याकडे एक म्हण आहे. या म्हणीची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. प्राण गमावण्यापेक्षा संग नसलेला परवडतो अशीही परिस्थिती निर्माण होऊ शकते.

उपसभापती : सन्माननीय सदस्य अर्थसंकल्पावर विचार मांडत आहेत की, राजकीय संकल्पावर विचार मांडत आहेत ?

श्री. दिवाकर रावते : खरे म्हणजे हा अर्थसंकल्प कसा आहे यासंदर्भात मी काल गमतीने बोललो होतो परंतु हा गमतीचा विषय नाही. (अडथळा) खरे म्हणजे मूळ अर्थसंकल्प मे महिन्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

जन्माला यायचा आहे. आता डोहाळे जेवण आणि बारसे मात्र मे महिन्यात असा प्रकार आम्हाला पहावयास दिसतो आहे. राज्यशासनाच्या चालू असलेल्या योजना राबविण्यासाठी पुढील आर्थिक वर्षाच्या चार महिन्याकरिता खर्चाची तरतूद करण्यासाठी हा अंतरिम अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे.

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. उल्हास पवार)

यामध्ये नवीन कोणत्याही योजनेचा खर्च मांडलेला नाही. परंतु हे करीत असतांना वार्षिक जमा खर्च देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आर्थिक जमा खर्चात जे सत्य बाहेर आले आहे ते फार गंभीर आहे. या शासनाकडे उत्पन्न कशातून येणार आहे? त्यामुळे मे महिन्यात आपण काय सांगणार आहात ते आम्हाला येथे दिसायला लागले आहे. 'सकाळ' या वृत्तपत्रात 2 जानेवारी,2009 रोजी एक बातमी आली होती. अर्थसंकल्प फुटला का यासंदर्भात मी काही बोलणार नाही. "सहाव्या वेतन आयोगासाठी विकास कामांना कात्री " अशीही बातमी आलेली आहे. जानेवारीला जी बातमी दिली होती त्याला अनुसरून अधिका-यांनी वित्तमंत्र्यांच्या संमतीने अर्थसंकल्प बनवला त्याचे हे द्योतक आहे. आमचे उत्पन्न कशात आहे, आमची घट कशात आहे, हे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे.

यानंतर श्री. खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामध्ये म्हटले आहे की, विक्री करामध्ये 2008-2009 मध्ये सुधारित अंदाज 28429 कोटीचा आहे अर्थसंकल्पात 2009-2010 मध्ये तो आपण 27006 कोटी इतका कमी दाखवला आहे. म्हणजे तुम्हाला तिथून अपेक्षा नाही. यामध्ये एकूण घट 1433 कोटीची दाखविली आहे. त्याचे कारण दिले आहे, अर्थव्यवस्थेतील मंदीमुळे घट कमी झाली. डिझेल आणि पेट्रोलचे भाव कमी झाले आहेत. तरी देखील परिवहन खाते काय करीत आहे ? हे मला माहित नाही. पेट्रोल डिझेलचे दर कमी झाल्यानंतर प्रवासी वाहतुकीचे भाडे वाढले आहेत. ते कमी होत नाही. एवढेच नव्हे तर रिक्षावाले सांगत आहेत की आम्हाला भाडेवाढ करून द्यावी. हा वेगळा विषय आहे.

सभापती महोदय, या राज्यामध्ये उत्पन्न कशामध्ये वाढले असेल तर ते म्हणजे उत्पादन शुल्कामध्ये. 4300 कोटीवरून 4800 कोटी पर्यंत म्हणजे अपेक्षित 500 कोटींची वाढ प्रस्तावित आहे. म्हणजे हे शासन दारूडा महाराष्ट्र तयार करीत आहे. काल श्री.शरद पवार यांनी श्री.नरेंद्र मोदींना उद्देशून असा उल्लेख केला की, आम्हाला महात्मा गांधीजींचा गुजरात हवा आहे. पण या राज्य शासनाने दारू पिणारा महाराष्ट्र घडवला आहे. या शासनाचे 500 कोटी रूपयाचे उत्पन्न कशामध्ये वाढले आहे ? राज्य उत्पादन शुल्क विभागामध्ये उत्पन्न वाढले आहे. (अडथळा) या शासनाने द्राक्ष उत्पादकांना मातीत कसे घातले हे देखील मी सांगणार आहे. मला हळूच आदरणीय मंत्रिमहोदयांनी सूचना केली की, साखर कारखान्याच्या मद्यनिर्मितीतून उत्पन्न वाढणार आहे. द्राक्ष उत्पादकांना आपण गोंडस असे चित्र दाखविले आहे. आपण आपल्या देशात वाईन तयार करतो. वाईनला परदेशात मोठा भाव आहे. आता द्राक्ष उत्पादक कसा मातीत गेला हे श्री.पाशा पटेल आपल्या भाषणात सांगतीलच. कारण वाईनची द्राक्षे वेगळी असतात. आपली रोजची जी द्राक्षे असतात त्याद्वारे वाईन तयार होत नाही. आपल्या शेतकऱ्यांनी जी द्राक्षे लावली ती आता कोणीही दोन रूपये किलोने घेत नाही. ती द्राक्षे रस्त्यावर टाकण्याची पाळी शेतकऱ्यांवर आली आहे. यासाठी कोणाची पुण्याई आहे ? कुणाचे मार्गदर्शन आहे ? आपण सांगितले तर बरे होईल. मी उगाचच नाव सांगून द्राक्षे आंबट कशाला करून घेऊ. हे केंद्रीय कृषि धोरणातून निर्माण झालेले पाप आहे. महाराष्ट्रातील द्राक्ष उत्पादन शेतकऱ्यांसाठी निर्माण झालेले हे पाप आहे. त्यामुळे नाव कशाला घेऊ.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, आता श्रीमंती कशी वाढली आहे ते बघा. वाहनांवरील कर 2200 कोटीवरून 2600 कोटीवर गेला आहे. म्हणजे 400 कोटींची वाढ आहे. म्हणजे 400 कोटी रूपये वाहन करातून मिळणार आहे. म्हणजे महाराष्ट्राची श्रीमंती वाढली ना. वाहन घेणाऱ्यांची संख्या वाढली ना. दारू पिणारे वाढले. आणखी एक चांगली गंमत मी सांगणार आहे. कृषि पंपासंबंधी भाषणामध्ये चांगला मुद्दा आहे. कृषि पंपाना किती अनुदान दिले हे त्यात नमूद करण्यात आले आहे. कृषि पंपासह नको त्यांना आपण अनुदान दिलेले आहे. ते मी वाचून दाखवू का ? शेतकऱ्यांबरोबर दुसऱ्यांना काय दिले ते देखील मी सांगतो. ज्याचा काहीही संबंध नाही त्यांना आपण अनुदान दिलेले आहे. भिवंडीला हातमाग आहेत. त्यांना आपण अनुदान का दिलेले आहे ? एक तर वीज नाही म्हणून हातमाग कामगार तडफडतो आहे. त्याला आमची हरकत नाही. आज हातमाग कामगार छाती फुटेपर्यंत काम करीत आहे. त्या हातमाग कामगाराला अनुदान मिळाले नाही. मात्र हातमाग उद्योग मालकाला ते अनुदान मिळाले आहे.

सभापती महोदय, विजेवरील कर आणि शुल्क याकडे मी आपले लक्ष वेधणार आहे. जो वीज वापरतो तो कर भरतो. त्याच्यामध्ये देखील वाढ आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

2 हजार 800 कोटी रुपयावरुन 3 हजार कोटी रुपयापर्यंत म्हणजेच 200 कोटी रुपयांची विद्युत उपकरामध्ये वाढ झालेली आहे. फ्रीज, टोस्टर, वातानुकुलीत यंत्रे, पंखे, वॉशिग मशिन्स इत्यादीची विक्री वाढलेली आहे त्यामुळे विजेची बिले जास्त यावयास लागली आहेत. विजेच्या उपकरांणाची विक्री थांबलेली नाही. अशा प्रकारे या वस्तुंच्या विक्रीत वाढ झालेली असतांनासुध्दा विक्री करात मात्र घट झालेली आहे. सर्व सामान्य माणूस खरेदीमध्ये कोठे तरी मार खात आहे. सर्वसामान्य माणसाचे कंबरडे मोडले आहे. जागतिक मंदीचा परिणाम त्यांना एवढा भोगावा लागत आहे की, काल परवापर्यंत जी व्यक्त दहा रुपयाचे अन्नधान्य खरेदी करीत होती ती व्यक्ती आता पाच रुपयाचे खरेदी करीत आहे. त्यामुळे कदाचित विक्री करात धट झालेली असेल असे मला वाटते. अजून मी हे पुस्तक बारकाईने वाचलेले नाही जर मी हे पुस्तक बारकाईने वाचले तर कोणत्या कमोडीटीजमध्ये हा विक्री कर कमी झालेला आहे हे कळू शकेल. परंतु पुरेसा वेळ न मिळाल्यामुळे मी हे पुस्तक बारकाईने वाचू शकलो नाही.

सभापती महोदय, यानंतर मी दुसरा एक मुद्दा या ठिकाणी मांडणार आहे. केन्द्र सरकारच्या सहाय्यक अनुदानात घट झालेली आहे. आम्हाला अर्थसंकल्पाच्या संदर्भात जी विविध पुस्तके देण्यात आलेली आहेत त्यातील अर्ध्यापेक्षा अधिक पानांमध्ये केन्द्र सरकारच्या सहाय्यक अनुदानाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. ही बाब कौतुकाची आहे. आपल्या लेकराचे आणि आपल्या आई वडिलांचे कौतुक आपणच करतो तसाच प्रकार येथेसुध्दा चालू आहे. केन्द्र सरकारच्या सहाय्यक अनुदानात 14 हजार 305.79 कोटी रुपयावरुन 13 हजार 612.38 कोटी रुपये म्हणजेच 693.41 कोटी रुपयांची घट झालेली आहे. त्याचा अर्थ असा की ,एक तर केन्द्र सरकार राज्य सरकारला पैसे देत नसेल किंवा केन्द्र सरकार जे काही सहाय्यक अनुदान देते तेवढेच मैचिग ग्रान्ट राज्य सरकारने अर्थसंकल्पात द्यावयाचे असते ते देण्यास राज्य सरकार असमर्थ ठरले असल्यामुळे ते अनुदान परत गेले असेल. सरकारचा हा नाकर्तेपणा आहे असेच म्हणावे लागेल. सरकारचा नाकर्तेपणा दाखविणारा हा आकडा आहे. राज्य सरकारला कोणते अनुदान मिळालेले नाही, कोणते अनुदान परत गेले यासंबंधीची सविस्तर माहिती पुस्तकातून मिळेल. एक तर मॅचिग ग्रान्ट राज्य सरकार देऊ शकत नसल्यामुळे सहाय्यक अनुदान परत गेले असेल किंवा केन्द्र सरकारने जे अनुदान देणार असल्याचे दाखविले होते ते त्यांच्याकडून मिळालेले नसेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

सभापती महोदय, यानतर मी दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडणार आहे. अर्थसंकल्पातील खर्चाच्या बाबी पाहिल्यानंतर अत्यंत वेदना होतात . त्या बाबतीत सरकारचे अपयश तर आहेच परंतु नोकरशाहीच्या माध्यमातून सरकारची तिजोरी किती लुटली जाणार आहे याचा कधी तरी विचार केला जाणार आहे काय. ? मी सरकारी कर्मचा-यांना सांगू इच्छितो की, तुम्ही कृपा करुन वाईट वाटून घेऊ नका . तुम्हाला वेतन आयोग मिळण्याच्या संदर्भात मला रोश नाही परंतु सध्या महाराष्ट्र सरकार अडचणीत आहे, राज्य गंभीर आर्थिक परिस्थितून जात आहे याचा त्यांनी विचार करावयास पाहिजे. परंतु या कर्मचा-यांना राष्ट्रीयत्व कोण समजावून सांगणार आहे ? एक तर अंगा पेक्षा बोंगा मोठा झालेला आहे. विधानमंडळासह अनेक विभागात गरजेपेक्षा अधिक कर्मचारी आहेत. सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मी या ठिकाणी जपानचे उदाहरण देऊ इच्छितो. जपानच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये घट झाल्यानंतर राष्ट्रीय उत्पन्नाला स्थिरता यावी म्हणून तेथील सर्व कर्मचा-यांनी पगार न घेता वेळे पेक्षा जास्त काम केले होते . अशा प्रकारे त्यांनी देशासाठी त्याग केला होता. आज राज्यातील शेतकरी बेजार झाल्यामुळे आत्महत्या करीत आहेत अशा वेळी. सरकारला त्यांच्यासाठी काही द्यावयाची इच्छा आहे किंवा नाही हे मला माहीत नाही. परंतु त्याना काही द्यावयाची सरकारची इच्छा असली तरी ते देता येत नाही. एका बाजूला शेतक-यांच्या दुधाचा भाव वाढविण्याचा प्रयत्न केला जातो परंतु ग्राहकांनी आंदोलन केल्यानंतर भाव कमी केला जातो. अशा प्रकारे दुधाचा पुरवठा करणारे आणि ग्राहक यांच्यामध्ये भावासबंधीचा सघर्ष सुरु आहे.

सभापती महोदय, राज्य सरकारवर 1 लाख 70 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. घेतलेल्या कर्जाचे व्याज द्यावयाचे असल्यामुळे हे कर्ज सरकारवर वाढलेले आहे. राज्यातील विकासाच्या कामासाठी कर्ज घेता येत नाही अशी स्थिती निर्माण झालेली आहे. शेतक-यांच्या आत्महत्याच्या संदर्भात मी भाषणाच्या शेवटी माझे मनोगत व्यक्त करणार आहे. हे मनोगत अत्यत कष्टी आहे. अशा वेळी सहावा वेतन आयोग मिळालाच पाहिजे, तो मान्य करावाच, इतकेच नव्हे तर तो पूर्णपणे मान्य करावा अशी मागणी करण्यात येत आहे. राज्यावर असलेले आर्थिक संकट आणि उद्ध्वस्त झालेल्या शेतक-यांची संख्या लक्षात घेता दोन वर्षे आम्ही वेतन आयोग घेणार नाही असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

सांगून या कर्मचा-यांनी राज्याप्रती आणि देशाप्रती जर निष्ठा दाखवली असती तर त्या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले असते, त्यांना शाबासकी दिली असती परंतु दिलेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भात....

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ...

आम्हाला किती कमी मिळाले यासाठी आंदोलने केली जातात, त्यासाठी रस्त्यावर उतरले जातात हे बरोबर वाटत नाही. त्यांना काही मिळाल्याबद्दल दु:ख नाही. त्यांना जरूर आपण वेतन आयोग द्या, परंतु तिजोरीमध्ये जमा नसताना जेव्हा कर्मचाऱ्यांना वेतनवाढ दिली जाते तेव्हा त्यामुळे तिजोरीवर कसा भार पडतो हे या अर्थसंकल्पातून पुढे आणलेले आहे ते मी येथे दाखवून दिले आहे, तेवढ्या पुरतेच मी माझे भाष्य केलेले आहे, अन्यथा मला देखील हे कळले नसते. सभापती महोदय, व्याज प्रदानाचा खर्च 2,044.60 ने वाढला. पोलिसांवरील खर्च हा जस्टीफाय आहे. पोलिसांवरील खर्च हा 262.83 ने वाढलेला आहे. मात्र हा खर्च वाढविताना माननीय अर्थमंत्र्यांनी जे भाष्य केलेले आहे त्यातील काही शब्दांचा अर्थ मला समजलेला नाही. तो त्यांनी कृपा करून त्यांच्या उत्तरात समजावून द्यावा. माननीय अर्थमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या अर्थसंकल्पातील पृ.2 वरील 5.1 मध्ये आपण म्हटले आहे की, '.. हे पथक पूर्णपणे अत्याधुनिक पद्धतीने प्रशिक्षित केले जाणार असून या पथकासाठी अद्यावत हत्यारे, दारूगोळा, वाहने इ. दिले जाणार आहे. ..' आता यातील 'दारूगोळा' म्हणजे काय ? ते बॉम्ब फेकणार म्हणून तुम्हीही बॉम्ब फेकणार का ? तेव्हा 'दारूगोळा' म्हणजे नेमके काय आहे ते आपण आम्हाला सांगावे. आपल्याकडे प्रतिकारासाठी अत्याधुनिक गन पाहिजे वगैरे सगळे काही बरोबर आहे, पण 'दारूगोळा' म्हणजे काय ? तो कशासाठी पाहिजे ? कदाचित माझे ते अज्ञान असेल, पण कृपा करून आपण याचा खुलासा करावा.

सभापती महोदय, बाकी निवडणुकीचा खर्च, व्याज प्रदान वगैरे सगळे ठीक आहे. परंतु 'इतर प्रशासकीय सेवा' यामध्ये 2,349.34 इतका खर्च वाढला आहे. कशामुळे ? तर कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात होणारी संभावित वाढ देण्यामुळे. सहावा वेतन आयोगामुळे पडणारा भार म्हणून ही 2,359 कोटी इतकी वाढ येथे दाखविली आहे. निवृत्ती वेतन व इतर सेवानिवृत्तांना द्यावयाचा लाभ यामध्ये 380.81 इतकी वाढ झालेली आहे. संकीर्ण, सर्वसाधारण सेवा त्यात महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाच्या शिफारशींची अमलबजावणी करण्यासाठी जवळ जवळ 2,268 कोटीची वाढ झालेली आहे. सर्वसाधारण शिक्षणावर देखील काही खर्च दाखविला आहे. म्हणजे काही असे अपरिहार्य विषय यात आहेत, नाही असे नाही. पण त्यात 2,960 कोटीची वाढ झालेली आहे. सभापती महोदय, वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य सेवांमध्ये देखील वेतनावर मोठा खर्च दाखविला आहे.

..... ओ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औषध-पाण्यासाठी हा खर्च असता, आरोग्य सुविधांसाठी खर्च असता तर आम्ही समजू शकलो असतो. एकीकडे लोक रूग्णालयामध्ये बेड नसल्यामुळे जमिनीवर झोपतात म्हणून आरोग्य मंत्र्यांनी तेथे कॉटस् वाढविल्या असत्या तर मला आनंद झाला असता. पण तसे झालेले नाही. पण हा जो 209.81 कोटी खर्च वाढला आहे तो वेतनावर वाढलेला खर्च आहे. त्याचवेळेस पगार देण्यासाठी खर्च वाढला आहे, असे इतर सारे खर्च वाढले आहेत. ते सारे कोटीमध्ये आहेत. जवळ जवळ 8-9 हजार कोटी यामुळे वाढले आहेत. त्याचवेळेस या महाराष्ट्र राज्यामध्ये जी जनता कर देते, त्या जनतेच्या करातून हा पैसा येतो. तेव्हा आपली जी बांधिलकी आहे ती त्या जनतेशी प्रथमत: असली पाहिजे. पण त्या बांधिलकीवर काय झालेले आहे ? सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता हे माननीय श्री.अजितदादा पवार यांचेकडील खाते आहे. त्यात देखील 230.59 इतका खर्च कमी करावा लागला आहे. त्यानंतर गृहनिर्माण विभागामध्ये आम्ही अमुक इतकी घरे बांधली म्हणून स्वत:चे कौतुक करून घेतले आहे. म्हणजे मनोदय व्यक्त केलेला आहे. पण शेवटी आडात नाही तर पोहोऱ्यामध्ये कोठून येणार ? आपल्याकडे मुळात पैसाच नाही तर आपण करणार काय ? या गृहनिर्माण मध्ये 694.90 एवढा खर्च कमी झालेला आहे. नगरविकासामध्ये 1738.70 इतका खर्च कमी आहे. अनुसूचित जात, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांचे कल्याण यावर जवळ जवळ 8-9 पॅरा. आपण यामध्ये घेतलेले आहेत. आम्ही शाहू महाराज, फुले, आंबेडकरांचे वारसदार आहोत हे यातून दाखवून दिले जात आहे. पण त्यावरील खर्च हा 1147.67 ने कमी करावा लागला. मग आपण कशा प्रकारे यांचे कल्याण करणार आहात ? बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात अशी परिस्थिती आपली झालेली आहे. कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ करण्यामध्ये आपण इतके अडकलो आहोत त्यामुळे आपली अशी परिस्थिती झाली आहे. सामाजिक सुरक्षा व कल्याण यामध्ये 332.03 खर्च कमी., पोषण आहार, महिला बचत गटाच्या कौतुकाचा विषय हा एका परिच्छेदात आपण मांडला आहे. पण त्यात देखील आमच्या पैठणच्या महिला सरपंचांने एका दलित महिला बचत गटाला खिचुडी शिजविण्याचे काम दिले म्हणून त्यांचे घर जाळण्यात आले.

(यानंतर श्री. सरफरे .... पी 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीय नोंदी

श्री. दिवाकर रावते...

अशाप्रकारे महिला बचत गटाचे सक्षमीकरण होत आहे. सभापती महोदय, पोषण आहारावरील खर्च 326.41 कोटी इतका कमी करण्यात आला आहे. नैसर्गिक आपत्ती निवारण सहाय्य कुणासाठी आहे? आमच्या शेतकऱ्यासाठी आहे. ते मुंबईमध्ये एकदा आले होते, त्यावेळी केंद्र शासनाने त्यांना 1200 कोटी रुपये देण्याचे कबूल केले होते. त्यापैकी किती आले, किती आले नाहीत याचा हिशेब माझ्याकडे नाही. त्यापैकी काही आले असतील. मघाशी माननीय सदस्यांनी नैसर्गिक आपत्तीचा, गारपिटीचा उल्लेख केला. आणि त्यामध्ये आम्ही मदत दिली असे त्यांनी सांगितले. गारपीट झाली, अवकाळी पाऊस झाला, दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली, ऊस जाळण्याची पाळी आली अशाप्रकारच्या आपत्ती निवारणासाठी 906.90 कोटी रुपये कमी तरतूद केली आहे. पिक संवर्धनासाठी मूळ अर्थसंकल्पामध्ये सुधारित तरतूद 1322 कोटींची होती. यावेळी प्रस्तावित तरतूद 923 कोटींनी कमी करण्यात आली. एकूण 388.84 कोटींनी ही तरतूद कमी आहे.

सभापती महोदय, ग्रामीण रोजगारावर तीन परिच्छेद आहेत. त्यामध्ये ग्रामीण रोजगार कसा उपलब्ध करुन देणार? त्यासाठी आम्ही अमूक करणार, तमूक करणार असे याठिकाणी सांगितले आहे. माननीय मंत्री श्री. अजितदादा पवार साहेब आपणास सांगू इच्छितो की, आपण ग्रामीण भागात कुठेही गाडी घेऊन चाललेले असतो त्यावेळी आपल्यापुढे एस.टी. बस चाललेली असते. त्या बसवर आबांचा आणि मुख्यमंत्र्यांचा फोटो असतो, आपला नसतो. त्या पोस्टरवर ग्रामीण रोजगाराविषयी माहिती दिलेली असते. प्रत्यक्षात काहीही दिलेले नसते. एस.टी. च्या सर्व बसेसच्या मागे हे पोस्टर लावलेले असते. काम न करणारे आपले फोटो छापतात, परंतु माननीय मंत्री श्री. अजितदादा पवार साहेब हे फोटो छापत नाहीत तर काम करतात. सभापती महोदय, ग्रामीण रोजगार योजनेसाठी 397.25 कोटींची तरतूद आहे. अशाप्रकारे या अर्थसंकल्पामध्ये सांगण्यासारख्या खूप गोष्टी आहेत. परंतु या सरकारची इच्छा असली तरी विकासाला गती देण्याचे काम या सरकारला करता येणार नाही. एवढा स्वाहाकार कर्मचाऱ्यांच्या पगारामध्ये गेलेला आहे. म्हणून मी मघाशी जपानचे उदाहरण दिले. एवढे करुन सुध्दा या कर्मचाऱ्यांना समाधान वाटते काय? माननीय श्री. अजितदादा पवार साहेबांचा अर्धा दिवस त्यांच्या अधिकाऱ्यांना ते काम करीत नाहीत म्हणून दम देण्यामध्ये जातो अशाप्रकारची परिस्थिती आहे. मंत्रिमहोदय जबाबदारी अंगावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ KGS/

श्री. दिवाकर रावते...

घेतात, बाकीचे अंगावर घेत नाहीत. मला 7/12 मिळेल काय? तो कोरा करावयाचा असेल त्यावेळी करा. परंतु तो 7/12 कशाकरिता पाहिजे त्यावर त्याची किंमत ठरलेली असते. कोणतीही फाईल त्यावर वजन ठेवल्याशिवाय हलत नाही, अशी व्यथा आहे. तर मग वजन ठेवल्यावर तरी करा, लोकांना समाधानी करा. ते सुध्दा होत नाही ही प्रशासकीय उणीव आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 15 वर सन 2009-10 करिता आपण कर्ज व आगाऊ रकमा प्रस्तावित केल्या आहेत. मंत्रिमहोदय, यामध्ये आपला काहीही सहभाग नाही. आपण आता आलेले आहात, ही सर्व पापे अगोदरची आहेत. माननीय श्री. अजितदादा पवार साहेब होते म्हणून माननीय सदस्य श्री. बी.टी. देशमुख यांच्या आग्रहाखातर अधिकाऱ्यांनी जी.आर. बदलले. नाहीतर अर्थखात्याच्या अधिकाऱ्यांनी विदर्भाच्या सिंचन विकासाच्या कामांना पाचर मारुन टाकली असती. माननीय दादासाहेब त्यावेळी आपण ज्या पध्दतीने सभागृहात बोलला त्याबद्दल मी आपले कौतुक करतो. त्यावेळी मी आणि माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख आपण सर्वजण सभागृहामध्ये होतो. मला त्या गोष्टीचा खूप आनंद झाला. माननीय दादांनी त्यावेळी भूमिका घेतली नसती तर त्या अधिकाऱ्यापुढे शरणागती पत्करावी लागली असती एवढे ते रुबाबात होते. त्यावेळचे अर्थमंत्री देखील त्यांचेच असल्यामुळे मंत्र्यांना ते दम देऊ शकले नाहीत. माननीय दादासाहेब हे नेहमी अधिकाऱ्यांना दम देतात, मंत्र्यांना दम देत नाहीत. आपण राज्य चालवीत आहोत, हे अधिकारी चालवीत नाहीत. दादांच्या कार्य कर्तृत्वाच्या अनेक गोष्टी आहेत. सभापती महोदय, वीज प्रकल्पावरील कर्ज 389.63 कोटी, शासकीय कर्मचाऱ्यांना कर्ज दिले जाते त्याचा परतावा पुढील पानावर दाखविण्यात आला आहे. तो परतावा आपण त्यांच्या वेतनातून कापून घेतला असून त्याची रक्कम 343.28 कोटी आहे. शेतकऱ्यांना 1 लाख रुपये देतांना तो दारु पितो, भांडखोर आहे, अमूक आहे, तमूक आहे असे सांगणाऱ्या या कर्मचाऱ्यांना आपण एवढे कर्ज देतो आणि शेतकऱ्याला देण्यासाठी आपल्याकडे पैसे नाहीत याचे दु:ख होते.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

शासकीय कर्मचाऱ्यांना कर्ज दिल्याचे दु:ख नाही, पण शेतकऱ्यांना देताना यांचे हात आखडतात आणि खोटे पंचनामे करुन शेतकऱ्याचे कुटुंब बरबाद करतात, याची चीड येते आणि मी हे सर्वकाही अनुभवलेले आहे म्हणून सांगत आहे.

सभापती महोदय, आपण सहकारासाठी 146.23 कोटी रुपयांचे कर्ज देत असताना त्यामध्ये साखर कारखान्यांच्या बाबतीत उल्लेख करण्यात आलेला आहे. हे सर्व आकडे शेकड्यामध्ये आहेत. 300 कोटी, 350 कोटी, 150 कोटी आणि पुढे असे म्हटलेले आहे की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती याकरता 25.86 कोटी रुपयांचे कर्ज, नगरविकास विभागासाठी 21.14 कोटी रुपये कर्ज आणि ग्रामोद्योग व लघु उद्योगासाठी 18.13 कोटी रुपयांचे कर्ज आणि आजच खादी ग्रामोद्योग साठी देण्यात येणारे अनुदान बंद करण्यात आलेले आहे आणि त्याबाबत आजच "ई" टी.व्ही.वर बातमी आली होती. शासनाने निवडणुकांच्या तोंडावर खादी ग्रामोद्योगसाठी देण्यात येणारे अनुदान बंद केलेले आहे आणि त्याची फळे सर्वानांच भोगावी लागतील. कारण काँग्रेस पक्षाचे लोक खादी वापरतात. पण आता त्यांचे खादी वापरणे कमी झाले आहे.

श्री.भास्कर जाधव (खाली बसून) : आम्ही स्वत: त्याग करु.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी जो अर्थसंकल्प मांडलेला आहे, तो पाहिल्यानंतर या पुस्तकामध्ये मी अत्यंत नम्रपणे माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, अधिकारी किती बनावट पध्दतीने काम करतात आणि सरकारला कसे तोंडघाशी पाडतात. पान क्र.15 वर अनु.क्र.45 मध्ये असे म्हटलेले आहे की,"मान्यताप्राप्त कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जाती यांना 100 टक्के, इतर मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना 50 टक्के शैक्षणिक शल्काची प्रतिपूर्ती सन 2004 पासून करण्यात येत आहे." मराठवाड्याच्या बाबतीत सांगावयाचे तर माझ्याकडे यासंबंधातील अधिकृत पत्र आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "कृषी विद्यापिठाअंतर्गत मान्यता प्राप्त विना अनुदानित व कायम विना अनुदानित कृषी विद्यालये विषयक अभ्यासक्रमासाठी शासकीय कोट्यातून प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करणे." ही प्रतिपूर्ती कधीपासून करण्यात आलेली नाही ? तर 2006-2007 मध्ये एकूण विद्यार्थी संख्या 140 असून शासनाने 100 टक्के ....

. . . .क्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

शैक्षणिक शुल्क भरावयाचे आहे त्याची रक्कम 2 कोटी 75 लाख 20 हजार रुपये इतकी आहे. त्याची 50 टक्के अनुदानाची रक्कम 1 कोटी 37 लाख 6 हजार रुपये इतकी होते. तसेच 2007-2008 मध्ये एकूण विद्यार्थ्यांची संख्या 496 असून, शासनाने 100 टक्के शैक्षणिक शुल्क द्यावयाचे आहे, त्याची रक्कम 1 कोटी 52 लाख 80 हजार रुपये इतके असून, त्याची 50 टक्के रक्कम 7 कोटी 64 लाख रुपये इतकी आहे. 2008-2009 मध्ये एकूण विद्यार्थ्यांची संख्या 552 असून, शासनाने 100 टक्के शैक्षणिक शुल्क द्यावयाचे आहे, त्याची रक्कम 1 कोटी 79 लाख 78 हजार आणि 50 टक्के अनुदानाची रक्कम 9 कोटी 48 लाख 90 हजार रुपये आहेत म्हणजे एकूण 1188 विद्यार्थ्यांना 18 कोटी 99 लाख रुपयांचे अनुदान गेल्या तीन वर्षामध्ये देण्यात आलेले नाही आणि सभागृहामध्ये मात्र फुशारक्या मारत आम्ही या अनुदानाची प्रतिपूर्ती केलेली आहे असे जेव्हा तुम्ही म्हणता, तेव्हा तुम्ही या सभागृहामध्ये असत्य कथन करीत आहात असे म्हणावे लागेल. म्हणून जेव्हा सभागृहामध्ये अशा प्रकारे न केलेल्या अनुदानाच्या प्रतिपूर्तीबाबत घोषणा केली जाते आणि सन्माननीय राज्यमंत्र्यांनी येथे याबाबत निवेदन केलेले असल्यामुळे, त्यांच्यावर असत्य आणि सभागृहाची दिशाभूल केलेली असल्याने त्यासंबंधात हक्कभंग आणण्याच्या बाबतीत माझा जो अधिकार आहे, तो मी राखून ठेवतो. आता माझ्याकडे केवळ मराठवाडयाच्या संदर्भातील माहिती आहे. बाकीच्या रिजनमध्ये कृषी विद्यापिठांअंतर्गत काय परिस्थिती आहे, त्याबाबत इतर गुरुजन सांगतील. हे विद्यार्थ्यांचे पैसे आहेत आणि माझे म्हणणे असे आहे की, त्यांनाच डायरेक्ट चेक द्यावेत. संस्था चालकांना पैसे दिल्यानंतर ते विद्यार्थ्यांना देतच नाहीत. संस्था चालकच हडप करतात.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, कोणताही संस्था चालक काहीही हडप करीत नाही. ते त्याचा विद्यार्थ्यांसाठी वापर करतात . . ..

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवारसाहेब, मी आपले स्वागत करतो आणि तुमच्यामध्ये शिक्षकाची नैतिकता असेल, शिक्षण संस्था चालकाचे नितीधैर्य असेल तर महाराष्ट्रामध्ये ज्या शिक्षकाला दोन-दोन वर्षे फुकट शिकवावयास लावतात, अनुदान येईपर्यंत पगार देत नाहीत, त्याच्या कुटुंबाचे नुकसान करतात. तर आपण अशा संस्था चालकांना शिक्षा करणार आहात काय ? ते मला सांगावे. सगळे कॉंग्रेसचे लोक आहेत, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे लोक आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती :आपण माझ्याकडे बघून बोलावे

श्री. दिवाकर रावते : मी हा विषय मांडत आहे. मी अद्याप या विषयाच्या खोलात गेलो नाही. माझा तो स्वभाव नाही. आपण एवढया नीतिधैर्याने बोलू नका. तुमच्याबद्दल आमचे असे मत नाही.....

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे बघून बोलावे. "काही शिक्षण संस्था" असे त्यांना म्हणावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय या विषयावर स्वतंत्र चर्चा होऊ शकते इतका हा विषय गंभीर आहे. पिळवणूक हा शब्द त्याला लागू पडतो. (अडथळा) श्री. काळे, तुझे वडील या विषयावर जास्त चांगले बोलले असते. त्यांना याबाबतीत जास्त चीड होती. सभापती महोदय, या अर्थसंकल्पावरील भाषणाच्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी तो विषय मांडला आहे. अनुक्रमांक 13 वर "कृषि पंपना पुरविण्यात येणात्या विज करता अनुदान" हा विषय आहे. गेल्या पाच वर्षात यंत्रमागधारकांना जे अनुदान देण्यात आलले आहे ते कोणाला देण्यात आलेले आहे? ते अनुदान मालकाला देण्यात आलेले आहे की, कामगारांना देण्यात आले आहे? याबद्दल आम्हाला कळलेले नाही. तेव्हा याबाबतचा खुलासा करण्यात यावा. विजेच्या बिलापोटीचे 606 कोटी रुपये महावितरण कंपनीला देण्यात आले आहेत. परंतु आजही शेतक-यांना लाखाच्या घरात विजेची बिले येत असल्यमुळे तो हैराण झालेला आहे. त्याबाबतचे उत्तर कोण देणार? शेतक-यांना मोफत वीज दिली जात नाही पण विजेची प्रचंड बिले लावली जातात. त्या बिलासंबंधीचा विषय अर्थसंकल्पामध्ये मांडण्यात आलेला आहे. कापसाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. गुजराथीसाहेब बरोबर बोलले. नाफेड नसती तर या सरकारचे वस्त्र राहिले नसते. पण नाफेड आणि सरकारचा काही संबंध नाही. कापूस आणि वस्त्राचा संबंध आहे म्हणून मी तसे बोललो अन्यथा मला तसे बोलावयाचे नाही. कापसाच्या उत्पादनापासून ते कापसाच्या प्रक्रियेपर्यंत पणन व्यवस्थापन आहे. आज नाफेड फायद्यात आहे. नाफेडकडे 70 लाख गाठी जमा झाल्या होत्या, त्यातील 40 लाख गाठी गेल्या आठवडयात विकल्या गेल्या. त्यामुळे नाफेड फायद्यात आहे. म्हणून आपण अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. एखादी केंद्रीय संस्था, सी.सी.आय.सुध्दा फायद्यात येते. सी.सी.आय.च्या कापसाच्या सगळया गाठी संपल्या आहेत. कारण ते एक नंबरच्या गाठी घेतात. बाकीच्या भानगडीत ते पडत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

नाहीत. त्यांची प्रथाच चांगली असल्यामुळे त्यांच्या गाठींना मागणी आहे. सी.सी.आय.चा कापूस योग्य असतो आणि पैसे सुध्दा रोख असतात. नाफेडच्या माध्यमातून चुकारे वेळेवर होत नहीत ही आपली व्यथा आहे. ती व्यथा मांडेपर्यंत निवडणुका जवळ आल्यामुळे सरकार थोडे सावध झाले आहे. काही जास्त होणार नाही याची काळजी घेत आहे. परंतु भारनियमनाच्या बाबतीत काय केले आहे? मोठया प्रमाणात भारनियमन सुरु आहे. पण याबाबतीत संबंधित अधिकाऱ्याचे मला कौतुक करावेसे वाटते. त्यांनी व्यवस्थित भारनियमन केलेले आहे, त्यामुळे सायंकाळी सात वाजता वीज येते ती सकाळी सात वाजताच जाते. घरी आलेल्या माणसाला वीज असल्याचे समाधान असते. दिवसा ती किती तास जाते हे कामधंद्यामध्ये त्याच्या लक्षात येत नाही. त्यामुळे विजेच्या टंचाईची तीव्रता फक्त शेतक-यांच्या कृषि पंपाकरिता आणि कृषिकरिताच आहे हे लक्षात येते. बाकी आनंद आहे. निवडणुकीच्या तोंडावर विजेचे एवढे व्यवस्थित नियोजन करण्यात आलेले आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील (बसून) : मी याबाबतीत श्री. सुनील तटकरेंना सांगतो.

श्री. दिवाकर रावते : तुम्ही ते काम केलेले आहे. याबाबतीत श्री. तटकरेंना कशाला सांगावयास पाहिजे. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे त्यांचे पाप तुमच्यावर आलेले आहे. तसे तुमच्या निर्मितीचे क्रेडीट ते खात आहेत. असे ते सगळे उलटे चाललेले आहे. विजेचा विषय हा सर्वात भिषण असा विषय आहे. असे असताना आजपर्यंत तुम्हाला एकदाही सभागृहातून पळून जाण्याची वेळ कधी आली नाही. याचे कारण तुम्ही ती परिस्थिती स्वीकारायला तयार झालात, हे लक्षात घ्या. विरोधी पक्षाच्या टीकेला समोरे जाऊन जी परिस्थिती आहे ती तुम्ही मान्य केली हे महत्वाचे आहे. श्री. आनंद यादवने माफी मागितल्यानंतर सुध्दा त्यांनी राजीनामा दिलाच पाहिजे अशा प्रकारचा तुम्ही कुठे दुराग्रह दाखविला नाही.

सभापती महोदय, कापसाच्या बाबतीत दोन महिन्यात पणन मंत्र्यांना कां बदलण्यात आले?

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

माझा आनंदाचा भाग एवढाच होता की, पश्चिम महाराष्ट्रातील एक मंत्री पणन मंत्री म्हणून नवख्याप्रमाणे फिरत होते. दोन महिन्यात त्यांचे खाते का बदलले ? कोणाला राग आला ? ते पणनमंत्री लाल दिव्याची गाडी बाजूला ठेऊन आपल्या खाजगी गाडीतून सगळ्या केंद्रांवर जावयाचे. सगळ्या केंद्रावर पंचनामा करावयाचे. पंचनामा म्हणजे माहिती घ्यावयाचे. काय चालले आहे ते बघावयाचे. कसा व्यापार चालू आहे ते बघावयाचे. रात्री अपरात्री जावयाचे. मला असे वाटावयाचे की, एवढा सक्षम पणन मंत्री महाराष्ट्र राज्याला मिळाल्यानंतर आता दोन महिन्यामध्ये खरेदी विक्रीमधील गोंधळ थांबेल. पण बघतो तर त्यांचे खातेच गेले. पुन्हा ते खाते जुन्या माननीय मंत्रिमहोदयांकडे आले. कांद्याचा वांदा नवीन पणन मंत्र्यांना बरोबर सांभाळला. त्यांच्या काळात आतापर्यंत तीन वेळा कांद्याच्या बाबतीत प्रश्न निर्माण झाला. त्यांचे पणन खाते का बदलले हे कळले नाही. पण मला एका गोष्टीची आठवण झाली. सन्माननीय सदस्य श्री. बाजोरिया या ठिकाणी उपस्थित आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय श्री. विलासरावजी देशमुख आमच्या अकोल्यामध्ये आले होते. त्यांनी आमच्या शेतकऱ्यांचा घोर अपमान केला होता. शेतकरी कापसामध्ये पाणी घालून कापूस विकतो अशा प्रकारचे जाहीर वक्तव्य त्यांनी केले होते आणि त्यांच्यावर माफी मागण्याची पाळी आली. शेवटी अकोल्यामध्ये येऊन त्यांना शेतकऱ्यांची माफी मागावयास लावली. शेतकरी तंबाखू आणि गुटखा खातो, कापसामध्ये दगड घालतो असे वक्तव्य त्यांनी केले होते. त्यांचे धैर्य मानले पाहिजे. माननीय मंत्रिमहोदय श्री. अजितदादा पवार यांना सांगू इच्छितो की, आपल्या पाठिंब्यातून माणसे किती कर्तृत्ववान होतात ? त्यांचे काय धैर्य असते ? पश्चिम विदर्भातील अकोल्यासारख्या कापूस उत्पादक भागामध्ये, ज्या ठिकाणी शेतकरी उद्ध्वस्त झाले आहेत त्या ठिकाणी येऊन असे बोलण्यासाठी सुध्दा छाती लागते. त्यांनी शेतकऱ्यांना आळशी सुध्दा म्हटले होते.

तालिका सभापती (श्री. उल्हास पवार) : विपर्यस्त वृत्तांत आला होता. त्याचा खुलासा सुध्दा झाला आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : त्यांनी शेतकऱ्यांना आळशी म्हटले होते. शेतकऱ्यांना दारुड्या ठरवले. आता दारु विक्री एवढी वाढल्यानंतर तसे होणारच. आता निवडणुकीत आणखी मजा येईल. आपल्या पणनच्या दुर्दैवी धोरणामुळे आणि खरेदीविक्री संघाच्या नाकर्त्या भूमिकेमुळे शेतकऱ्यांना आपला कापूस व्यापाऱ्यांना विकावा लागतो आणि व्यापारी सगळे लुटून नेतो. ही व्यथा सर्वांना माहीत आहे. सभागृहात असलेल्या त्या त्या भागातील सर्वांना ही व्यथा माहीत आहे. हा विरोधी पक्षाचा किंवा कोणत्याही पक्षाचा प्रश्न नाही. ही सगळ्यांची व्यथा आहे. मी सिल्लोडला गेलो होतो. ट्रॉलीमधून थपाथपा पाणी गळत होते आणि ग्रेडर कापूस घेत होता. मी चौकशी केली. सगळे ट्रक लागलेले होते. त्यामध्ये शेतकऱ्यांना माल नव्हता. सगळा माल व्यापाऱ्यांचा होता. मी तक्रार केली. मग धाडी टाकण्यास सुरुवात केली. आदल्या दिवशी दोनशे गाड्या होत्या. ज्यावेळी धाड टाकण्याचे, तपासणी करण्याचे जाहीर झाले त्यावेळी सगळ्या गाड्या गेल्या आणि फक्त 42 गाड्या राहिल्या. सगळे व्यापारी गाड्या घेऊन पळून गेले. ग्रेडर कोण आहे ? त्याला 4-5 हजार रुपयांवर तात्पुरते आणलेले आहे. त्याचा आपल्याशी काही संबंध नाही. त्याला आपण काय शिक्षा करणार ? तो ग्रेडर रोज भ्रष्टाचाराचे 30 ते 35 हजार रुपये खिशात घालून नेतो. आपल्या एका सेंटरवर एक ते दीड लाख क्विंटल कापूस खरेदी झाला. त्याचा पूर्ण हिशेब काढला तर त्या वजनामध्ये 3 कोटी 42 लाख रुपयांची पाणी खरेदी झाली. हे एका केंद्रावर झाले. हा भ्रष्टाचार व्यापाऱ्यांनी चालविलेला आहे. आपण ग्रेडरवर काही कारवाई करु शकत नाही. कारण तो आपला कोणी नाही. त्याला आपण 5 हजार रुपयांवर घेतलेले आहे. तो सरकारी कर्मचारी नाही. त्या ठिकाणी काय चालले आहे ? आपण पणन व्यवस्थापनामध्ये नकळत कापूस एकाधिकार योजना रद्द केली त्याची ही पापे सरकारला आणि शेतकऱ्यांना फेडावी लागत आहेत आणि व्यापारी गब्बर होतात. ते निवडणुकीमध्ये मोठी पर्स देतात. कारण त्यांना त्यातच पुढे जगावयाचे आहे. कोण किती घेतो आणि कोण किती खातो हा विषय मी कधी सभागृहात मांडत नाही. फक्त या सगळ्या प्रक्रियेमध्ये ज्यावेळी कष्टाने उगवणारा शेतकरी उद्ध्वस्त होतो त्यावेळी आपल्याला काही वाटत नाही काय हा प्रश्न आहे. यांची घरे भरुन आपल्याला काय मिळते ?

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यांच्यावर का कारवाई होत नाही ? का फौजदारी गुन्हे यांच्यावर दाखल होत नाहीत ? 4-5हजार रुपये पगारावर कापूस मोजण्यासाठी नेमलेल्या ग्रेडरवर धाडे टाकून चेकींग केले त्याच्याकडे कापूस मोजण्यासाठी वापा-यांकडून जमा केलेले 35 ते 40 हजार रु. रोज सापडतील. वैजापूरला भिजलेला कापूस साठविल्यामुळे त्याला दुर्गंधी येऊ लागली आणि जिनिंगसाठी कापूस निघत नव्हता म्हणून बुलडोझर लावण्यात आला. केवढा भ्रष्टाचार. सभापती महोदय, साडेचार कोटीचा कापूस वणीला जळाला. हा कापूस कसा जळाला.? कापूस प्रत्यक्षात किती जळाला ? किती गाठी होत्या ? कापूस जळाल्याचे कोणी बघितलेले आहे ? कापूस जळाल्यानंतर शेतक-यांचे नुकसान झाले असे सांगण्यात येते. परंतु कापूस जळण्यामध्ये शेतक-यांच्या नुकसानीचा प्रश्न येत नाही. कारण संकलित केलेला कापूस हे राज्याचे उत्पन्न असते. या राज्याच्या तिजोरीशी त्याचा संबंध असतो. त्यामुळे कापूस जळाल्यामुळे होणारे नुकसान हे देखील राज्याचेच नुकसान आहे. परंतु हे नुकसान शेतक-यांचे झालेले आहे असे दाखविण्याची प्रवृत्ती निर्माण झालेली आहे. कापूस जळाला की जिनिंगच्या मालकावर खटला भरला जातो. कापूस जळण्याच्याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी हे माझ्या मताशी नक्कीच सहमत होतील. कापसाला आग लागते त्यावेळी साठविलेला कापूस बाहेरुन जळतो. खालचा दोन-अडीच फुटावरचा कापूस जळत नाही. तो तसाच असतो. मग हा वरचा जळून काळा झालेला कापूस साफ करुन आतील तसाच राहिलेला कापूस पणनच्या अधिका-यांना हाताशी धरुन विकला जातो. मात्र कापूस संपूर्णपणे जळालेला आहे असा पंचनामा केला जातो, इन्शुरन्सचे पैसेही घेतले जातात. सभापती महोदय, हे लोक राज्याच्या तिजोरीला किती लुटणार आहेत ? कर्मचारी लुटत आहेत, अधिकारी लुटत आहेत आणि शेतकरी मात्र उद्ध्वस्त जीवन जगत आहेत. अर्थसंकल्पामध्ये जेव्हा विविध बाबीवर तरतुदी दाखविल्या जातात त्यावेळी या गोष्टी पुढे येतात. कापसाला 3000 रुपये भाव देण्यात आला. परंतु हा भाव कोणालाच मिळालेला नाही. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे आज सभागृहामध्ये उपस्थित असते आणि त्यांना तो भाव मिळाला असता तर तसे त्यांनी लगेच उठून सांगितले असते. कापसाच्या संदर्भातील विषय हा अतिशय गंभीर बनलेला आहे. महिना 4-5 हजार रु. पगारावर घेतलेल्या ग्रेडरच्या माध्यमातून भ्रष्टाचार होत आहे. शेतक-यांचा कापूस बांधावर पडलेला आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

शेतक-याचा कापूस घेऊन व्यापारी तो पणन केन्द्रावर विकत आहेत. शासनाचे कोटयवधी रुपये या व्यापा-यांच्या घरात जात आहेत. 2 हजार कोटींची अर्थव्यवस्था ही शेतक-यांच्या घशातून काढली जात असेल तर मग शेतकरी आत्महत्या करणार नाही तर काय करणार ?

सभापती महोदय, शेतक-यांच्या कर्जमाफीचा आकडा या सरकारने सांगितला. माझ्याकडे कर्जमाफीचा जी.आर आहे. तत्पूर्वी कृष्णा-खो-याच्या संदर्भात माझ्या वाचनात आले. युती शासनाच्या काळामध्ये कर्जकरुन का होईना कृष्णा-खो-यातील 65 ते 70 टक्के प्रकल्प पूर्ण झाले होते. परंतु गेल्या 10 वर्षामध्ये या शासनाने काय केले ? 10 वर्षे पूर्ण व्हायला काही महिन्यांचा अवधी आहे. कृष्णा-खोरे प्रकल्प आपण का पूर्ण केले नाहीत.? माननीय अर्थमंत्री महोदयांनी आम्हाला अनुशेषाची आकडेवारी सांगू नये. अन्यथा सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख आणि मी काढलेल्या कर्जासंबंधीची स्वेतपत्रिका सादर करावयास सांगून त्या माध्यमातून आपणाला कशी स्वच्छ आणि सुंदर वस्त्रे नेसवायी ते बघू. हिंमत असेल तर काढा श्वेतपत्रिका.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, आप समय सीमा निश्चित कीजिए, क्योंकि बाद में बोलने वाले माननीय सदस्यों को कम समय मिलता है.

श्री. दिवाकर रावते : सब को मौका मिलेगा. विरोधी पक्ष के सदस्य को बोलने का ज्यादा अधिकार हैं. आपको क्या बोलना है. आप सरकार पक्ष में है. आपको सरकार को समर्थन ही देना है. आपकी सरकार के एक मंत्री ने लकडी की चोरी की है. आपके एक मंत्री ने लफडा किया है. क्या आप इस बात पर बोलने वाले हैं.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, या चर्चेच्या बाबतीत वेळेचे नियोजन व्यवस्थिपणे करावे. सायंकाळी 4.30 वाजता याच विषयावर विधानसभा सभागृहामध्ये सर्वसाधारण चर्चेला सुरुवात होणार आहे. ती चर्चा ऐकण्यासाठी तेथील सदस्यांच्या सूचना लिहून घेण्यासाठी मला तेथे जावे लागेल. आज सभागृहाच्या कामकाजाचे नियोजन असे झाले आहे की, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा उत्तरासह सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत पूर्ण करावयाची.

तालिका सभापती (श्री. उल्हास पवार) : सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब आपले भाषण सुरु होऊन जवळपास 45 मिनिटांचा कालावधी झालेला आहे. इतरही सन्माननीय सदस्यांना आपापली मते मांडावयाची आहेत. त्यामुळे कृपया आपण फक्त मुद्दे मांडावेत.

श्री. दिवाकर रावते : माननीय वित्तमंत्र्यांनी कोणा दुस-या मंत्र्यांना सूचना लिहून घेण्यास सांगावे. त्याचे कारण असे आहे की, या सभागृहात माननीय वित्तमंत्र्यांचे उत्तर उशिराने सुरु होणार आहे.

तालिका सभापती : असे करुन चालणार नाही. हे अधिवेशन फक्त चार दिवसांचेच आहे. त्यामुळे प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी वेळेचे बंधन पाळले पाहिजे.

प्रा. सुरेश नवले : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणात असा उल्लेख केला की, "आपकी सरकार के एक मंत्री ने लकडी की चोरी की है." मला असे वाटते की, महाराष्ट्रातील मंत्रिमंडळातील कोणीही मंत्री लाकूड चोर नाही. त्यामुळे त्यांनी जो उल्लेख केला आहे तो रेकॉर्डमधून काढून टाकण्यात यावा.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : त्यांच्या भाषणातील अनावश्यक भाग काढला जाईल. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपले भाषण पूर्ण करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्याकडे अजून दोन विषय आहेत. त्या दोन विषयांचा उल्लेख करुन मी माझे भाषण पूर्ण करणार आहे. कृष्णा खो-याची कामे गेल्या दहा वर्षात का पूर्ण झाली नाहीत असा माझा सरकारला प्रश्न आहे. सरकारकडून या संदर्भात जे उत्तर दिले जाते ते खरे नाही. त्याचे कारण एक खासदार कृष्णा खो-यातील कामे पूर्ण करण्यात येतील असे सांगता आहेत. त्यांचे गणीत मला समजलेले नाही. कृष्णा खो-यातील कामे जलसंधारण मंत्री पूर्ण करु शकतील, परंतु ही कामे खासदार कशी काय पूर्ण करणार ? माझ्याकडे या विषयाच्या बाबतीतील अनेक कात्रणे आहेत. त्या कात्रणात स्पष्ट म्हटले आहे की, " कृष्णा खो-याची कामे मार्गी लावू- श्री. शदर पवार ". आघाडी सरकारचे प्रमुख श्री. शरद पवारसाहेब आहेत. जलसंधारण खाते हे राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाकडे होते. तरी देखील ती कामे का पूर्ण करु शकला नाहीत. कृष्णा खो-यांची कामे अपूर्ण ठेवून आता निवडणूक डोळयासमोर ठेवून ती कामे पूर्ण करु असे पुन्हा आश्वासने देत आहात. तुमच्या पक्षाच्या प्रमुखांना तुमच्या सरकारचा नाकर्तेपणा दाखवून देण्यासाठी मी प्रयत्न करीत आहे. माननीय श्री. शरद पवार यांच्या बाबतीत मला एक स्वप्न पडलेले आहे. वेळ येईल त्यावेळी मी ते स्वप्न सभागृहात सांगणार आहे.

सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्येचा विषय अतिशय गंभीर झालेला आहे. शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण विदर्भात जास्त आहे. मी या ठिकाणी शेतक-यांची व्यथा मांडतो आहे. शेतक-यांवरील कर्ज माफीचा जी.आर.माझ्याकडे उपलब्ध आहे. महाराष्ट्र कृषि कर्ज फेड, कर्ज माफी, कर्ज सवलत योजना 2009 या अनुषंगाचा तो जी.आर.आहे. एकूण 6208 कोटी रुपयांची कर्जमाफी ही 40 लाख 15 हजार शेतक-यांना दिली जाणार आहे अशी नागपूरच्या सभागृहात सरकारच्या वतीने घोषणा केली, त्यावेळी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी जोरजोरात बाके वाजविली. सरकारने जनतेमध्ये आपली प्रतिष्ठा नेहमी चांगली ठेवली पाहिजे. खोटी कर्ज माफी करुन शेतक-यांना फसविले असेल तर शेतकरी सरकारला धडा शिकविल्याशिवाय राहणार नाहीत. शेतक-यांच्या कर्जमाफीच्या जी.आर.मध्ये असे म्हटले आहे की, 20 हजार रुपयांची कर्ज माफी दिली आहे. ही कर्ज माफी कोणाला दिली आहे ? यात पहिला मुद्दा असा आहे की,.....

यानंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

शेतकरी आत्महत्या का करतात? माझ्याकडे आजच्या सकाळ या दैनिक वृत्तपत्राचे कात्रण आहे. त्यात म्हटले आहे की, डिसेंबर, 2008 पर्यंत राज्यातील 5214 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. शासनाने कर्जमाफी जाहीर केल्यानंतरही 15 फेब्रुवारी, 2009 अखेर 212 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. मी आवश्यकता असल्यास आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची नावनिहाय, गावनिहाय, तालुकानिहाय व जिल्हानिहाय यादी देण्यास तयार आहे. एवढी कर्जमाफी जाहीर झाल्यानंतर शेतकरी आत्महत्या का करतात? शासनाच्या जी.आर.मध्ये म्हटले आहे की, 1997 पूर्वी वाटप केलेले कर्ज. 1997 पूर्वी ज्यांनी कर्जे घेतली आहेत, त्यांचे व्याजासहित जे कर्ज झाले असेल ते 20 हजारापर्यंत असेल तर पूर्ण माफ केले जाईल. अशी किती शेतकऱ्यांची कर्जे माफ झाली? 2.13 लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली. यासाठी 257 कोटी रुपये इतकी रक्कम खर्ची पडली. परंतु 1997 पूर्वी कर्ज घेतलेल्या शेतकऱ्याच्या कर्जाची रक्कम 20 हजार रुपयांपेक्षा जास्त आहे अशा शेतकऱ्यांची संख्या 1.42 लाख इतकी आहे. त्यांच्या कर्जमाफीसाठी 284 कोटी रुपयांची व्यवस्था केली आहे. 1997 पूर्वी कर्ज घेतले असेल आणि 20 हजारापेक्षा जास्त असलेल्या कर्जाची रक्कम त्यांनी फेडली तरच त्यांना कर्जमाफीचा फायदा मिळणार आहे. यातील बहुतांश शेतकऱ्यांनी कर्ज फेडलेले नाही. त्यांचे कर्जावरील व्याज वाढत चालले आहे. त्यांना नवीन कर्ज मिळालेले नाही. शासनाच्या माध्यमातून नवीन कर्ज न मिळाल्यामुळे सावकारांकडून ते कर्ज घेत आहेत. शासनाच्या वित्तीय संस्थांकडून 1997 पूर्वी कर्ज घेतले असल्यामुळे त्यांना नवीन कर्ज मिळत नाही, त्यामुळे शेतकरी सावकारांकडून कर्ज घेतो. ते कर्ज फेडता येत नसल्यामुळे त्यांच्यापुढे आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय शिल्लक नसतो, त्यामुळे आत्महत्या वाढत आहेत. 1997 पूर्वीची कर्जे थकित आहेत हे शासनाने मान्य केले आहे. कसली तुमची कर्जमाफी? 20 हजाराच्या पुढील रक्कम परतफेड केली तर 20 हजारापर्यंतचे कर्ज माफ केले जाणार आहे. 1997 पूर्वीच्या कर्जाचा एक रुपयाही फेडता आला नाही असे 1.42 लाख शेतकरी आहेत. शेतकरी आता हप्ते फेडतील आणि मग शासनाचे 20 हजार रुपये घेतील अशी अपेक्षा तुम्ही करता?.....

श्री.विलासराव शिंदे : ती केंद्र सरकारची योजना आहे. त्या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना कर्जमाफीचा फायदा मिळणार आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : केंद्राने झक मारली म्हणून आम्ही मारतो असे सांगता आहात?.....

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात)

तालिका सभापती (श्री.उल्हास पवार) : सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील जो आक्षेपार्ह भाग असेल तो वगळण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : शेतकऱ्यांचे वाटोळे झाल्यामुळेच मी बोलत आहे. कृपा करुन शब्दावर जाऊ नका. मी तीव्र शब्द वापरलेले नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.विलासराव शिंदे यांना मी सांगू इच्छितो की, 1997 च्या कर्जाबद्दल 20 हजार रुपयांची कर्जमाफी मिळणार असली तरी 20 हजार रुपयांच्या वरील रक्कम कर्जदार शेतकऱ्यांनी फेडली तरच त्यांना कर्जमाफीचा फायदा मिळणार आहे हा महत्वाचा मुद्दा आहे. 1997 पर्यंत एक रुपया देखील कर्जाचा फेडता आला नाही. फेडला का? नाही. जे कर्ज फेडणार नाहीत त्यांना हा कर्जमाफीचा फायदा मिळणार नाही. कृषि पूरक आणि संलग्न असे अनेक विषय मला मांडावयाचे आहेत. परंतु माननीय सभापती सतत बेल वाजवित आहेत म्हणून मी थोडक्यात बोलणार आहे.

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी आपले भाषण पूर्ण करावे. अन्यथा शिवसेना पक्षासाठी निश्चित केलेला वेळ कमी करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला घड्याळ दाखवू नका. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये सकाळी 9.00 ते रात्री 12.00 वाजेपर्यंत आम्हाला राबवून घेतले. ते सरकारसाठीच राबवून घेतले. सभागृहामध्ये सुरु असलेल्या विषयावरील चर्चा संध्याकाळी 7.00 वाजेपर्यंत चालू द्या. सन्माननीय सदस्य बोलतील.

तालिका सभापती : आपण आपापसात वेळ निश्चित करावी. सर्वांना समान न्याय दिला पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : न्याय सर्वांना द्या. सर्वांना बोलायला वेळ द्यावा. आम्ही एकच दिवस बोलणार आहोत.

तालिका सभापती : आपल्या पक्षातील सदस्य भाषण करतील तेव्हा त्यांना थोडक्यात आपले विचार मांडावे लागतील. आपण आपले विचार थोडक्यात मांडावेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : मी स्वत: माननीय सभापतींना विनंती केली. आज अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा घ्यावी व उद्या पूर्ण दिवस पुरवणी मागण्यांवरील चर्चा घ्यावी. सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी भरपूर वेळ द्यावा. आम्ही 12-12 तास, 15-15 तास काम केले आहे. आज बोलण्यासाठी एक दिवस उपलब्ध आहे, तेव्हा आम्हाला बोलण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा. तांबी लावू नका. सभापती महोदय, या कर्जमाफीचा फायदा मिळणे अपेक्षित असलेल्या शेतकऱ्यांची संख्या 7.78 लाख इतकी आहे. त्यासाठी 1138 कोटी रुपये आवश्यक आहेत. 6000 कोटी रुपयांमधून एवढीच कर्जमाफी होणार आहे.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

बाकीच्या शेतकऱ्यांच्या बाबतीत शासन काय विचार करणार आहे ? बाकीच्या शेतकऱ्यांनी 20 हजाराच्या वरची रक्कम परतफेड केली तरच त्याला या कर्जमाफीचा फायदा होणार आहे. त्यातल्या त्यात शासनाने यात भू-विकास बँका सुध्दा घेतल्या आहेत. या भू-विकास बँकांचे कर्ज कसे आहे तर ते सन 1997 पासूनचे काढलेले 5 हजार रुपये एवढे कर्ज असेल तर त्याची चक्रवाढ व्याजाने आता 80 हजाराच्या आसपास रक्कम झालेली आहे, त्यासंबंधीचा स्पष्ट उल्लेख या जी.आर.मध्ये नाही म्हणून एक प्रकारचा हा फसवा जी.आर.आहे. त्यासंबंधी चिकित्सा करावयाची झ ाली तर एकूण 40 लाख 15 हजार शेतकऱ्यांमधून फक्त 8 लाख शेतकऱ्यांनाच या जी.आर. चा व कर्जमाफीचा फायदा मिळू शकतो. बाकीच्या शेतकऱ्यांच्या बाबतीत काय, दिले तर दिले, नाही तर नाही अशी परिस्थिती या कर्जमाफीबाबत निर्माण झाली आहे.....अडथळा.... माझ्या भाषणात अडथळे आणून माझे भाषण थांबविण्याचा प्रयत्न केला जात असला तरी माझे भाषण थांबवू शकता पण शेतकऱ्यांच्या आत्महत्या आपण थांबवू शकत नाही, हे या राज्यातील शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे. शासनाने जी 20 हजारापर्यंतची कर्जमाफी दिली ती देण्याची तरी या शासनाची दानत आहे काय, याचा विचार होणे आवश्यक आहे. कारण ती कर्जमाफी देताना सुध्दा त्यात अटी घालून दिल्या आहेत. शेतकऱ्यांनी आपल्या पिकाचा विमा काढला पण हे विम्याचे हप्ते कोणी भरले तर ते सुध्दा शेतकऱ्यांनीच भरलेले आहेत. आणि शासनाच्या दि. 27.1.2009 रोजीच्या जी.आर. मध्ये "सहकारी संस्था, लेखा परीक्षण, औरंगाबाद विभाग औरंगाबाद" यांनी म्हटले आहे की, या 20 हजार रुपयाच्या कर्जामध्ये सावकाराकडून घेतलेल्या कर्जाचा समावेश नाही. याचा अर्थ "सावकारी जिंदाबाद" हे आपणच मान्य करीत आहात. दुसऱ्या बाजूला मात्र सावकारांच्या बाबतीत कायदा आणण्याची भाषा करीत आहात, अजुनही तो कायदा आणला जात नाही. आज सकाळी सभागृहात माननीय महसूल मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी अत्यंत महत्वाचे व आवश्यक असलेले एक विधेयक मंजूर करुन घेतले. पण सभागृहाला गेल्या सहा अधिवेशनापासून सरकार सांगत आहे की, या राज्यात सावकारी प्रतिबंधक कायदा आणण्याचा शासनाचा विचार आहे, तो अद्यापही आणला जात नाही. त्यासाठी मग वेळोवेळी केंद्राची अडचण सांगितली जाते, अशा प्रकारे टोलवाटोलवी केली जात आहे. दुसऱ्या बाजूला मात्र घटनेत ज्या विधेयकाला माननीय राष्ट्रपतींची

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

परवानगी लागते ते विधेयक राष्ट्रपतींना टाळून येथे आणण्याचा प्रयत्न हे शासन करीत आहे. ते कोणासाठी तर एका परदेशी कंपनीला पैसे मिळविण्यासाठी. या परदेशी कंपनीशी आपले काय हितसंबंध आहेत यासंबंधी स्पष्टीकरण झाले पाहिजे. परंतु शेतकऱ्यांसाठी असलेल्या जी.आर. मध्ये मात्र विमा कंपनीकडून मिळालेली भरपाईची रक्कम, त्याला मिळणाऱ्या कर्जमाफीच्या एकूण पात्र रकमेतून वगळली जाते व उर्वरित रक्कम शेतकऱ्याला दिली जाते. अशा प्रकारे या शेतकऱ्याला 20 हजाराची जी कर्जमाफी मिळणार आहे त्यातूनही अशा प्रकारची रक्कम कपात करुन बाकीची रक्कम दिली जाईल असा उल्लेख या जी.आर. मध्ये आहे. त्यापलिकडे पाहिले तर अत्यंत वाईट परिस्थिती आहे. या ठिकाणी सांगण्यात आले की, शासनाने गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अमुक इतकी मदत केली, पाऊस पडला नाही म्हणून मदत दिली, ऊस जळाला म्हणून मदत दिली परंतु जे नुकसान झाले त्यापोटी अशी मदत दिली जाते. परंतु अशी मदत देत असताना एखाद्या शेतकऱ्याची 2 लाखाची द्राक्षाची बाग उद्ध्वस्त झाली तर त्यापोटी फक्त 5-25 हजार रुपये दिले जातात. परंतु अशी जी मदत दिलेली असेल ती देखील या 20 हजार रुपये एवढे कर्जमाफीच्या रकमेतून वळती करुन घेणार ही गोष्ट योग्य आहे काय, याचा विचार शासनाने करावा. तसेच ज्यांनी आपल्या कर्जाची परतफेड केलेली आहे त्याला तर काहीच फायदा दिलेला नाही. याला एकच शब्द फीट बसतो तो म्हणजे "क्रुएल्टी". ती कोणत्या अधिकाऱ्याने केली किंवा शासनाने केली हे आपणच ठरवावे. कारण याच्याशी त्या शेतकऱ्याचा संबंध नाही. तसेच ज्यांनी कर्जफेड केली त्यांच्यासाठी हे शासन काहीच करणार नाही काय ? ज्या रकमेची परतफेड झाली आहे त्यांना व्याज, दंड, तपासणी चार्जेस अशा प्रकारे लावून पात्र रकमेची वसुली करण्यात आली असेल तर ती रक्कम सुध्दा कपात केली जाणार आहे. परंतु कर्जफेड करणाऱ्यांनी कोणते पाप केले आहे ? आणखी एक वाईट गोष्ट अशी आहे की, आत्महत्या झालेल्या कुटुंबियांना 1 लाखाची मदत शासनाने दिली पण ज्या कर्जासाठी त्याने आत्महत्या केली त्या कर्जाची माफी मात्र त्यांना इ ालेली नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

सभापती महोदय, आपली व्याकुळता मी समजू शकतो परंतु शेतक-यांच्या दु:खाच्या संदर्भातील माझ याही भावना आपण समजून घ्याव्यात.

तालिका सभापती (श्री. उल्हास पवार): सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण थोडक्यात आटोपते घ्यावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या विषयावर मी 5-10 तास बालेलो, तरी हा विषय सपंणार नाही एवढा हा विषय मोठा आहे. या शासनाने कर्ज माफी जाहीर केली. परंतु जेवढे कर्ज असेल त्यापेक्षा जास्त व्याज घेता येणार नाही असे कोर्टाने आपल्याला बंधन घालून दिलेले आहे. आज माझ्या खात्यावर जर व्याजासहीत 70 हजार रुपये कर्ज असेल आणि मूळ कर्ज 25 हजार रुपये असेल तर राहिलेले 20 हजार रुपये कोण देणार आहे? त्यासाठी हे शासन काय करणार आहे? आता वित्तीय संस्था मोडकळीस आलेल्या आहेत, वित्तीय संस्थाचा एनपीए वाढलेला आहे. त्यामुळे राहिलेले पैसे कोठून येणार आहेत ? हे पैसे कसे दिले जाणार आहेत त्यासंदर्भात मात्र काहीच विचार केला जात नाही. माझ्याकडे "सकाळ" या वर्तमानपत्राचे एक कात्रण आहे. त्याचे हेडींग "गेल्या गाई कोणीकडे" असे आहे. मी ते कात्रण या ठिकाणी थोडक्यात वाचून दाखवतो. "यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशीम, बुलडाणा, वर्धा या सहा जिल्हयांसाठी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी अडीच वर्षापूर्वी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. या पॅकेजअंतर्गत शेतक-यांना दुभत्या गायी आणि बैलजोडी देण्यात येणार होती. त्यानुसार 17 हजार जनावरांचे वाटपही करण्यात आले. त्यापैकी नऊ हजार गाई असून, त्यातील 1400 गाईंचा हिशेब लागत नसल्याचे आढळून आले आहे. या गाई खरोखरीच दिल्या गेल्या, की त्या फक्त कागदावरच होत्या, हे अद्याप सिध्द झालेले नाही. साडेतीनशे गाई मरण पावल्या, चारशे विकल्या गेल्या आणि उर्वरित सहाशे गाईंनी चक्क स्थलांतर केले" असा खुलासा पशुसंवर्धन अधिका-यांनी केलेला आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य, श्री. रावते साहेब, आपण या विषयावर एक तासापासून आपले विचार मांडत आहात. या विषयावर अजून ब-याच सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत. सन्माननीय सदस्यांना किती वेळ बोलू द्यावयाचे यांसदर्भात काही सन्माननीय सदस्यांनी हरकत घेतलेली आहे, त्यामुळे सन्माननीय सदस्य, श्री. दिवाकर रावते यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती .....

आपले विचार थोडक्यात पूर्ण करावेत. वेळेचे नियोजन केल्याशिवाय, इतर सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडता येणार नाहीत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माझे भाषण थोडक्यात आटोपते घेतो. परंतु सन्माननीय सभागृह माझे भाषण शांतपणे ऐकून घेत आहे. माझे भाषण पूर्ण करण्याच्या अगोदर, मी एक पत्र वाचून माझे भाषण पूर्ण करतो.

तालिका सभापती : आपले जे काही पत्र असेल ते आपण सन्माननीय मंत्रीमहोदयांना द्यावे. पत्र वाचून सभागृहाचा वेळ घेऊ नये. एक तासापासून आपण या ठिकाणी विचार मांडत आहात.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सो बायस. महोदय, एवढया वेळात मी पत्र वाचून पूर्ण केले असते. हे पत्र मी माननीय गुजराथी साहेबांच्या अनुमतीने वाचतो कारण या पत्राच्या संदर्भात मला त्यांचा पाठिंबा हवा आहे.

"यांसी जयमहाराष्ट्र ।

बरेच दिवस झाले. दिवस कसले महिने झाले. आपला पत्र संवाद झालाच नाही.

दिंडीत भेट होत होती. जिवा भावाची वेदना समजत होती. साठवलेले कृतीत उतरत होते.

कापूस दिंडीने चूकारे आले, तरी आत्महत्या चालुच होत्या.

सांत्वन दिंडीने चाललो आपल्याच उद्ध्वस्त भगिनीच्या सांत्वनासाठी भेटलो. दिले ते आयुष्यभर पुरणारे नव्हते.

पण सदभावना होती. एकाकी नसल्याचे सांगण्याची.

मा.शिवसेनाप्रमुखांचा आर्शिवाद आणि मा.उध्दवजींचा निर्धार होता. अश्रू पुसण्यापलिकडे तरी काय करणार ?

आत्महत्या चालुच आहेत. रोज 3 ते 4, महिन्याचा, दिवसांचा विचार केला तर, शेकडयातच. जानेवारी ते फब्रुवारी मध्ये 142 आत्महत्या झाल्या.

बेचैन झालो. कोणाशी बोलणार? म्हणूनच आपणासोबत हा मूक संवाद.

20 टक्के आत्महत्याग्रस्त अभागी भगिनींना शासनाने 1 लाख दिले (30 हजार रोख तर 70 हजार उधारीवर, सहा वर्षानंतर)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

उरलेला तशाच रडत राहिल्या फुटलेले कर्म, उद्ध्वस्त घर, लेकरे कवटाळून.

विधान परिषदेत टाहो फोडून सांगितले 4700 आत्महत्या. मदत फक्त 1200/1500 कुटुंबानांच,

यानंतर श्री. भारवि...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

उरलेल्या अभागी कुटुंबांना मदत द्या ! किती लागतील ! 20/25 कोटी. तुमच्या (सरकारच्या) पापाचे परिमार्जन करा. तर नाही म्हणतात. कास्तकाराची आत्महत्या दारूमुळे,आजारामुळे, भांडणामुळे ठरवून मोकळे. सावकार मात्र मोकळेच. अधिकारी हेच ज्यांनी हे ठरवले. विधान परिषदेत हे आक्रोश करून सांगितले. यांचा नकार कायमच. प्रश्न 20/24 कोटींचा नाही तर उद्ध्वस्त कुटुंबाच्या आधाराचा आहे. सहावा वेतन आयोग देण्याकरिता 9 हजार कोटी आहेत. त्यांच्या मुलाबाळांच्या भविष्याकरिता 18 हजार कोटी फंडामध्ये ठेवायला आहेत. राज्यावर 1 लाख 70 हजार कोटीचे कर्ज असले तरी. परंतु, ज्यांनी कास्तकाराला दारूबाज ठरवले, भांडखोर ठरवले, आत्महत्यानंतर त्यांच्या लेकराबाळांच्या तोंडचे 1 लाख देण्याचे नाकारले. त्यांना सहा हजार कोटी पगारवाढ निवडणुकीचा आहेर. हे असह्य आहे. दु:ख त्यांना दिल्याचे नाही. उद्ध्वस्त कास्तकाराच्या कुटुंबाला नाकारल्याचे आहे. याकरिताच हा पत्र संवाद. पॅकेज खाल्ले, गायी खाल्या. कर्ज माफीही वांझोटी ठरली. कर्जमाफी - नाव पश्चिम विदर्भाचे. दिले पश्चिम महाराष्ट्राला. (कर्जमाफीत 57 टक्के पश्चिम महाराष्ट्र, 22 टक्के मराठवाडा, 18 टक्के विदर्भ, 3 टक्के कोकण. सरकारी आकडेवारी.) सावकारी कायदा येतोच आहे. आपलं 'सरण' मात्र तयार आहे. काय बोलणार, कस बोलणार ! म्हणून ....संवाद नव्हता आता सहनच होत नाही. लिहिले. आपले नाते गप्प बसू देत नाही. याकरिता . धन्यवाद. सभापती महोदय, आपण मला बोलायला संधी दिल्याबद्दल मी आपले खास आभार मानतो.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी अंतरिम अर्थसंकल्पावर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. केंद्र आणि राज्य शासन या दोघांचे मी अभिनंदन करतो. कारण दोन्ही शासनाने चलनवाढीचा दर हा नियंत्रित ठेवला आहे. मुंबईवर अतिरेक्यांनी हल्ला केल्यानंतर ज्या ज्या भारतीय नागरिकांनी प्रतिकार केला त्या सर्वांना मनापासून धन्यवाद देतो. महाराष्ट्र शासनाने फोर्स-1 गट स्थापन करण्याचा निर्णय घेतला. हा फोर्स-1 गट कधी कार्यान्वित होणार आहे, त्याचे स्वरूप काय असणार आहे, त्याची कार्यकक्षा कसी असणार आहे या सर्व बाबींचे स्पष्टीकरण, खुलासा राज्य शासनाने केला तर महाराष्ट्रातील जनतेला निश्चितपणे दिलास आणि आधार मिळाल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा यासंबंधी शासनाने स्पष्टीकरण करावे अशा प्रकारची आग्रहाची विनंती मी शासनाला करणार आहे.

सभापती महोदय, राज्यातील नक्षलग्रस्त भागावर नियंत्रण ठेवण्यासाठी 1386.53 कोटीचा आराखडा शासनाने तयार केलेला आहे. या निमित्ताने मला शासनाला प्रश्न विचारावा वाटतो की, शासनाच्यावतीने नक्षलवादाला प्रतिबंध करण्यासाठी एक समिती गठित करण्यात आली होती. त्या समितीने कोणत्या शिफारशी केल्या आहेत ? त्या समितीची कार्यकक्षा काय होती ? सध्या समितीचे अस्तित्त्व काय आहे ? या सगळ्या गोष्टीचे स्पष्टीकरण शासनाच्यावतीने झाले तर निश्चितपणे नक्षलवाद चळवळीला प्रतिबंध करणाऱ्या शक्तींना एक प्रकारे दिलासा मिळेल. मी शासनाला विनंती करणार आहे की, नक्षलवाद चळवळीला विरोध करीत असताना जे जे मृत्यूमुखी पडले त्यांच्या वारसदारांना अनुकंपा यादीमध्ये समाविष्ट करू नका.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

याचे कारण असे की,अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्यासाठी जी यादी तयार करण्यात आलेली आहे ती इतकी मोठी आहे की त्या यादीतील व्यक्तिचा दहा वर्षातसुध्दा नंबर येणार नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने या संदर्भात धोरणात्मक निर्णय जाहीर करण्याची गरज आहे . जे जे नक्षलवादी चळवळीला विरोध करीत असतांना मृत्यूमुखी पडतील त्यांच्या घरातील वारसदाराला ताबडतोब महाराष्ट्र शासनाने सेवेत घेण्याची आवश्यकता आहे असे केले तरच या भागात काम करणा-या लोकांना एक प्रकारे दिलासा मिळेल. सभापती महोदय, या चळवळीतील महिलांचा जो सहभाग तो अतिशय शोचनीय व चिंताजनक आहे. त्यामुळे या भागातील लोकांचे प्रबोधन करण्यासाठी शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. एका हातामध्ये साम आणि दुस-या हातामध्ये दंड घेऊन जर शासन कठोरपणे समोर गेले तर नक्षलवाद्यांचा बिमोड महाराष्ट्र शासन निश्चितपणे करु शकेल याबद्दल मला खात्री आहे. तेव्हा त्या दृष्टीने शासनाने प्रयत्नांची पराकाष्टा करावी अशी मी या निमित्ताने शासनाला विनती करतो.

सभापती महोदय, या नंतर मी दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडू इच्छितो. आज राज्यातील बाजारामध्ये मंदी आहे . बेकारांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. अशा स्थितीमध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेला दिलासा देण्यासाठी शासनाने ग्राम पातळीवर विविध उद्योगधंदे उभे करण्याची गरज आहे. सुदैवाने महाराष्ट्रातील उद्योग खाते तरुण व तडफदार अशा आदरणीय राणेसाहेबांकडे आहे. त्यामुळे उद्योग खात्यामध्ये सुध्दा ते तडफ दाखविल्याशिवाय राहणार नाहीत... अडथळा....

एक सन्माननीय सदस्य : सन्माननीय सदस्य असे म्हणाल्यामुळे तुम्हाला वाईट वाटले काय ?

प्रा.सुरेश नवले : त्यामुळे आमच्याकडील सर्व सन्माननीय सदस्यांना आनंद झाला आहे आणि आपल्यालासुध्दा आनंद झाला असेल. उद्योग विभागाला माझी अशी विनंती आहे की राज्यातील लघू आणि मध्यम उद्योगाला द्यावयाच्या अनुदानासबंधीची मुदत 31 मार्च पर्यत आहे. तेव्हा ही मुदत उद्योग खात्याने वाढवून द्यावी त्यामुळे राज्यातील उद्योगधंद्याना एक प्रकारे दिलासा मिळू शकेल.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आता सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांनी शिवसेनेची अधिकृत भूमिका या सभागृहात मांडली आहे . राज्यातील लाखो कर्मचा-यांना राज्य शासनाने सहावा वेतन आयोग लागू केला आहे. त्यासबंधी शिवसेनेची जी भूमिका आहे ती सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी येथे मांडलेली आहे. त्यांनी अशी भूमिका मांडली आहे की ,या कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग देण्याची आवश्यकता नव्हती. महाराष्ट्रातील सर्व कर्मचा-यांच्या कानापर्यत शिवसेनेची ही भूमिका गेलेली आहे . त्या पक्षाची अधिकृत भूमिका मांडण्यासाठी या सभागृहाच्या व्यासपीठाचा ते उपयोग करतात याबद्दल सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांचा मी आभारी आहे. या निमित्ताने एक प्रश्न माझ्यासमोर उपस्थित झाला आहे. सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भात ज्या अर्थी सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी विरोध केलेला आहे.त्या अर्थी शिवसेनेची ही स्पष्ट भूमिका आहे ...

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सहावा वेतन आयोगाला विरोध आहे असे सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी म्हटलेले नाही. त्यांनी असे सांगितले की , दोन वर्षानंतर वेतन आयोग आम्ही घेऊ शकतो अशा प्रकारची कर्मचा-यांनी जर भूमिका स्वीकारली तर बरे होईल.

तालिका सभापती : हा हरकतीचा मुद्दा होऊ शकत नाही. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी भाषण सुरु करावे.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात)

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना ही उपरती नतर झाली आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे भाषण तपासून पहावे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे आपले नेते आहेत. त्यांच्या म्हणण्यालाच मी पाठिंबा देतो. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.बाजोरिया यांनी जो हरकतीचा मुद्दा येथे मांडला आहे त्यासंबंधात मला बोलावयाचे आहे. वाटल्यास आपण सभागृहाचे प्रोसिडींग काढून पहावे आणि सन्माननीय सदस्य प्रा. नवले यांनाही ते वाचावयास द्यावे. या ठिकाणी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.रावते यांनी जे भाषण केले आहे त्यात त्यांनी 'सरकारी कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग देऊ नये' असे केव्हाही म्हटलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री.रावते यांचे भाषण मी स्वत: सभागृहामध्ये पाठीमागे बसून ऐकले आहे. त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये असे म्हटले आहे की, राज्याची हलाखीची परिस्थिती पाहता आणखी दोन वर्षांनी कर्मचाऱ्यांनी हा वेतन आयोग घेतला असता तर राज्याची स्थिती तेवढ्या काळात सुधारली असती आणि शेतकऱ्यांना देखील आपल्याला अधिक लाभ देता आला असता. मात्र सन्माननीय सदस्य प्रा.नवले येथे सन्माननीय सदस्य श्री.रावते यांच्या भाषणाचा दाखला देऊन जे सांगत आहेत तशा प्रकारचे कोणतेही भाषण वा वाक्य सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी केलेले नाही.

तालिका सभापती (श्री.उल्हास पवार) : ठीक आहे. हा काही हरकतीचा मुद्दा होत नाही. सन्माननीय सदस्य प्रा.नवले यांना मी विनंती करीन की, त्यांनी सभापतींना उद्देशून आपले भाषण करावे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, मला येथे एवढेच सांगावयाचे आहे की, आता आमच्या मित्रांच्या हे लक्षात आले असेल की, महाराष्ट्रातील लाखो सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्याबाबत त्यांची भूमिका नेमकी काय आहे हे समजून आलेले आहे. असो. सभापती महोदय, शासकीय कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू केल्यामुळे शासकीय तिजोरीवर बोजा पडणार आहे हे महाराष्ट्र शासनाने या अर्थसंकल्पात मान्यच केले आहे. जेथपर्यंत मला माहिती आहे त्यानुसार महाराष्ट्र शासनाचा आस्थापना आणि एकूण प्रशासकीय खर्च जो आहे तो जवळ जवळ 82 टक्क्यांवर जाणार आहे. रूपयातील 82 पैसे अशा प्रकारे आस्थापनेवर खर्च होणार असतील आणि शासनाने तरीही सांगितले आहे की, विकास कामावर यामुळे काहीही परिणाम होणार नाही. तर मग आपण एकीकडे हे मान्य करता आहात की, आस्थापनेवरील वाढत्या खर्चाचा बोजा पडणार आहे आणि दुसरीकडे म्हणता आहात की, विकास कामांवर त्याचा काहीही परिणाम होणार नाही तर मग याचेही स्पष्टीकरणे सरकारकडून होणे आवश्यक आहे की, सर्वसाधारणत: सहावा वेतन आयोग लागू केल्यामुळे नेमका किती बोजा पडणार आहे. आम्हाला हे समजले पाहिजे की, आस्थापनांवर

..... एए 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. नवले ....

नेमका किती खर्च होणार आहे. सभापती महोदय, हे शासन शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींचे आहे. 6208 कोटी रूपयांचे पॅकेज शासनाने कर्जमुक्तीसाठी शेतकऱ्यांना दिलेले आहे. केंद्र आणि राज्य सरकार मिळून दिलेले 14 हजार कोटी रूपये महाराष्ट्रातील 78 लाख शेतकऱ्यांना त्यांच्या कर्जमुक्तीसाठी मिळणार आहेत. तेव्हा हे शासन शेतकऱ्यांचे आहे. त्यामुळे शासनाला माझी प्रार्थना आहे की, जसे प्रत्येक पाऊल टाकत असताना आपल्या मनामध्ये शेतकऱ्यांचा विचार आहे आणि म्हणूनच आजवर हे शासन शेतकऱ्याच्या पाठीमागे समर्थपणे उभे राहिले आहे तसेच ते भविष्यात देखील या शेतकऱ्यांच्या पाठीमागे हे शासन समर्थपणे उभे राहील याबद्दल माझ्या मनात शंका नाही. म्हणून या निमित्ताने मी ईश्वराकडे प्रार्थना करीन की, ईडा पीडा टळो आणि या महाराष्ट्रात बळीचे राज्य येवो. कारण ही पीडा महाराष्ट्राला परवडणारी नाही.

सभापती महोदय, अतिवृष्टी आणि गारपीट यामुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे त्यासाठी महाराष्ट्र शासनाने 1254.15 कोटी रूपयांची मदत शेतकऱ्यांना दिलेली आहे. पण आमच्या समोरच्या मित्रांना मी विचारू इच्छितो की, त्यांच्या काळामध्ये त्यांनी शेतकऱ्यांना किती मदत दिली हे जरा त्यांनी आठवून पहावे. म्हणजे मग निश्चितपणे हे सरकार शेतकऱ्यांच्या बाजूचे आहे हे आपल्याला दिसल्याशिवाय, जाणवल्याशिवाय राहणार नाही. ...

(यानंतर श्री. सरफरे .... बीबी 1 ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

फक्त आपण ते दाखवत नाही हा त्यामधील महत्वाचा भाग आहे. महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना राज्य सरकारने 80 कोटी रुपयांची मदत दिली आहे. असे असतांना बाहेरील नेते याठिकाणी येऊन सांगत आहेत की, आमच्या सात पिढया शेती करण्यामध्ये गेल्या. ज्यांनी आयुष्यामध्ये कधी काळी माती आणि लाल माटी पाहिली नाही. ज्यांना तुराटी, पळाटी आणि बोराटी यामधील फरक ज्यांना सांगता येणार नाही ते महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा 7/12 कोरा करा असे सांगत आहेत. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा 7/12 कोरा केला तर ते रुमण्याने झोडपल्याशिवाय राहणार नाहीत. सभापती महोदय, आपण संत वाङमयाचे अभ्यासक आहात. चांगदेवाकडे संत ज्ञानेश्वरांनी कोरा कागद पाठविला त्यावेळी त्या कागदावर काय लिहावे हे त्यांना कळेना. त्याप्रमाणे चांगदेवाची परंपरा सांगणाऱ्यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा 7/12 कोरा करावा अशी मागणी करणे औचित्याला धरुन नाही याचा आपण विचार करावा. अशी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्याप्रती मी मागणी करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या विदर्भामध्ये मिहान प्रकल्प उभा करण्यात येत आहे. त्याप्रमाणे राज्य सरकारने मराठवाडयामध्ये आणि अन्य प्रदेशामध्ये प्रकल्प निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी शासनाने निश्चितपणे प्रयत्न करावेत. चाकण, शिर्डी व सोलापूर याठिकाणी हे राज्य शासन विमानतळाची उभारणी करणार आहे. त्याचप्रमाणे पंढरपूरला वारकऱ्यांची, भक्तांची ये-जा असते. त्या पांडुरंगाच्या तीर्थस्थळी सुध्दा महाराष्ट्र सरकारने विमानतळ निर्माण करावे. संत तुकाराम महाराज हे पुष्पक विमानाव्दारे वैकुंठाला गेले असे संत साहित्यात म्हटले आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्रातील वारकऱ्यांना पंढरपूरमध्ये विमानतळाच्या निमित्ताने विमान तरी पहावयास मिळेल याचा विचार महाराष्ट्र सरकारने करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने आपण निश्चितपणे विचार करावा.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील काही राष्ट्रीय महामार्गांचे चौपदरीकरण होणार आहे. त्याचप्रमाणे काही राज्य महामार्गांचे देखील चौपदरीकरण होणार आहे. यामध्ये औरंगाबाद-बीड या राज्य महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या राज्य शासनाचे मागास भागाकडे विशेष लक्ष आहे याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बीड येथे परळी-बीड-नगर रेल्वेमार्ग होण्यासाठी हजारो आंदोलने करण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

प्रा. सुरेश नवले....

आली. त्यावेळी आंदोलन करणारे तरुण होते ते आता वृद्ध झाले आहेत, आणि काही देवाघरी गेले आहेत. तरीदेखील ही मागणी अजूनपर्यंत पूर्ण होत नव्हती. या शासनाने एक पाऊल पुढे टाकून हा रेल्वे मार्ग पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाचा 50 टक्के हिस्सा उचलला आहे. त्यामुळे हा रेल्वे मार्ग येत्या दोन-तीन वर्षात पूर्ण झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे जे वृद्ध आंदोलनकर्ते आहेत ते प्रत्यक्षात या रेल्वेमध्ये जाऊन बसतील. त्याचप्रमाणे माझा या सभागृहातील सदस्यत्वाचा कार्यकाळ संपण्यापूर्वी मला देखील या अधिवेशनाला त्या रेल्वेमध्ये बसून येता येईल. राज्य शासनाच्या या भूमिकेबद्दल मी पुन्हा एकदा अभिनंदन करतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले . . . .

सभापती महोदय, केंद्र शासनाने मागास क्षेत्र अनुदान निधीसाठी 400 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे आणि राज्य शासनाने डिसेंबर अखेरपर्यंत 300 कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च केलेला आहे.तेव्हा मी राज्य शासनाला अशी विनंती करतो की,केंद्र शासनाच्या निधीतून जो खर्च झालेला आहे,तो निधी आमच्या बीड जिल्ह्यासाठी सुध्दा उपलब्ध व्हावा. कारण या निधीच्या अंतर्गत बीड जिल्हा येत नाही, तर नांदेड, औरंगाबाद हे जिल्हे येतात.परंतु राज्य शासनाने या योजनेमध्ये बीड जिल्ह्याचा देखील अंतर्भाव करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, मघाशी माननीय पाटबंधारे मंत्री माननीय श्री.अजितदादा पवारसाहेब उपस्थित होते. आमच्या भागातील टुकूर हा मध्यम प्रकल्प असून त्याला अनेक वर्षापासून प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे, तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. पण तेथील काही गावकऱ्यांनी विरोध केल्यामुळे तो प्रकल्प तसाच अर्धवट अवस्थेमध्ये पडून आहे. त्यामुळे पुढील काळामध्ये बजेट सादर करताना त्यामध्ये या प्रकल्पाच्या कामाचा देखील अंतर्भाव करण्यात यावा अशी माझी राज्य शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, सर्वशिक्षा अभियान कार्यक्रम अतिशय चांगला आहे. खरे म्हणजे आता पर्यंत सर्वशिक्षा अभियानाचा कार्यक्रम तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्याची गरज होती. परंतु यामध्ये झारीतील शुक्राचार्य बसलेले आहेत, त्यामुळे हा कार्यक्रम तळागाळातील लोकांपर्यंत गेलेला नाही. म्हणून माझी राज्य शासनाला विनंती आहे की, या झारीतील शुक्राचार्यांना वेचून बाहेर काढण्यात यावे.

सभापती महोदय, बीड जिल्ह्यामध्ये डोंगर विकास पट्टा आहे. परवा त्याठिकाणी काही डॉक्टर मंडळींनी जाऊन सर्व्हे केला आहे. त्यावेळी त्या भागामधील काही विद्यार्थी कुपोषणाच्या अवस्थेमध्ये जगत असून, त्यांच्या हृदयाची वाढ कमी प्रमाणात झाल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे राज्य शासनाने डोंगर पट्टयामध्ये जे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, ज्यांच्या हृदयाची वाढ पूर्ण झालेली नाही अशा सर्व विद्यार्थ्यांच्या बाबतीत सर्वेक्षण करावे आणि त्यांना योग्य ते औषधोपचार द्यावेत अशी मी राज्य शासनाला आग्रहाची विनंती करणार आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासन हे पुरोगामी विचारांचे राज्य आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने 34 ठिकाणी "सामाजिक न्याय भवन"बांधण्याच्या बाबतीत राज्य शासनाने

. . . .2 सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले . . . .

निर्णय घेतला आहे. त्याबद्दल मी राज्य शासनाचा मनापासून आभारी आहे.राज्य शासन हे समतेचे असून,राज्य शासन आणि त्यांचे प्रतिनिधी हे समतेचे पुजारी आहेत,आम्ही ममतेचे पुरस्कर्ते आहोत.आमचा हिंसेवर विश्वास नाही.महात्मा गांधी यांची अहिंसा आम्हाला शिरोधार्ह आहे."अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, अपरिग्रह,शौच,संतोष,तप,स्वाध्याय,ईश्वर,प्रणिधान या यम नियमांवर आमची श्रध्दा आहे, अढळ विश्वास आहे. होय, हिंदूंचा यावर विश्वास आहे. आमची समानतेवर अढळ श्रध्दा आहे, आमचा विश्वास आहे. राज्य शासन हे या देशातील, राज्यातील मुस्लिम असतील, बौध्द असतील,जैन असतील,पारशी असतील, या सगळयांचा समान विकास झाला पाहिजे यावर विश्वास ठेवणारे आहे. त्यामुळे धर्माच्या शिखरावर बसून अधर्म शिकविणाऱ्यांना महाराष्ट्रातील जनता त्यांना घरी पाठवून सांगेल की,"आपण माळ जपा." सभापती महोदय, ...

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

अहो, ते वरुन आलेले आहेत, आम्ही खालून, लोकांमधून आलो आहोत. त्यामुळे वरुन येणाऱ्यांना महाराष्ट्रातील जनता स्वीकारणार नाही. जे खालून लोकांमधून आलेले आहेत, त्यांचाच महाराष्ट्रातील जनता स्वीकार करील. त्यामुळे अशा प्रकारे वरुन, ढगातून येणाऱ्या लोकांना जनता स्वीकारत नाही असा आतापर्यंतचा इतिहास आहे आणि त्या इतिहासाची पुनरावृत्ती झाल्याशिवाय रहाणार नाही एवढया शब्दानिशी आपण मला याठिकाणी भाषण करण्याची संधी उपलब्ध करुन दिली, त्याबद्दल मी आपला मनापासून आभारी आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत/ शीघ्रलेखापाठी नोंदी

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : अध्यक्ष महाराज, माननीय अर्थमंत्र्यांनी माडलेल्या अंतरिम अंर्थसंकल्पावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. अध्यक्ष महाराज, हे अधिवेशन चार दिवसांचे आहे. त्यामध्ये या कामासाठी मिळणारा वेळ लक्षात घेऊन मी मुद्दाम काही विशिष्ट मुद्दाबाबतच माझे विचार मांडणार आहे. विशेषत: 6 व्या वेतन आयोगाची बाहुचर्चीत उजेडाची बाजू आणि अंधाराची बाजू या दोन्ही बाबतीत मी प्रतिपादन करण्याचे ठरविले आहे. दर दहा वर्षांनी रुपयाची घसरलेली किंमत सावरुन धरण्यासाठी केंद्राच्या पातळीवर हा वेतन आयोग नेमला जातो. याबाबतीत महाराष्ट्र शासनाने जो धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे, तो आजपर्यंत बदललेला नाही. तो आजही कायम आहे. राज्य पातळीवर वेतन आयोग आम्ही नेमणार नाही, केंद्राच्या पातळीवर जे निर्णय होतील ते महाराष्ट्रामध्ये अंमलात आणले जातील अशा प्रकारचा महाराष्ट्र शासनाचा निर्णय आहे. त्याची चांगली बाजू, प्रकाशाची बाजू अशी की, महाराष्ट्र शासनाने 6 वा वेतन आयोग लागू केला. याबाबतीत अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये असे लिहिलेले आहे की, 20 ते 25 टक्के वाढ होणार आहे आणि ती वाढ सुध्दा रुपयाच्या घसरलेल्या किंमतीला थोपवून धरण्यासाठी आहे. ही वाढ दि.1/1/2006 पासून लागू केली, ही गोष्ट चांगली झाली. तो योग्य निर्णय घेतलेला आहे. तसेच ती वाढ दिनांक 1 एप्रिल पासून देण्यात येईल असे आपण सांगितलेले आहे. याची चुकीची आणि अंधाराची जी फार मोठी बाजू आहे त्या विषयी मला सभागृहात माझे विचार मांडावयाचे आहेत. गेल्या वेळी सुध्दा चातुर्वर्ण्य व्यवस्था...

डॉ. कमलकिशोर कदम : अध्यक्ष महोदय, माझा पॉईन्ट ऑफ प्रोपरायटी असा आहे की, या ठिकाणी वरचा आयोग देतो म्हणून खाली पगार वाढविले पाहिजेत असे समर्थन करण्यात येत आहे. दहा वर्षाने पगार दुप्पट होतात पण शेतक-यांच्या शेतमालाच्या किंमती दुप्पट होतात काय? होत नाहीत. दहा वर्षामध्ये शेतक-यांच्या कापसाच्या किंमतीत एक रुपयाने सुध्दा वाढ झालेली नाही असे असताना कर्मचा-यांचे पगार मात्र दुप्पट करण्यात आलेले आहेत. दीड टक्के लोकांच्या हातात 70 टक्के संपत्ती देण्यात येते आणि नऊ कोटी शेतक-यांना नागवण्यात येते याचे समर्थन या सभागृहात होऊ शकत नाही, आम्ही ते होऊ देणार नाही, सरकारी कर्मचा-यांचे प्रतिनिधी या ठिकाणी येऊन असे बोलत असतील तर हा या सभागृहाचा अवमान आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : अध्यक्ष महाराज, शेतकऱ्यांच्या विषयावर ज्या ज्यावेळी चर्चा होईल त्या त्यावेळी मी माझे विचार मांडत असतो. त्याप्रमाणे शेतक-यांच्या विषयावर ज्यावेळी चर्चा होईल त्यावेळी मी माझे विचार मांडीन. पण ते त्या विषयावर विचार मांडत नाहीत. त्यांनीही त्यावेळी आपले विचार मांडावेत. आज सभागृहासमोर जो विषय आहे त्यावर बोलत असताना मी जे निर्णय सांगितला तो माझा निर्णय नाही. मी मघाशी फक्त सांगून पुढे गेलो होतो. Now I quote "राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्या सुधारण्याकरिता राज्य शासनाकडून स्वतंत्र वेतनआयोग नियुक्त न करता केंद्र शासन जेव्हा जेव्हा केंद्रीय कर्मचा-यासाठी वेतन आयोग नियुक्त करील तेव्हा तेव्हा त्या वेतन आयोगाच्या शिफारशीवरील केंद्र शासनाचे वेतनविषयक निर्णय (Decisions of the Central Government on the Commission's recommendations in regard to pay scales) राज्य शासकीय कर्मचा-यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. वेतन निश्चीतेचे सुत्र देखील केंद्र शासनाप्रमाणेच असेल." सभापती महोदय, कुणाला दुखावणे हा भाग वेगळा मी राज्याचा निर्णय काय आहे हे सांगितले आणि या सभागृहामध्ये मला ते सांगण्याचा अधिकार आहे. केमिस्ट्रिच्या तासाला फिजिक्स आणि फिजिक्सच्या तासाला केमिस्ट्रि शिकवणारा मी शिक्षक नाही. आज सभागृहासमोर जो विषय आहे त्यावर बोलले पाहिजे. सिंचनाचा अनुशेष असेल, शेतक-यांचा अनुशेष असेल (अडथळा) मी चळवळीमध्ये काम करणारा मनुष्य आहे. हा विषय जेंव्हा चर्चेला येईल त्यावेळी मी त्यावर बोलेन पण त्याही वेळा तुम्ही त्यावर बोलत नाही हे दुर्दैव आहे. अध्यक्ष महाराज, महाराष्ट्रात पाचवा वेतन आयोग लागू करताना जी चातुर्वर्ण्य व्यवस्था लागू करण्यात आली ती आजही तशीच्या तशी चालू आहे, ही काळी बाजू आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्था हा शब्द तालिका सभापतीमहोदय, आपण ज्या ठिकाणी बसला आहात त्या ठिकाणी श्री. फरांदेसर बसले होते आणि मी हा शब्द उच्चारल्याबरोबर ते काय म्हणाले ते मी मुद्दाम प्रोसिडिंगमधून काढून आणलेले आहे. ते असे म्हणाले होते की,"हा शब्द वाईट आहे, पण शासनाची वागणूक तशीच आहे." आज सुध्दा तो रिपीट परफॉरमन्स आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा रिपीट परफॉरमन्स आजही चालू आहे. आय.ए.एस., आय.पी.एस. आणि सेंट्रल सर्व्हिसेस मधील जे कर्मचारी आहेत त्यांना केंद्र सरकारने 6 वा वेतन आयोग ज्या तारखेला लागू केला त्या तारखेला महाराष्ट्रामध्ये सुध्दा लागू झाला. कारण तसा निर्णय झालेला आहे. त्यामुळे पहिला वर्ग तेथे संपतो. सेंट्रल

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख....

सर्व्हिसेसच्या लोकांसाठी केंद्र शासनाने जे निर्णय घेतले त्याबाबतीत महाराष्ट्र शासन काही निर्णय घेवो अथवा न घेवो केंद्र शासनाचे निर्णय लागू झालेले आहेत. राज्य शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत उशिरा निर्णय घेण्यात आला असला तरी तो अर्धवट निर्णय घेण्यात आलेला आहे.विशेषत: वाहतूक भत्ता आणि घरभाडे भत्त्याच्या बाबतीत तो निर्णय अजूनही घेण्यात आलेला नाही. हे दुस-या वर्गाच्या बाबतीत झाले. चातुर्वर्ण्यातील तिसरा वर्ग म्हणजे उच्च माध्यमिक, माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षक. उच्च माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षकांविषयी विशेषत: सनदी नोकरशाहीच्या मनामध्ये जो आकस असतो तो इतका ठसठसीतपणे या निमित्ताने समोर आलेला आहे की, आपण त्याची कल्पना सुध्दा करु शकणार नाही.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख ....

म्हणजे 20 ते 25 टक्के सर्वांना वाढवून देत असताना यांच्या बाबतीत 30 ते 40 टक्के कापण्यात आलेले आहेत. हे आपल्याला खरे वाटणार नाही म्हणून सांगण्याची गरज आहे आणि तेही अधिकृत कागदपत्रानिशी सांगण्याची गरज आहे. मघाशी मी धोरणात्मक निर्णय वाचला त्या ठिकाणी महाराष्ट्रातील वेतन आयोग संपले. महाराष्ट्रातील पहिला वेतन आयोग 1.4.1966 च्या दरम्यान न्यायमूर्ती बडकस यांच्या अध्यक्षतेखाली नेंमला होता.. दुसरा वेतन आयोग न्यायमूर्ती भोळे यांच्या अध्यक्षतेखाली 1976 च्या दरम्यान होता. 1977 च्या डिसेंबर महिन्यामध्ये हा निर्णय झाल्यानंतर मग महाराष्ट्रामध्ये स्टेट लेव्हल पे कमिशन बसले नाही. 1996 मध्ये ज्यावेळी केंद्राचे निर्णय आले त्यावेळेला महाराष्ट्र सरकारने या ठिकाणी पे कमिशन बसवले नाही. कारण तो धोरणात्मक निर्णय होता. पण या ठिकाणी न्यायमूर्ती नाईक यांच्या अध्यक्षेतेखाली एक समानीकरण समिती नेमली. आपण हे नाव काळजीपूर्वक ऐकण्याची गरज आहे. या ठिकाणी समानीकरण समिती नेमली आणि त्या समितीकडे पदांची समतुल्यता ठरविण्याचे काम सोपवले. कारण एखादे पद त्या ठिकाणी असते तर एखादे पद या ठिकाणी असते. त्यादृष्टीने ते बरोबर आहे. न्यायमूर्ती नाईक यांनी त्यावर अतिशय चांगला अहवाल दिला. शिक्षकांच्या एका वर्गावरील जो भेदभाव होता तो दूर करणारा निर्णय त्यामध्ये होता. 1996 पासून एक नवा प्रयोग महाराष्ट्रामध्ये सुरु झाला. वेतन आयोग नेमावयाचा नाही पण जी समिती नेमावयाची तिला वेतन सुधारणा समिती असे नाव देण्यात आले. श्री. सुकथनकर नावाचे माजी मुख्य सचिव होते त्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीला वेतन समानीकरण समिती असे नाव न देता वेतन सुधारणा समिती असे नामकरण करण्यात आले. पूर्वी हायकोर्टाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती समितीवर नेमले जावयाचे त्यांच्या ऐवजी एका माजी मुख्य सचिवांना नेमले गेले. सुकथनकर समितीच्या अहवालाचे वर्णन करावयाचे झाले तर केंद्र शासनाच्या ज्या शिफारशी होत्या त्यात शासनातील आपल्या आवडत्या काही पदांना आणि पदाधिकाऱ्यांना वाढवून दिले. त्यांना अपग्रेड केले. बाकीच्या बहुसंख्य लोकांना जे आहे ते दिले आणि सर्व शिक्षकांना एका सोयीने कापून काढले. सबंध महाराष्ट्रभर असंतोष निर्माण झाला.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख ....

सुकथनकर समितीचा अहवाल जाळण्यात आला आणि त्या वेळच्या सरकारने सुकथनकर समितीचा अहवाल कचऱ्याच्या टोपलीत टाकला. मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आणि केंद्राचे जे निर्णय आहेत ते महाराष्ट्रामध्ये लागू केले. मे, 1999 मध्ये त्याबाबतचा शासन निर्णय निघाला. ते भांडण त्या ठिकाणी संपले. आता सहाव्या वेतन आयोगाच्या वेळेला या माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षकांची स्थिती काय आहे ? मागच्या समितीचे अध्यक्ष निदान सेवानिवृत्त मुख्य सचिव होते पण यावेळी एका सचिवांना नेमले. न्यायमूर्ती तर नाहीच. ज्यांना नेमले त्यांना कंत्राटी स्वरुपामध्ये काम दिले. त्यांना एक लाख रुपयांचे कंत्राट देऊन 3 महिन्याच्या आत अहवाल देण्यास सांगितले. त्यांनी तीन महिन्याच्या 8-10 दिवस अगोदरच अहवाल दिला. त्यांनी सुध्दा सुकथनकरांचा परफॉर्मन्स रिपीट केला. म्हणजे आपल्या आवडत्या काही वर्गांना वाढवून दिले. बाकीच्या शासकीय कर्मचाऱ्यांना जे आहे ते दिले आणि शिक्षकांना एका सोयीने कापून काढले. एखादा योध्दा किंवा वीर तलवार घेऊन बाहेर निघावा तशा पध्दतीने त्यांनी तलवार घेतली आणि प्राथमिक शिक्षकांना, माध्यमिक शिक्षकांना आणि उच्च माध्यमिक शिक्षकांना सपासप कापून काढले. आता कंत्राटीकरणाचा जमाना आहे. ठेकेदारी पध्दतीने काम दिले जाते. त्यांना एक लाख रुपयांचा ठेका दिला. त्यांनी एकही नवीन आर्ग्युमेंट दिले नाही. त्यांनी एकच वाक्य वापरले की, हे सुकथनकरांनी यापूर्वी सांगितलेले आहे त्यामुळे मी सांगण्याची काही गरज नाही. मी ते वाचून दाखवू शकतो पण वेळेची मर्यादा लक्षात घेता ते वाचून दाखविण्यामध्ये मी वेळ घालविणार नाही. त्यांनी काही मेहनत घेतली नाही. यांना का कापून काढतो याची त्यांनी काहीही कारणे दिलेली नाहीत. त्यांनी एकाच वाक्यात कारण दिले की, सुकथनकरांच्या अहवालामध्ये त्यांनी हे सांगितलेच आहे. म्हणजे तुका म्हणे सारखे सुकथनकर म्हणे असे त्यांनी केले. त्यांच्या अहवालातील परिच्छेद क्रमांक सुध्दा चुकीचे नमूद केले. मग ते शुद्धिपत्रकात दुरुस्त केले. हे काम त्यांना ठेकेदारी पध्दतीने दिले होते. यांनी स्पष्टपणे असे सांगितले की, यांना सहावा वेतन आयोग लागू करण्याची गरज नाही. मी त्यांचे वाक्य आपल्याला जसेच्या तसे वाचून दाखवतो.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परिच्छेद क्र. 3.9.2.मध्ये असे म्हटलेले आहे की "या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन समिती अशा निष्कर्षाप्रत आलेली आहे की शिक्षकीय पदांच्याबाबत केन्द्रीय आयोगाच्या शिफारशी जशाच्या तशा स्वीकारणे योग्य होणार नाही." सभापती महोदय, ही धैर्याची गोष्ट आहे. सुकथनकारांचा रिपोर्ट महाराष्ट्रातील माध्यमिक शिक्षकांनी पेटवून लावला होता. माझ्या समोर महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक मंडळाने जो आंदोलनाचा कार्यक्रम दिलेला आहे तो माझ्या टेबलवर आहे. 21 तारखेला जिल्ह्या जिल्ह्याच्या ठिकाणी हकिम समितीच्या रिपोर्टवर थुंकण्याचा कार्यक्रम महाराष्ट्रामध्ये जाहीर झालेला आहे. थुंकण्याची कृती ही निषेधाची तीव्रतर कृती आहे असे आपण समजतो. हकिम यांनी काय केले ? मी आपल्याला सांगितले की, त्यांनी काहीही कारणे दिलेली नाहीत. सुकथनकारांनी दिलेली सर्व कारणे हास्यास्पद आहेत. सुकथनकरांनी दिलेला रिपोर्ट कच-याच्या टोपलीत टाकल्यामुळे ती कारणे सांगणे बरोबर नाही. त्यांनी सांगितले की, त्यांची संख्या कमी आहे आणि यांची संख्या जास्त आहे. ते दिल्लीसारख्या राजधानीत काम करतात आणि हे शहरात काम करतात. म्हणजे कोण नंबरमध्ये किती आहे हे पाहून आपण वेतन ठरविणार आहात काय ? कोण शहरात काम करतो तर कोण खेडयामध्ये काम करतो. बिचा-या सुकथनकरांना हे माहीत नव्हते की जवाहर नवोदय विद्यालय खेड्यात सुध्दा आहेत आणि त्यावरुन वादंग झाले. ह्या गोष्टी हकिम यांना ते केन्द्रात असल्यामुळे माहीत नव्हत्या. आता यांनी काय केले हे सांगतो आणि यांचा निरोप घेतो. सभापती महोदय, परिच्छेद क्रमांक 3.8.22मध्ये केन्द्राने असे म्हटलेले आहे की, "In order to attract better Teachers and to retain them in the Government, the Commission is inclined to recommend a higher start for Primary School Teachers." चांगली माणसे तेथे आली पाहिजेत. नुसती आली पाहिजेत असे नाही तर ती तेथे टिकलीही पाहिजेत. नायब तहसिलदारकी मिळते म्हणून ती जाता कामा नयेत. यासाठी आम्ही या शिफारशी करीत आहोत. यांनी त्यांचे वेतन 3 हजार रुपयांनी कापले. सा-याच्या सा-या वेतन श्रेण्या यांनी कापल्या. श्रेणीवेतने कापली. आता श्रेणी वेतन ही नवीन पध्दत आलेली आहे.प्राथमिक शिक्षकांना पे बॅण्ड 2 मधून काढून पे बॅण्ड 1 मध्ये टाकलेले आहे आणि त्यांचा ग्रेड पे देखील 4200 होता तो 2800 केला. म्हणजे ग्रेड पे मध्ये 1400 चा फरक केला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फरक केला. 30 टक्कयांनी वेतन कापले. तसेच 3 हजार रुपयांनी पे बॅण्ड कमी केला. म्हणजे 5 हजार रु.ची कपात या प्राथमिक शिक्षकांच्या पगारामध्ये केली. प्राथमिक शिक्षकांकडे पाहण्याचा हकिम यांचा दृष्टीकोन घाणेरडा, तुच्छ आणि निंदनीय आहे. आम्ही शासनाला दुर्दैवाने दोष देऊ शकत नाही. कारण मी स्वत: आणि या सभागृहातील चार सन्माननीय सदस्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले, माननीय अर्थमंत्र्यांना पत्र लिहिले आणि सांगितले की, तो रिपोर्ट आम्हाला पाहू द्यावा, त्यावर आमचे म्हणणे ऐकून घ्यावे आणि त्यानंतर आपण निर्णय घ्यावा. शेवटी शासनालाच निर्णय घ्यावयाचा आहे. परंतु कपट हे अंधारामध्ये उत्तम जमते. कपटाला उजेडाचे वावडे आहे. हकिम समितीचा रिपोर्ट मंत्रिमंडळाचा निर्णय होईपर्यन्त जाहीर झाला नाही. आम्ही चार सदस्यांनी ज्या दिवशी निर्णय होणार होता त्या दिवशी पत्र दिले. त्या दिवशी निर्णय झाला नाही ही श्री. दिलीप वळसे-पाटील यांची कृपा. कारण ते त्या दिवशी मुंबईत नसल्यामुळे निर्णय एक हप्ता पुढे गेला. 8 दिवस आमचे पत्र पडून राहिले. परंतु आम्हाला तो रिपोर्ट काही पहायला मिळाला नाही. आम्ही दोन-तीन सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकडे गेलो आणि त्यांना विचारले की, हा रिपोर्ट गुप्ता का ठेवला ? त्यावेळी त्यांनी सांगितले की, रिपोर्ट गुप्त ठेवला नाही. तो वेबसाईटवर गेलेला आहे. हा रिपोर्ट वेबसाईटवर मंत्रिमंडळाचा निर्णय झाल्यानंतर गेला. त्यातील सारी घाण आणि मळमळ बाहेर आली. प्राथमिक शिक्षकांच्या वरिष्ठ श्रेणीचे 4600 रुपयाचे ग्रेड पे 4200 केले. त्यांची निवडश्रेणी 4800 होती ती 4300 केली. केन्द्राने लाखो कर्मचा-यांना जिथे 4200 ग्रेड पे दिला तिथे महाराष्ट्रामध्ये तो 4200 च्या ऐवजी 4600 केला त्यामुळे प्राथमिक शिक्षकांचा ग्रेड पे 4800 वरुन 4300 करण्यात आला. माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत सुध्दा त्यांचा मूळ ग्रेड पे जो 4600 होता तो या हकिमांनी 4300 केला. वरिष्ठ श्रेणीचा जो ग्रेड पे4800 होता तो 4400 केला आणि निवडश्रेणीचा 5400 होता तो 4800 केला. कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत 4800 चा ग्रेड पे 4600 केला आणि वरिष्ठ श्रेणीचा ग्रेड पे 6600 होता तो 5700 केला. म्हणजे जवळ जवळ 900 रुपयांची कपात केली.

...नंतर श्री. गिते....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख....

एखाद्या सोयीने एखादा शूर वीर बाहेर निघावा, त्याने तलवारीने सर्व पृथ्वी निशिक्षकीय करुन टाकीन असे म्हणावे, अशा शिक्षकांच्या वेतनश्रेण्या या शासनाने कापून टाकल्या. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, महाराष्ट्रातील शिक्षकांशी अशा प्रकारचा खेळखंडोबा पूर्वी श्री.सुकथनकर समितीच्या वेळी झाला होता. या सरकारने सर्वांना 20-25 टक्के वाढवून दिले. परंतु शिक्षक वर्गावर मात्र 30-40 टक्क्यांची तलवार चालविली. शिक्षक वर्गावर फार मोठा अन्याय केला गेला आहे. नोकरशाहीने केलेल्या अन्यायाच्या कारस्थानाला शासनाने मदत करु नये अशी मी विनंती करतो आणि तिसरा जो वर्ण आहे त्या वर्णाचे विवेचन मी येथेच थांबवितो.

सभापती महोदय, चातुर्वर्णीयातला चौथा वर्ण विद्यापीठ आणि महाविद्यालयीन कर्मचा-यांचा आहे. हा चातुर्वर्णीयातला चौथा वर्ण आहे त्याची तर परिस्थिती अतिशय भयानक आहे. या सभागृहात डिसेंबर महिन्यात चर्चा झाली. त्या चर्चेच्या वेळी माननीय मंत्री महोदय उपस्थित होतो. त्यावेळी आम्ही असे म्हणालो की, हा एकच वर्ग असा आहे की, ज्याच्या बाबतीमध्ये अतिरिक्त भाराच्या 80 टक्के भार केंद्र शासन उचलते. केंद्र सरकार फक्त या वर्गाचाच भार उचलते. अन्य वर्गाच्या बाबतीत तसा भार उचलत नाही. या सभागृहात डिसेंबर महिन्यात या विषयाच्या बाबतीत चर्चा झाली. त्यावेळी माननीय मंत्री महोदय जे काही म्हणाले आहेत त्यातील एक वाक्य मी या ठिकाणी वाचून दाखवितो. तशी वाक्ये सांगण्यापेक्षा ते वाक्य या ठिकाणी कोट करणे जास्त श्रेयस्कर आहे. "एच.आर.डी.मंत्रालय आणि यु.डी.जी.सी.यांनी आदेश काढले आहेत, त्या आदेशाचे महाराष्ट्र शासन पालन करील. वेतन आयोगाच्या ज्या शिफारशी आहेत, त्याबाबत सर्व अधिकारी आणि कर्मचा-यांच्या बाबतीत ज्यावेळी महाराष्ट्र शासन निर्णय घेईल, त्यावेळी शिक्षण आणि उच्च शिक्षण विभागातील जे कर्मचारी आहेत, त्यांचेही त्यांचेबरोबर करुन घेऊ." सभापती महोदय, हकीम समितीचा अहवाल राज्य सरकारला डिसेंबर महिन्यात प्राप्त झाला. तो अहवाल अतिशय गुप्त ठेवण्यात आला. त्या अहवालाच्या बाबतीत निर्णय झाला. परंतु त्याच डिसेंबर महिन्यात केंद्र शासनाचा शासन निर्णय आला. श्रीकृष्ण आयोगाच्या अहवालाच्या बाबतीत काय झाले त्यासंबंधीची माहिती मी मघाशी दिली. श्रीकृष्ण आयोगाचा अहवाल केंद्र सरकारला सादर झाल्याबरोबर हजार पानांचे दोन खंड 10 मिनिटांच्या आत वेबसाईडवर गेले. परंतु हकीम समितीच्या अहवालाबाबतची

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

माहिती मंत्रिमंडळाच्या निर्णय झाल्यानंतर पहावयास मिळाली. श्रीकृष्ण आयोगावर जो फीड बॅक आला तो लक्षात घेऊन सरकारने अनेक बदल केले. दिनांक 31 डिसेंबर, 2008 रोजी केंद्र शासनाचा निर्णय झाला. ज्या दिवशी याबाबतीत शासन निर्णय झाला. तो निर्णय नंतर लागलीच वेबसाईडवर आला. "केंद्र शासनाने दिनांक 31 डिसेंबर, 2008 रोजी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहले आहे त्यात असे म्हटले आहे की, "Copies of the said communication were endorsed, among others, to Chief Secretaries of State Governments with clear advice in regard to what the State Governments are expected to do in order to be eligible for Central assistance..... The UGC has, in the meantime, approached MHRD for guidance..." त्यांनी दिनांक 31 डिसेंबर, 2008 रोजी जी.आर.काढला आणि त्याच दिवशी महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवांना केंद्र सरकारने पत्राने कळविले की, आम्ही याबाबतीत 80 टक्के मदत देण्यास तयार आहोत. तुम्ही याबाबतची कार्यवाही ताबडतोब सुरु करा. आता तुम्ही कोणत्याही नवीन कागदपत्रांची वाट पाहू नका. असे लिहिल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षण विभागाच्या सचिवांना काय लिहिले आहे ते मी वाचून दाखविणार आहे. तत्पुर्वी त्याबाबतची बाबतची माहिती सांगणे जास्त श्रेयस्कर आहे. केंद्राने सांगितले की, 89 टक्के आर्थिक सहाय्य देण्यास आम्ही तयार आहोत. 40 टक्के आर्थिक सहाय्य दिनांक 31 मार्च, 2009 रोजीच्या आत देण्यास तयार आहोत. 40 टक्के थकबाकी देण्याची कार्यवाही दिनांक 31 मार्च, 2009 च्या आत करावी. माननीय वित्तमंत्र्यांच्या एक गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र माझ्याकडे उपलब्ध आहे. " विद्यापीठ अनुदान आयोगाने फेब्रुवारी, 2009 मध्ये सर्व राज्यांच्या शिक्षण सचिवांना पत्र लिहले आहे त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, "The Commission has received orders from the Government of India, Ministry of Human Resource Development, Department of Higher Education, New Delhi vide letter No. 1-32/2006-U.II/U.I (i) and 1-32/2006-U.II/U.I (ii) dated 31st December, 2008 on the above subject and to say that the State Government may take action to adopt the

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

above Government of India scheme for State Universities and Colleges and payment of pay scales, enhancement of retirement age and release of 40% of the arrears during the current financial year in accordance with these provisions." दिनांक 31 मार्च, 2009 च्या आत 40 टक्के थकबाकी द्यावी असे स्पष्टपणे केंद्राने म्हटलेले आहे. या राज्यातील नोकरशाही पूर्णपणे इ ोपलेली आहे...

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

त्यांना याबाबत काही करावेसे वाटत नाही. चातुर्वण्यातील चवथ्या वर्गाला दिली जाणारी ही वागणूक आहे. झोप लागल्यासारखी परिस्थिती आहे. काही ॲक्शन झालेली नाही. हे मंत्रीमहोदयांनी सभागृहात सांगितल्यानंतर मी मघाशी मंत्रीमहोदयांनी सभागृहात सांगितले ते वाचून दाखविले. आम्ही केंद्राचा निर्णय आल्यानंतर निर्णय घेऊ म्हणाले. डिसेंबरमध्ये हकिम समिती आली. शिक्षकांना कापून काढणार होते. कापून झाल्यानंतर रक्तपात व्हायचा तो झाला. ते बाहेर काय लढाई करावयाची ती करतील. परंतु यांच्याबाबतीत गंभीर घोळ झाला आहे. विद्यापीठ आणि महाविद्यालयीन शिक्षकांबाबत केंद्र शासन म्हणते की, 31 मार्चच्या आत 40 टक्के थकबाकी द्या. त्यासाठी लागणारा पैसा घेऊन जा. परंतु आम्हाला कोणला तो पैसा आणण्यासाठी वेळ नाही. हे ऐकायला नेमके ते नाहीत. केंद्र सरकार देत असताना या शिक्षकांना फायदा देऊ नये असे जर वाटत असेल तर शासनाला कावीळ झालेली आहे. माझे याबाबतीत म्हणणे असे आहे की, ही अत्यंत अयोग्य अशा प्रकारची गोष्ट झालेली आहे. सहाव्या वेतन आयोगाचा उजेड आणि प्रकाश हा निर्णय घेतला येथपर्यंत ठीक आहे. चांगली गोष्ट आहे. योग्यवेळी निर्णय घेतला. केंद्र पातळीवर जो निर्णय होणार तोच राज्य पातळीवर होणार आहे हा निर्णय घेतला. तारीख बदलली नाही हे चांगले झाले. परंतु शासनाने याबाबत काही निर्णय घेतला नाही हे योग्य नाही. प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांबाबत आचारसंहिता लागू झाल्यामुळे मंत्रीमहोदयांना शांतता दिसते. ती खरी मानू नये. सुकथनकर समितीच्या वेळी काय झाले त्याची फाईल उघडून पहावी. त्या संघटनेला बोलावून विचार करावा आणि 80 टक्के सहाय्य ज्याबाबत मिळते त्याबाबत आपल्या अधिकाऱ्यांना थोडी हालचाल करावयास सांगावी. सहाव्या वेतन आयोगाचा विषय मला वाटते अंधाराची बाजू फार मोठी आहे. सहावा आयोग म्हटले की, पाचव्यासारखे पाहतात तो भाग वेगळा आहे. मी एक दोन गोष्टींचा उल्लेख करु इच्छितो. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी शेगाव आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या स्थळांचा उल्लेख केला. राष्ट्रसंत या विषयाबाबत यापूर्वी सभागृहात चर्चा झालेली आहे. राष्ट्रसंत उपाशी आहेत. सभापती महोदय, आपण चांगली भूमिका बजावून या कामाला न्याय दिला होता. या दोन मुद्यांबाबत शासनाने निश्चितपणे घोषणा केली तर आम्हाला आनंद होईल. आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या अंतरिम अर्थसंकल्पाबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी विचार मांडले आहेत. सहाव्या वेतन आयोगाबाबत अधिक भाष्य केले गेले. परंतु या राज्यामध्ये आपण सुरक्षित असलो, या राज्यामध्ये आपण जिवंत राहिलो तरच वेतनासंबंधी चर्चा करण्यास तुम्हा-आम्हाला संधी मिळणार आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याला 720 कि.मी.चा सागरी किनारा लाभलेला आहे. परंतु शासनाने 2008-2009 या आर्थिक वर्षासाठी फक्त 166.94 कोटीची तरतूद केली. या 720 कि.मी.पैकी 145 कि.मी.सागरी किनारा रायगड जिल्हयात आहे.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकरजी रावते हे अनेक वेळा सभागृहात अतिरेक्यांच्या बाबतीत चर्चा करतात. त्यामुळे मी म्हणालो की सन्माननीय सदस्यांना याबाबत जास्त माहिती आहे. तसेच सन्माननीय सदस्या प्रा. फौजिया खान यांनी समुद्रमार्गाव्यतिरिक्त देखील अतिरेकी येऊ शकतात असा मुद्दा उपस्थित केल्यामुळे माझ्यापेक्षा सन्माननीय सदस्या प्रा. फौजिया खान यांना जास्त माहिती असावी, असे मी म्हणालो.

प्रा.फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी आता जो उल्लेख केला तो कामकाजातून काढून टाकावा.

तालिका सभापती (श्री. उल्हास पवार) : ठीक आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, मी सन्माननीय सदस्या प्रा. फौजिया खान यांच्यावर आक्षेप घेतलेला नाही. त्या म्हणाल्या की, अतिरेकी हे समुद्रमार्गेच नाही तर कोठूनही येऊ शकतात. मला वाटत होते की, फक्त समुद्र किनाऱ्यातूनच अतिरेकी येऊ शकतात, कारण माझे ज्ञान तेवढेच होते. परंतु सन्माननीय सदस्या यांनी सुचविल्यामुळे माझ्यापेक्षा त्यांना जास्त माहिती असावी असा उल्लेख मी केला. त्यात कुठलाही हेतू नाही.

महोदय, शासनाने या समुद्रकिनाऱ्याचा विकास करण्यासाठी 166.96 कोटीचीच तरतूद केली असून ती अत्यंत अपुरी आहे. आज समुद्रकिनाऱ्याच्या बाबतीत विचार केला तर ही अत्यंत गंभीर बाब म्हणता येईल व पाहिजे त्या गांभीर्याने या किनाऱ्याच्या संरक्षणाकडे शासनाने लक्ष दिलेले नाही. मुंबई ते गोवा हा एकूण 720 किलोमीटरचा समुद्रकिनारा असून त्यातील 145 किलोमीटरच्या किनाऱ्यावर पोलिसांचे फक्त 28 अधिकृत लँडिंग स्क्वॉड आहेत. ते बागमांडल्यापासून तर बेलापूरपर्यंत असे हे 28 स्क्वॉड आहेत. परंतु अनधिकृतपणे कुठल्याही किनाऱ्यावर कुठलीही बोट कधीही लागू शकते हे विसरुन चालणार नाही. म्हणून या सभागृहात गेल्या सात वर्षांपासून मी सातत्याने बोलून याबाबतीतील व्यथा मांडत आहे. अशा प्रकारे अपुरी तरतूद करुन शासन एक-दोन लाकडी बोट ठेवून किनाऱ्याचे संरक्षण करायला मागत आहे. परंतु 26 नोव्हेंबर, 2008 ची घटना विचारात घेता यासाठी भरीव तरतूद करण्याची गरज आहे व पोलिसांकडे अत्याधुनिक शस्त्रे देणे आवश्यक आहे. एवढेच नव्हे तर माझी माननीय अर्थमंत्र्यांना

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ SBT/

श्री. जयंत प्र.पाटील.....

विनंती आहे की, यासंदर्भात गृह विभागाशी चर्चा करुन आधुनिक बोटी विकत घ्याव्यात. त्या किनाऱ्यावरच राहतील, गस्ती होणारच नाही म्हणून केवळ अशा बोटी विकत घेऊन चालणार नाही तर आपण एकविसाव्या शतकाकडे जात असताना अत्याधुनिक व्हिडियो कॅमेरे आपल्याकडे असले पाहिजेत. त्या अत्याधुनिक कॅमेऱ्यांचा प्रत्येक बोटीमध्ये उपयोग करुन घेतला पाहिजे. तसेच या गस्ती नौकांवर गेलेले पोलीस योग्य प्रकारे काम करतात की नाही याचे नियंत्रण एकाच ठिकाणाहून होणे आवश्यक आहे, त्यांच्यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. या अनुषंगाने माझी अशी मागणी आहे की, शासनाने एकूण 500 कोटी रुपयाची तरतूद करावी. त्या नौका किनाऱ्यावरच फिरतील याकडे लक्ष ठेवावे. अन्यथा फक्त सामुग्री घ्यावयाची, त्यांना लागणारे पेट्रोल फक्त खर्च झाल्याचे दाखविले जाईल आणि गस्ती मात्र होणार नाही. असे झाले तर ज्या उद्देशाने या बोटी खरेदी केल्या जातात तो उद्देश मात्र सफल होणार नाही. अशा प्रकारे 11 नॉटिकल माईलपर्यंत किनाऱ्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी राज्यशासनाची आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील....

त्यामुळे या प्रश्नाकडे गंभीर लक्ष दिले पाहिजे आणि त्याच बरोबर भरपूर निधी सुध्दा उपलब्ध करुन दिला पाहिजे. यासंदर्भात केंद्रसरकारने किती पैसे दिले आहेत यासंदर्भातील माहिती अर्थसंकल्पात आम्हाला दिसलेली नाही. मुंबईवर ज्यावेळी दहशतवादी हल्ला झाला त्यावेळी केंद्रसरकारने सांगितले की, आम्ही दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी मुंबईला 1 हजार कोटी रुपये देऊ, निधीची कोणत्याही प्रकारे कमतरता पडू दिली जाणार नाही. मुंबईवर जेव्हा दहशतवादी हल्ला झाला त्यावेळी जवळ जवळ संपूर्ण केंद्रीय मंत्रिमंडळ मुंबईत आले होते, देशाचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, श्रीमती सोनिया गांधी यांनी मुंबईत येऊन सांगितले की, किना-याचे संरक्षण करण्यासाठी केंद्रशासनाकडून भरपूर निधी देण्यात येईल. परंतु केंद्रशासनाचा निधी आतापर्यंत राज्यशासनाला किती मिळाला आहे याची आम्हाला काही सुध्दा माहिती देण्यात आलेली नाही. किना-याच्या संरक्षणासाठी जो निधी आहे तो फार अपूर्ण आहे. त्यामुळे किना-याचे संरक्षण करण्यासाठी अधिक निधी मिळाला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भात या ठिकाणी ब-याच सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. जे वेतन घेतात त्यांच्यावर या ठिकाणी चर्चा झालेली आहे. परंतु जे कायम विना अनुदानित तत्वार काम करणारे कर्मचारी आहेत त्यांच्या संदर्भात या ठिकाणी मात्र कोणीही विचार मांडलेले नाहीत. जे कायम विना अनुदानित तत्वावर काम करतात त्यांचे प्रतिनिधीत्व करणारे या ठिकाणी सुध्दा उपस्थित आहेत. (अडथळा) माझी या संदर्भात मागणी आहे की, आम्हाला सहावा वेतन आयोग उशिरा दिला तरी चालेल परंतु जे कायम विना अनुदानित तत्वावर काम करतात त्यांना प्रथम वेतन दिले गेले पाहिजे. त्यांना वेतन दिले तर त्यासाठी आमचा विरोध राहणार नाही. परंतु जे कायम विना अनुदानित तत्वावर आहेत, जे 10-10 वर्षापासून वेतन न घेता काम करतात त्यांना वेतन देण्याच्या संदर्भात या ठिकाणी कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी विचार मांडलेले नाहीत. माननीय अर्थमंत्र्यांनीच "कायम" हा टाकलेला आहे. याला माननीय खासदार श्रीमती सुप्रिया सुळे यांनी विरोध केलेला आहे. माननीय खासदार सुप्रिया सुळे यांच्या प्रयत्नामुळेच माननीय अर्थमत्र्यांनी "कायम" हा शब्द काढून टाकलेला आहे. त्यामुळे मी माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील....

खासदार श्रीमती सुप्रिया सुळे यांचे अभिनंदन करतो. या ठिकाणी माननीय अर्थमंत्र्यांनी "कायम" हा शब्द काढून टाकू असे कबूल केलेले आहे. सभापती महोदय, आचार संहिता असली तरी "कायम" हा शब्द काढून टाकण्यास काही अडचण निर्माण होईल असे मला वाटत नाही. बाकीच्या गोष्टी आचार संहितेमध्ये आपण खुशाल करता मग "कायम" हा शब्द काढून टाकण्यास आपल्याला काय हरकत आहे ? या सभागृहात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी "कायम" हा शब्द आठ दिवसात काढून टाकण्यात येईल असे आश्वासन दिले होते परंतु अजून सुध्दा माननीय मुख्यमंत्रीमहोदयांचे आठ दिवस पूर्ण झालेले दिसत नाहीत. त्यामुळे माननीय मुख्यमंत्री महोदयांचे आठ दिवस केव्हा संपणार आहेत? कायम विना अनुदानित तत्वावरील शिक्षकांना न्याय कधी मिळणार असा माझा सवाल आहे. कर्जमाफीच्या संदर्भात या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपले विचार मांडलेले आहेत. या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांचे कर्जमाफीचे भाषण फार चांगले झाले. सन्माननीय सदस्य फार गोड गोड बोलतात, ते कधीही आक्रमक बोलत नाही, जे काही बोलतात ते खरे बोलतात. परंतु मला दु:ख होते की, राज्य शासनाने कर्ज माफी जाहीर करण्यापूर्वी केंद्रसरकारने कर्ज माफी जाहीर केली. यासंदर्भात मोठ मोठे जल्लोश झाले, कार्यक्रम झाले. पश्चिम महाराष्ट्रात तर मोठ मोठया रॅलीज निघाल्या. संपूर्ण 7/12 कोरा झाला पाहिजे यासंदर्भात बीडमध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी शिवसेना स्टईल भाषण केले होते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

7/12 कोरा म्हणजे काय ? 7/12 वर कुठलाही बोजा नाही. आमच्या कोकणात 7/12वर सावकाराचा बोजा नाही. श्री.रावते साहेब मराठवाड्यामध्ये 7/12 वर सावकराचा बोजा असेल. मी सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी यांचे भाषण ऐकले आहे. जे कर्ज शेतकऱ्यांवर आहे ते कर्ज एक रकमी फेडले तर 25 टक्के कर्ज माफ करणार असे सांगण्यात आले. मग ते कर्ज शेतीसाठी, ट्रॅक्टरसाठी असू दे, कुठल्याही शेती व्यवसायासाठी घेतलेले कर्ज एक रकमी फेडले तर केंद्र सरकार 25 टक्के माफ करणार असे सांगण्यात आले. पण 8 दिवसाने ऑर्डर आली की, अशी योजना नाही. ही फसवी कर्ज माफी आहे. माझी प्रा.नवले यांना विनंती आहे की, त्यांनी ढिंढोरा पिटवू नये. मी एका बँकेचा संचालक आहे. आज प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या हातामध्ये काय मिळते ? फक्त वीस हजार रूपयांची कर्जमाफी. आपण शेतकरी आहात. आपल्याला माहिती आहे की, बँकेत, सोसायटीमध्ये कर्ज माफी मिळविण्यासाठी किती वेळा जावे लागते. कर्जमाफी मिळविण्यासाठी शेतकऱ्याला दोन ते तीन हजार रूपये खर्च येतो. त्यामुळे येथे कोणी ढिंढोरा पिटवू नये. ऑडिटरची, जॉईंट रजिस्ट्रारची, कमिशनरची वेगळी कमिटी येते. त्याचा बोजा शेतकऱ्यांवर पडतो. त्यामुळे ही कर्जमाफी बोगस आहे. प्रत्यक्ष शेतकऱ्यांना काहीही मिळत नाही. हे आपण गावात जाऊन बघा. नगरचे सन्माननीय सदस्य श्री.गोविंदराव आदिक हे कर्जमाफीला कंटाळले. त्यामुळे त्यांनी कॉंग्रेस सोडली. आता ते राष्ट्रवादीमध्ये गेले. त्यांनी कर्जमाफीमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे, अशा प्रकारची मागणी केली आहे. शेतकऱ्यांना काहीच मिळत नाही. त्यामुळे संपूर्ण शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी झाली पाहिजे.

सभापती महोदय, सहाव्या वेतन आयोगाला माझा विरोध नाही. सन्माननीय सदस्य श्री.रावते यांचा सहाव्या वेतन आयोगाला विरोध असेल. त्यांच्या एवढा अभ्यास मी केलेला नाही. मला आकडेवारी कळत नाही. वेतनासाठी आठ हजार कोटी रूपयाची तरतूद केली जाते. तीन हजार कोटी रूपयांची तरतूद शेतकऱ्यांसाठी करण्यात आली. त्याचा खूप मोठा गाजावाजा करण्यात आला. त्यापेक्षा आपण 15 ते 20 हजार कोटींची तरतूद करून शेतकऱ्यांना कर्जमाफीतून मुक्त करावे. तरच कर्जमाफी होईल. वस्तुनिष्ठ कर्जमाफी झाली पाहिजे, अशाप्रकारची मागणी मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

या निमित्ताने करतो. सहकार खात्याची यंत्रणा आहे. माझे मित्र सन्माननीय श्री.हर्षवर्धन पाटील हे नव्या दम्याचे सहकार मंत्री आहेत. त्यांच्यावर कोणाचा दबाव आला हे मला कळत नाही. त्यांच्याकडून माझ्या अपेक्षा आहेत. या सर्व यंत्रणांमध्ये खऱ्या अर्थाने सहकार राहिला पाहिजे. आज काय परिस्थिती आहे ? 2400 कोटीचा एमपीए कोणाकडे आहे ? यासाठी एक समिती नेमलेली आहे. कोणाकडून पैसे येणे आहे याची आपण यादी काढावी. 90 संस्थांकडून 2400 कोटी रूपये येणे बाकी आहे. त्यात 46 साखर कारखाने आहेत. 90 संस्थाकडे 2400 कोटी रूपये अडकून पडलेले आहेत.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ...

त्याच्यामध्ये एकूण 46 सहकारी साखर कारखाने असून त्या सहकारी साखर कारखान्यांना राज्य शासनाने हमी दिलेली आहे. तेव्हा जी कर्जमाफी देण्यात आली आहे ती नेमकी कोणाला दिली गेली आहे ? 2400 कोटी रुपये कोणी खाल्ले आहेत ? हे समजणे आवश्यक आहे. धुळे जिल्हयातील शहादा येथील श्री. पी.के.अण्णा पाटील यांच्या सहकारी साखर कारखान्याकडे आणि स्टार्च फॅक्टरीकडे 450 कोटी रुपये थकबाकी आहेत. तेव्हा या संदर्भात शासन केव्हा चौकशी करणार आहे ? साने गुरुजींच्या कर्म भूमीत हे प्रकार सुरु आहेत असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. कर्ज माफीच्या निमित्ताने ज्यांनी घोटाळे केलेले आहेत, पैशांचा गैरवापर केलेला आहे त्यांची चौकशी केली, ऑडिट केले तर बराच गैरव्यवहार झाल्याचे लक्षात येईल आणि त्या पैशातून शेतक-यांना आणखी कर्जमाफी देता येईल असे मला माननीय वित्त मंत्र्यांना सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये ऊस पिकविणा-या शेतक-यांना जेवढया सवलती दिलेल्या आहेत , ऊसाच्या प्रोसेसिंग युनिटला जेवढया सवलती दिलेल्या आहेत, जेवढी मदत दिलेली आहे जेवढी माफी दिलेली आहे तेवढी माफी वा मदत गेल्या 60 वर्षात कोकणामध्ये दुर्देवाने देण्यात आलेली नाही. कोकणामध्ये भाताचे एकच पीक होत असते. परंतु गेल्या 60 वर्षातील आकडेवारी आणि अर्थसंकल्प पाहिल्यानंतर कोकणातील भात पिकविणा-या शेतक-यांना एक टक्का सुध्दा मदत मिळालेली नाही असे दिसून येईल. सभापती महोदय, अर्थसंकल्पावर अनेक सन्माननीय सदस्यांना अजून बोलावयाचे आहे याची मला जाणीव आहे त्यामुळे या संदर्भात मी अधिक बोलणार नाही. परंतु या चर्चेच्या निमित्ताने मला एकच मुद्दा येथे मांडावयाचा आहे. कोकणात खार लॅन्डची शेती आहे. महाराष्ट्राला 720 किलोमिटर्स लांबीचा समुद्र किनारा आहे त्या किनार पट्टीला लागून असलेली जी शेती असते त्या ठिकाणी बांध बंदीस्तीची कामे करणे आवश्यक आहे. परंतु ही कामे केली जात नाही. अर्थसंकल्पामध्ये विविध योजनां जाहीर केल्या जातात आणि त्यांच्यासाठी मोठया प्रमाणावर तरतुदी केल्या जातात याबाबत वारंवार डांगोरा पिटला जातो परंतु 720 किलोमिटर्स समुद्रकिना-यावर बांध बंदीस्तीसाठी फक्त 2 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

एक सन्माननीय सदस्य : त्या विभागाचे मंत्री कोण आहेत ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : त्या विभागाचे मंत्री कोकणातीलच आहेत. या चर्चेच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, बांध बंदिस्ती न केल्यामुळे खारे पाणी जेव्हा शेतामध्ये शिरते तेव्हा अंत्यत वाईट स्थिती निर्माण होत असते. हे पाणी शेतात शिरल्यानंतर त्या भागामध्ये सहा महिन्यात मॅन्ग्रोव्हज निर्माण होतात. हे मॅन्ग्रोव्हज निर्माण झाल्यानंतर त्याची तोड करण्यास देखील कायद्याने बंदी घालण्यात आलेली आहे. त्यामुळे कोकणातील ही शेती जाणुनबुजून नष्ट करण्याचा आणि भांडवलदाराना ही जमीन देण्याचा राज्य सरकार प्लॅनिंग करीत आहे असे यावरुन दिसून येते. एकदा त्या भागात मॅन्ग्रोव्हज वाढल्यानंतर तेथे शेती पिकवता येत नाही . एखाद्या व्यक्तीने मॅन्ग्रोव्हज काढल्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये त्या व्यक्तिविरुध्द गुन्हा दाखल केला जातो. इतकेच नव्हे तर त्या शेतक-याच्या सात बाराच्या उता-यावर मॅन्ग्रोव्हजची नोंद केली जाते . या अगोदर 100 वर्षे शेती पिकविल्यानंतर व सहा महिन्यात मॅन्ग्रोव्हज निर्माण झाल्यानंतर सात बाराच्या उता-यावर तशी नोंद केल्यामुळे त्या शेतक-याला पुन्हा शेती करता येत नाही .ही अत्यंत गंभीर बाब आहे तेव्हा त्या ठिकाणी मॅन्ग्रोव्हज केव्हा निर्माण झाले हे पाहिले पाहिजे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.भास्कर जाधव)

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नोंदी

श्री. जयंत प्र. पाटील ...

तेव्हा ही मॅनग्रोज होणार नाही याची काळजी आपण घेतली पाहिजे. सभापती महोदय, माझी या निमित्ताने मागणी आहे की, बांधबंदिस्ती न केल्याने खारे पाणी शेतजमिनीमध्ये शिरून जेथे मॅनग्रोज निर्माण झालेली आहेत त्याची नोंद 'मॅनग्रोज' म्हणून केली जाऊ नये तसेच भविष्यात अशी मॅनग्रोज निर्माण होऊ नयेत यासाठी किनारपट्टीच्या शेतजमिनीसाठी बांधबंदिस्तीसाठी मोठा निधी अर्थसंकल्पाद्वारा दिला पाहिजे. सभापती महोदय, माझी माननीय अर्थमंत्र्यांनाविनंती आहे की, आपण आपला सर्व निधी ऊसासाठी कृपा करून घेऊन जाऊ नका, त्यातील थोडा तरी आपण कोकणातील भातासाठी ठेवावा.

सभापती महोदय, शेवटी शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संबंधात माझे विचार मांडून मी भाषण संपविणार आहे. ही कर्जमाफी देताना गेल्या अधिवेशनामध्ये बलुतेदार संस्था तसेच आदिवासी महामंडळाकडून घेतलेल्या कर्जाला देखील माफी दिली जाईल असे आश्वासन संबंधित मंत्र्यांकडून दिले गेले होते. तेव्हा आज या निमित्ताने माझी मागणी आहे की, बलुतेदार संस्थामार्फत घेतलेले कर्ज तसेच आदिवासी महामंडळाकडून घेतलेले कर्ज देखील आपण माफ केले पाहिजे. 260 कोटी रूपये केवळ या संस्थांना कर्ज दिलेले आहे, ते माफ झाले पाहिजे अशी विनंत करून मी भाषण संपवितो.

***

..... एमएम 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या निमित्ताने मी माननीय अर्थमंत्र्यांच्या एक गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो की, या अधिवेशनाची सुरूवात करताना माननीय राज्यपालांनी केलेले अभिभाषण आणि आपले अर्थसंकल्पीय भाषण, ही दोन्ही आपण समोर ठेवले तर अगदी पॅरा टू पॅरा ते बरोबर नसेल तसेच त्यातील शब्दांची रचना सोडली तर ही दोन्ही भाषणे जवळपास एकच आहेत असे आपणास दिसून येते. आपण ऊर्जा मंत्री असताना ज्याप्रमाणे आपण नेहमी सभागृहापुढे सत्य सांगत होता तसे आता देखील या चर्चेला उत्तर देताना आपण सत्य सांगावे की, 1 लाख 64 हजार कोटी रूपयांचे जे कर्ज आपण काढले आहे ते कशासाठी काढले आहे ? तसेच दरमहा त्या कर्जाची फेड करण्यापोटी तसेच त्यावरील व्याजाच्या हप्त्यापोटी आपल्या उत्पन्नातून किती पैसा जातो हेही आपण येथे सांगितल्यास बरे होईल.

सभापती महोदय, तसेच माननीय अर्थमंत्र्यांनी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणातील पृष्ठ 2 वर म्हटलेले आहे की, '... मुंबई शहर हे भारताची आर्थिक राजधानी असून गेल्या काही वर्षात देशात आणि राज्यात होत असलेली औद्योगिक व आर्थिक प्रगती पाहून त्याला खीळ घालण्याच्या दृष्टीने दहशतवाद्यांनी मुंबईवर दिनांक 26 नोव्हेंबर 2008 रोजी अतिरेकी हल्ला केला. ...' सभापती महोदय, खरे म्हणजे हा हल्ला केला गेला तो आपल्या दुबळेपणामुळे केला गेला. त्याचा उल्लेख येथे राजकीयदृष्ट्या करण्याची गरज नव्हती. पुढे आपण परिच्छेद 5.2 मध्ये म्हटले आहे की, "...सन 2008-09 या वर्षात पोलीस दलात विविध संवर्गातील एकूण 11021 पदे निर्माण करण्यात आली आहेत आणि या पदांसाठी रूपये 107 कोटी इतकी रक्कम खर्च केली जाणार आहे." सभापती महोदय, यापूर्वी गेल्या वर्षीच माननीय श्री.आर.आर.पाटील गृहमंत्री असताना त्यांनी येथे सांगितले होते की, पोलीस दलामध्ये 11,021 पदे निर्माण केली आहेत व त्यासाठी 107 कोटी रूपये खर्च येणार आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, मुंबईवर दहशतवाद्यांनी हल्ला केला म्हणून ही पदे आपण निर्माण केली आहेत की, त्या अगोदरच ही पदे निर्माण केली होती. तसे असेल तर मग आपण या कारणासाठी म्हणून ही पदे निर्माण केली असे म्हणू नये. ...

(यानंतर श्री. सरफरे .... एनएन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी की, या सभागृहामध्ये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या अहवालावर बरीच चर्चा झाली, त्याच्या खोलात मी जात नाही. शासनाने या सहाव्या वेतन आयोगाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना प्रत्यक्षात काहीही दिलेले नाही. फक्त गूळ लावून ठेवला आहे. केंद्र सरकारने लागू केल्याप्रमाणे राज्य सरकारने आय.ए.एस. अधिकाऱ्यांना 10 ते 12 लाख रुपये दिले आहेत. त्यांचा अंतर्भाव शासनाने मोठया चलाखीने 8 हजार 91 कोटींमध्ये केला आहे. याठिकाणी शासनाने सांगितले आहे की, सहावा वेतन आयोग लागू केल्यामुळे काही कोटी रुपये कर्मचाऱ्यांना द्यावे लागतील, प्रत्यक्षात कर्मचाऱ्यांना काहीही दिलेले नाही.

सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांच्या भाषणामधील "इमारतीचे बांधकाम" हा परिच्छेद पाहिल्यानंतर महाराष्ट्रामध्ये कुठेतरी इमारती बांधल्या जाणार आहेत असे वाटले. वास्तविक त्याचे वाचन केल्यानंतर हा परिच्छेद हास्यास्पद असल्याचे दिसून येते. आपण मुंबईमध्ये हायमाऊंट गेस्ट हाऊस, मर्झबान पथ येथे बांधकाम भवन व अंधेरी येथे प्रशासकीय भवन यांचे बांधकाम हाती घेतले आहे. ही या शासनाची फार मोठी कामगिरी नाही, ही दैनंदिन व्यवस्थेतील बाब आहे. सभापती महोदय, मी मंत्रिमहोदयांचे दुसऱ्या गोष्टीकडे लक्ष वेधतो. मुंबई महानगरामध्ये 17 हजार 800 प्रोजेक्ट अफेक्टेड लोकांचे पुनर्वसन केल्याचे आपण म्हटले आहे. माझ्या माहितीप्रमाणे यामधील 9 हजार लोकांनी त्यांना देण्यात आलेल्या सदनिका विकल्या आहेत. आणि पुन्हा नव्याने झोपडी बांधून त्याठिकाणी ते रहाण्यास गेले आहेत. ज्या ठिकाणी आता वेगवेगळे प्रकल्प उभे रहाणार आहेत त्याठिकाणी झोपडी दादांनी झोपडया बांधण्यास सुरुवात केली आहे. त्याकरिता त्यांनी सन 1995 आणि सन 2000 पर्यंतचे दाखले गोळा करण्यास सुरुवात केली आहे. यामुळे खऱ्या अर्थाने प्रकल्पग्रस्तांना मिळणारी घरे या झोपडी दादांच्या ताब्यात जाणार आहेत.

सभापती महोदय, मंत्रिमहोदयांच्या भाषणातील क्रमांक 36 वरील परिच्छेद हा राजकीय स्वरुपाचा आहे असे मला वाटते. आपण कोणत्याही महामंडळाला आर्थिक मदत केलेली नाही. याठिकाणी फक्त मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाला सुमारे 50 कोटी रुपये दिले आहेत. बाकीच्या एकाही महामंडळाला सरकारने पैसे दिले नाहीत. याउलट पणन विकास महामंडळाला म्हाडाकडून 100 कोटींची येणे रक्कम आहे. शेळी-मेंढी विकास महामंडळाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ KGS/

श्री. मधुकर चव्हाण...

सुध्दा येणे रक्कम आहे. मागासलेल्या वर्गाच्या सामाजिक विकासासाठी आपण ही महामंडळे निर्माण केली. परंतु याठिकाणी आपण अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाला मदत करतांना हे सर्व पैसे मदरशासाठी दिले जाणार आहेत. कोणत्याही शाळेला ज्यावेळी शासकीय अनुदान दिले जाते त्यावेळी त्या शाळेमध्ये शासनमान्य अभ्यासक्रम शिकविला पाहिजे. अशाप्रकारची अट आपण मदरशांना घालणार काय? त्यांना अनुदान देण्यास आमची हरकत नाही. मुस्लिम विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास झाला पाहिजे, त्यांनी शिकले पाहिजे. परंतु धार्मिक शिक्षण देण्यासाठी आपण पैसे देऊ शकतो काय? याचे विश्लेषण करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या माध्यमातून मुंबईचे शेरीफ यांच्याकरिता चार महिन्यांसाठी 64 लाख रुपये मागण्यात आले आहेत. शेरीफ हे ब्रिटीशकालीन पद असल्यामुळे ते आपण आता काढून टाकावे, त्याचा काहीही उपयोग नाही. फक्त माननीय राष्ट्रपती, माननीय पंतप्रधान ज्यावेळी या शहरामध्ये येतात त्यावेळी त्यांच्या स्वागताकरिता विमानतळावर माननीय राज्यपाल, माननीय मुख्यमंत्री, मुंबई शहराच्या माननीय महापौर यांच्याबरोबर मुंबईचे शेरीफ देखील त्याठिकाणी उपस्थित असतात. याशिवाय ते वर्षभर काय काम करतात? अशाप्रकारे केवळ चार महिन्यांच्या कालावधीसाठी आपण त्यांना पाऊण कोटी रुपयांची तरतूद केली आहे. म्हणजे पूर्ण वर्षभरासाठी 3 कोटी रुपये त्यांच्यावर खर्च करण्यात येणार आहेत. तेव्हा आपण हे शेरीफचे पद रद्द करुन त्याऐवजी आपल्याला दुसरी व्यवस्था करता येईल.

सभापती महोदय, मुंबईची लोकसंख्या महाराष्ट्राच्या एक दशांश म्हणजे सुमारे 1 कोटी 35 लाख इतकी आहे. असे असतांना आपण मुंबई जिल्हा व नियोजन विकासासाठी किती पैसे दिले आहेत? मुंबई शहर विकासासाठी 60 कोटी 4 लाख दिले आहेत. आणि मुंबई उपनगरासाठी 163 कोटी दिले आहेत. सुमारे 233 कोटी रुपये मुंबईसाठी दिले आहेत. यामधून आपण मुंबईमध्ये काय सुधारणा करणार आहात? मुंबईच्या सौंदर्यीकरणासाठी एक नवीन पैसा देखील आपण ठेवला नाही. याच्या खोलात मी जात नाही. याठिकाणी दोन-तीन गोष्टींचा मुद्दाम उल्लेख करतो.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण . . . .

सभापती महोदय, माध्यमिक शाळांना पुस्तके देण्यासाठी एक नया पैसा दिलेला नाही. या ठिकाणी मुंबईतील क्रिडांगणाच्या विकासासाठी केवळ चार लाख रुपये ठेवलेले आहेत आणि उपनगरातील क्रिडांगणाच्या विकासासाठी 10-12 लाख रुपये ठेवलेले आहेत. तसेच माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये एक परिच्छेद आहे की, ...

श्री.दिलीप वळसे-पाटील (खाली बसून) : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संदर्भात वेगळी चर्चा होणार आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबाबत चर्चा करीत नाही. त्यासंदर्भात वेगळी चर्चा होणार आहे. पण खरे म्हणजे तुम्ही आमच्यावर अन्याय केलेला आहे आणि आम्ही त्याबाबत वेगळी चर्चा करु. मला माननीय वित्त मंत्र्यांना असे सांगावयाचे आहे की, माता आणि बालआरोग्य यासाठी एक नया पैसा ठेवलेला नाही, एक रुपया देखील ठेवलेला नाही. मुंबईमध्ये 60 टक्के लोक झोपडपट्टीमध्ये रहातात आणि ते मध्यमवर्गीय आहेत.

श्री.दिलीप वळसे-पाटील (खाली बसून) : सन्माननीय सदस्य कोणत्या पुस्तकातील माहिती देत आहेत ?

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्या खंड-2 मधील माहिती देत आहे. "अर्थसंकल्पिय अंदाज" हे पुस्तक बॅगेमध्ये देण्यात आलेले आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य याठिकाणी जिल्हा योजनेच्या संदर्भातील तरतुदींबाबतचे आकडेवारी देत आहेत. पण डी.पी.डी.सी.जिल्हा योजना तयार करते, शासन तयार करीत नाही. डी.पी.डी.सी. लमसम रक्कम देते आणि त्यानंतर कोणत्या विभागाला किती तरतूद करावयाची हे डी.पी.डी.सी.च्या सदस्यांनी ठरवावयाचे आहे. त्यामुळे तो डी.पी.डी.सी.चा अधिकार आहे, तो शासनाचा अधिकार नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मला याबाबत चांगली माहिती आहे की, कोणत्या विभागाला किती तरतूद करावयाची हे डी.पी.डी.सी.ठरविते आणि मला हेच सांगावयाचे आहे की, तुम्ही डी.पी.डी.सी.ला 60 कोटी रुपये दिले आहेत. गेल्या वर्षी त्यातील 40 ते 50 टक्के रक्कम मुंबई शहरामध्ये आणि उपनगरामध्ये खर्चच झालेली नाही. मला याचे पूर्ण ज्ञान आहे की, डी.पी.डी.सी. म्हणजे मुंबई जिल्ह्याचे कलेक्टर नोटा छापत नाही, तर शासन निधी देते आणि त्या

. . . .2ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण . . . .

दिलेल्या पैशामध्ये वर्षभरासाठी तरतूद करावयाची असते. मग त्यामध्ये स्मशानाची डागडूजी असेल, शहराचे सौंदर्यीकरण असेल, शिष्यवृत्त्या द्यावयाच्या असतील इ.साठी तरतूद करावयाची असते.पण मला असे वाटते की, तुम्ही मुंबई शहराच्या बाबतीत सापत्न भावाने वागत आहात ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये 48 टक्के शहरीकरण झालेले आहे आणि संपूर्ण देशामध्ये 27 टक्के शहरीकरण झालेले आहे. म्हणजे जर महाराष्ट्रामध्ये दहा कोटी जनता असेल तर त्यातील सुमारे पाच कोटी जनता शहरांमध्ये रहाते. शहरे वाढत चालली आहेत. संपूर्ण भारतामध्ये सर्वात जास्त महाराष्ट्रामध्ये शहरीकरण होत आहे. पण त्याची या शासनाला जरा देखील चिंता नाही.

सभापती महोदय, याठिकाणी नगरविकास विभागाचे जे बजेट आहे, त्यामध्ये "लहान व मध्यम शहरांचा एकात्मिक विकास" यासाठी 1340 कोटी 99 लाख रुपये ठेवण्यात आलेले आहेत. परंतु आपण मला सांगावे की, आज शहरांची स्थिती काय आहे ? महाराष्ट्रातील कोणतेही शहर घ्यावे. मग त्यातील मुंबई, नागपूर,पुणे अशी जागतिक किर्तीची शहरे सोडली तर बाकीच्या सगळया शहरांची अवस्था अतिशय गलिच्छ झालेली आहे. या शहरीकरणामध्ये पाणीपुरवठया बरोबरच रस्ते, सांडपाण्याची व्यवस्था, पार्कींगची व्यवस्था,पदपथ इ.बाबतीत योग्य प्रकारे रचना करावयास पाहिजे. आपल्या देशानंतर जगातील अनेक देश स्वतंत्र झाले आणि आपण परदेशामध्ये गेल्यानंतर लक्षात येते की, त्याठिकाणी शहरांची योजनापूर्वक नीट रचना करण्यात आलेली आहे. आज महाराष्ट्रामध्ये हातावर पोट घेऊन इतर शहरांमधून लोक येत आहेत ही सर्वांत मोठी चिंतेची बाब आहे. अशा परिस्थितीत शासनाने केवळ 1340 कोटी रुपयांची तरतूद कोणत्या आधारावर केलेली आहे ? यामधून शहरांचा कशा प्रकारे विकास करणार आहात ? असा प्रश्न आहे. तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये शहरीकरणाबरोबरच प्रदूषणही वाढत चालले आहे. पण माननीय अर्थमंत्री महोदयांनी प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण यासाठी एक रुपयादेखील ठेवलेला नाही.

सभापती महोदय माझे शेवटचे दोन मुद्दे आहेत. त्यातील पहिला मुद्दा गृहनिर्माण विभागाच्या संदर्भातील आहे. मुंबई शहरामध्ये गृहनिर्माण योजना जाहीर केलेली आहे.ही योजना जाहीर करीत असताना एफ.एस.आय.वाढविला आणि संयुक्त विकास, क्लस्टर डेव्हल्पमेंट या नावाखाली जुन्या....

. . . .2ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चाळीतील लोकांना बिल्डरच्या ताब्यात देण्यात आले अशी स्थिती आहे. केवळ एफ.एस.आय. वाढविला म्हणजे घरांची संख्या वाढेल असे नाही. आम्हाला मुंबईतील श्रीमंत लोकांची चिंता नाही. ते लोक बाजारामध्ये पैसे फेकून रहाण्यासाठी घरे घेतील. पण गृहनिर्माण योजना निश्चितपणे कशी आखलेली आहे ? तर 225 चौ.फूटाच्या ऐवजी 300 चौ.फूटाच्या जागा देण्याचे मान्य केलेले आहे. आता ज्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे, ज्यासाठी अर्थसंकल्पिय तरतूद झालेली आहे, ज्याचे प्लॅन्स् व डिझाईन मंजूर झालेले आहे.

यानंतर कु. थोरात....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

अशा लोकांना तुम्ही 225 फूटाची जागा देणार की 300 फुटाची जागा देणार हे सांगितलेले नाही. पण अर्थसंकल्पाच्या भाषणात असे सांगितलेले आहे की, "आम्ही शहराकडे लक्ष दिलेले आहे. मुंबई शहराकडे लक्ष दिलेले आहे." म्हणून त्या बाबतीत तरतूद करणे अत्यंत आवश्यक आहे. नागरी गृहनिर्माणासाठी 669 कोटी रुपये तरतूद केलेली आहे. ज्या राज्याचे नागरीकरण लोकसंख्येच्या तुलनेत 50 टक्के आहे त्या राज्यामध्ये ग्रामीण आणि शहरी गृहनिर्माणासाठी फक्त 669 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. म्हाडा अंतर्गत मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुर्नरचना मंडळ आहे. त्यांच्यासाठी 38 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. म्हाडाचा नियम असा आहे की,जेवढा कर गोळा होतो तेवढी मॅचिंग ग्रान्ट देणे आवश्यक आहे परंतु गेल्या सात-आठ वर्षातील अर्थसंकल्पातील तरतुदी पाहिल्या तर 50 कोटी रुपये कर गोळा झाला तर 12 ते 13 कोटी रुपये बाजूला ठेवण्यात येतात, कायद्यानुसार त्यातील एकही पैसा वापरता येत नाही. कारण त्यामध्ये शासनाचे कॉन्ट्रीब्यूशन काहीही नसते. 1 रुपया सेस गोळा झाला तर त्यातील 90 पैसे भाडेकरु देत असतात आणि 10 पैसे लॅण्डलॉर्ड देत असतो त्यामुळे त्यामध्ये शासनाचा एकही पैसा नाही. म्हणून मला असे वाटते की, त्यामध्ये अशा प्रकारची चोरी करणे हे अत्यंत गैर आहे. सभापती महोदय, अर्थसंकल्पावर भाषण करताना गृहनिर्माणाच्या बाबतीत सांगितले जाते की, महाराष्ट्रामध्ये, मुंबईमध्ये अतिशय स्वप्नदर्शी अशा गृहनिर्माणाच्या योजना राबविलेल्या आहेत पण त्या योजनांवर या सभागृहात कधी चर्चा झालेली नाही. आम्हाला त्यासंबंधीचे एक पुस्तक देण्यात आले परंतु त्यावर सभागृहात कधीही चर्चा झालेली नाही. यावेळचे अर्थसंकल्पावरील भाषण हे पूर्णत: राजकीय अभिनिवेशातून केले गेलेले आहे. त्यामध्ये कुठल्याही प्रकारच्या विकासाची कामे झालेली नाहीत. म्हणून सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय अर्थमंत्र्यांना विनंती करतो की, आपण 1 लाख 64 हजार कोटी रुपयाचे जे कर्ज काढलेले आहे त्याची श्वेतपत्रिका प्रसिध्द करावी. ते कर्ज कशासाठी खर्च करण्यात आलेले आहे, ते सांगावे. राज्याच्या एकूण उत्पन्नापैकी दरमहा कर्ज परतफेडीसाठी किती खर्च करण्यात येतात, मुद्दल किती देण्यात येते आणि प्रशासकीय खर्च किती आहे याचा खुलासा करावा. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

-x-

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, या राज्याचे वित्त मंत्री माननीय श्री. दिलीपराव वळसे-पाटील त्याचप्रमाणे राज्यमंत्री माननीय श्री. सुनीलजी देशमुख यांनी या राज्याचा सन 2009-2010 चा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला आहे. त्याला पाठींबा देण्यासाठी मी उभी आहे. अध्यक्ष महोदय, मला आनंद होत आहे आणि शासनाचे अभिनंदनही करावेसे वाटते की, कुठलीही करवाढ न करता विकास कामावर भर दिलेला असा हा अर्थसंकल्प आहे. त्याचप्रमाणे विशेष उल्लेख करावयाचा झाला तर जीवनदायी योजनेमध्ये शाळेच्या मुलांना समाविष्ट केलेले आहे त्यामुळे खरोखरच मी मनापासून शासनाचे अभिनंदन करुन मी माझ्या सूचना करणार आहे.

सभापती महोदय, दि.26 नोव्हेंबर,2008 रोजी मुंबईवर, या राज्यावर आणि या देशावर जो हल्ला झालेला आहे,त्याचा मी सर्वप्रथम निषेध करते. (अडथळा) शाळेच्या मुलांसाठी जीवनदायी योजनेमध्ये दीड लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे ती खूप चांगली अशी तरतूद आहे, त्याबद्दल मी पहिल्यांदाच शासनाचे कौतुक केलेले आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे .....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील हे समुद्र किनाऱ्याबाबत बोलले. मुंबई, नवी मुंबई, कोकणचा समुद्र किनारा तसेच मुंबईमध्ये वाढणारी लोकसंख्या, नवी मुंबई तसेच ठाण्यामध्ये वाढणारी लोकसंख्या, समुद्र किनाऱ्यावरुन होणारे दहशतवादी हल्ले यासंदर्भात चर्चा झाली. हे हल्ले कोठेही होऊ शकतात ही वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती आपण मान्य केली पाहिजे. आपण सागर किनाऱ्यांच्या संदर्भात 166 कोटी रुपयांचा खर्च करुन सागरी किनाऱ्यावर चांगल्या नौका आणणार आहोत. 26 नोव्हेंबरचा हल्ला झाल्यानंतर वस्तुस्थिती काय आहे ? 8 दिवसांपूर्वी मी स्पीड बोटने मुंबईवरुन नवी मुंबईला गेले होते. त्या ठिकाणी नौका तुटलेली होती आणि त्यावर 2 पोलीस लटकत होते. अशा परिस्थितीमध्ये कोठेही हल्ला होऊ शकतो. ही वस्तुस्थिती लोक सुध्दा पाहात असतात. आज राज्यामध्ये यासाठी आपण ही तरतूद करीत आहोत परंतु जे लोक बोटींवर काम करतात त्यांना चांगले प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. त्यांना दारुगोळा तसेच स्वयंचलित हत्यारे देऊ असे आपण म्हटले आहे. परंतु त्यांना चांगल्या पध्दतीचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. तसेच सागरी किनाऱ्यावर ज्या मच्छिमारांच्या वस्त्या आहेत, तेथील जी सुशिक्षित बेरोजगार मुले असतील त्यांना सुध्दा सागरी किनाऱ्यावर येणाऱ्या लोकांच्या दृष्टीकोनातून प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. मी घणसोली गावामध्ये गेले होते. त्या ठिकाणी काही हालचाली निर्माण झाल्या होत्या. जेटीच्या संदर्भात काम करीत असताना बोटीवरील मच्छिमारांनी सांगितले की, समुद्र किनाऱ्यावर ज्या हालचाली होतील त्या आम्ही पोलीस स्टेशनला कळवू शकतो. आमची जी तरुण मुले आहेत त्यांना नोकऱ्या दिल्या आणि त्यांना प्रशिक्षण दिले तर आज समुद्र किनाऱ्याच्या सुरक्षिततेला जो धोका निर्माण होत आहे त्यादृष्टीने चांगले काम करता येईल. कोळी बांधवांची जी मुले आहेत ती समुद्रामध्ये वाटेल तेवढ्या प्रमाणावर पोहू शकतात. त्यांना लहानपणापासून त्याबाबतचा सराव असतो. त्यांना प्रशिक्षण दिले तर त्यांची बेरोजगारी दूर होईल तसेच समुद्र किनाऱ्याचे संरक्षण करता येईल. या मच्छिमारांना ओळखपत्र दिले गेले पाहिजे. मध्यंतरी अशी योजना सुरु केली होती. समुद्रामध्ये जे लोक आहेत ते खरोखरच मच्छिमार आहेत काय, ते आपल्या विभागातील आहेत काय हे कळण्याच्या दृष्टीने त्यांना ओळखपत्र देणे गरजेचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे .....

मध्यंतरी अशी योजना सुरु केली होती. ती योजना पुन्हा कार्यान्वित करावी. शासनाने जी मोठ्या प्रमाणावर तरतूद केली आहे त्याबाबत मी शासनाने अभिनंदन करते. त्यासंदर्भात शासनाने व्यवस्थितपणे नियोजन केले पाहिजे. आपली सेवा करणारे जे पोलीस आहेत त्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांचे कुटुंब बेघर होऊ नये. आज आपण पाहतो की, महाराष्ट्रात मुंबईमध्ये, नवी मुंबईमध्ये पोलिसांना घरे नाहीत. ते सेवानिवृत्त झाल्यानंतर किंवा अपघातामध्ये निधन झाल्यास किंवा दहशतवादी हल्ल्यामध्ये निधन झाल्यास त्यांचे कुटुंब उघड्यावर पडू शकते. अशा वेळी शासनाने सुध्दा धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे. ज्या ज्या ठिकाणी पोलिसांना मोफत घरे देऊ शकतो त्या योजनेच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतला पाहिजे. उदा. नवी मुंबईमध्ये मध्यंतरी पोलिसांच्या घरांच्या संदर्भात मी तसेच सन्माननीय सदस्य अरविंद सावंत, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण, आम्ही दौरा केला होता. त्यावेळी खुराड्यासारख्या घरामध्ये पोलीस कर्मचारी राहात होते. पोलिसांचे मनोधैर्य सुध्दा वाढले पाहिजे. ज्यावेळी दहशतवादी हल्ला, आंदोलन होते किंवा सभा होते त्यावेळी त्या ठिकाणी पोलीस कर्मचारी जातात. त्यांच्या घरामध्ये शांतता नसेल, त्यांचे घर व्यवस्थित नसेल तर त्यांची मानसिकता बरोबर नसते. आम्ही सर्व सदस्यांनी त्या ठिकाणी भेट देऊन त्यांची घरे पाहिलेली आहेत. दहा बाय दहाच्या घरामध्ये ते कर्मचारी 35-35 वर्षे राहात आहेत. आम्ही शासनाला सिडकोच्या माध्यमातून एक प्रस्ताव दिला होता. आपण जर चटईक्षेत्र वाढवून दिले तर अशा ठिकाणी सिडको पोलिसांना मोफर घरे बांधून देण्यास तयार आहे. यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे. सिडको घरे बांधून देण्यास तयार आहे तसेच जागाही उपलब्ध आहे. फक्त शासनाने एफएसआय वाढवून दिला तर तशी योजना होऊ शकते. राज्यामध्ये पोलिसांच्या ज्या अनेक तुटलेल्या वसाहती आहेत त्यांना यामुळे दिलासा मिळेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. शिगम ....

(श्रीमती मंदा म्हात्रे...)

तसेच ते जोमाने कामाने लागतील असे मला सांगावेसे वाटते. ग्रामीण भागामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी शासनाने प्रयत्न केलेले आहे. राज्यामध्ये 81.65 कोटीची गुंतवणूक करुन 1.88 लाख लोकांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने शासनाने पावले टाकलेली आहेत. या निमित्ताने मी शासनाला विनंती करु इच्छिते की, गावपातळीवर रोजगार निर्मिती करुन तेथील तरुणाला त्यासंबंधीचे प्रशिक्षण दिले तर शहरावरचा वाढता ताण निश्चितपणे कमी झाल्याशिवाय राहाणार नाही. स्वयंरोजगारासंबंधीच्या केन्द्र आणि राज्य शासनाच्या योजना आहेत.परंतु त्यांचा ग्रामीण भागापर्यन्त पाठपुरावा होत नाही. ग्रामीण भागातील तरुणांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण दिले तर त्याचा त्यांना आत्मनिर्भर होण्यासाठी निश्चितच फायदा होईल.

सभापती महोदय, राज्यामध्ये शिर्डी, सोलापूर तसेच अमरावती येथे विमानतळ व्हावे यासाठी अंतरिम अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. आम्ही गेली 11 वर्षे नवी मुंबई येथे विमानतळ होण्यासाठी सिडकोच्या माध्यमातून पाठपुरावा करीत आहोत. नवी मुंबई येथे विमानतळ झाले तर मुंबईतील विमानतळावरचे ट्राफिक कमी होईल. आज परिस्थिती अशी आहे की, धावपट्टीवर उड्डाण करण्यासाठी 6-7 विमाने रांगेत उभी असतात तर उतरण्यासाठी विमानाना 40-40 मिनिटे आकाशात घिरटया घालाव्या लागतात आणि त्यामुळे पेट्रोलही जास्त जळते. नवी मुंबई येथे विमानतळ झाले तर मुंबईतील विमानतळावरचे ट्राफिक कमी होईल आणि आकाशात घिरट्या घालाव्या लागणार नसल्यामुळे इंधनामध्येही बचत होईल. शिवाय तेंथे विमानतळ झाले तर तेथील लोकांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतील. यानुषंगाने मी एक सूचना करु इच्छिते की, हे सर्व करीत असताना प्रथमत: तेथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झाले पाहिजे. प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना प्रशिक्षण देऊन हा विमानतळाचा विषय निकाली काढावा.

सभापती महोदय, विश्रामगृहासंबंधी मी सांगू इच्छिते की, नवी मुंबईमध्ये सीबीडी येथे बचत भवन नावाचे विश्रामगृह आहे. त्या विश्रामगृहाची अत्यंत दुरवस्था झालेली आहे. पनवेल, उरण, नवीमुंबई आणि दिवापर्यन्त एकही विश्रामगृह नाही. त्यामुळे कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा येथून येणा-या लोकांना थेट मुंबईलाच येऊन विश्रांती घ्यावी लागते. नवी मुंबई येथील बचत भवनाची चांगली दुरुस्ती केली तर एका चांगल्या विश्रामगृहाची सोय होऊ शकेल. तेव्हा त्यादृटीने शासनाने विचार करावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती मंदा म्हात्रे..)

सभापती महोदय, मुंबईप्रमाणे ठाणे, नवी मुंबईची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे. मुंबईमध्ये अनेक प्रकल्प येत असताना ठाणे आणि नवी मुंबईवर अन्याय होता कामा नये एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. ठाणे आणि नवी मुंबईमध्ये मोनोरेल्वे आणि मेट्रोरेल्वे प्रकल्प आणून तेथील वाहतुकीच्या समस्या दूर करण्याच्यादृष्टीने पावले उचलणे गरजेचे आहे.

सभापती महोदय जीवनदायी आरोग्य योजनेसाठी अधिक तरतूद करावी अशी मी सातत्याने मागणी करीत आले आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे...

या योजनेतून लाभ घेणा-या प्रत्येक रुग्णास दीड लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याबाबतचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे. या योजनेचा लाभ शाळकरी विद्यार्थ्यांना देण्याचा देखील शासनाने निर्णय घेतला त्यामुळे मी व्यक्तीश: आणि सर्व शाळकरी पालकांच्या वतीने शासनाचे अभिनंदन करते. या राज्यात अनेक जातीचे, अनेक धर्माचे लोक राहतात. त्यात अनेक लोकांची आर्थिक परिस्थिती हालाखीची आहे. या योजनेचा लाभ दारिद्रय रेषेखालील कुटुंबियातील व्यक्तींना दिला जातो आहे. परंतु ज्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अतिशय हालाखीची असूनही त्या लोकांना या योजनेचा लाभ दिला जात नाही. म्हणून ज्या कुटुंबांची आर्थिक परिस्थिती अतिशय हालाखीची असेल अशा कुटुंबियातील व्यक्तींना देखील या जीवनदायी योजनेचा लाभ देण्यात यावा अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील अनेक तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत "जेजुरीच्या खंडाबा" आहे. हे तीर्थक्षेत्र उंचावर असल्यामुळे त्या ठिकाणी रोप-वे करण्याची आवश्यकता आहे. या तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी तसेच रोप-वे तयार करण्यासाठी शासनाने भरीव तरतूद करावी अशी मी या निमित्ताने मागणी करते.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, विधानसभा सभागृहात सर्वसाधारण चर्चा सायंकाळी 4.00 वाजता सुरु होणार आहे त्यामुळे ही चर्चा लवकर संपवावी असे मघाशी आपणास सांगितले. आतापर्यंत शिवसेना पक्षाकडून एकाच सदस्यांचे भाषण झाले आहे. भारतीय जनता पक्षाच्या दोन सन्माननीय सदस्यांनी भाषण केले आहे. अजून अनेक सन्माननीय सदस्यांना यावर बोलावयाचे आहे. ही चर्चा आजच संपविली जाणार असल्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी आपण उपलब्ध करुन द्यावी अशी माझी विनंती आहे.

श्री.दिलीप वळसे पाटील : सभागृहात एखाद्या विषयाची चर्चा उपस्थित होत असते त्यावेळी वेळेचे नियोजन करीत असतो. एका पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी एक तास भाषण करुन अतिशय मौलिक सूचना केलेल्या आहेत. त्या सूचनांची मी नोंद घेतलेली आहे. पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी भाषण केल्यानंतर त्या पक्षाच्या इतर सदस्यांनी त्या विषयावर बोलण्याची अपेक्षा ठेवू नये असे मला वाटते.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापतीस्थानी माननीय उपसभापती

डॉ.दीपक सावंत : ज्येष्ठ नेते एक तास बोलले म्हणून इतर सदस्यांनी बोलण्याची अपेक्षा ठेवू नये असे म्हणणे बरोबर नाही. ही चर्चा साडेतीस तासात संपविणे योग्य होणार नाही असे मला वाटते. त्याचे कारण असे आहे की, अजून अनेक सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने विचार मांडावयाचे आहेत. म्हणून सर्वांना समान न्याय द्यावा अशी माझी पुन:श्च विनंती आहे.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, हे अधिवेशन फक्त चार दिवसांच्या कालावधीचे आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी माननीय राज्यपालांचे अभिभाषण झाले, त्यानंतर शोकप्रस्ताव घेण्यात आले. दुस-या दिवशी सभागृहासमोर पुरवणी मागण्या व अर्थसंकल्प मांडला गेला. आज तिस-या दिवशी पुरवणी मागण्या आणि अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा सुरु आहे. विधानसभा अध्यक्ष आणि विधानपरिषदेचे सभापती या दोघांनी एकत्र भेटून या सभागृहात प्रथम अर्थसंकल्पावरील चर्चेस सुरुवात करावी असा निर्णय घेतला आणि त्याप्रमाणे कामकाज सुरु झाले आहे. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत संपवावयाची आहे. त्यानंतर विधानसभा सभागृहात ही चर्चा सायंकाळी 4.30 वाजता सुरु होणार आहे. या ठिकाणी अर्थसंकल्पावरील चर्चा संपल्यानंतर पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु होणार आहे. बजेटच्या एकूण एक तृतीयांश तरतूद या अंतरिम अर्थसंकल्पात केलेली आहे. या अंतरिम अर्थसंकल्पात ज्या योजनांची कामे सुरु आहेत त्यांच्यासाठी तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. या अर्थसंकल्पात एकही नवीन योजनेचा समावेश करण्यात आलेला नाही. या अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी काहीही सूचना केल्या तरी त्या सूचनांची मी फक्त नोंद घेऊ शकतो, परंतु त्याबाबतीत मी कोणतीही कमिटमेंट करु शकत नाही. एखाद्या सूचनेची कमिटमेंट केली तर आचारसंहितेचा भंग होऊ शकतो. सन्माननीय सदस्यांना या अंतरिम अर्थसंकल्पात ठोबळ स्वरुपात त्रुटी निदर्शनास आल्या असतील त्या त्रुटींचा आवर्जून उल्लेख केला तर येत्या अधिवेशनातील अर्थसंकल्पात त्या त्रुटींबाबत उल्लेख करता येईल एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, अजून अनेक सन्माननीय सदस्यांना या अर्थसंकल्पावर आपापली मते मांडावयाची आहेत. साडेतीन तासात ही चर्चा संपवू नये. सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : ठीक आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी आपले अपूर्ण असलेले भाषण पूर्ण करावे.

यानंतर श्री. भोगले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, आमच्या नेत्या खासदार श्रीमती सुप्रिया सुळे यांनी महिला बचत गटांना यशस्वीनीच्या माध्यमातून 4 टक्के दराने कर्ज देण्याबाबत चांगली कामगिरी केली आहे. त्यामध्ये यश आले आहे. महाराष्ट्रातील तमाम महिला व महिला बचत गटांच्या वतीने मी शासनाचे अभिनंदन करते. त्याचबरोबर एक सूचना करु इच्छिते की, गेली 3-4 वर्षे आम्ही सभागृहातील सर्व महिला सदस्य महिला बचत गटाबाबत विविध मागण्या करीत आहोत त्याची कुठेही अंमलबजावणी होताना दिसत नाही. आम्ही प्रत्येक वेळी सूचना केली होती की, तालुका, जिल्हा व शहराच्या ठिकाणी महिला बचत गटांना प्रशिक्षण केंद्र सुरु करावे. त्यांनी उत्पादित केलेल्या मालाची विक्री करण्यासाठी विक्री केंद्र असावे या आमच्या महिला सदस्यांच्या मागणीबाबत येणाऱ्या पुरवणी मागण्यांमध्ये किंवा बजेटमध्ये महिलांना दिलासा देण्याच्या दृष्टीने त्यांनी तयार केलेल्या मालाला बाजारपेठ मिळावी यासाठी शासनाने विचार करण्याची गरज आहे याची नोंद घेण्यात यावी. मी या अंतरिम अर्थसंकल्पाला पाठिंबा देऊन माझे भाषण पूर्ण करते. जय हिंद, जय महाराष्ट्र!

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांनी काल अंतरिम अर्थसंकल्प सादर केला. मी फार वेळ न बोलता आचारसंहिता लागू असल्यामुळे महत्वाचे मुद्दे मांडणार आहे. सुरुवातीलाच त्यांनी पोलीस खात्याचे आधुनिकीकरण करण्यासाठी, पोलीस खात्याला सक्षम करण्यासाठी ज्या तरतुदी केल्या आहेत ते करण्यापूर्वी पोलीस खात्यामध्ये अनुशासनाची गरज आहे आणि ते अनुशासन अनामी रॉय प्रकरणातून उजळून निघाले आहे. स्वत:ला अनुशासन नाही, शस्त्रे दिली तरी उपयोग होणार नाही. अनुशासन नसेल तर पोलीस खाते चांगल्या प्रकारे काम करु शकणार नाही. शासनाची अब्रू न्यायालयात गेली तरी सुध्दा आम्हाला काही शुध्द आलेली नाही. म्हणून पहिल्यांदा शस्त्रास्त्र देण्यापूर्वी अनुशासन कसे आणणार हे सांगावे. पोलीस खात्यातील गटबाजी कशी संपविणार आहात हा खरा गंभीर प्रश्न आहे. प्रत्येक पोलिसाला कोणाचा तरी स्टॅम्प आहे. तो राज्याचा आहे असे वाटत नाही. हा पोलीस कोणाचा? कोणत्या पक्षाचा? एखाद्या व्यक्तिचा किंवा कोणत्या गटाचा? हे जे आज पोलीस खात्यात चालू आहे ते कसे संपविणार हे सुध्दा या निमित्ताने सभागृहाला कळले तर फार बरे होईल अशी माझी अपेक्षा आहे. जागतिक मंदीचा धसका शासनाने घेतला आहे. त्याचबरोबर औद्योगिक गुंतवणुकीमध्ये प्रगतीशील औद्योगिक धोरण, उत्तम पायाभूत सुविधा आणि उद्योग व व्यापार यासाठी अनुकूल वातावरण यांच्या बळावर महाराष्ट्र राज्याने भारतीय तसेच विदेशी गुंतवणूकदारांचे प्रथम पसंतीचे राज्य म्हणून आपला लौकिक कायम राखला आहे. सन 2008 मध्ये राज्यात सुमारे 81,065 कोटी रुपयांची गुंतवणूक असणारे आणि 1.88 लाख व्यक्तिंना रोजगार मिळू शकेल इतक्या क्षमतेचे 697 प्रकल्पांचे प्रस्ताव असलेली औद्योगिक आवेदनपत्रे व इरादापत्रे केंद्र शासनाकडे सादर करण्यात आली आहेत असे माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात म्हटले आहे. माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे की, जरा एकदा आम्हाला खरे सांगावे. कोणाची इरादापत्रे आली? हे उद्योग कुठे उभारले जाणार आहेत? त्यातून 1.88 लाख व्यक्तिंना रोजगार उपलब्ध होणार आहे तो कोणत्या क्षमतेच्या लोकांसाठी असणार आहे? या निमित्ताने मी एक अतिशय गंभीर गोष्ट आपल्या निदर्शनास आणू इच्छितो.

(नंतर श्री.खर्चे.....

अशुद्धित प्रत / मुद्रणेपूर्वी नाही

या शासनाने स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार मिळावा म्हणून मध्यंतरीच्या काळात एक जी.आर. काढला होता. तो जी.आर. राज्यात सर्व ठिकाणी गेला. त्यानुसार तृतीय आणि चतुर्थ श्रेणीच्या भरतीत या भूमीपुत्रांना प्रधान्य देण्यात यावे अशा प्रकारचे आदेश दिलेले असताना पुण्यातील "कमिन्स" या कंपनीने 850 तृतीय आणि चतुर्थ श्रेणीच्या लोकांची भरती करताना भूमीपुत्राऐवजी त्यात 700 लोक बाहेरुन भरती केले. यासंदर्भात मागील अधिवेशनात मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून सभागृहात हा मुद्दा उपस्थित केला होता परंतु आजतागायत मला त्याचे उत्तर आले नाही. काल परवा मी माननीय सभापतींना त्या विशेष उल्लेखाची आठवण करुन दिल्यानंतर मात्र माननीय सभापतींच्या कार्यालयातून कामगार कार्यालयाला पत्र पाठविले की, अशा प्रकारचा शासनाचा निर्णय असताना पुण्यातील कमिन्स कंपनीने 850 पैकी 700 लोक बाहेरुन भरले. परंतु त्यासंदर्भात कामगार आयुक्तांनी कुठल्याही प्रकारची कारवाई केली नाही. असेच या राज्यात होत राहिले तर राज्यातील बेकार तरुण तसाच बेरोजगार म्हणून भटकतील व गुन्हेगारीच्या मार्गावर गेल्याशिवाय राहणार नाहीत. या अनुषंगाने एक मुद्दा असा आहे की, बंद पडलेल्या उद्योगांच्या जमिनीच्या बाबतीत शासन आज काय विचार करीत आहे ? त्यादृष्टीने माननीय उप मुख्यमंत्र्यांनी गंभीर दखल घ्यावी अशीही माझी मागणी आहे. शासन रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी राज्यात अनेक ठिकाणी एमआयडीसीची स्थापना करते, इन्फ्रास्ट्रक्चर तयार करुन देते, उद्योगांना वेगवेगळ्या सवलती देते, पाणी देते, वीज देते, टॅक्सेशनमध्ये सवलत देते व त्यानंतर उद्योग उभा राहतो. परंतु कालांतराने ज्यावेळी उद्योग बंद होतो त्यावेळी त्या जमिनीचा मालक कोण हा प्रश्न उभा राहतो. जर शासनाने या उद्योगाला जमीन मोफत दिली असेल, काही वेळेस सवलतीच्या दराने दिलेली असते परंतु उद्योग बंद झाला अथवा त्या उद्योगात बदल करावयाचा असेल तर कायद्यात अशी कुठलीही तरतूद नाही की या जमिनीचे काय करावे ? बजाज कंपनीच्या संदर्भात असाच प्रकार घडलेला आहे. अशा प्रकारे एका बाजूला उद्योग बंद करुन कायद्याची धज्जी उडविणे असा प्रकार सध्या राज्यात चालू आहे. मग या राज्यात कामगार कायदा अस्तित्वात आहे की नाही येथपासून सुरुवात करावी लागत आहे. आज हजारो लोक बेरोजगार होत आहेत त्यांना रोजगार उपलब्ध केल्याचे आपण अंतरिम अर्थसंकल्पात सांगतो पण राज्यात किती बेरोजगार झाले याची सुध्दा माहिती देणे आवश्यक आहे. पुण्यात बजाज उद्योग समुहाला शासनाने सवलतीने

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जमीन दिली होती परंतु तो उद्योग बंद करुन दुसऱ्या राज्यात गेला. ज्या उद्योगासाठी जमीन दिली तो उद्योग बंद केला परंतु त्या जमिनीचे पुढे काय ? त्या जमिनीचे मालक कोण आहे, एमआयडीसीला अधिकार आहे की नाही ? याचे स्पष्टीकरण काहीच नाही. फक्त "आय टू आर" "इंडस्ट्रीअल टू रेसिडेन्शिअल" असेच या राज्यात आज चालले आहे. परंतु त्याबाबत कुठलीच कारवाई करण्यासंबंधीची तरतूद कायद्यात नाही, त्यादृष्टीने बदल शासनाने करावा. त्यानंतर नवीन एसईझेड मध्ये आय.टी. उद्योग आले. त्या उद्योगांना तर कामगार कायद्याचे कुठलेही बंधन नाही. आठ तासाची नोकरी हा विषयच त्या कंपन्यांमध्ये नाही. बारा-बारा, सोळा-सोळा तास राबवून घेतले जाते आणि वरुन कुठल्याही क्षणी उद्यापासून कामावरुन येऊ नका अशी परिस्थिती आहे. अर्थात या लोकांना पगार कमी नाहीत परंतु त्यांना कायद्याच्या माध्यमातून संरक्षण मिळणार की नाही हा भाग महत्वाचा आहे. अशा प्रकारे या एसईझेड मधील उद्योग स्वतंत्र स्वायत्त संस्थाने बनत आहेत, म्हणून या कामगारांना कायद्यात बदल करुन संरक्षण देण्याची गरज आहे. परंतु आज कामगार कायदा अस्तित्वात आहे की नाही हाच मुळात प्रश्न आहे. तो जर अस्तित्वात असेल तर कुठल्या क्षेत्रात आहे, एसईझेड साठी तो लागू आहे काय याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. सिगारेटच्या पाकिटावर सुध्दा "Smoking is injurious to Health" हे एवढ्या बारीक अक्षरात लिहिलेले असते की दुर्बिणीशिवाय ते दिसू शकत नाही. तसे आय.टी. मधील किंवा कम्युनिकेशन मधील इंडस्ट्रीजच्या बाबतीत होत आहे. रिलायन्स कंपनीच्या टेलिफोनच्या बाबतीत सांगायचे तर त्यात इतक्या बारीक अक्षरात लिहिलेले असते की ते वाचायला दोन तास तरी लागतील. ते वाचायचा कंटाळा करतो आणि कनेक्शन घेतल्यानंतर ज्यावेळेस बिल मिळते त्यावेळेस लक्षात येते. म्हणून अशा प्रकारांची गंभीर दखल शासनाने घेण्याची गरज आहे. तसेच एमआयडीसी ॲक्टमध्ये सुध्दा मुलभूत बदल करावा अशी मी मागणी करतो. तसेच जेवढे कारखाने बंद पडले त्यातील कामगारांचे तर सोडाच परंतु त्यांना जे प्लॉट दिलेले आहेत त्यांच्या बाबतीत काय ? तसेच दिलेल्या मुदतीत उद्योग उभा राहिला नाही तर काय यासाठीही त्या कायद्यात तरतूद असणे आवश्यक आहे. परंतु उद्योग जरी उभा राहिला नाही तरी त्या उद्योगाला

वेळोवेळी मुदतवाढ दिली जाते आणि अशा परिस्थितीत उभा राहिलेला उद्योग कालांतराने बंद पडला तर त्या जमिनीच्या बाबतीत काय ? हा प्रश्न पुन्हा उभा राहतो. तो प्लॉट परत करण्याची तरतूद या कायद्यात असणे आवश्यक आहे. (यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

म्हणून या कायद्यात मूलभूत बदल करावा अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, याच संदर्भात जेव्हा प्रकल्पग्रस्तांचा विषय येतो तेव्हा त्या बाबतीत काय घडते? आपण कोयनेचा विषय सुध्दा पाहिलेला आहे. आपण रोजगाराच्या संदर्भात अनेक विषय पाहिलेले आहेत. सन्माननीय उपाध्यक्षांनी स्वत: श्रीमती संगिता सावंत यांचा विषय हाताळलेला आहे. या विषयावर मी नंतर माझे विचार व्यक्त करणार आहे. प्रकल्प ग्रस्तांसाठी 5 टक्के जागा आरक्षित असली पाहिजे अशी प्रकल्प ग्रस्तांच्या संदर्भात शासनाची अशी तरतूद आहे. एकंदर नोकर भरतीच्या 5 टक्के जागा प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षित असली पाहिजे. परंतु नोकर भरती असेल तरच हा नियम लागू होतो. खास करुन जेव्हा पाटबंधारे खात्याचे प्रकल्प येतात त्यामध्ये जर नोकर भरतीच नसेल तर आपण प्रकल्पग्रस्तांना 5 टक्के नोक-या कशा काय देणार? हा प्रकार कोयनेपासून तसाच सुरु आहे. मध्यंतरी मी महात्मा फुले कृषी विद्यापिठाचा विषय सभागृहात उपस्थित केला होता त्यावेळेस माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, "आम्ही तशा प्रकारे करु." महात्मा फुले कृषी विद्यापिठाचा विषय मी विशेष उल्लेखाच्या द्वारे उपस्थित केला होता तेव्हा त्याला सुध्दा 5 टक्क्याचा नियम आहे व त्या नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाईल असे उत्तर आले होते. सभापती महोदय, प्रकल्प ग्रस्तांना नोक-या मिळाल्या नाहीत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भात आपले विचार मांडले परंतु माझा शेतकरी मरतो आहे. शेतकरी मरत असतांना शासनाने त्याला सवलत देऊ नये काय? ज्या प्रमाणे आपण शासकीय कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग देतात त्याच प्रमाणे शेतक-यांना सुध्दा फायदा द्यावा असे माननीय दिवाकर रावते साहेबांना सांगायचे होते. शासकीय कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग आपण जरुर द्या कारण तो त्यांचा हक्क आहे. केंद्रशासन जी काही वाढ देईल तशीच वाढ राज्य शासन देईल हे तत्व आपण 1977 ला मान्य केलेले आहे. शासकीय कर्मचा-यांचा जो मूलभूत हक्क आहे तो त्यांना द्या परंतु शेतक-यांचा सुध्दा काही तरी हक्क आहेच की.

सभापती महोदय, प्रकल्प ग्रस्तांची 100 टक्के जमीन शासन ताब्यात घेते, शेतक-यांची स्थावर मालमत्ता 100 टक्के घेतली जाते. शेतक-याची स्थावर जंगम मालमत्ता 100 टक्के गेल्यानंतर त्या शेतक-याच्या एका पिढीला नोकरी मिळणार परंतु त्यांनतरच्या पिढीला नोकरीची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

कोणतीही सुविधा नाही. त्या शेतक-यांची जमीन तर कायमची गेलेली असते परंतु नोकरीची काहीच सुविधा नसते. या शेतक-यांच्या मुलांना आपण सुविधा कधी देणार आहात ? नोकरी कधी देणार आहात ? शेतक-यांच्या पिढयांपिढया उद्ध्वस्त झालेल्या आहेत. या संदर्भात माननीय अर्थमंत्र्यांनी सूचना करण्यास सांगितले होते. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या 5 टक्क्याचा क्लॉजचे आपण काय करणार आहात? ज्या ज्या ठिकाणी प्रकल्प होतील त्या त्या ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन एका वर्षाच्या कालावधीत, ज्या खात्यात जमेल त्या खात्यात त्यांना नोकरी दिली पाहिजे आणि हे सर्व करतांना टक्केवारी सांगण्याची गरज नाही. जे प्रकल्पबाधीत होतील त्यांचे एका वर्षाच्या आत 100 टक्के पुनर्वसन केले गेले पाहिजे. कोयनेच्या प्रकल्पग्रस्तांची पूर्णपणे वाताहत लागली आहे. कोयनेचे प्रकल्पग्रस्त उध्वस्त झालेले आहेत. आम्हाला त्याची झळ बसत नाही त्यामुळे आम्ही काही बोलत नाही कारण आम्हाला सर्व काही सुखासुखी मिळत असते.

सभापती महोदय, मी आता गिरणी कामगारांच्या संदर्भात विचार मांडणार आहे. या अर्थसंकल्पात गिरणी कामगारांची आठवण सुध्दा काढण्यात आलेली नाही. आपण जर गिरणी कामगाराला डोळयासमोर आणले तर आपल्याला सर्व काही आठवेल. गिरणी कामगारांच्या मुलांसाठी आयटीआयची व्यवस्था करणार आहोत असेही या ठिकाणी सांगण्यात आले. उद्योगाला अनुसरुन असणा-या टेक्नॉलॉजी आयटीआयमध्ये आल्या पाहिजेत. आतापर्यंत ट्रॅडीशनल जे काही चालू आहे तेच चालू असल्यामुळे आयटीआयमध्ये ट्रॅडीशनल कोर्स केलेल्या मुलांना जॉब सुध्दा मिळत नाही. त्यामुळे आयटीआय मधून बाहेर पडणा-या किती तरुणांना शासनाने रोजगार दिला त्याची सुध्दा माहिती मिळण्याची आवश्यकता आहे. गिरणी कामगारांसाठी, गिरणी कामगारांच्या मुलांना नोकरी मिळण्यासाठी काय केले याचीही माहिती या ठिकाणी आम्हाला मिळाली पाहिजे. गिरणी कामगारांच्या मुलांना नोकरी लावण्याच्या संदर्भात शासनाने पहिल्यांदा सांगितले की, गिरणी कामगारांची मुले पदवीधर नाहीत त्यावेळेस गिरणी कामगारांची किती विद्यार्थी पदवीधर पाहिजे याची यादी मी तुम्हाला देतो असे मी सभागृहात सांगितले होते. गिरण्यांच्या ठिकाणी मॉल्स उभे राहत आहेत. गिरणी कामगारांच्या मुलांना नोकरी देण्याच्या संदर्भात शासनाने सांगितले की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

आम्ही त्यांच्यासाठी ट्रेनिंग सेटर्स उघडतो आहोत. परंतु या अर्थसंकल्पात गिरणी कामगारांची या शासनाला आठवण सुध्दा झालेली नाही. गिरणी कामगारांच्या प्रश्नाच्या संदर्भात मागील अर्थसंकल्पात ट्रेनिंग सेटर्स उघडण्याच्या संदर्भात आश्वासन दिले होते त्याची काही सुध्दा माहिती या अर्थसंकल्पात देण्यात आली नाही. या ट्रेनिंग सेटरमध्ये गिरणी कामगारांची एवढी मुले आली, एवढया मुलांना ट्रेनिंग दिले, त्यांना नोकरी दिली हे शासनाला अभिमानाने सांगता आले असते परंतु या अर्थसंकल्पात शासनाने यासंदर्भातील काहीही माहिती दिलेली नाही. याचा अर्थ शासनाने गिरणी कामगारांच्या मुलांसाठी काहीही केले नाही असाच त्याचा अर्थ होतो. गिरणी कामगारांच्या मुलांच्या संदर्भात जे दु:ख आहे ते दु:ख मी या ठिकाणी मांडलेले आहे. गिरणी कामगारांच्या संदर्भात शासनाने जी जी आश्वासने दिली ती आश्वासने शासनाने पाळली का याचेही उत्तर माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी द्यावे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, मुंबई शहराच्या संदर्भातील युएलसी कायदा शासनाने रद्द केला त्यावेळी सांगण्यात आले की, केंद्र सरकारच्या जेएनआरयुचे पैसे आपल्याला मिळायचे आहेत, मुंबई शहराचा विकास करावयाचा आहे आणि जर युएलसी कायदा रद्द केला नाही तर केंद्रशासन आम्हाला पैसे देणार नाही म्हणून युएलसी कायदा रद्द करणे आवश्यक आहे असे राज्यशासनाने सांगितले होते. युएलसी कायदा रद्द केल्यामुळे घरांची संख्या वाढेल,जमिनीचे भाव कमी होतील असे सांगितले परंतु सभापती महोदय, हे सर्व हवेतच चालले आहे. मुंबईतील जमिनींचे भाव कमी झाले नाही, घरांची संख्या वाढली नाही परंतु झोपडयांची संख्या मात्र रोजच्या रोज वाढते आहे. उलट सन 2000 मधील झोपडयांना अधिकृत कसे करावे याचा विचार चालू आहे. माझा सवाल आहे की, जेएनआरयुच्या अंतर्गत युएलसी कायदा रद्द केल्यामुळे केंद्रशासनाकडून आपल्याला किती निधी उपलब्ध झाला, कोणत्या कारणासाठी झाला आणि त्या निधीची विनियोग आपण काय केले याची सुध्दा माहिती आम्हाला या निमित्ताने मिळाली तर आमच्या ज्ञानात भर पडेल.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...

आपण युएलसी कायदा रद्द केला. त्यामुळे किती घरे निर्माण झालीत. किती भावामध्ये ती मिळालीत. काही महिन्यांपूर्वी म्हाडाची सदनिका विक्रीसंबंधातील जाहिरात आली होती. त्यासाठी लक्षावधी लोकांनी अर्जासाठी गर्दी केली होती. छोट्याशा जागेसाठी. तेव्हा शासनाने जेएनएनयुआरएम च्या पैशाचे काय केले ?

मुंबईमध्ये पवई तलाव आहे. त्याच्या सुशोभिकरणासाठी केंद्र सरकारकडून निधी आला. हे मी आठ वर्ष ऐकत आहे. यासंबंधी मी माननीय आयुक्तांबरोबर बैठक घेतली. तत्कालीन माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांच्या समवेत बैठक झाली. पण या तलावाच्या सुशोभिकरणाचे काय झाले ? पवई तलाव आहे तसाच आहे. पैसे कुठे गेले माहित नाही. पवई तलावातील पाणी स्वच्छ करण्यासाठी कोट्यवधी रूपये खर्च करण्यात आले. पवई तलावाच्या मागच्या बाजूला गोरेगावमध्ये आरे वसाहत आहे. आमचे सरकार असताना आरे वसाहतीतील जागा गोल्फ क्लबसाठी श्री.नॅन्सी नावाच्या माणसाला देण्यात आली. साहेब म्हणाले, परिसर सुंदर दिसेल. गोल्फ क्लब करू दे. सुंदर अशी हिरवळ होईल. त्या नॅन्सीने जमीन घेतली. पण गोल्फ क्लब राहिला दूर. श्री.भुजबळ साहेब आता तेथे बंगले बांधले. लावासा सिटी, ॲम्बी व्हॅली आता गोरेगावच्या आरे वसाहतीमध्ये सुरू आहे. गोरेगावच्या आरे वसाहतीमध्ये वन खात्याच्या जमिनीवर, वन खात्याच्या छाताड्यावर त्या नॅन्सीने सप्ततारांकित रॉयल पाम हॉटेल बांधले. बिबळ्या तेथे फिरतो. त्याच्या घरात आता आम्ही घुसलो. यासाठी कोणी परवानगी दिली हे आम्ही विचारले. काय चालले आहे,ते मला कळतच नाही. मूळ जमीन दिली कशाला. हिरवीगार वनराई करायला. त्या जमिनीचा मूळ मालक कोण ? श्री.राजेश टोपे यांनी बैठक बोलाविली होती त्यावेळी बैठकीमध्ये मी अधिकाऱ्यांना जमिनीचा मूळ मालक कोण असे विचारले. त्यावेळी अधिकाऱ्यांनी जमीन नॅन्सी यांची आहे असे सांगितले. मी म्हटले ठीक आहे. नॅन्सीच्या आधी कोण मालक होते असे मी विचारले. किती जमीन नॅन्सीला दिली ते सांगा. त्यापैकी किती टक्के जमिनीवर बांधकाम करता येते ते सांगा. वन जमिनीच्या छाताडावर मोठ्याप्रमाणावर रॉयल पामचे बांधकाम उभे राहिले आहे. यासंबंधी प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया काहीही लिहित नाही. जाहिराती मिळतात म्हणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...

कोणाचीही हिंमत होत नाही. मी बोलतोय. काय व्हायचे ते होऊ द्या. सगळे चोर. सावासारखे वागत आहेत. आम्ही झोपड्यांच्यासंबंधी बोलतो पण रॉयल पामसंबंधी बोलण्याचे धाडस होत नाही. हिरानंदानी, रहेजा यांच्यासंबंधी बोलण्याचे धाडस नाही. त्यांचेसुद्धा बाप जबरदस्त आहेत. मुंबईहून वाशीला जाताना टोलनाका ओलांडल्यावर खाडीत पुन्हा झोपडपट्टया उभ्या रहात असल्याचे दिसून येते. इकडून घ्यायचे आणि विकायचे असे झोपडीवाल्यांचे धोरण आहे. मध्यंतरी श्रीमती सोनिया गांधी आल्या होत्या. त्यांनी उद्घाटन केले. घराच्या चाव्या झोपडीधारकांना दिल्या. घराच्या चाव्या मिळाल्यानंतर झोपडीवाले आपली घरे विकून पुन्हा झोपड्यात निघून गेले. अशी ही आपली मुंबई नगरी. आपणच विकायला काढली आहे. त्यामुळे मी येथे काही प्रश्न उपस्थित करणार आहे. पवई तलावाच्या निधीचा विनियोग कशा प्रकारे झाला आहे ? गारेगाव आरे वसाहतीतील रॉयल पामच्या जमिनीचा मालक कोण आहे ? ती जमीन रॉयल पामला कशी देण्यात आली. त्या जमिनीवर मोठ्या प्रमाणावर बांधकाम कशा प्रकारे होत आहे ? लोणावळ्याला श्री.नवले यांची सिंहगड इंटरनॅशनल इन्स्टिटयूट आहे. ती नवलाईच आहे. ही इन्स्टिटयूट देखील वनखात्याच्या जमिनीवर आहे. आमच्या वन मंत्र्यांबद्दल मला कधी कधी वाईट वाटते. ते ह.भ.प.आहेत. त्यांनी कधी तरी खरे बोलावे. ते स्वत: तिकडे जातात. ते म्हणतात असे आहे का ? तक्रार द्या. त्यांना मी तक्रारीचा मोठा बाड दिला. वनखात्याने कोर्टात जाऊन तक्रार केली. तरी देखील संस्थेचे बांधकाम सुरू. बांधकाम करण्यास कोर्टाने मनाई केली. आजही तेथे बांधकाम सुरू आहे. तेव्हा याची देखील आपण चौकशी करावी अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, शिक्षण खात्यात काय चालले आहे ? महापालिकेतील, जिल्हा परिषदेतील शाळेतील शिक्षणाचा दर्जा आणि अवस्था, आश्रमशाळेतील शिक्षणाचा दर्जा आणि अवस्था, आश्रमशाळांतील वसतिस्थानांची अवस्था, वसतिगृहांची अवस्था, यावर वेगळी चर्चा करण्याची गरज आहे. परवा वरळीवरून येताना मी मोठे होर्डिंग पाहिले. ते इंटरनॅशनल स्कूलचे होर्डिंग होते. त्याच्या खाली काय लिहिले होते. वातानुकूलित वर्ग. मी सहज मनात म्हटले की, कितीही पैसा असू दे पण या बालमनाला वातानुकूलित वर्गात शिक्षण मिळाले तर त्याची या मातीशी नाळ जुळेल काय ? आज काय हा शिक्षणाचा बाजार मांडला आहे ?

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ...

एका बाजूला पगार झालेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे तर दुसऱ्या बाजूला पगारवाढ दिल्याचे जे सांगताहेत ते तद्दन खोटे आहे. मघाशी या ठिकाणी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी या बाबतची आकडेवारी दिलेली आहे त्यामुळे मी त्याचे द्विरूक्ती करून वेळ घेऊ इच्छित नाही. पण तरीही काही आकडे पुन्हा येथे सांगितले पाहिजेत. या सरकारचा पूर्वीपासूनच असा दृष्टीकोन राहिलेला आहे की, ज्या ज्यावेळेस केंद्रामध्ये वेतनवाढ होईल त्या त्यावेळी ती जशीच्या तशी येथेही लागू करायची. परंतु यावेळेस पहिल्यांदा असे घडले आहे की, इतर कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देताना शिक्षकांना मात्र उलट्या गतीने, उलट्या मार्गाने तुम्ही वेतनवाढ दिलेली आहे. केंद्रीय वेतनश्रेणी जी आहे ती मिळणे तर दूरच राहिले, पण जी ग्रेड पे देऊ केली आहे ती किती आहे ? डी.एड. शिक्षकांना 4200 ची ग्रेड अपेक्षित होती, ती 2800 वर आणून ठेवली आहे म्हणजे येथेच 1400 चा घाटा आहे. त्यावर एचआरए आणि टीए मोजला तर हा घाटा आणखी मोठा होणार आहे. म्हणजे केंद्रीय शिक्षकांच्या तुलनेत या राज्यातील जे प्राथमिक शिक्षक आहेत, माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शिक्षक आहेत त्यांना किमान 5 ते 6 हजार रूपये पगार कमी मिळणार आहेत ही वस्तुस्थिती आहे. बी.एड. म्हणजे माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत जवळपास 400 रूपयांची कपात वित्त मंत्र्यांनी म्हणजेच हकीम समितीने केलेली आहे. अर्थात यामध्ये मी हकीम समितीलाही दोष देत नाही. कारण शेवटी याबाबतचा निर्णय राज्य सरकार घेत असते, मंत्रिमंडळ घेत असते आणि राजकीय इच्छाशक्तीने घेत असते. या सरकारचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोनच इतका वाईट आहे, इतका अवमानित करणारा आहे, .. भले सरकार कितीही सांगो की, आम्ही शाहू, फुले आंबेडकरांचे वारसदार आहोत, रोज जरी त्यांची नावे हे सरकार घेत असले तरी सरकारच्या एकंदर कृतीवरून तरी असेच दिसते आहे की, हे सरकार निश्चितच त्यांचे वारसदार नाहीत. हे मनुचेच वारसदार आहेत. म्हणून या राज्यातील सबंध गोरगरीब शिक्षकांना, विद्यार्थ्यांना, जनतेला शिक्षणापासून वंचित ठेवण्यासाठी त्यांचा आटोकाट प्रयत्न सुरू आहे. सभापती महोदय, बी.एड. शिक्षकांना किती ग्रेड पे अपेक्षित होता ? 4600, 4800 आणि 5400 अशी ग्रेड पे अपेक्षित असताना त्यांना प्रत्यक्षात 4300, 4400 आणि 4600 अशी ग्रेडपे दिली गेली. म्हणजे जवळपास 300 ते 400 चा फरक त्यात केला गेला. एका बाजूला शासनाने इतर कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू केलेली आहे. कारण सेवा करीत असताना त्यांना आपली

.... वायवाय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रगती करता यावी, त्याच्या कामाचा मोबदला त्याला नीटपणे मिळावा तसेच त्याच्या कामाचा दर्जा देखील वाढवावा म्हणून ही योजना आहे. खरे तर ही योजना शिक्षण क्षेत्राला आवश्यक होती. जेथे शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी तरतूद करण्याची आवश्यकता असताना त्या शिक्षकांना मात्र 24 वर्षांच्या सेवेनंतर केवळ 20 टक्के शिक्षकांनाच याचा लाभ होणार आहे. म्हणजे पूर्वीचीच प्रथा कायम ठेवली आहे. खरे तर सरसकट हा लाभ देण्याची आवश्यकता होती. ज्याप्रमाणे सरसकट इतर कर्मचाऱ्यांना ही योजना लागू केलेली आहे असे असताना शिक्षकांना मात्र त्यापासून का वंचित ठेवण्यात आले आहे हे समजू शकत नाही. माझा तर आरोप आहे की, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील म्हणाले त्याप्रमाणे एका बाजूला कायम विनाअनुदानित शिक्षक आणि दुसऱ्या बाजूला वस्तीशाळांचे शिक्षक, अनौपचारिक शिक्षण क्षेत्रातील शिक्षक, आदिवासी विभागातील अप्रशिक्षित शिक्षक या सगळ्यांना एक प्रकारे वेठबिगारीचे जीवन जगणे जगण्यास हे सरकार भाग पाडत आहे आणि आता तर या सरकारचा घाट असा आहे की, उर्वरित सगळ्या शिक्षकांना की, जे वेतनश्रेणी घेत आहेत त्या सर्व शिक्षकांना अर्धपगारी आणि वेठबिगारी करण्यास भाग पाडायचे. याचा अर्थ असा आहे की, शिक्षणाचा, सर्व शिक्षा अभियानाचा वारंवार उच्चार केला जातो, पण तरीही या शिक्षण क्षेत्रातून सगळा गरीब वर्ग बाहेर पडावा. त्याला केवळ नावापुरते प्राथमिक शिक्षण मिळावे, त्यापुढील शिक्षण त्याने घेऊ नये अशी व्यवस्था करण्याचा प्रयत्न आहे. ज्याच्याकडे ऐपत आहे त्यानेच शिकावे. त्यासाठीच आम्ही शाळा-महाविद्यालये काढू. त्याच्यासाठी विनाअनुदान चालू. त्याच्यासाठी कायम विनाअनुदान चालू, त्यासाठी आयसीआयसीचे, सीबीएससीच्या शाळांना सरकार परवानगी देते. आणि दुसऱ्या बाजूला ज्या अनुदानित शिक्षण संस्था आहेत त्या हळूहळू ही जबाबदारी आपल्या खांद्यावरून कमी करण्याचा प्रयत्न या सरकारचा मागील दाराने सुरू आहे. या वेतन आयोगाच्या निमित्ताने तो प्रथमच इतक्या बटबटीत स्वरूपात सर्वांच्या समोर आलेला आहे. म्हणून या सरकारचे अभिनंदन मी करू इच्छित नाही, या अर्थसंकल्पाचे अभिनंदन नाही तर निषेध करणे मला भाग आहे.

सभापती महोदय, माननीय वित्त मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, खरोखरी तुम्ही आम्हा शिक्षकांवर इतका अन्याय केलेला आहे की, विचारता सोय नाही. मी कधीही आपला निषेध केलेला नव्हता. किंबहुना तुम्ही मंत्री झाला तेव्हा मला खूप आनंद झाला होता. कारण आमचा सगळ्यात

... वायवाय 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

जुना असा एक मित्र, जो चळवळीतीलदेखील आहे, त्याच्या काही विचारांवरील निष्ठा आहेत, अशा माणसाला संधी मिळाली आहे. पण तुमच्या हातून काही वाईट कामे करवून घेण्यात आली आहेत म्हणून मी मंत्री महोदयांना दोष कमी देतो. मला त्याची जाणीव आहे, माहिती आहे. पण नेमके त्यांनी हा अर्थसंकल्प करण्याची जबाबदारी आपल्यावर घेतली. म्हणजे वाईट स्थिती आली तेव्हा त्यांच्यावर ही जबाबदारी दिली गेली. .. त्यामुळेच आमचा मित्र मंत्री झाला याबद्दल आनंद जरूर वाटला पण तो क्षणभंगूर ठरला. असो.

(यानंतर श्री. सरफरे ..... झेडझेड 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

सभापती महोदय, केंद्र सरकारने महिला कर्मचाऱ्यांना प्रसूतीसाठी 136 दिवसांऐवजी 180 दिवसांची रजा दिली आहे, हा याठिकाणी सांगण्याचा मुद्दा नाही. परंतु राज्य शासनाच्या सेवेतील महिला कर्मचाऱ्यांना नवीन वेतनश्रेणी लागू करीत असतांना 180 दिवसांची रजा कां दिली जात नाही? केंद्र सरकारी महिला कर्मचाऱ्यांना बाल संगोपनासाठी 2 वर्षाची रजा दिली जाते. तर मग आपल्या महिला कर्मचाऱ्यांनी काय घोडे मारले आहे? त्यांची मुले सावत्र आहेत काय? तुम्ही त्यांना सापत्न भावाची जी वागणूक देत आहात ती अतिशय वाईट आहे, याकडे मी माननीय अर्थमंत्र्यांचे लक्ष वेधतो.

माननीय अर्थमंत्र्यांनी दिनांक 26 नोव्हेंबर रोजी मुंबई शहरावर झालेल्या अतिरेकी हल्ल्याच्या निमित्ताने 161 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. तसेच, 126 कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद करुन याठिकाणी तरतुदीचा पाढा वाचलेला आहे. मुंबई शहरावर सागरी मार्गाने हल्ला झाला. त्यामुळे या मुंबई शहराला सागरी मार्गाबरोबरच होणाऱ्या हवाई हल्ल्यापासून वाचविण्यासाठी सुरक्षा कवच देण्याची आवश्यकता आहे. ही सुरक्षा पुरविण्याची ज्या पोलिसांची जबाबदारी आहे त्यांना चांगले पगार देऊन त्यांची प्रतिष्ठा जपण्याची देखील आवश्यकता आहे. याबाबतीत शासनाने काय निर्णय घेतला आहे? आज पोलिसांचे जे पगार आहेत त्यामध्ये त्यांना अवमानित जीणे जगावे लागत आहे. अशा परिस्थितीत त्या पोलिसांकडून संपूर्ण मुंबई शहराच्या सुरक्षेची आपण अपेक्षा करु शकत असाल तर ते चुकीचे आहे. श्री. हेमंत करकरे यांच्या पत्नी श्रीमती कविता करकरे यांनी या संदर्भात शासनाला पत्र पाठविले आहे. त्याची दखल शासनाने कोणत्या पध्दतीने घेतली आहे? याचे उत्तर जाणून घेण्याची या सभागृहाची इच्छा आहे.

सभापती महोदय, नक्षलग्रस्त भागासाठी करण्यात आलेल्या तरतुदीचा याठिकाणी उल्लेख करण्यात आला आहे. आरोग्याच्या सुविधा, पाटबंधारेच्या सुविधा आणि पाणी पुरवठयाच्या सुविधांच्या संदर्भात चांगल्या प्रकारची तरतूद या ठिकाणी करण्यात आल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु नक्षलवादी चळवळीमध्ये बळी पडणाऱ्या तेथील आदिवासी तरुणांच्या पुनर्वसनासाठी आपण काय करीत आहात? फक्त पोलिसी बळ वाढवून आणि बंदुका चालवून आपण नक्षलवादाशी मुकाबला करु शकत नाही. नक्षलवादी चळवळीला जनतेमधून पाठिंबा कां मिळत असतो? याचा आपण विचार केला पाहिजे. एका बाजूला काश्मीरमधील अतिरेक्यांना लष्करामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

श्री. कपिल पाटील....

सामावून घेऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात आले, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यात आले. त्या पध्दतीने महाराष्ट्राच्या नक्षलग्रस्त भागातील या सर्व तरुणांना रोजगार अणि शिक्षणाच्या माध्यमातून मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता होती. त्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद या अर्थसंकल्पामध्ये किंवा शासनाकडून त्यापूर्वी कोणताही निर्णय घेऊन करण्यात आलेली नाही. सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम राबवितांना आपल्याला त्यासाठी राखून ठेवलेला निधी वापरता आला नाही. त्यामुळे बराचसा निधी परत गेला. दुसऱ्या बाजूला कस्तुरबा गांधी योजनेसारख्या चांगल्या योजना आल्या आहेत. त्या योजनांतर्गत असलेल्या शाळा आपण आप्तस्वकियांना वाटून दिल्या आहेत. या शाळा वाटतांना आपण कोणते निकष लावले, कोणत्या शिक्षण संस्थांना त्या दिल्या? याची यादी सभागृहामध्ये ठेवण्यात आली पाहिजे. ही माहिती समोर आली तर आपण केलेली वशिलेबाजी आणि आप्तस्वकिंयाची लावलेली वर्णी याची माहिती महाराष्ट्रासमोर येऊ शकेल.

सभापती महोदय, अनुसूचित जाती व मागासवर्गीयांसाठी शासनाने या अर्थसंकल्पामध्ये जी तरतूद केली आहे तिचा देखील टेंभा याठिकाणी मिरविण्यात आला आहे. या राज्यातील अनुसूचित जातींची लोकसंख्या 13+7 म्हणजे जवळपास 20 टक्क्यांच्या घरात आहे. अनुसूचित जातींची लोकसंख्या 13 टक्के असतांना ही तरतूद 13 टक्क्यांपेक्षा कमी आहे. नवबौंध्दांसहीत अनुसूचित जातींची लोकसंख्या 16 टक्के आहे. 16 टक्के लोकसंख्या असतांना सुध्दा आपली तरतूद 12 टक्क्यांवर जात नाही. एका बाजूला हे शासन शाहू, फुले, आंबेडकरांचा उल्लेख करीत असतांना त्या समाजावर एवढा मोठा अन्याय केला जात आहे हे मला समजत नाही. तीच गोष्ट आदिवासींच्या संदर्भात आहे. त्यांची लोकसंख्या 9 टक्क्यांपर्यंत गेली असतांना त्यांचा आकडा 7 टक्क्यावर पोहोचला नाही. ही वस्तुस्थिती मला आपल्या नजरेस आणावयाची आहे. विना अनुदानित शिक्षण संस्थांच्या संदर्भात एका बाजूला शिक्षण संस्थांना अनुदान दिले जात नाही. आपण या सभागृहामध्ये "कायम" हा शब्द आठ दिवसात काढण्याचे आश्वासन दिले होते. हे आश्वासन मंत्री म्हणून जरी आपण दिले नसलेतरी माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले होते. शासनामध्ये काम करीत असतांना "तो मी नव्हेच" असे बोलता येत नाही. राज्याच्या प्रमुखांनी एकदा भूमिका घेतल्यानंतर त्याचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पामध्ये पडावयास हवे होते. तसेच, आठ दिवसांची मुदत आचारसंहिता लागण्यापूर्वी खूप अगोदर जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर तीन महिन्यांचा कालावधी लोटला आहे. त्याबाबत आपण काहीच निर्णय न घेता त्या 65 हजार शिक्षकांना उपाशी ठेवले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

श्री. कपिल पाटील...

या राज्यातील वस्ती शाळांचे शिक्षक असतील, अप्रशिक्षित वर्ग असेल, कायम विना अनुदानित शिक्षक असतील यांच्या तोंडाला ज्या पध्दतीने पाने पुसली आहेत त्याचे वर्णन करणे कठीण आहे.त्याबद्दल मी पुन्हा एकदा शासनाचा धिक्कार करतो आणि माझे भाषण संपवितो.

धन्यवाद.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : मला या सभागृहाची परवानगी घेऊन, अगदी मर्यादित वेळेमध्ये दोन मिनिट भाष्य करावयाचे आहे, माझे विचार मांडावयाचे आहेत.

काल माननीय अर्थमंत्र्यांनी सदनामध्ये जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे, त्यावर चर्चा सुरु आहे.माननीय अर्थमंत्री महोदय, त्यासंबंधात योग्य वेळी उत्तर देतील. याठिकाणी सन्माननीय वित्तमंत्री आणि सन्माननीय वित्त राज्यमंत्री हे दोघेही जण उपस्थित आहेत. मी सभागृहातील चर्चेच्या अनुषंगाने एक बाब त्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

आपण महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांसाठी फार मोठे पॅकेज दिले. शेतकरी कर्जबाजारी झाल्याने आत्महत्या करीत होते, ही बाब लक्षात घेऊन आणि एकंदरीतच त्यांच्या सर्व परिस्थितीचा साकल्याने विचार केल्यानंतर या शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर करण्याचे काम या राज्य शासनाने केले आहे आणि त्यामध्ये केंद्र शासनाने मोठा वाटा उचलला. आजच्या चर्चेच्या अनुषंगाने मी स्वत: एका महत्वाच्या प्रश्नाबाबत शासनाचे मुद्दाम लक्ष वेधू इच्छितो. आपण शेतकऱ्यांना पॅकेज देऊन फार मोठी कामगिरी केली, त्याबद्दल मी आपल्याला मन:पूर्वक धन्यवाद देऊ इच्छितो. परंतु त्याचवेळी अशा प्रकारच्या समस्यांना तोंड देत असलेले अनेक जे गोरगरीब आहेत, कामगार आहेत,मध्यमवर्गीय असा एक फार मोठा वर्ग महाराष्ट्रामध्ये आहे, ज्यांनी मग कोणाच्या घरी लग्नकार्य असेल तर त्यासाठी किंवा भविष्य काळासाठी किंवा काही तत्कालीक कारणासाठी आपल्या कडील छोट्या-मोठ्या ठेवी, आपली आयुष्याची पुंजी काही पतपेढयांमध्ये, काही सहकारी बँकांमध्ये ठेवलेली आहे. आज यातील काही बँका, काही पतपेढया डबघाईस आल्या आहेत. जवळपास तीन ते साडेतीन लाखाच्यावर किंबहुना त्यापेक्षा जास्त लोक हाल-अपेष्टांचे जीवन जगत आहेत. या लोकांची आयुष्यभराची पुंजी त्या पतपेढयांमध्ये गेलेली आहे आणि त्यामुळे आज ही सर्व मंडळी अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत. या समस्येमधून या लोकांना कसे बाहेर काढावयाचे यादृष्टीने काही-काही योजना राज्य शासनाकडे आलेल्या देखील आहेत. मला असे वाटते की, हा जो दुर्लक्षित वर्ग आहे, तो देखील तितकाच महत्वाचा आहे. ते देखील आपल्या राज्याचे नागरीक आहेत. आपल्याला त्यांच्या समस्या माहिती आहेत. त्यामुळे या प्रश्नाच्या बाबतीत राज्य शासनाचा हस्तक्षेप ताबडतोब होणे अत्यावश्यक आहे. नाहीतर आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नाकडे जसे चांगल्या प्रकारे लक्ष केंद्रीत केले, त्याचप्रमाणे या लोकांना देखील त्यांच्या दु:खामध्ये शासनाने काहीतरी मदत करावी अशा प्रकारच्या काही योजना राज्य शासनासमोर आहेत. परंतु या सगळया

. . . .3 ए-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

योजनांच्या बाबतीत निश्चितपणे राज्य शासनाने गंभीरपणे दखल घ्यावयास पाहिजे. राज्य शासनाने काही-काही गोष्टी केल्या. सुवर्ण सहकारी बँकेच्या संदर्भात किंवा नांदेड सहकारी बँक असो, त्यांना राज्य शासनाने आर्थिक सहाय्य केले. त्यामुळे तेथील ठेवीदारांना मदत झाली. त्यामुळे जे वंचित लोक आहेत, उदाहरण द्यावयाचे झाले तर भुदरगड पतपेढीचे देता येईल. आज महाराष्ट्रातील कित्येक लाख लोक आहेत की ज्यांच्या ठेवी बुडालेल्या आहेत. त्यामुळे लोकांचे संसार उद्ध्वस्त झालेले आहेत. अशा प्रसंगाच्या वेळी या पतपेढयांचे विलिनीकरण काही संस्थांमध्ये होत आहे. तर या सगळया ज्या प्रक्रिया आहेत, त्यामध्ये राज्य शासनाला काही तोशिष नाही अशा प्रकारची काही प्रपोजल्स् दिलेली आहेत. त्यामुळे या राज्यातील जे अनेक मध्यमवर्गीय लोक आहेत, गोरगरीब वर्ग आहे, कामगार आहे, ज्यांना या क्षणाला कोणी वाली नाही. त्यांच्या बाबतीत मला असे वाटते की, माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प मांडलेला आहे आणि उद्याचा दिवस देखील चर्चा आहे. मी आता याठिकाणी जो प्रश्न मांडलेला आहे, त्यामध्ये आपण गांभीर्याने लक्ष घालावे आणि जर आपण योग्य वेळीच हस्तक्षेप केला तर या दुर्लक्षित, वंचित लोकांना निश्चितपणे चांगला न्याय मिळू शकेल अशी माझी स्वत:ची धारणा आहे. त्यामुळे यासंदर्भात आपण राज्याचे शासनकर्ते म्हणून निश्चितपणे गांभीर्याने लक्ष घालावे अशा प्रकारची सूचना मी याठिकाणी आपल्याला करु इच्छितो.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मला एकच गोष्ट विचारावयाची आहे. आपण मघाशी असे सांगितले की, उद्यापर्यंत चर्चा चालणार आहे. पण ही चर्चा या विषयावर की आणखी कशावर चालणार आहे ?

उप सभापती : एकंदरीतच अर्थसंकल्पावर चर्चा होणार आहे. त्यानंतर पुरवणी मागण्या आहेत, रि-ॲप्रोप्रिएशनचे विधेयक आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी ज्या-ज्या सूचना मांडलेल्या आहेत, सन्माननीय सदस्यांनी देखील सूचना मांडलेल्या आहेत, त्यातील एक चर्चेचा भाग म्हणून....

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, आपण याठिकाणी जी सूचना केलेली आहे, त्याची नोंद घेतलेलीच आहे. पण मला सभागृहाच्या कामकाजाचे टाईम टेबल कळले तर बरे होईल.

उप सभापती : माननीय वित्त मंत्र्यांना आजच्या विषयपत्रिकेवरील विषय काय आहेत ? याची

. . . .3ए-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माहिती आहे आणि सगळेच प्रश्न हे निश्चितपणे चांगल्या प्रकारे चर्चिले गेले पाहिजेत. त्यामुळे याठिकाणी . . . .

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या अर्थसंकल्पाच्या संदर्भातील उत्तराचे भाषण कधी ठेवणार आहात हे मला कळले तर बरे होईल.

उप सभापती : माननीय वित्त मंत्र्यांच्या उत्तराचे भाषण आजच होईल. मला आपली अडचण माहिती आहे आणि आमची अडचण आपण ओळखून आहात. मला असे वाटते की, या सभागृहाचे कामकाज सुरळीत सुरु आहे. तेव्हा तुम्ही आमच्यावर विश्वास ठेवावा आणि आपण योग्य वेळी याचे उत्तर द्यावे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, धन्यवाद.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : अध्यक्ष महोदय, या राज्याच्या नूतन अर्थमंत्र्यांनी सन 2009-2010 चा अंतरिम अर्थसंकल्प अतिशय नियोजनबध्द पध्दतीने मांडलेला आहे त्याबद्दल प्रथम मी त्यांचे अभिनंदन करतो.

दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला, त्या अनुषंगाने "फोर्स वन" गटाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. परंतु हे करीत असताना राज्यातील जनतेच्या सुरक्षेसाठी, पोलीस खात्याचे बळकटीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी पोलिसांच्या हातातील काठी जावयास पाहिजे आणि ती जागा बंदुकीने घ्यावयास पाहिजे. यासाठी शासनाने अत्यंत गांभीर्याने प्रयत्न केला पाहिजे. या अर्थसंकल्पामध्ये अनेक योजनांसाठी तरतूद करण्यात आली असताना नक्षलग्रस्त भागाचा जलद गतीने विकास करण्यासाठी मोठया प्रमाणात तरतूद करण्यात आली आहे. परंतु नक्षलवाद्यांचा बीमोड करण्यासाठी सुध्दा शासनाने ठोस कृती कार्यक्रम आखला पाहिजे आणि त्यासंबंधीचा एक बृहत आराखडा तयार केला पाहिजे. महाराष्ट्र शासनाने 6 वा वेतन आयोग स्वीरकारला. हा 6 वा वेतन आयोग स्वीकारण्यासाठी राज्य शासनाने हकीम समितीची नियुक्ती केली होती. 6 व्या वेतन आयोगामध्ये काही त्रुटी असता कामा नये यासाठी या समितीची नियुक्ती करण्यात आली होती. गेले तीन-चार महिने राज्यातील सर्व कर्मचारी वर्गांचे आणि घटकांचे म्हणणे या हकीम समितीने मंत्रालयात ठराविक वेळ निश्चित करुन ऐकून घेतले. त्यांच्याकडून निवेदने घेतली. या मागे शासनाचा शुध्द हेतू असा होता की, कोणत्याही बाबतीत त्रुटी असता कामा नये. या हकीम समितीला शासनाने कोणते अधिकार दिले होते हे आम्हाला माहीत नाही. परंतु आम्हाला जेव्हा कुणकुण लागली की, या हकीम समितीने शिक्षकांच्या वेतनावर कुऱ्हाड फिरवलेली आहे, तलवार फिरवलेली आहे तेव्हा आम्ही आठ दिवसापूर्वीच या राज्याच्या अर्थमंत्र्यांना आणि या राज्याच्या मुख्यमंत्र्यांना भेटून त्यांना दिवेदन दिलेले आहे. हकीम समितीने शिक्षकांवर अन्याय केलेला आहे असे आम्हाला कळलेले आहे तेव्हा या अहवालाची प्रत आम्हाला देण्यात यावी अशी आम्ही त्यांना विनंती केली. परंतु याबाबतीत आम्हाला जे उत्तर अपेक्षित होते तेच मिळाले. "हा अहवाल गोपनीय आहे, तो तुम्हाला देता येणार नाही." म्हणून आम्हाला तो अहवाल दिला गेला नाही.शब्दात व्यक्त करता येणार नाही अशा पध्दतीने प्रथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत जे व्हायचे होते तेच झालेले

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MMP/

श्री. विक्रम काळे. . .. .

आहे. या सभागृहात आम्ही शिक्षकांचे प्रतिनिधी म्हणून जेव्हा बोलतो तेव्हा इतर काही सदस्य "शिक्षक काही शिकवतात काय" अशा प्रकारे आमची हेटाळणी करतात. आम्ही शिकवले नसते तर तुमच्यासारखे विद्वान लोक घडले असते काय? हा माझा या ठिकाणी प्रति प्रश्न आहे. सभापती महोदय, मी या सभागृहाला अवगत करु इच्छितो की, भारतातील महाराष्ट्र हे असे राज्य आहे की, गेल्या वर्षी या राज्यामध्ये सगळयात जास्त इंजिनियर विद्यार्थी पास झाले. सगळयात जास्त डॉक्टर विद्यार्थी पास झाले. भारत देशातील महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. हे कशामुळे घडते तर या राज्यात विद्वान शिक्षक असल्यामुळे हे घडत आहे. आणि अशा विद्वान शिक्षकांवर हकीम समितीने क्रुर पध्दतीने घाला घातलेला आहे. परंतु माननीय अर्थ मंत्री महोदयांनी तातडीने याची दखल घेतली आणि मिटिंग बोलावली.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे ....

त्यांनी आम्हाला आश्वासन दिले आहे. दिलेले आश्वासन ते पाळतील याबद्दल आमच्या मनामध्ये विश्वास आहे. त्यामध्ये काय चूक झालेली आहे हे मी सांगणार नाही. कारण सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील तसेच सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी त्याबाबत सांगितले आहे. 100-200 रुपयांचा फरक असता तर समजू शकलो असतो परंतु पे बँडमध्ये 2400-2400 रुपयांचा फरक हकीम समितीने केलेला आहे. शासनाने सांगितले आहे की, वाढीव खर्चाची तरतूद पुढच्या अधिवेशनामध्ये करावयाची आहे. माझी माननीय अर्थमंत्र्यांना विनंती आहे की, पुढील अधिवेशन येण्याच्या अगोदर ही जी चूक झालेली आहे ती दुरुस्त करावी.

सभापती महोदय, जे चांगले आहे त्याला चांगले म्हणण्याची मराठी माणसांची संस्कृती आहे. केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणावर कर्जमाफी दिली त्याचप्रमाणे राज्य सरकारने सुध्दा मोठ्या प्रमाणावर कर्जमाफी दिली. या राज्यातील जवळपास 40 लाख शेतकऱ्यांना दोन्ही सरकारांनी मिळून कर्ज माफीची योजना दिलेली आहे. त्यामुळे जे चांगले आहे त्याला चांगले म्हणावे. आपण सर्व शेतकऱ्यांची लेकरे आहोत. आपण सर्व भूमिपुत्र आहोत. शासनाने जे चांगले केलेले आहे त्याला चांगले म्हणण्याची आपली संस्कृती आहे. तत्कालीन पंतप्रधान कै. व्ही. पी. सिंग यांनी 10 हजार रुपयांची कर्जमाफी दिली होती. त्यानंतर या पुरोगामी राज्य सरकारने धाडसी निर्णय घेऊन 20 हजार रुपयांची कर्जमाफी देण्याचा निर्णय घेतला त्याबद्दल शासनाचे हार्दिक अभिनंदन करतो. त्याचबरोबर ज्या ज्या वेळी शेतकऱ्यांवर आपत्ती येते, संकट येते, पिकांवर रोगराई येते किंवा कमी-जास्त पाऊस पडतो त्यावेळी हे शासन शेतकऱ्यांना मदतीचा हात देते. या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उल्लेख केला की, रेणापूर तालुक्यामध्ये मदत दिली. तो आपल्या नेत्यांचा मतदारसंघ आहे. तो कोणाचा मतदारसंघ आहे हे आमच्या सरकारने पाहिले नाही. शासनाने सगळ्यांना मदत करण्याची भूमिका घेतली. त्यामध्ये कोणत्याही पध्दतीचे राजकारण केले नाही. सरकारने सातत्याने केवळ समाजकारण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्या ज्या ठिकाणी लष्करी अळीचा प्रादुर्भाव झाला किंवा सोयाबीनवर रोग पडला त्या त्या ठिकाणी शासनाने मदत केलेली आहे. जी 50 टक्के मदत राहिलेली आहे ती सुध्दा शासनाने दिली पाहिजे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

श्री. विक्रम काळे .....

सभापती महोदय, विदर्भाला वरदान ठरणारा मिहान प्रकल्प शासनाने हाती घेतलेला आहे. त्या ठिकाणी 35 ते 40 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आह. जवळपास दीड लाख लोकांना मिहान प्रकल्पामध्ये नोकऱ्या मिळणार आहेत. राज्याचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी दळणवळणाची साधने चांगली असली पाहिजेत तसेच विविध सोयीसुविधा असल्या पाहिजेत या दृष्टीकोनातून शासनाने चाकण, शिर्डी, सोलापूर येथे नवीन विमानतळ करण्याचा निर्णय घेतला आहे तसेच जळगाव, अमरावती येथील विमानतळांचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच बरोबर मराठवाडा प्रदेशामध्ये नांदेड, लातूर आणि औरंगाबाद या ठिकाणी सुध्दा विमान वाहतुकीची व्यवस्था शासनाने केलेली आहे. आज वीज निर्मितीच्या संदर्भात सगळीकडे बोलले जाते. वीज निर्मिती करणे हे काम जादूच्या कांडीसारखे नाही. जादूची कांडी फिरवली आणि वीज निर्मिती केली असा हा विषय नाही. त्यासाठी काही योजना आखाव्या लागतात, प्रकल्प उभे करावे लागतात. तत्कालीन ऊर्जा मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी बाणेदारपणा दाखवून नियोजन केले त्यामुळे आज थोडेफार बरे चालले आहे. परंतु यामध्ये आपल्याला पूर्णपणे यश आलेले आहे असे म्हणता येणार नाही. हे सर्व करण्यासाठी राज्य सरकारने सहवीजनिर्मिती हाती घेतली पाहिजे. राज्यामध्ये जे सहकारी साखर कारखाने आहेत त्या सर्वांना वीज निर्मिती करण्याचे बंधनकारक केले पाहिजे. असा निर्णय पुढच्या काळामध्ये घ्यावा लागणार आहे. अल्पसंख्यांक समाजाच्या बाबतीत राज्य सरकारने एक धोरणात्मक निर्णय घेतला. त्यांच्यासाठी एक स्वतंत्र मंत्रालय स्थापन केले आहे. खऱ्या अर्थाने या समाजाचा विकास करावयाचा असेल तर त्या समाजाला शिक्षण देण्याची गरज आहे. म्हणून सच्चर समितीने ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्या शासनाने अंमलात आणाव्यात अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे. मान्यताप्राप्त कायम विना अनुदानित संस्थेमध्ये व्यवसाय अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फीची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. भास्कर जाधव)

यानतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. बरवड 15:35

(श्री. विक्रम काळे....)

सभापती महोदय, व्यवसाय अभ्यासक्रमामध्ये बी.एड आणि डी.एड. अभ्यासक्रमाचा देखील समावेश होत असल्यामुळे या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फीची प्रतिपूर्ती देखील शासनाने केली पाहिजे. माननीय मंत्री महोदयांनी शेवटी खर्चाच्या नियोजनासंबंधी सांगितले. आज वेतनेतर अनुदानाचा प्रश्न आहे, कायम विनाअनुदानित शाळांचा प्रश्न आहे. मागील अधिवेशनामध्ये तत्कालीन शिक्षण मंत्र्यांनी आणि माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहामध्ये असे सांगितले होते की, आम्ही 8 दिवसामध्ये "कायम" हा शब्द काढून टाकू. परंतु 8 दिवस झाले आणि त्यानंतर तीन महिने झाले तरी याबाबतीत निर्णय झालेला नाही. चौकशी केल्यानंतर नस्ती माननीय अर्थमंत्र्यांकडे गेलेली आहे असे समजले. येणा-या अधिवेशनामध्ये नवीन तरतूद म्हणून ही बाब माननीय अर्थमंत्र्यांनी विचारात घेतली पाहिजे. "कायम" हा शब्द काढून सर्व शाळांना अनुदान द्यावे आणि वेतनेतर अनुदानाचा प्रश्न मार्गी लावावा अशी माझी त्यांना विनंती आहे. या ठिकाणी माननीय अर्थमंत्र्यांनी एक चांगला अंतरिम अर्थसंकल्प मांडल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2009-2010च्या अंतरिम अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. तसेच राज्यामध्ये कोणतीही करवाढ नसलेला, दलित, पददलित, शेतकरी इत्यादींना दिलासा देणारा असा अंतरिम अर्थसंकल्प माननीय वित्तमंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी या सभागृहामध्ये मांडला त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांसाठी या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये 2214.11कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यांच्या तुलनेत ही सर्वात मोठी तरतूद आहे. एवढेच नाही तर मागील 5 वर्षामध्ये या वर्गासाठी 12 हजार 920.91 कोटी इतकी तरतूद शासनाने उपलब्ध करुन दिलेली आहे. या भरीव तरतुदी बद्दल मी माननीय वित्तमंत्र्यांचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, गेल्यावेळी मी सभागृहामध्ये विशेष घटक योजनेसाठी केन्द्राने दिलेल्या निधीचा वापर होत नसल्यासंबंधीचा उल्लेख केला होता. राज्य शासनाकडून मॅचिंग ग्राण्ट उपलब्ध करुन दिली जात नसल्यामुळे या योजना राबविता येत नाहीत हे मला खेदाने सांगावेसे वाटते. मागासवर्गीयांच्या योजनांसाठी राखून ठेवलेला निधी हा त्या योजनांसाठी न वापरता दुसरीकडे वळविला जातो. महाराष्ट्र हे छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुरोगामी राज्य आहे असे आपण वारंवार सांगत असतो. असे असताना मागासवर्गीयांसाठी राखून ठेवलेला निधी अन्यत्र वळविणे योग्य नाही. म्हणून मी असे सांगितले होते की, "खबरदार ! मागासवर्गीयांसाठी राखून ठेवलेला निधी दुसरीकडे वळविलात तर"! यावेळी हा निधी दुसरीकडे गेलेला नाही, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, या शासनाने राज्याच्या विकासाच्या विविध योजना प्रभावीपणे राबविलेल्या आहेत. तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय यांच्या उन्नतीसाठी विविध विकास योजना राबवून या समाजाला न्याय दिलेला आहे.

सभापती महोदय, मुंबईवर दहशतवादी हल्ला झाल्यानंतर सुरक्षेसाठी शासनाने भरीव तरतूद केलेली आहे. मुंबई शहर आणि विशेषत कोकणाला 720 कि.मी.चा किनारा लाभला आहे. या किनारपट्टीच्या सुरक्षेच्यादृष्टीने देखील अर्थसंकल्पामध्ये चांगली तरतूद करण्यात आलेली आहे. मी एक गोष्ट या ठिकाणी नमूद करु इच्छितो की, जेव्हा या मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला

..3..

(श्री. सुभाष चव्हाण...)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यावेळी या राज्याच्या गृहमंत्र्यांनी आणि केन्द्रातील गृहमंत्र्यांनी राजीनामा दिला. पण जेव्हा संसदेवर हल्ला झाला होता त्यावेळी एका तरी मंत्र्यांने राजीनामा दिला होता काय ? जबाबदारी स्वीकारुन राजीनामा देण्याची नितिमत्ता काँग्रेसपक्षाकडेच आहे. ...(अडथळा)...

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण.....

या राज्यात लोकशाही आघाडीचे सरकार आहे. हे सरकार कोणत्याही प्रकारचा भेदभाव करीत नाही. आपण सर्व एकत्रितपणे काम करीत आहोत. या सरकारबद्दल कोणीही गैरसमज करुन घेऊ नये.

सभापती महोदय, गुजरात राज्यात अक्षरधाम येथे घटना घडली. त्या घटनेची जबाबदारी स्वीकारुन गुजरातचे मुख्यमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी राजीनामा द्यावयास पाहिजे होता. परंतु त्यांनी राजीनामा दिला नाही. मुंबई येथील दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी स्वीकारुन त्यावेळेचे माननीय मुख्यमंत्री आणि माननीय गृहमंत्री यांनी राजीनामे दिले ही वस्तुस्थिती कोणी नाकारु शकत नाही.

सभापती महोदय, जागतिक आर्थिक मंदीमुळे आपल्या अर्थसंकल्पावर परिणाम झालेला आहे. जागतिक आर्थिक मंदी सामान्य माणसाच्या लक्षात येत नाही. सर्वसामान्य माणसांना या जागतिक आर्थिक मंदीस तोंड देता यावे म्हणून पायाभूत सुविधा शासनाने निर्माण करुन दिल्या पाहिजेत. अन्नधान्य, पाटबंधारे, लहान लहान उद्योगधंदे, पाणी पुरवठा इत्यादी सोयी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. सर्वसमान्य माणसला अन्न,वस्त्र आणि निवारा या तीन गोष्टीची जास्त आवश्यकता असते. सर्वसामान्य माणसांना बेसीक गरजा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. राज्य सरकारने शेतक-यांसाठी 2000 कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पात केलेली आहे. त्यात कर्जमाफीसाठी केलेली तरतूद योग्य आहे. या तरतुदीचा लाभ नागरी बँकांच्या कर्जाच्या संकटात सापडलेल्या छोटया कर्ज धारकांनाही देण्याचा विचार राज्य शासनाने केला पाहिजे. रस्त्यावर लहान लहान काम करणारे कामगारांना देखील या योजनेचा लाभ दिला पाहिजे अशी माझी या निमित्ताने शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, विजेच्या भारनियमाबाबत विरोधी पक्ष सदस्यांकडून मोठया प्रमाणात टीका करतात. विजेच्या भारनियमातून मुक्त होण्यासाठी ऊर्जा क्षेत्रात महाराष्ट्र शासनाने भरीव कामगिरी केली आहे. एकूण 1700 मे.वॅ.क्षमतेच्या दोन ऊर्जा प्रकल्पांची उभारणी रत्नागिरी आणि ट्रॉम्बे येथे खाजगी गुंतवणुकदारांकडून केली आहे. महाराष्ट्रातील श्री.सुशीलकुमार शिंदे हे केंद्रीय ऊर्जामंत्री झाल्यामुळे सोलापूर जिल्हयात एन.टी.पी.सी.चा 1100 कोटी रुपयांचा 1320 मे.वॅ.क्षमतेचा सुपर थर्मल पॉवर प्रोजेक्ट होत आहे. आमच्या ऊर्जामंत्र्यांमुळे हा प्रोजेक्ट त्या ठिकाणी होत आहे. पूर्वीच्या काळात केंद्रीय मंत्रिमंडळात तुमच्या पक्षाचे दोन ऊर्जा मंत्री झाले होते. त्यात एक

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण....

ऊर्जामंत्री रत्नागिरीचे होते आणि दुसरे ऊर्जामंत्री सिंधुदूर्ग जिल्हयातील होते. त्यांनी या राज्यात किती प्रकल्प आणले याचा खुलासा विरोधी पक्ष सदस्यांनी सभागृहात करावा. सोलापूर जिल्हयात होणा-या सुपर थर्मल पॉवर प्रोजेक्टच्या कोनशिला समारंभास आमच्या नेत्या स्वत: माननीय श्रीमती सोनिया गांधी उपस्थित होत्या. आचारसंहिता लागण्याच्या चार दिवसापूर्वी हा समारंभ पार पडला आहे. या प्रकल्पाच्या कामासाठी माननीय केंद्रीय ऊर्जा मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी तीन महिन्यात हजारो एकर जमीन ताब्यात घेतली. ज्यांच्या जमिनी संपादित केल्या गेल्या त्यांना प्रत्येकी सहा लाख रुपये दिले. त्यात चार लाख रुपये रोखीने दिले आणि दोन लाख रुपये एन.टी.पी.सी.ने प्रकल्पग्रस्तांच्या नावाने फिक्स डिपॉझीटमध्ये ठेवले आहेत. नागपूर जिल्हयातील मौदा प्रकल्प राज्य शासनाने भारत सरकारकडून आणलेला आहे. आमच्या ऊर्जामंत्र्यांनी ही प्रकल्प त्या ठिकाणी आणलेला आहे. सोलापूर जिल्हयात चिंचोली येथे सहा हजार कोटी रुपयांचा विद्युत प्रोजेक्ट उभा राहिलेला आहे. या प्रकल्पातून केवळ वीज निर्मितीचे उद्दिष्ट न ठेवता सोलापूर पॉवर ट्रेनिंग इन्स्टीटयूटची स्थापना केलेली आहे. त्या प्रकल्पात स्थानिक प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच या प्रकल्पात ज्यांच्या जमिनी गेल्या त्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्यात आला आहे.

सभापती महोदय, शेतीसाठी शेतीपंपासाठी शासनाने या अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. मंगळवेढा येथे एक पायलट प्रोजेक्ट आणला आहे. त्या इंजिनची किंमत फक्त 25 हजार रुपये आहे. सदरहू इंजिन संपूर्ण राज्यात वाटण्यात येणार आहेत. तसेच त्यांचे वाटप देश पातळीवर देखील होणार आहे. विजेची बचत करुन शेतीला जास्तीत जास्त पाणी उपलब्ध करुन देणे, विजेचे बील कमी येणे या उद्देशाने या इंजिनचा वापर करण्याचे ठरविले आहे. आमच्या ऊर्जामंत्र्यांकडून असे विविध प्रोजेक्ट आणले जात आहेत. तुमचे देखील दोन ऊर्जा मंत्री झाले परंतु त्यांनी एकही विद्युत प्रकल्प आणला नाही याची आपण नोंद घेतली पाहिजे.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .....

सभापती महोदय, तीर्थक्षेत्राचा विकास करण्याबाबत माझी वित्त मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, कोकणातील सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी जिल्हयातील गणपतीपुळे, कुणकेश्वर, मार्लेश्वर, आंगणेवाडी या तीर्थक्षेत्रांचा देखील विकास आराखडयामध्ये समावेश करुन जलदगतीने विकास करणे आवश्यक आहे. या तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी लाखो भाविक, पर्यटक येत असतात. सिंधुदूर्ग जिल्हयातील धामापूर हे एक अतिशय निसर्गरम्य व सुंदर असे गाव असून तेथे एक तलाव आहे. या देशामध्ये असा सुंदर तलाव नाही. या तलावाला लाखो पर्यटक नियमितपणे भेट देत असतात. या क्षेत्राचा देखील विकास आराखड्यामध्ये समावेश करावा अशी मी वित्तमंत्र्यांना प्रत्यक्ष भेट घेऊन धामापूर तलावाच्या विकासासाठी अंदाजपत्रक सादर केले होते. या निमित्ताने मी पुन्हा विनंती करतो की, येणा-या जून-जुलैच्या अधिवेशनात पुरवणी अंदाजपत्रकामध्ये या क्षेत्राचा विकास आराखडयात समावेश करावा.

सभापती महोदय, राज्यातील अनेक विमानतळांचे नामकरण करण्यात आले आहे. नवनवीन विमानतळांची उभारणी केली जात आहे. अमरावती, पंढरपूर येथे विमानतळाची निर्मिती करण्यात आली आहे. ज्या भागातील नेते प्रभावी आहेत तेथे विमानतळाची उभारणी केली जाते. सिंधुदूर्ग जिल्हयात चिपी येथे विमानतळ व्हावे अशी 10 वर्षापूर्वी केलेली मागणी अद्याप पूर्ण झालेली नाही. चिपी येथे विमानतळ व्हावे म्हणून दहा वर्षे प्रयत्न करुनही अद्याप जमीन संपादन केली जात नाही. ज्यावेळी प्रकल्प उभा करण्याचा निर्णय होतो अशा वेळी तेथील स्थानिक नेत्यांनी मान्यता दिली पाहिजे. गिर्ये येथे 16 हजार कोटी रुपये खर्चाचा ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा निर्णय झाला. परंतु स्थानिक लोकांनी विरोध केल्यामुळे तो प्रकल्प देशात दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करण्यात आला. सिंधुदूर्ग जिल्हयातील प्रकल्पांना वेळेवर मान्यता दिली जात नाही, याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी नोंद घेतली पाहिजे.

सभापती महोदय, जिल्हा नियोजन विभागाबाबत मी बोलणार आहे. अर्थसंकल्पामध्ये सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेसाठी 2500 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. आमदारांचा स्थानिक विकास निधी आहे, त्याबाबतची सध्याची पध्दत अतिशय सदोष आहे. या पध्दतीमध्ये आमुलाग्र बदल केला पाहिजे अशी माझी सूचना आहे. आमदारांनी विकास कामासाठी निधी देण्याबाबतचे पत्र दिल्यानंतर सतत पाठपुरावा करावा लागतो. वारंवार जिल्हा नियोजन विभागात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .....

जावे लागते. असंख्यवेळा फोन करावे लागतात. जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांची वारंवार भेट घेऊनही दाद दिली जात नाही. कामाचे अंदाजपत्रक वेळेवर तयार केले जात नाही. त्या विभागातील क्लार्क, सिनियर क्लार्क, डेप्युटी इंजिनिअर, ज्युनिअर इंजिनिअर यांची सतत भेट घ्यावी लागते. त्यानंतरच टेंडर प्रक्रिया सुरु होते. तोपर्यंत कोणत्या ना कोणत्या निवडणुकीची आचारसंहिता लागू होते. परिणामी आमदारांचा स्थानिक विकास निधी व्यपगत होतो. यामुळे या पध्दतीमध्ये आमुलाग्र बदल करावा अशी माझी शासनाला सूचना आहे. जिल्हा नियोजन विभागास पत्र दिल्यानंतर 15 दिवसात कामाचे एस्टीमेट तयार झाले पाहिजे. शासनाची मान्यता मिळाली पाहिजे. यादृष्टीने शासनाने योग्य ती उपाययोजना करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, नैसर्गिक आपत्तीमध्ये शासन निर्णय घेत असताना निर्णय पध्दतीने आमुलाग्र बदल केले जातात. मध्यंतरी कोकणामध्ये आंबा पिकाचे नुकसान झाले. आगी लागणे, गारपीट होणे, पूर येणे अशा आपत्तीमध्ये संबंधित भागातील लोकप्रतिनिधींना या सार्वभौम सभागृहामध्ये बोलावे लागते. या सभागृहात बोलल्यानंतरच शासकीय यंत्रणेला जाग येते. याबाबत अशी पध्दत तयार करावी की, नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झाल्यानंतर ताबडतोब त्या त्या भागातील तलाठी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार यांनी तातडीने नुकसानग्रस्त गावांना भेटी दिल्या पाहिजेत. संबंधित माणसांपर्यंत पोहोचले पाहिजे. नुकसानीचा अंदाज घेतल्यानंतर तलाठी, तहसीलदार, उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून योजनेचा आराखडा शासनापर्यंत आला पाहिजे. सभागृहात आवाज उठविल्यानंतरच शासकीय यंत्रणेने हालचाल करायची असे न होता त्यात बदल केला पाहिजे, अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

नंतर श्री. खर्चे .....

अशुद्धीत प्रत / मुद्रणासाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या राज्याचे माननीय अर्थमंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी जो अंतरिम अर्थसंकल्प मांडला आहे, त्यासंदर्भात माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, मला कल्पना आहे की, माननीय वित्तमंत्र्यांची अडचण आहे ती म्हणजे आचारसंहिता असल्यामुळे त्यांची इच्छा असूनही काही योजनांवर त्यांना तरतूद करता आली नाही, अथवा वाढीव तरतूद ते करु शकले नाही किंवा काही योजना समाविष्ट करणे त्यांना शक्य झाले नाही. परंतु या निमित्ताने काही बाबींचा उल्लेख करणे तो यासाठी मी करणार आहे की, पुढील अधिवेशनात जो अर्थसंकल्प येईल, ज्या तरतुदी करण्यात येतील त्यात किमान या बाबींचा समावेश व्हावा अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भात सभागृहात आज सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख व अन्य सन्माननीय सदस्यांनी सुध्दा याबाबत आपले विचार व्यक्त केले आहेत. सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भात राज्यात श्री. हकीम यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती गठित करण्यात आली होती त्या समितीने दिलेल्या अहवालातील शिफारशींबाबत सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या भावनांशी व त्यांच्या मतांशी मी पूर्णत: सहमत आहे. त्यावेळेस जे धोरण घेण्यात आले त्यानुसार वेतन आयोगाबाबत खरोखरच या राज्यात ही समिती गठित करण्याची आवश्यकता होती काय हाच मुळात प्रश्न निर्माण होत आहे. 32 वर्षापूर्वी या राज्यात 54 वर्षांचा ऐतिहासिक संप झाला होता व त्याचे साक्षीदार सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख व अन्य सदस्य देखील आहेतच. अशा प्रकारे 54 दिवसांचा ऐतिहासिक लढा दिल्यानंतर राज्यात हे धोरणात्मक तत्व लागू झाले की यापुढे राज्यासाठी वेगळा आयोग असणार नाही तर कुठल्याही प्रकारची वेगळी समिती गठित करणार नाही तर केंद्राप्रमाणेच राज्य सरकारी कर्मचारी आणि इतर ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारे वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याची आवश्यकता असते त्यांना लागू करण्यात येतील. असे असताना सुध्दा या राज्यात सहाव्या वेतन आयोगाबाबत अशी समिती गठित करण्यात आली. या समितीने केलेल्या शिफारशी विशेषत: शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर अन्याय करणाऱ्या आहेत व त्यासंबंधीचे संपूर्ण विवेचन सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणातून केलेले आहे. हे खरोखरच अन्यायकारक आहे म्हणून त्यात सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. यामध्ये वाहतूक

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. रामनाथ मोते .....

भत्ता अथवा घरभाडे भत्त्याचा विषय तसेच महिला शिक्षक किंवा महिला कर्मचारी यांच्या रजांबाबतचा विषय अशा सर्व सुधारणा केंद्राप्रमाणे करण्याची गरज आहे. राज्यात सहावा वेतन आयोग लागू केल्यानंतर वातावरण जरी शांत वाटत असले तरी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये आजही प्रचंड संताप आहे. कारण त्यांच्यावर काही बंधने आहेत. शिक्षक वर्गाला आज समाज वेगळ्या पध्दतीने पाहतो. उद्या शिक्षकांनी आंदोलन केले तर कोणीही बोलू शकते की, तुम्ही शिक्षक सुध्दा आंदोलन करतात काय ? अशा प्रकारची भावना समाजात निर्माण होऊ शकते. परंतु याबाबत उद्या जर शासनाने याबाबत लक्ष घातले नाही, सहाव्या वेतन आयोगातील त्रुटी दूर केल्या नाहीत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवरील अन्याय दूर केला नाही तर मात्र या राज्यातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक हे सर्व रस्त्यावर आल्याशिवाय राहणार नाहीत. मग त्यावेळेस पुन्हा 54 दिवसांचे आंदोलन करावे लागणार की काय अशा प्रकारची भूमिका या राज्यातील शिक्षकांची आहे, याचा विचार शासनाने करावा माझी विनंती आहे.

त्यानंतर राज्यातील कायम विना अनुदानित शाळांच्या बाबतीत आम्हाला वाटले होते की, या शाळांना दिलासा मिळेल. कारण राज्यातील प्रत्येकाला प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण देण्याची जबाबदारी ही शासनाचीच आहे. परंतु शासनाचे हे विद्यादानाचे काम आमच्या शैक्षणिक संस्था करीत आहेत. आज राज्यातील 6000 पेक्षा जास्त शाळा कायम विना अनुदानित तत्वावर चालू आहेत. या कायम विना अनुदानित मधला "कायम" हा शब्द काढून तसा जी.आर. आठ दिवसात काढतो असे आश्वासन शासनाने दिले होते. आमचे म्हणणे असे आहे की, सध्या "कायम" हा शब्द काढून टाकावा. अनुदान मात्र 8-10-12 महिन्यांनी दिले तरी चालेल, परंतु आश्वासन देऊन सुध्दा शासनाने हा "कायम" हा शब्द काढला नाही. यासंदर्भात अनेक वेळा माननीय मंत्री महोदयांची भेट घेतली, वेगवेगळ्या चर्चा झाल्या पण अद्यापही त्याबाबत कुठलीच कार्यवाही झालेली नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

किमान "कायम" हा शब्द काढून टाकण्याच्या संदर्भात आपण जो आठ दिवसात जीआर काढणार होता तो जीआर सुध्दा आपण अद्यापपर्यंत काढू शकला नाहीत. याविषयाच्या संदर्भात अनेक आंदोलने झाली, अनेक भेटीगाठी झाल्या, चर्चा झाल्या, आश्वासने मिळाली परंतु अद्यापपर्यंत यासंदर्भात काहीही कार्यवाही झालेली नाही. कायम विना अनुदानितचा या राज्याला लागलेला जो कलंक आहे तो दूर होण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळण्यासाठी यासंदर्भातील निर्णय होण्याची आवश्यकता आहे. या राज्यातील संस्थाचालकांनी आंदोलने केली होती. आज ख-या अर्थाने वेतनेतर अनुदान मिळाले नाही तर ग्रामीण भागातील संस्था चालू शकणार नाहीत याची आम्हाला पूर्ण कल्पना आहे. या संस्था चालकांना वेतनेतर अनुदान देण्याचे शासनाने मान्य केले होते, यासंदर्भातील अहवाल शासनाकडे आलेला आहे. या विषयाच्या संदर्भात अर्थसंकल्पात काही तरी येईल असे आम्हाला वाटले होते परंतु तशा प्रकारची कोणतीही तरतूद या ठिकाणी करण्यात आलेली नाही. संस्था चालकांना, शाळांना सुध्दा काही प्रमाणात का होईना द्यावयास पाहिजे, वाटले तर यासंदर्भातील टक्केवारी तुम्ही ठरवा परंतु त्यांना वेतनेतर अनुदान दिल्याशिवाय या शाळा चालू शकणार नाहीत, या शाळा बंद पडतील. या शिक्षकांना शाळेच्या खर्चासाठी पैसे द्यावे लागतील की, काय अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे याचाही शासनाने गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. हकीम समितीने शिक्षकांच्या संदर्भात जो अहवाल दिलेला आहे तो अहवाल आमच्या शिक्षकांच्या दृष्टीने अन्यायकारक जरी असला तरी त्यांनी राज्य सरकारी कर्मचा-यांचा विचार केलेला आहे. या राज्यात हजारो शिक्षण सेवक काम करीत आहेत. गेल्या आठ वर्षापासून त्यांच्या मानधनात कोणत्याही प्रकारची वाढ झालेली नाही. हकीम समितीने सांगितले आहे की, हा विषय आमच्या अधिकार कक्षेत येत नाही. यासंदर्भात एक समिती गठीत झाली असून त्याचा अहवाल शासनाकडे आलेला आहे. गेल्या आठ वर्षापासून सर्वसामान्य कर्मचा-यांच्या पगारामध्ये 8 हजार रुपये, 6 हजार रुपये वाढ झालेली आहे परंतु या शिक्षण सेवकांच्या पगारामध्ये 3 हजार ते 3 हजार, 4 हजार ते 4 हजार, आमच्या उच्च माध्यमिक शाळेचा शिक्षक आज शासनाच्या शिपायापेक्षा कमी पगार घेतो आहे. आमचा शिक्षक 5 हजार रुपयावर 3-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

वर्षापासून काम करीत आहे. या शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याचा विषय सुध्दा आदरणीय वित्त मंत्रीमहोदयांनी विचारात घेण्याची आवश्यकता आहे. अल्पसंख्याक शाळेच्या बाबतीत या ठिकाणी विचार मांडण्यात आले आहेत. मी अनेक अल्पसंख्याक शाळांना भेटी दिलेल्या आहेत. परवा मी भिवंडी येथील अल्पसंख्याक शाळेला भेट दिली, उर्दू शाळेला भेट दिली त्यावेळेस त्यांनी सांगितले की, शासनाचे हे सर्व थोतांड आहे, अल्पसंख्याक शाळांची शासन फसवणूक करीत आहे. त्यांनी सांगितले की, आम्ही हजारो रुपये खर्च करुन आवेदन पत्र दिले, सगळी माहिती दिली परंतु तरी सुध्दा आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालेली नाही. शासन आमची फसवणूक करते की,काय अशा प्रकारची भावना अल्पसंख्याक शाळेमध्ये, अल्पसंख्याक शाळेच्या विद्यार्थ्यांच्या मनामध्ये, संस्था चालकांमध्ये निर्माण झालेली आहे. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना ख-या अर्थाने मदत करावयाची असेल तर ती भरीव स्वरुपात करण्याची नितांत गरज आहे. आमदार साहेब, तुमचे वेतन तुम्हाला मिळाले का? आम्हाला फेब्रुवारीच्या महिन्यापासून वेतन मिळालेले नाही यासंदर्भात काल संध्याकाळपासून 127 एसएमएस मला आलेले आहेत. सभापती महोदय, या महिन्याचा पगार तर सोडा परंतु फेब्रुवारी महिन्याचे वेतन जे मार्च महिन्यात मिळावयास पाहिजे होते ते वेतन सुध्दा अद्यापपर्यंत या शिक्षकांना मिळालेले नाही. शिक्षकांना एक तारखेला कधीही वेतन मिळत नाही. सन्माननीय तत्कालीन वित्त मंत्र्यांनी सभागृहात घोषणा केली होती की, या राज्यातील प्रत्येक शिक्षकाला एक तारखेला वेतन देण्याची हमी आम्ही तुम्हाला देतो आहे. परंतु तरी सुध्दा शिक्षकांना एक तारखेला कधीही वेतन मिळत नाही. शिक्षकांना कधी 1 तारखेला, 5 तारखेला, 10 तारखेला तर कधी 15 तारखेला वेतन मिळत असते. आज 18 तारीख आली तरी आमच्या शिक्षकांना फेब्रुवारी महिन्याचे वेतन मिळालेले नाही. शिक्षकांच्या वेतनातून बँकाचे हप्त्यांना, एलआयसीचे हप्त्यांना एक दिवस तरी उशीर झाला तरी त्या एक दिवसाचे व्याज आमच्या शिक्षकांना भरावे लागते असते आणि आज तर 18 दिवस होऊन गेले तरी आमच्या शिक्षकांना वेतन मिळालेले नाही त्यामुळे आमच्या शिक्षकांना 18 दिवसाचे व्याज भरावे लागणार आहे. आमच्या शिक्षकांना वेळेवर वेतन सुध्दा मिळू शकत नाही. त्यामुळे शिक्षकांच्या वेतनाच्या संदर्भात शासनाने दखल घेण्याची आवश्यकता आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

सभापती महोदय, शालेय पोषणाच्या आहाराच्या संदर्भात कपात करण्यात आलेली आहे. शालेय पोषण आहाराच्या संदर्भात विनाअनुदानित शाळा, कायम विना अनुदानित शाळेत गोरगरीब जनतेची मुले शिक्षण घेत असतात. यामध्ये वाढ होण्याची आवश्यकता आहे . मग ही शाळा विना अनुदानित आहे की, कायम विना अनुदानित शाळा आहे, त्या ठिकाणी जी गोरगरीब मुले शिक्षण घेतात त्यांना सुध्दा पोषण आहार मिळण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे यासंदर्भातही विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय,या राज्यातील अनुसूचित जाती-जमातीच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शुल्क परत करण्याची योजना शासन राबवित आहे. परंतु आज या राज्यातील माध्यमिक शाळेतील अनुसूचित जाती-जमातीचे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, जे विद्यार्थी विना अनुदानित शाळेत शिक्षण घेत आहेत, कायम विना अनुदानित शाळेत शिक्षण घेत आहेत ते विद्यार्थी मागासवर्गीय असूनही त्यांना ज्या पध्दतीने शासनाकडून प्रतीपूर्ती मिळावयास हवी ती प्रतीपूर्ती शासनाकडून मिळत नाही.

यानंतर श्री. भारवि...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

मुंबईमधील संस्था चालक श्री. प.म.राऊत व श्री.तांबे साहेब आमचे आहेत. त्यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फी प्रतीपुर्ती संदर्भात आंदोलने केली आहेत. राज्य शासनाला निवेदने दिली आहेत. भेटीगाठी घेतल्या आहेत. पण आमच्या या राज्य शासनाने कायम विनाअनुदानित, विनाअनुदानित शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे शुल्क भरपाई करण्यासंबंधी, त्याची प्रतिपूर्ती करण्यासंबंधी कोणताही निर्णय घेतलेला नाही. महाविद्यालयांसाठी फी स्ट्रक्चर ठरविण्यासाठी शासनाने समिती गठित केली आहे. असे अधिकार शाळांच्याबाबतीत पीटीएला आहेत. शिक्षण पालन संघाला आहे. शिक्षण पालन संघाने घेतलेला निर्णय शासन मानत नसेल तर शासनाने इन्फ्रास्ट्रक्चरची संपूर्ण तपासणी करून मग फी ठरवावी. फी ठरविण्याचे अधिकार पीटीएला दिलेले आहेत. त्यासंबंधी निर्णय देखील घेतलेला आहे. तेव्हा अनुसूचित जाती-जमातीचे जे विद्यार्थी आहेत त्यांना पीटीएने ठरविलेले शुल्क मिळाले पाहिजे. ते शासनाकडून मिळणे आवश्यक आहे. तेव्हा यासंबंधी शासनाने दखल घ्यावी अशाप्रकारची विनंती करतो. धन्यवाद.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव) : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आपण आरोग्य विभागावर चांगले मुद्दे मांडता. तेव्हा आपण आरोग्य विभागावरच मुद्दे मांडले तर अधिक बरे होईल. रिपीटेशन होणार नाही एवढे आपण बघावे. आपण चांगले मुद्दे मांडतात त्याबद्दल वाद नाही.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी रिपीटेशन करणार नाही. माननीय अर्थराज्यमंत्र्यांनी काल सभागृहामध्ये अंतरिम अर्थसंकल्प मांडला, त्यावर भाष्य करण्यासाठी मी उभा आहे.

या अर्थसंकल्पामध्ये जागतिक मंदीचा परिणाम अशा आशयाचा सात क्रमांकाचा मुद्दा आहे. त्यात असे नमूद करण्यात आले आहे की, सन 2007-2008 मध्ये आर्थिक विकासाचा दर 9 टक्के होता. सन 2008-2009 मध्ये आपण 7 टक्के वाढ अपेक्षिली आहे. आर्थिक मंदीचा आपण विचार केला तर आर्थिक मंदी ही सर्व देशांमध्ये आहे. जगाच्या पाठीवर प्रत्येक ठिकाणी आहे. त्याप्रमाणे प्रत्येक देशाने, राज्याने त्यावर आपली उपाययोजना सुरू केलेली आहे. मुंबई देशाचे आर्थिक केंद्र आहे. आर्थिक मंदीबाबत आपण काय करणार आहोत, ही रेप्लीका आपल्याला पहायला मिळत नाही. आज महाराष्ट्रातील मुले बेरोजगार झालीत तर त्यांच्यासाठी आपण काय करणार आहात ? आज अनेक बँका आपले कामकाजाचे तास कमी करत चालल्या आहेत. आठ वाजेपर्यंत बँक सुरू असेल तर ती आता 4 किंवा 5 वाजेपर्यंत उघडी ठेवतात. अशा प्रकारचे कटींग मेजर्स घेण्यात येत आहेत. त्यासंबंधी राज्य शासन काय करणार आहे ? यासंबंधी माननीय अर्थ मंत्री प्रकाश टाकावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

आपण अतिशय बेरकीपणाने सांगितले आहे की, सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीमुळे आर्थिक बोजा पडला असला तरी राज्याने विकास कामाच्या खर्चावर कपात केलेली नाही. यासाठी मी माननीय अर्थ मंत्र्यांचे कौतुक करतो. अतिशय बेरकेपणाने त्यांनी हे सांगितले आहे. आजपर्यंतची सर्व बजेटवरील भाषणे ऐकली आणि नंतर पाहिले तर सर्वांवर 40 ते 50 कट त्या त्या खात्याच्या प्रायोरिटीप्रमाणे लावण्यात आलेला आहे हे दिसून येईल. म्हणजे आपण धादांत खोटे सांगू शकता, असत्य सांगू शकता हा माझ्या समोर प्रश्न आहे. यावर्षी नसेल तर उत्तम आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत .....

सभापती महोदय, गेल्या चार वर्षातील त्या त्या वित्त मंत्र्यांचे भाषण पाहिले तर अतिशय निखालसपणे असत्य पेपरवर कसे आणतो त्याचा अतिशय उत्कृष्ट नमुना आहे. राज्यातील राष्ट्रीय, राज्य, जिल्हा मार्गाचे चौपदरीकरण असा मुद्दा आहे. माझ्याकडे सन 2008 मधील मंत्रिमहोदयांचे भाषण आहे. ते मी वाचून दाखवितो. "सद्य:स्थितीत 655 कि.मी.लांबीचे राष्ट्रीय महामार्ग चौपदरी असून 497 कि.मी. चौपदरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. 1127 कि.मी.लांबीचे चौपदरीकरण करणे प्रस्तावित आहे. यामुळे राज्यातील औरंगाबाद, वाशिम, धुळे, नागपूर, अमरावती ही शहरे चौपदरी रस्त्याने जोडली जातील. आज वित्तमंत्री काय म्हणत आहेत, "619 कि.मी.लांबीच्या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण पूर्ण करण्यात आले आहे व 717 कि.मी.चे चौपदरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच राज्यमार्गाचे चौपदरीकरण खाजगीकरणांतर्गत करण्यात येत असून त्याकरिता 6678 कोटी रूपये खाजगी गुंतवणूक व 1766 कोटी रूपये शासनाचा आर्थिक सहभाग राहणार आहे."

यानंतर श्री.गायकवाड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अगोदरच्या वर्षी 655 किलोमिटर्स रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे असा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये केला होता आणि या वर्षी 619 किलोमिटर्स लांबीच्या रस्त्याचे काम पूर्ण कण्यात आल्याचा उल्लेख करण्यात येत आहे. तेव्हा मागच्या वर्षी जे काम करण्यात आलेले आहे त्याच कामाचा पुन्हा उल्लेख करण्यात आलेला आहे की उर्वरित कामाचा उल्लेख केलेला आहे ?. मागच्या वर्षी केलेल्या कामाचीच पुन्हा या वर्षी पुनरावृत्ती करण्यात आलेली आहे काय अशा प्रकारचा संदेह मनामध्ये निर्माण होत असतो.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर कोकणामध्ये पंतप्रधान ग्राम सडक योजना शुन्य स्वरुपात आज अस्तित्वात आहे. गेल्या दोन वर्षात कोकणामध्ये पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत जे रस्ते तयार करण्यात आलेले आहेत त्यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला आहे. एका पावसाळयात हे रस्ते वाहून जातात. या रस्त्याच्या कामाकरिता केन्द्र सरकारकडून पैसे दिले जातात म्हणून त्या पैशाचा वापर कशाही पध्दतीने आपण करावयाचा काय ? या रस्त्याच्या कामामुळे अनेक कंत्राटदार श्रीमंत होतात परंतु सर्व सामान्य माणसाला त्याचा काहीही फायदा होत नाही. अनेक रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याचे मी माननीय मंत्री महोदयांना दाखवू शकेल. तेव्हा पंतप्रधान ग्राम सडक योजना कोकणामध्ये राबविण्यात येत आहे त्या कामाचा दर्जा कसा आहे आणि तो सुधारण्यासाठी काय केले पाहिजे या संबंधी शासनाने अधिक लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, या अर्थसकल्पामध्ये असे म्हटलेले आहे की, "मुंबई महानगर प्रदेशातील परिवहन व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासन, भारतीय रेल्वे व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी एकत्रितरित्या मुंबई नागरी परिवहन प्रकल्प सन 2002 पासून हाती घेतला आहे." त्या संदर्भात मला एक मुद्दा येथे मांडावयाचा आहे. या प्रकल्पाअंतर्गत 2005साली माननीय वित्त मंत्री श्री.जयंत पाटील यांनी अर्थसंकल्पामध्ये असे म्हटले होते की, " 2005 साली 53 हजार घरे बांधून तयार आहेत .तसेच पुढील पाच महिन्यात साडे तीन लक्ष घरे बांधणार आहोत. " या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये असे म्हटलेले आहे की, "या प्रकल्पाअंतर्गत आतापर्यत 17 हजार 800 प्रकल्पबाधित कुटुंबाचे पुनर्वसन करण्यात आले आहे. " तेव्हा बाकीची घरे कोठे गेली आहेत ? प्रकल्पबाधितासाठी 53 हजार घरे बांधून तयार होती तर बाकीची घरे कोठे गेली ? की

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रत्यक्षात ही घरे बांधण्यात आली नव्हती आणि आमचे समाधान करण्यासाठी कागदपत्रामध्ये ही माहिती दिली जात आहे काय ?

सभापती महोदय, मुंबईच्या उपनगरातील उड्डाण पुलांच्या सदर्भात या अर्थसंकल्पात उल्लेख करण्यात आला आहे. त्याबाबत मला येथे बोलावयाचे आहे. एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून 50 स्काय वॉक बांधण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे .त्यापैकी बांद्रा येथील पहिला स्काय वॉक बांधण्यात आला आहे . त्या पुलावरुन फार कमी लोक ये - जा करीत असतात . बरेचसे लोक मॉनिग वॉकसाठी या पुलाचा वापर करतात. मुंबईमध्ये ज्या ठिकाणी गरज नाही त्या ठिकाणी स्कायवॉक बांधण्यात येत आहे. त्यामुळे त्या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होते तसेच पादचाऱ्यांना जातांना व येतांना त्रास सहन करावा लागतो. एम.एम.आर.डी.ए.चे आयुक्त श्री. रत्नाकर गायकवाड हे प्रत्येक स्काय वॉकचे डिझाईन तयार करण्यासाठी दोन कोटी रुपये देतात .

सांताक्रुझ येथे एका स्काय वॉकचे काम सुरु असून त्याची किंमत 22 कोटी रुपये आहे. त्यापैकी 2 कोटी रुपये डिझाईनसाठी द्यावे लागणार आहेत आणि 20 कोटी रुपये स्काय वॉकच्या बांधकामासाठी द्यावे लागणार आहेत. शासनाकडे पैशाची कमतरता असतांना अशा प्रकारे पैसे खर्च न करता ते पैसे शेतक-यांना देण्यात यावे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. मुबईमध्ये आज मोठया प्रमाणावर वाहतूक वाढली आहे त्याचबरोबर नॅनो गाडी बाजारात आणली जाणार आहे मुंबईत वाहतुकीची समस्या असतांना आणखी नॅनो गाडी आणून या समस्येत भर पडणार आहे . स्काय वॉकच्या बाबतीत मी माननीय मुख्यमंत्र्यांना दीड महिन्यापूर्वी एक पत्र लिहिले होते त्या पत्राला एवढेच उत्तर देण्यात आले होते की, "आपले पत्र मिळाले." अशा प्रकारे एक ओळीचे उत्तर त्यांनी दिले होते. त्याचप्रमाणे आश्रमशाळांच्या संदर्भात मी एक पत्र दिले होते त्या पत्रालासुध्दा "आपले पत्र मिळाले " एवढे एका ओळीचे उत्तर पाठविण्यात आले होते अशा प्रकारचे जर शासनाची उदासिनता असेल तर ती बरोबर नाही. त्याचबरोबर स्काय वॉक बांधण्यात येऊ नये यासाठी काही लोक जर श्री. रत्नाकर गायकवाड यांना भेटण्यासाठी गेले तर त्या लोकांना श्री. रत्नाकर गायकवाड जेलमध्ये टाकतात .

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सध्या बाजारात मंदी आहे, आम्हाला या स्काय वॉकचा त्रास होत आहे, तसेच आमची गरज नसतांना तो बांधण्यात येत आहे असे सांगण्यासाठी काही व्यापारी गेले असतांना त्यांना दोन दोन दिवस जेलमध्ये टाकण्यात आले होते.

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

'पादचाऱ्यांची सोय की गैरसोय' या शीर्षकाखाली 'लोकसत्ता' या दैनिक वर्तमानपत्रामध्ये ही बातमी आलेली आहे. अशा प्रकारे 50 स्कायवॉक बांधले जाणार आहेत. विलेपार्ले पश्चिम येथे, अंधेरी इत्यादी उपनगरांमध्ये हे बांधले जाणार आहेत. खरोखरी त्याची इतकी गरज आहे का ? मुंबईच्या संपूर्ण उपनगरांमध्ये याबद्दल प्रचंड असंतोष आहे. कालच मुलुंड या विषयावरून 'बंद' केले होते. तेव्हा याबाबतीत तुमची आचार संहिता काय असेल वा नसेल, मला त्याची माहिती नाही. पण सामान्य नागरिक यामध्ये होरपळला जातो आहे हे आपण लक्षात घ्यावे. तसेच मुंबईत मेट्रो रेल्वे, मोनो रेल्वे हे प्रकल्प देखील होत आहेत. त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही.

त्यानंतर पाणीपुरवठ्या संबंधात मला सांगावयाचे आहे. या ठिकाणी आपण म्हटले आहे की, भारत निर्माण अंतर्गत 2005-06 ते 2007-08 पर्यंत 18750 गावे आणि वाड्यांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हाताळण्यात आला. 2008-09 मध्ये उर्वरित 19,877 गावांपैकी डिसेंबर 2008 अखेर पर्यंत 14203 गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यात आला आहे. सभापती महोदय, आज मुंबईपासून जवळ असलेल्या वाडा, मोखाडा इत्यादी भागामध्ये आपण जाऊन पहावे. तेथे लोकांना पाणी मिळत नाही. मेळघाटामध्ये वीज मिळत नाही, हातपंप बंद आहेत. नंदूरबार मध्ये देखील हीच परिस्थिती आहे. मुलांना पाणी न मिळाल्यामुळे त्या भागातील आश्रमशाळांतील मुले 8-8 दिवस आंघोळ करीत नाहीत, 10-10 दिवस कपडे धूत नाहीत. मुलींना आंघोळ करण्यासाठी नदीवर जावे लागते. सभापती महोदय, तेथे टँकरने पाणी पुरवठा होत नाही. आज राज्यामध्ये ही परिस्थिती असेल तर मग आपण आपल्या अर्थसंकल्पामध्ये कशासाठी लिहिता की, आम्ही अमुक अमुक केलेले आहे, 2008 मध्ये 14 हजार गावांना पाणी पुरवठा केलेला आहे.

(वेळ संपल्याची घंटी वाजविण्यात येते.)

सभापती महोदय, मला अजून थोडा वेळ पाहिजे, तेवढा आपण मला द्यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव) : तेवढाच केवळ आपल्याकडे कमी आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, कृपा करून माझ्यावर अन्याय करू नका. मी एकच महत्त्वाचा मुद्दा येथे मांडणार आहे. जीवनदायी आरोग्य योजने विषयी मला येथे माझा मुद्दा मांडावयाचा आहे. या योजनेविषयी माननीय अर्थमंत्री आपल्या भाषणात म्हणत आहेत की,

..... 3के 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सावंत ....

"...राज्यात दारिद्र्य रेषेखालील रूग्णांसाठी जीवनदायी आरोग्य योजना राबविली जाते. या योजनेच्या विस्तारीकरणामध्ये आता सर्व शाळकरी मुलांचा देखील समावेश करण्यात आला आहे. त्यात हृदयविकार, मूत्रपिंडाचे विकार, मेंदू व मज्जासंस्थांचे आजार यांचा समावेश होतो. शासनाने या योजनेतील वित्तीय मदत 50 हजार रूपयांवरून एक लाख पन्नास हजार रूपयांपर्यंत वाढविली आहे. तसेच कॅन्सर पीडित रूग्णांनाही या योजनेंतर्गत वित्तीय सहाय्य उपलब्ध केले आहे." सभापती महोदय, या योजनेतील वित्तीय मदत 50 हजार रूपयांवरून दीड लाख रूपयांपर्यंत वाढविली आहे ती 2008 मध्ये वाढविली आहे. आणि याचबाबतीत आपण 2005-06 मध्ये म्हटले आहे की, आपण 70 हजार रूपये यासाठी देणार होतो. 2006-ञ7 मध्ये देखील आपण हेच म्हटले होते. कॅन्सर रूग्णांसाठी आपण तेव्हा 70 हजार रूपये देण्याचे म्हटले होते. आताच्या आपल्या या परिच्छेदातील शेवटचे वाक्य मी आपणास वाचून दाखवितो. त्यात आपण म्हटले आहे की, कॅन्सर पीडित रूग्णांनाही या योजनेंतर्गत वित्तीय सहाय्य उपलब्ध केले आहे. सभापती महोदय, माझ्याकडे माननीय अर्थमंत्र्यांनी गेल्या 4 वर्षात केलेल्या सगळी अर्थसंकल्पीय भाषणे आहेत. वाटल्यास मी ती आपल्याकडे आपल्या अवलोकनासाठी पाठवून देतो. सभापती महोदय, आपण जीवनदायी योजनेतून गरीब जनतेची अशी फसवणूक का करीत आहात ? 2005-06 मध्ये तुम्ही म्हणता आहात की, आम्ही यासाठी 70 हजार रूपये वित्तीय सहाय्य देऊ आणि आता म्हणता आहात की, 50 हजार रूपयांवरून ही मदत दीड लाखावर नेत आहोत. मी हे अगदी आपल्याच भाषणांच्या प्रती पुराव्या दाखल आपल्याला दाखवू शकतो. सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियानाची देखील तीच गोष्ट आहे.

सभापती महोदय, सर्वशिक्षा अभियानाबाबत आपण काय म्हटलेले आहे ? याबाबतीत आपण आपल्या भाषणात सांगितले आहे की, "... हा कार्यक्रम सुरू झाल्यापासून आतापर्यंत 47,610 एवढ्या वर्गखोल्यांचे बांधकाम झाले आहे. 2007 मध्ये आपण म्हटले होते की, 26000 वर्गखोल्यांचे बांधकाम केले. त्यानंतर 2008 मध्ये 8500 वर्गखोल्यांचे बांधकाम केले आणि आता 2009 मध्ये म्हणत आहात की, 47 हजार खोल्यांचे बांधकाम केले आहे. वाटल्यास ही आकडेवारी देखील आपण तपासून पहावी. कृपा करून अशा प्रकारे लोकांना चुकीचे सांगू नका. हे प्रचाराचे भाषण नाही. हा या राज्याचा अंतरिम अर्थसंकल्प आहे, याला सँकटिटी आहे, या सभागृहाला देखील

.... 3के 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सँकटिटी आहे. तेव्हा अशा प्रकारे चुकीच्या बाबी यामध्ये किती आहेत हे आपणच तपासून पहावे. सभापती महोदय, आपण स्वत: एक अभ्यासू आहात. तेव्हा आपणही हे तपासून पहावयास हरकत नाही. मी यापुढे जाऊन आपल्याला सांगतो की, पुण्याच्या बी.जे.मेडिकल कॉलेजच्या बाबतीत आताच्या माननीय अर्थमंत्र्यांनी, जेव्हा वैद्यकीय शिक्षण विभाग त्यांच्याकडे होता तेव्हा त्यांनी काय म्हटले होते ते मी येथे सांगू इच्छितो. त्यावेळी म्हणजे 2008 मध्ये त्यांनी सांगितले होते की, पुण्यातील बी.जे.मेडिकल कॉलेज आणि ससून रूग्णालय यांना 33 कोटी रूपये देण्यात आले. ते पैसे कोठे गेले ? ही माहिती मिळविण्यासाठी मी श्री.तायडे साहेबांना पत्र लिहिले होते. या पैशातून तुम्ही काय काय घेतले म्हणून त्यांना विचारणा केली. पण आजतागायत त्याचे उत्तर मला आलेले नाही. त्याचे कारण काय ? त्यानंतर आपण म्हटले होते की, नागपूरला 16 कोटी रूपये दिले आहेत. इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय,नागपूरला जवळ जवळ अडीच कोटी रूपये दिले, औरंगाबादला 40 उकोटी दिले आणि आता तुम्ही म्हणता आहात की, बी.जे.मेडिकल कॉलेज,पुणे आणि ससून सर्वोपचार रूग्णालय,पुणे यांना 65 कोटी रूपयाची मान्यता दिली. ..

(यानंतर श्री. सरफरे .... 3एल 1 ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

म्हणजे ते 33 कोटी दिले आणि हे 65 कोटी दिले, म्हणजे 100 कोटी दिले? जर तसे नसेल तर मागील वर्षी दिले नव्हते काय? ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. सभापती महोदय, या अर्थसंकल्पामधील परिच्छेद मी आपणास वाचून दाखवितो "पुणे येथील बै.जी. वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्यासाठी अद्ययावत यंत्रसामग्री व बांधकामासाठी शासनाने 65 कोटी रुपयांच्या समग्र कार्यक्रमास मंजुरी दिली असून, त्यानुसार सन 2007-08 व सन 2008-09 या दोन्ही वर्षात संस्थेमध्ये विविध प्रकारची अत्याधुनिक यंत्रसामग्री खरेदी करण्यासाठी व बांधकामासाठी एकूण 52 कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सन 2009-10 च्या अंतरिम अर्थसंकल्पात या प्रयोजनार्थ रुपये 12.84 कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आहे". म्हणजे एके ठिकाणी 33 कोटी दुसऱ्या ठिकाणी 52 कोटी आणि आता सांगत आहात 65 कोटी हे कसे काय?

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, ज्यावेळी अर्थसंकल्प सादर केला जातो त्यावेळी तरतूद करण्यात येते. आणि त्यानंतर टाईम टू टाईम अधिवेशनामध्ये पूरक मागण्यांच्या माध्यमातून तरतूद करण्यात येते. मूळ अर्थसंकल्पामध्ये 33 कोटींची तरतूद करण्यात आली असली तरी पूरक मागण्यांव्दारे त्यामध्ये आणखी तरतूद करण्यात आली असेल आणि त्यामुळे ती 52 कोटीपर्यंत आली असेल. एकूण अर्थसंकल्पातील तरतुदीचा आकडा हा 62 कोटींचा आहे. याबाबत आकडेवारीसंबंधी या सभागृहामध्ये बातचित करता येणार नाही.

डॉ. दीपक सावंत : कां करता येणार नाही? या सभागृहाचे सभासद म्हणून आमचा हक्क आहे. आपण अशाप्रकारे काहीही सांगितले तर आम्ही ते मान्य करावयाचे काय? आपण पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केली असेल तर ती दाखवा. याबाबत मी आपणाकडे पत्र व्यवहार केला असतांना त्या पत्राचे उत्तर अजूनपर्यंत मला मिळाले नाही. ते कां मिळाले नाही? 2 वर्षामध्ये 50 कोटी रुपये औरंगाबाद येथील कॅन्सर हॉस्पिटलच्या स्थापनेसाठी दिले. अशाप्रकारे जर आकडेवारीमध्ये घोळ होणार असेल आणि आमच्या पत्राला उत्तर मिळणार नसेल आणि मी दिलेली आकडेवारी चुकीची असेल तर मी माफी मागून खाली बसतो.

तालिका सभापती : यावर्षीची तरतूद 10 कोटी आहे काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : 12 कोटी 84 लाख आहे. आपण कितीही कॅलकुलेशन करुन दाखविले तरी 65 कोटींचा आकडा येत नाही. ही सर्व कागदपत्रे मी आपणाकडे पाठवून देतो. सभापती महोदय, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत कुपोषणाचे प्रमाण गेल्या 3 वर्षामध्ये 11 टक्के तर गेल्या वर्षभरामध्ये 4.5 टक्के कमी झाल्याचे म्हटले आहे. हे प्रमाण इतके कमी होणे शक्य आहे काय? कुपोषणाचे प्रमाण 11 टक्क्यावरुन 4.5 टक्क्यावर येणे म्हणजे महाराष्ट्र राज्यामध्ये क्रांती झाली आहे असे मी म्हणेन.

तालिका सभापती : 11 टक्क्यावरुन 4.5 टक्क्यावर आले असे नाही तर 11 टक्क्यामध्ये 4.5 टक्के कमी झाले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, गेल्या वर्षभरामध्ये शासनाने काय दिले होते हे आपणास माहीत आहे. परंतु वेळेअभावी मी याठिकाणी सांगू शकत नाही. या गोष्टींवर माझे बारीक लक्ष असते हे आपणास माहीत आहे. आदिवासीकरिता असलेल्या अन्न पुरवठा योजनेमध्ये कोटयावधींचा घोटाळा झालेला आहे. याबाबत शनिवार, दि. 14 मार्च 2009 च्या दै. लोकमत मध्ये बातमी छापून आलेली आहे. त्या बातमीत आदिवासी अन्न पुरवठा योजनेमध्ये घोटाळा करणाऱ्यांमध्ये कोण कोण सामील आहेत यांची नावासहीत यादी दिली आहे. त्यांच्यावर अजून एफ.आय.आर. दाखल केलेला नाही. अशाप्रकारे आदिवासी अन्न पुरवठा योजनेमध्ये कोटयावधींचा घोटाळा झालेला असतांना त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक कां करण्यात आली नाही? याबाबत उच्च न्यायालयाने सहा आठवडयात कारवाई पूर्ण करुन आरोपींवर आरोपपत्र दाखल करण्याचे आदेश सी.बी.आय. ला दिले आहेत. एप्रिल 2008 ते 20 जुलै 2008 या कालावधीत या घोटाळयामध्ये कोण कोण सामील होते? त्यांनी कोण कोणत्या मालाचा पुरवठा केला, त्यांनी कशाप्रकारे घोटाळा केला, त्यांचा उद्देश काय होता? याची सर्व माहिती या बातमीमध्ये दिली आहे. तरी देखील त्यांच्यावर कारवाई कां केली जात नाही? याबाबत मंत्रिमहोदयांकडून खुलासा झाला पाहिजे. या प्रकरणी अजूनही एफ.आय.आर. दाखल करण्यात आलेला नाही ही वस्तुस्थिती आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याबाबतीत एफ.आय.आर.कधी दाखल करणार आहात ? तसेच जवळजवळ गेल्या तीन वर्षापासून आदिवासींना पुरविण्यात येणाऱ्या अन्न पुरवठा योजनेमध्ये घोटाळा होत आहे.

सभापती महोदय,यानंतर मी शेवटचा मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोतेसर यांनी अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या मुलांसाठी फी मिळाली नाही असा मुद्दा मांडला. मी देखील मागच्या वेळेस पुरवणी मागण्यांच्या वेळेस हा मुद्दा उपस्थित केला होता की, विकास हायस्कूलच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील मुलांच्या फी बाबत परतावा मिळावयास हवा होता. परंतु तो अजूनपर्यंत मिळालेला नाही. छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतले जाते आणि आम्ही मागासवर्गीयांना वैद्यकीय मदत करतो, त्यांच्या इंजिनिअरींगची फी देतो असे सांगतात, पण अजून पर्यंत त्या मुलांना शाळेच्या फी बाबत परतावा दिलेला नाही. यामध्ये पेरेंट टिचर्स असोसिएशन आणि त्यांचे भांडण आहे. वास्तविक पेरेंट टिचर्स असोसिएशनला हक्क दिलेला आहे की, तुम्ही फी ठरवावी आणि तशा प्रकारचा जी.आर.देखील काढण्यात आला आहे आणि मागील अधिवेशनापासून आम्ही या मुद्याबाबत ठाम आहोत. तेव्हा या मागासवर्गीय मुलांच्या फी चा परतावा कधी मिळणार आहे? ही रक्कम फार मोठी नाही. प्रत्येक शाळेची जवळजवळ 7 ते 8 लाख रुपये म्हणजे 10 लाखाच्या आतील रक्कम आहे. तेव्हा कृपा करुन बजेटच्या संदर्भातील माननीय वित्त मंत्र्यांच्या भाषणामध्ये याचा उल्लेख करण्यात यावा आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा. तेवढे मिळाले तरी खूप झाले. एवढेच मी सांगू इच्छितो. धन्यवाद.

. . . .3 एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, याठिकाणी अर्थसंकल्पिय अंदाज 2009-2010 या पुस्तकातील काही मुद्यांच्या संदर्भात मी माझे विचार मांडत आहे आणि तसे करीत असताना मुद्यांची पुनरावृत्ती होणार नाही याची मी दक्षता घेईन.

सभापती महोदय, याठिकाणी केंद्रीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सहावा वेतन आयोग राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांना आणि खाजगी संस्थांमधील सर्व शिक्षक-कर्मचाऱ्यांना जसाच्यातसा लागू करावा याबाबतीत अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडलेले आहेत. तसेच याठिकाणी यासंदर्भात सदनामध्ये काही कॉमेंन्टस् सुध्दा झालेल्या आहेत. या सदनातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य या गोष्टीला साक्षी आहोत की, 1977 मध्ये 54 दिवसांचा संप झाला, त्यावेळी जवळजवळ 11 लाख कर्मचारी संपावर गेले होते आणि महाराष्ट्रातील सर्व कारभार कोलमडून पडला आणि शेवटी स्व.वसंतदादा पाटील यांचे सरकार बरखास्त झाले आणि माननीय नामदार श्री.शरदचंद्रजी पवार यांचे सरकार सत्तेवर आले. त्यावेळी त्यांनी ही गोष्ट मान्य केली की, ज्या-ज्यावेळेस केंद्रीय कर्मचाऱ्यांना काही लाभ दिला जाईल, तेव्हा तो जसाच्या तसा आम्ही राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना देऊ. त्यावेळेस आम्ही अनेक शिक्षक, अनेक कर्मचारी आणि मी सुध्दा 15 दिवस जेलमध्ये होतो. तेव्हापासून राज्य शासनाने यासंदर्भातील सूत्र मान्य केले. पाचवा वेतन आयोग आला, तेव्हा युती शासनाने असे धोरण स्विकारले की, आम्ही पाचवा वेतन आयोग जसाच्यातसा देणार नाही. त्यावेळेस अनेक मान्यवर मंत्री महोदयांनी वक्तव्य केले की, जर पाचवा वेतन आयोग जसाच्यातसा दिला तर हे मंत्रालय पगार देणारी संस्था ठरेल. पण शेवटी बाहेरचा रेटा आणि सभागृहात उपस्थित होणाऱ्या प्रश्नांच्या माध्यमातून आम्ही सर्व सन्माननीय सदस्यांनी रेटा लावल्यामुळे युती शासनाने देखील पाचवा वेतन आयोग जसाच्यातसा लागू केला. आता जेव्हा सहाव्या वेतन आयोगाचा प्रश्न आला आहे, परंतु ज्या शासनाने 1977 पासून आतापर्यंत दिले, तेच आज असे सांगत आहेत की, आम्ही सहावा वेतन आयोग जसाच्यातसा देणार नाही. म्हणून सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भात काही त्रुटी राहिलेल्या आहेत आणि महत्वाची त्रुटी म्हणजे जसाच्या तसा घरभाडे भत्ता अजून दिलेला नाही. जो पूर्वीचा रेट होता, त्याप्रमाणे दिलेला आहे. परंतु केंद्र शासनाने त्यांच्या कर्मचाऱ्यांना जो घरभाडे भत्ता दिलेला आहे, त्याप्रमाणे राज्य शासनाने दिलेला नाही. तसेच केंद्र शासनाने त्यांच्या कर्मचाऱ्यांना जो वाहन भत्ता दिलेला आहे, त्याप्रमाणे देखील दिलेला नाही आणि विशेष म्हणजे जवळजवळ 18 हजार कोटी रुपयांची थकबाकी आहे. ही पाच

. . . .3 एम-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

टप्प्यामध्ये देण्याचे राज्य शासनाने मान्य केलेले आहे. केंद्र शासनाने 40 टक्के आणि 60 टक्के अशी दोन टप्प्यामध्ये याची विभागणी केलेली आहे. त्याप्रमाणे केंद्र शासनाने 40 टक्के थकबाकी दिलेली आहे आणि 60 टक्के मिळावयाचे आहेत. तेव्हा राज्य शासन ही थकबाकी पाच टप्प्यामध्ये देणार आहे, त्याऐवजी केंद्र शासनाप्रमाणेच दोन टप्प्यामध्ये थकबाकी देण्यात यावी. दि.25 व 26 फेब्रुवारी 2009 रोजी सर्व मंत्रालय ठप्प झाले. या राज्यातील अनेक लोकांची कामे अडकली आणि हे कशामुळे घडले ? तर शासनाच्या उदासिनतेच्या धोरणामुळे झाले. त्यावेळच्या माननीय तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी मान्य केले होते. ज्यावेळी केंद्र शासनाने यासंबंधात घोषणा केल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी पत्रकार परिषद घेऊन सांगितले की,आम्ही याबाबतीत समृध्द आहोत. महाराष्ट्र शासन सहावा वेतन आयोग जसाच्या तसा देईल.पण आज मात्र ते नडलेले आहेत, मागे आलेले आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यू. व्ही. डायगव्हाणे ....

म्हणून 6 वा वेतन आयोग जसाच्या तसा लागू करावा अशी मी मागणी करतो. यासाठी जवळ जवळ 1700 ते 1800 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे आणि याची अंमलबजावणी प्रत्यक्षात दि.1 एप्रिल,2009 पासून करण्यात येणार आहे. शासनाने याबाबतची घोषणा केली नाही तर हे लक्षात ठेवावे की, हे अधिवेशन संपल्यानंतर आम्ही निश्चितपणे स्वस्थ बसणार नाही. कर्मचारीसुध्दा स्वस्थ बसणार नाहीत आणि शासनाला 6 वा वेतन आयोग जसाच्या तसा लागू करावा लागेल.

वेतनेत्तर अनुदानाचा महत्वाचा मुद्दा आहे. राज्य शासनाने सन 2004 पासून वेतनेत्तर अनुदान बंद केले आहे. सन 2004 पूर्वीचे वेतनेत्तर अनुदान काही संस्थाना अजूनही मिळालेले नाही. ती फार मोठी रक्कम नाही. सन 2004 पूर्वीचे जवळ जवळ 30 कोटी रुपये देणे बाकी आहे. मागच्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी मान्य केले होते की,प्रथम आम्ही सन 2004 पूर्वीचे वेतनेत्तर अनुदान देऊ नंतर 2004 पासूनचे वेतनेत्तर अनुदान देऊ. हिवाळी अधिवेशनामध्ये माननीय मंत्रिमहोदय, श्री. पतंगराव कदम यांनी चार-पाच वेळा सांगितले की, आठ दिवसात आम्ही याबाबतचा निर्णय घेऊ. मी शिक्षण मंत्री म्हणून दोन महिने निश्चित राहणार आहे आणि दोन महिन्याच्या आत हा निर्णय घेण्यात येईल. त्यानंतर त्याचे खाते बदलले नवीन शिक्षण मंत्री विराजमान झाले परंतु वेतनेत्तर अनुदानाच प्रश्न तसाच शिल्लक आहे. या अनुदानाशिवाय ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील शाळा चालूच शकत नाहीत. आज पाच वर्षापासून त्यांना अनुदान दिलेले नाही. अध्यक्ष महोदय, सन 2004 पासूनचे 350 ते 400 कोटी रुपये देणे बाकी आहे. आणि सन 2004 पूर्वीचे सुध्दा देणे बाकी आहे. तेव्हा सन 2004 पूर्वीचे आणि सन 2004 पासूनचे देणे देण्याबाबतचे कमिटमेन्ट करण्यात यावे. इंजिनियरींग आणि मेडिकल कॉलेजेस आपण चालवू शकला, इंग्रजी माध्यमाच्या शाळाही आपण चालवू शकाल पण अनुदानित शाळा चालू शकणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

शिक्षकांच्या पाल्यांना पोस्ट ग्रॅज्युएटपर्यंत नी-शुल्क शिक्षण देण्याची योजना युती शासनाने 1996 पासून सुरु केली. या योजनेचे आज जवळ जवळ 8 ते 9 कोटी रुपये थकित आहेत. यावर्षी यासाठी 1 कोटी 48 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. दर वर्षी वाटाण्याच्या अक्षतासारखी एक कोटी, सव्वा कोटी रुपयांची तरतूद करण्यात येते. त्यामुळे मागच्या चार-पाच वर्षापासूनचे जवळ जवळ 8 ते 9 कोटी रुपये थकित आहेत. काही मुले इंजिनियर होऊन बाहेर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यू.व्ही. डायगव्हाणे. . . .

पडलेले आहेत. काही मुले डॉक्टर होऊन बाहेर पडलेले आहेत. पण त्यांची नी-शुल्कची फी अजूनही परतफेड झालेली नाही. म्हणून याबाबतची तरतूद तातडीने करण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

सन्माननीय सदस्य श्री. मोते यांनी मघाशी जे सांगितले ते खरे आहे. हे शासन केलेल्या कामाचाच मोबदला देऊ शकत नाही. माझ्याकडे संपूर्ण महाराष्ट्राची माहिती नाही पण विदर्भातील बुलढाणा, यवतमाळ आणि चंद्रपूर या तीन जिल्हयामध्ये आज मार्च महिन्याची 18 तारीख आहे तरी फेब्रुवारी महिन्याचा पगार मिळालेला नाही. केलेल्या कामाचा मोबदला 1 तारखेला दिला पाहिजे असे कमिटमेंट आहे, जी.आर.आहे. जो अधिकारी याचे पालन करणार नाही त्याच्यावर ॲक्शन घेऊ असे सर्क्युलर हिवाळी अधिवेशनात काढण्यात आलेले आहे. याबाबतीत काय ॲक्शन घेणार? फेब्रुवारी महिन्याचे वेतन एक-दोन दिवसात देण्याची व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. (अडथळा) यामध्ये आचारसंहितेचे कारण नाही. खरे म्हणजे पगार न देणे किंवा उशिरा देणे हा आचारसंहितेचा भंग आहे. तेव्हा फेब्रुवारी महिन्याच्या पगाराची व्यवस्था तातडीने करण्यात यावी.

सभापती महोदय, पान क्रमांक 23 वर शिष्यवृत्तीच्या संदर्भात 4 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आदिवासी, एस.सी.,एस.टी.,एन.टी.च्या विद्यार्थ्यांच्या संदर्भातील हा मुद्दा आहे. ही मुले इयत्ता दहावी आणि इयत्ता बारावी पास होऊन बाहेर जातात. अनेक शाळांचे असे प्रश्न आहेत की, खोटया सहया करुन मुख्याध्यापक हे पैसे उचलतात. मागच्याकाळात दोन वेळा सभागृहात हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. काही मुख्याध्यापकांवर ॲक्शन घेण्यात आलेली आहे.म्हणून याबाबतची दक्षता घेण्यात यावी. हा निधी तातडीने वितरीत होत नाही हा यातील महत्वाचा मुद्दा आहे. केवळ तरतूद करण्यात येऊन ती कागदावर येते पण त्या रक्कमचे वितरण जिल्हयामध्ये करण्यात येत नाही. म्हणून जिल्हयामध्ये या निधीचे वितरण केले पाहिजे. या निधीचे वितरण करण्यासाठी किती दिवस पाहिजेत?

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंदी

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे .....

शिष्यवृत्तीचा हा प्रश्न फार मोठा नाही. शासनाने तरतूद केलेली आहे परंतु त्याचे वितरण तातडीने होत नाही. कायम विनाअनुदानित शाळांच्या संदर्भात बाहेर मोठा संघर्ष पेटलेला आहे आणि पुढेही पेटणार आहे. निवडणुकीमध्ये याबाबतीत काय दिसावयाचे ते दिसेल. परंतु आपण कायम विनाअनुदानित तत्वावरील शाळेतील लोकांच्या जीवनाशी खेळू नका. दहा-पंधरा वर्षे होऊन गेली तरी त्यांना पैसे दिलेले नाहीत. आपण 100 रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर लिहून घेतले की त्यांचा पगार मॅनेजमेंट देईल परंतु मॅनेजमेंट त्यांचा पगार देत नाही. उलट त्यांच्याकडूनच घेतात. कायम विनाअनुदानित शाळांचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. तो प्रश्न तातडीने सोडविण्याचा प्रयत्न शासनाने करावा. आदिवासी विभागाच्या संदर्भात हाच प्रश्न आहे. संस्था चालक परिरक्षणाचे म्हणजे जेवणाचे जे पैसे असतात ते सुध्दा खातात. विद्यार्थ्यांच्या जेवणासाठी, त्यांच्या कपड्यांसाठी, त्यांच्या कल्याणासाठी जो निधी येतो त्यातील 50 टक्के निधीचा अपव्यय होतो. या ठिकाणी आदिवासी विकास मंत्री अनेक वेळा फार गोड बोलतात परंतु कृती करत नाहीत. ते ॲक्शन घेऊ असे सांगतात पण ॲक्शन घेत नाहीत. मी शालेय शिक्षण विभागाच्या बाबतीत सांगितले परंतु आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षकांना डिसेंबर महिन्यापासून वेतन मिळालेले नाही. याबाबत मंत्रिमहोदयांनी चौकशी करावी. त्यांना डिसेंबर महिन्यापासून पगार मिळालेला नाही. आपण आता पुढच्या काळासाठी तरतूद केलेली आहे परंतु त्यांच्या पगाराची तातडीने व्यवस्था करावी अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, शालेय पोषण आहाराच्या बाबतीत फज्जा उडालेला आहे. केंद्राचा निधी घेऊन मजा करण्याचे काम चालू आहे. याबाबत केंद्राचा अहवाल आहे. शालेय पोषण आहाराच्या 40 टक्के निधीचा अपव्यय होतो असे मी म्हणत नाही तर यासंदर्भात पार्लमेंटमध्ये जी चर्चा झाली त्यामध्ये याचा उल्लेख आलेला आहे. शिक्षकांचे मानधन वेळेवर मिळत नाही. अन्न शिजविण्यासाठी जो निधी द्यावा लागतो तो दरमहा नियमितपणे दिला पाहिजे, ॲडव्हान्स दिला पाहिजे अशी तरतूद आहे. त्याप्रमाणे निधी दिला जावा अशी मी विनंती करतो. नगरपरिषदा आणि नगरपालिकांच्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात महत्वाचा प्रश्न आहे. त्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळत नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे ....

राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळते परंतु नगरपरिषदा आणि नगरपालिकांच्या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची योजना लागू नाही. त्यासंदर्भातही शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो. प्राथमिक शिक्षक आणि माध्यमिक शिक्षकांच्या संदर्भात पे बँड आणि ग्रेड पे च्या बाबतीत जी तफावत ठेवलेली आहे ती दूर करावी तसेच सहावा वेतन आयोग जशाच्यातसा या ठिकाणी लागू करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहात सादर झालेल्या अंतरिम अर्थसंकल्पावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, तपशिलातील मुद्दे कोणते आहेत ते या ठिकाणी दोन्ही बाजूने मांडले जात आहेत. हा अंतरिम अर्थसंकल्प पाहात असताना आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, कोणत्याही शासनाची ऑनेस्टी, इंटेग्रिटी आणि कमिटमेंट यामध्ये प्रतीत होते की नाही याचा आपण विचार केला तर निश्चितपणे त्याची प्रचिती यातून येते असे मला वाटते. अतिशय कमी कालावधीसाठीची ही तरतूद असली तरी येणाऱ्या भविष्य काळातील धोक्याची सूचना देण्याचे प्रावधान यामध्ये झालेले आहे की नाही हे बघण्याची सुध्दा आवश्यकता आहे. ते बघत असताना आर्थिक मंदीचा उल्लेख आणि त्यासंबंधीची उपाययोजना याबाबतच्या धोक्याची सूचना या अंतरिम अर्थसंकल्पात केलेली आहे याचीही आपल्याला निश्चितपणे नोंद घेतली पाहिजे आणि त्याबद्दल शासनाचे अभिनंदन केले पाहिजे. कोणत्याही शासनाचे मग ते शासन इकडच्या बाजूच्या पक्षाचे असो किंवा तिकडच्या बाजूच्या पक्षाचे असो, उपेक्षितांच्या जीवनाचा स्तर उंचावणे आणि मानव विकास निर्देशांकात वाढ होणे हे सर्वसाधारण तत्व म्हणून जरी आपण ठरविले तरी त्याचा अविष्कार यामध्ये होतो की नाही हे पाहण्याची आवश्यकता असते.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि तो यामध्ये होत आहे हे बघून त्याबद्दल आपल्याला निश्चितच धन्यवाद दिले पाहिजेत. काही महत्वाचे प्रश्न यामध्ये उपस्थित झालेले आहेत. त्यामध्ये 6व्या वेतन आयोगाचा प्रश्न आहे. शेतक-यांच्या कर्जमाफीचा आणि त्याच्या अंमलबजावणीचा प्रश्न आहे. वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण होणा-या प्रश्नांचा त्यामध्ये समावेश आहे. शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत गरजांचा विचार यामध्ये आहे किंवा नाही हेही तपासून बघितले पाहिजे. हे करीत असताना एकीकडी आपण तरतुदींचा आकडा जेव्हा वाचत असतो त्यावेळी या तरतुदी या गरजांची पूर्तता करण्यासाठी पुरेशा असल्या तरी सुध्दा गुणात्मकदृष्टया त्यांचा योग्य पध्दतीने वापर केला जातोय किंवा नाही हे तपासणारी यंत्रणा उभारण्यासाठी कोणत्याही आचारसंहितेची अडचण येऊ शकेल असे मला वाटत नाही. शिक्षण विषयक गरजा वाढत असताना काल वर्तमानपत्रातील "खाजगी शाळांकडे ओघ वाढतो आहे आणि सरकारी शाळा ओस पडायला लागल्या आहेत" अशी एक बातमी माझ्या वाचनात आली. वेतनावर एवढा खर्च करीत असताना हा ओघ खाजगी शाळांकडे का जातोय या समस्येकडेही लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, नागरिकांची संपूर्ण सुरक्षा आणि आरोग्य सांभाळणे ही शासनाची जबाबदारी आहे. एका बालकाच्या झालेल्या चोरी प्रकरणी हायकोर्टाने मुंबई महापालिकेवर ताशेरे ओढले होते. त्याबाबतीत मुंबई महानगरपालिकेने असे उत्तर सादर केलेले आहे की, ज्याचे त्याचे मूल सांभाळण्याची जबाबदारी ज्याची त्याची आहे. अशा त-हेने आपण जर सामान्य माणसांच्या प्रश्नाकडे बघणार असू तर मग आपल्या संवेदना हरवून गेलेल्या आहेत काय, याचा देखील विचार आपण केला पाहिजे. हे करण्यासाठी कोणत्याही निवडणुकीच्या आचारसंहितेची अडचण न येता त्या गोष्टी या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये अजूनही समाविष्ट करता येतील असे मला वाटते. कोणेतेही शासन काम करीत असताना दोन प्रकारच्या आर्थिक आघाडयावर विचार करीत असते आणि त्यामध्ये स्थूल मानाने करेक्टिव्ह मेझर्स आणि प्रिव्हेण्टिव्ह मेझर्स या गोष्टी असतात. जे धडू नये असे आपल्याला वाटते त्याबद्दल प्रिव्हेण्टिव्ह मेझर्सला अधिक प्राधान्य देऊन त्यासाठी अधिक तरतूद अर्थसंकल्पामध्ये केली तर ते अधिक उपयुक्त ठरु शकेल. गारपीट, जास्त पाऊस, अवर्षण दुष्काळ, तीव्र पाणी टंचाई यासारख्या नैसर्गिक आपत्तीवर उपाययोजना करण्यासाठी भरीव तरतूद करावी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. हेमंत टकले...)

अशा प्रकारची सूचना मला या निमित्ताने करावीशी वाटते. आपण एकूणच विचार करीत असताना आपल्या राज्याचा इतिहास काय आहे, परंपरा काय आहे, भूगोल काय आहे, भविष्यात राज्य कसे असावे या तीन गोष्टींचा विचार केला तर ज्या अनेक बाबींचा उल्लेख मग तो संत गाडगेबाबा महाराजांच्या संदर्भात असो, शेगावच्या गजानन महाराजांच्या संदर्भात असो किंवा काही जी तीर्थक्षेत्रे राहिलीत त्याबाबतीत असो, या गोष्टींचा आपण प्रामुख्याने विचार केला पाहिजे. त्याच बरोबर पर्यावरण, ग्लोबल वॉर्मिंग या सारख्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी अंतरिम अर्थसंकल्पामध्ये काही तरतूद करणे शक्य असल्यास ती करावी किंवा निवडणूक आयोगाची परवानगी घेऊन तरतूद करता येत असेल तर त्यादृष्टीने पावले टाकावीत. या सगळया शैक्षणिक आणि बदलत्या परिस्थितीमध्ये आपण आरोग्याचा जितका विचार करतो तितकाच सामाजिक स्वास्थ्याचा देखील विचार केला गेला पाहिजे आणि त्याकरिता आपल्या राज्यात नैतिक शिक्षणासाठी काही करता येईल का याचा प्रामुख्याने विचार करायला पाहिजे, ही संकल्पना आपल्याला राबविता येईल का याचाही विचार माननीय अर्थमंत्र्यांनी करावा अशी मला या निमित्ताने सूचना करावीशी वाटते. ज्याप्रमाणे आपण येथे एकत्रितपणे विचारांना दिशा देण्याचे काम करतो त्याप्रमाणे ज्यांच्याकडे व्यवस्थापक म्हणून आपल्याला बघता येईल ती यंत्रणा योग्य पध्दतीने काम करीत आहे किंवा नाही, त्यांना आपण योग्य दिशा दिलेली आहे किंवा नाही आणि ती सुध्दा आपण येथे बसलेले सत्ताधारी किंवा विरोधी पक्षातील आपण सगळे जण कोणत्याही व्यवस्थेचे मालक नसून विश्वस्थ आहोत या भावनेतून याकडे बघितले तर हा प्रश्न आपल्याला मार्गी लावायला अधिक मदत होईल असे मला वाटते.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. हेमंत टकले...

राज्य सुरक्षित रहावे, सुशिक्षित व्हावे, सशक्त व्हावे आणि सुसंस्कृत व्हावे अशा पध्दतीची रचना अर्थसंकल्पातून मांडता आली तर ती राज्याच्या दृष्टीने अधिक लाभदायी ठरेल असे मला वाटते. या सगळया योजनांचा विचार करताना शेवटच्या माणसापर्यंत मिळाला पाहिजे. मग ती योजना कर्जमाफीची असो, गारपिटीच्या नुकसानीच्या मोबदल्याची मदत असो, या सर्व गोष्टी वेळेवर दिल्या गेल्या पाहिजेत. परंतु त्या योजनांचा लाभ वेळेत पोहोचत नाही. न्यायाच्या बाबतीत असे म्हटले जाते की, "Justice delayed is justice denied" अशा पध्दतीच्या योजना शेवटच्या माणसापर्यंत कशा जातील यादृष्टीने अधिक कार्यक्षमपणे या सगळया यंत्रणा तयार करण्यासाठी आणखी काही उपाययोजना करता येतील काय या गोष्टीचा विचार अंतरिम अर्थसंकल्पाच्या चर्चेमध्ये केला पाहिजे असे मला वाटते. मी जे काही मुद्दे उपस्थित केले, त्यांचा माननीय वित्तमंत्री निश्चितपणे विचार करतील अशी आशा बाळगतो आणि माननीय सभापती महोदयांनी चर्चेत भाग घेण्याची संधी दिली त्याबद्दल आभार व्यक्त करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. हेमंत टकले जी ने अपने भाषण के दौरान कहा "जस्टिस डिलेड, जस्टिस डिनाइड". मेरा कहना यह है "टाइम डिलेड, टाइम डिनाइड". हम बोलने के लिए सुबह से शाम तक बैठे रहते हैं और हमें शाम को बोलने के लिए समय कम मिलता है. इसलिए मेरा आपसे अनुरोध है कि इस बात के नॉर्म्स बी.ए.सी. में तय होने चाहिए कि किस पार्टी के किस प्रतिनिधि को कितना समय मिलेगा. यह बात बी.ए.सी. में तय होनी चाहिए.

तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव) : किस माननीय सदस्य को कितना समय दिया जाए, यह बात बी.ए.सी. में तय नहीं होती है. बी.ए.सी. में केवल इतना ही तय होता है कि सभागृह में चर्चा के लिए कौन से विषय लेने हैं. सभागृह में 50 प्रतिशत समय विरोधी पक्ष को और माननीय मंत्री महोदय का उत्तर शामिल करके 50 प्रतिशत समय सत्तारुढ़ पक्ष को दिया जाता है.

श्री. सय्यद जामा : माननीय सभापति जी के खिलाफ मेरा कोई ग्रीवेन्स नहीं है. वोट ऑन एकाउन्ट के लिए बजट हमारे सामने पेश किया गया है. आज इस सभागृह में हमें ऐसा लगता है और कुछ माननीय सदस्यों को इस बात की बहुत तकलीफ है कि महाराट्र राज्य के सरकारी कर्मचारियों कों छठवाँ वेतन आयोग लागू किया गया है और उनको चिन्ता है कि इसके लिए पैसा कहां से आएगा. मैं सभागृह को यह बताना चाहता हूँ कि यू.पी.ए. की पिछले 5 साल से केन्द्र में सरकार है और इस सरकार ने केन्द्रीय कर्मचारियों को 30 प्रतिशत से 40 प्रतिशत तक की बढ़ोतरी दी है और इसका 40 लाख कर्मचारियों को लाभ हुआ है. इसमें रेलवे और डिफेंस में काम करने वाले कर्मचारियों का भी समावेश है. इसी प्रकार से केन्द्रीय सरकार के 200 सार्वजनिक उपक्रमों में काम करने वाले कर्मचारियों को 30 प्रतिशत से 40 प्रतिशत तक की बढ़ोतरी दी है. यू.पी.ए. की सरकार ने फिजीकल मेनेजमेंट के जरिए बहुत सारा पैसा सोशल सेक्टर के लिए दिया है और इसके लिए 71 हजार करोड़ रुपए का प्रोवीजन किया गया है. किसानों के लिए भी पैसा दिया गया है और आर्थिक मंदी के इस दौर से उद्योगों को बाहर निकालने के लिए भी केन्द्रीय सरकार ने पेकेज दिया है. अमेरिका में भी इस प्रकार का 800 मिलियन डॉलर का पेकेज दिया गया है. यू.पी.ए. की केन्द्रीय सरकार ने इस बात का ख्याल रखा है कि हर वर्ग का समन्वित विकास होना चाहिए. राज्य सरकार के कर्मचारी भी इसमें आते

. . . 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जामा जारी

हैं, इसलिए छठवें वेतन आयोग की सिफारिशें लागू करने के बारे में किसी को गलतफहमी नहीं होनी चाहिए. राज्य सरकार के कर्मचारियों को केन्द्रीय सरकार के कर्मचारियों के बराबर वेतन और भत्ते मिलने चाहिए और इस बारे में जो कमी रह गई है, वह दूर होनी चाहिए.

सभापति महोदय, सभागृह में शिक्षकों के प्रतिनिधि कह रहे थे कि दिसम्बर 2008 का वेतन अभी तक उनको नहीं मिला है. केन्द्रीय शासन ने "पेमेन्ट ऑफ मिनिमम वेजस एक्ट" बनाया है और इस एक्ट के अनुसार एक निश्चित तारीख, उदाहरण के तौर पर 7 या 10 तारीख तक पगार होनी चाहिए. यह बात बहुत दुर्भाग्यपूर्ण है कि "पेमेन्ट ऑफ मिनिमम वेजस एक्ट" का उल्लंघन होता है. जिस अधिकारी की वजह से पेमेन्ट में देरी होती है, उसके ऊपर एक्शन होना चाहिए. आमदारों के फंड के बारे में, उनकी सेलरी के बारे में मैं यह कहना चाहता हूँ कि कम्प्यूटराइजेश होने के बाद जब से "बजट डिसबर्समेंट सिस्टम" आया है, उसके बाद से पिछले 4-5 महीने से आमदारों के पगार नहीं हुए हैं. हमें इस सिस्टम का नाम "बजट डिलेड सिस्टम" कर देना चाहिए. हमारा कहना यह है कि "पेमेन्ट ऑफ मिनिमम वेजस एक्ट" का सरकार को पालन करना चाहिए. मैं फिर से यह बात कहना चाहता हूँ कि राज्य सरकार के कर्मचारियों को छठवाँ वेतन आयोग लागू करते समय जो त्रुटियां रह गई हैं, वे दूर होनी चाहिए.

सभापति महोदय, अल्पसंख्यकों के बारे में 2008-09 के बजट में 167 करोड़ रुपए का प्रावधान किया गया है और 2009-10 के अंतरिम बजट में 54 करोड़ रुपए का प्रावधान किया गया है. प्रधान मंत्री के आदेशानुसार महाराष्ट्र शासन ने अक्टूबर 2006 में आदेश निकाला है कि जहां तक संभव हो, प्रत्येक हेड के बजटरी एलोकेशन में 15 प्रतिशत फंड का प्रावधान उन के लिए होना चाहिए, लेकिन वह होता नहीं है. 2008-09 के नियमित बजट में इतना एलोकेशन नहीं हुआ है और 167 करोड़ रुपए में से 50 करोड़ रुपए मौलाना आजाद वित्तीय महामंडल को दिए हैं. ऑपरेशनल डिले की वजह से अब तक इस पर अमल नहीं हुआ है और लोगों को इसका लाभ नहीं मिल पाया है. हमारी शासन से रिक्वेस्ट है कि जब हम नियमित बजट बनाएंगे तो उस समय जहां तक संभव हो, अल्पसंख्यकों के विकास के लिए "हेड वाइज एलोकेशन" होना चाहिए, ताकि उसका फायदा अल्पसंख्यकों को मिल सके.

. . . 3

. . . . श्री. सय्यद जामा जारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापति महोदय, मैं शिक्षक प्रतिनिधियों की इस बात से सहमत हूँ कि "कायम बिना अनुदानित शाला" वाली बात खत्म होनी चाहिए, सभी शाआलों को अनुदान देना चाहिए. शिक्षण सेवकों को बराबरी का हक मिलना चाहिए. उनको 3 हजार, 4 हजार या 5 हजार रुपए देना अच्छी बात नहीं है, उनको भी पे कमीशन के हिसाब से वेतन दिया जाना चाहिए और समाज में शिक्षक वर्ग का सम्मान होना चाहिए.

सभापति महोदय, श्रम मंत्रालय की हालत ठीक नहीं है और अभी उसकी जबाबदारी बहुत बढ़ गई है. नागपुर अधिवेश में हमने घरेलू महिला कामगारों के बारे में बिल पास किया है. श्रम मंत्रालय के पास सुरक्षा रक्षकों के प्रश्न हैं, माथाड़ी कामगारों के प्रश्न है और इस विभाग के अन्दर जो पद खाली हैं, वे भरे नहीं जा रहे हैं. उनके पास कम्प्यूटर नहीं हैं. मैं आपको नागपुर के एडीशनल कमिश्नर के कार्यालय के बारे में बताना चाहता हूँ कि उनके पास 4 कम्प्यूटर भी नहीं है. इसलिए मेरी मंत्री महोदय से विनंती है कि श्रम मंत्रालय के खाली पदों को तुरन्त भरा जाए और उनको कम्प्यूटर सहित सारी सुविधाएं प्रदान करनी चाहिए.

सभापति महोदय, महाराष्ट्र में पुनर्वसन के लिए कानून बनाया गया है और उसके लिए प्राधिकरण भी है. हमारे माननीय सदस्यों ने यहां पर कहा कि किसी भी प्रोजक्ट या बाँध के लिए प्रभावित लोगों के पुनर्वन के लिए कानूनी तौर पर समय सीमा निश्चित करनी चाहिए और उसके लिए बजट एलोकेशन की गारन्टी होनी चाहिए. हमने यह देखा है कि प्रोजक्ट शुरु हुए 20-25 साल हो गए हैं और पुनर्वसन के लिए उन लोगों को आंदोलन करना पड़ता है. इसलिए इसके लिए कोई समय सीमा निश्चित होनी चाहिए.

सभापति महोदय, पूरे देश में सब से अधिक एस.ई.जेड. महाराष्ट्र में आए हैं. यहां पर माननीय सदस्यों ने प्रश्न उपस्थित किया कि एस.ई.जेड. में लेबर कानून लागू होते हैं या नहीं होते हैं. मेरा कहना यह है कि जहां तक आई.टी. की बात है तो उन लोगों को तो अधिक वेतन मिलता है, लेकिन वहां पर नॉन ऑपरेशनल एरिया में बहुत सारे मजदूर काम करते हैं. वहां पर गारमेंट जोन है, फूड पार्क है. लेबर एडवाइजरी कमेटी ने गारन्टी दी है कि लेबर कानून सस्पेंड नहीं रहेंगे. हमारी जानकारी के अनुसार यह अधिकार एस.ई.जेड. के डिवलपमेंट कमिश्नर के पास रहेगा कि वहां पर लेबर कानून लागू होंगे या नहीं. इसलिए इस बारे में स्पष्टता होनी

. . . .4

. . . . श्री. सय्यद जामा जारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चाहिए और माननीय मंत्री महोदय को सभागृह में इस बारे में जानकारी देनी चाहिए. हमारी मांग है कि एस.ई.जेड. में लेबर कानून लागू रहने चाहिए और इसके अधिकार डिवलपमेंट कमिश्नर के पास होने चाहिए. इन्हीं कुछ सुझावों के साथ मैं अपनी बात समाप्त करता हूँ. धन्यवाद.

.....

. . . भाषण पूर्ण, इसके बाद श्री. पाशा पटेल का मराठी भाषण.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन 2009-2010 च्या अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी व त्याबाबतीतील माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या सभागृहात सहाव्या वेतन आयोगावर अगोदरच खूप चर्चा झालेली आहे. विषय असा आहे की, कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग मिळाला ते बरे झाले, आमच्या पोटात दुखण्याचे कारण नाही, चांगली गोष्ट आहे. पण संघटित व कुशल समजल्या जाणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच ही वाढ मिळाली आहे. शेतात काम करणारी जी माणसे आहेत, जी अकुशल आहेत त्यांना मात्र काहीच मिळाले नाही, त्यांचा विचारही झाला नाही. कुशल कामगारांना तीन ते पाच हजार रुपये वाढ चालू झाली, गावात मात्र अकुशल कामगार समजून शेतमजुराला फक्त 66 रुपये जो अगोदरपासून होता तेवढाच पगार आहे आणि कौटुंबिक मजूर ज्याला म्हणतो अशा शेतकऱ्याच्या घरातील जो सदस्य आहे त्यांना फक्त 82 रुपये अशी परिस्थिती या राज्यात आहे. सहावा वेतन आयोग कर्मचाऱ्यांना दिला गेला त्याच वेळी गावातील कर्मचाऱ्यांचा विचार झाला असता तर फार बरे झाले असते. त्यामुळे आता हे एक प्रकारचे गृहयुध्द सुरु होणार आहे. एका बाजूला दररोज 3 हजार रुपये पगार घेणारा आणि दुसऱ्या बाजूला मात्र रोजचे 66 रुपये याचा कुठेतरी विचार करणार की नाही हा प्रश्न निर्माण झाला व त्याचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

महोदय, नक्षलग्रस्त भागाच्या बाबतीत शासनाने धडक कृती कार्यक्रम तसेच त्या अनुषंगाने अनेक कार्यक्रम सुध्दा आखले. पण ज्या भुकेतून नक्षलवाद निर्माण होतो त्याचे मात्र त्यामध्ये कुठेही प्रतिबिंब दिसत नाही. 3 हजार रुपये क्विंटलची सोयाबीन 1300 रुपयाने घेतली तर ही भूक कशी कमी होणार आहे हो ? गावातल्या माणसाचा कुठे तरी विचार करणार की नाही ? नक्षलवादी चळवळ दिवसेदिवस का वाढते, नक्षलवाद्यांची संख्या का वाढत आहे, कोणासाठी वाढत आहे, याचा विचार करणार की नाही हो ? अशा प्रकारे शासनाने आजपर्यंत गावातील माणसांची भूक वाढविण्याचाच प्रयत्न केलेला आहे, तो कमी करण्याचा प्रयत्न मात्र कधीच होत नाही याकडे खऱ्या अर्थाने लक्ष देण्याची गरज आहे. शासन म्हणते की शेतकऱ्यांच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे आहोत. पण प्रत्यक्षात किती खंबीरपणे उभे आहे हे मात्र यावरुन दिसून येते. मी दोन तास सभागृहात उपस्थित नव्हतो. माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांच्या दालनात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल.....

नाशिक जिल्ह्यातील 11 शेतकरी आलेले आहेत. त्यातला एक शेतकरी तीन महिन्याचे मूल जसे रडते तसे ढसाढसा रडून आपली व्यथा सांगत होता. त्या शेतकऱ्याकडे 100-125 एकर द्राक्षाची बाग आहे. शेतकरी वारकरी पंथाचा असून गळ्यात तुळशीची माळ आहे. असा शेतकरी भाऊसाहेबांच्या केबिनमध्ये रडत होता. त्याचे कारण असे की या देशाचे कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार साहेब यांनी संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांना सांगितले होते की, आपल्या देशात वायनरीजच्या माध्यमातून परकीय चलन आणायचे आहे. त्यासाठी आपल्याला राज्यात जास्तीत जास्त वायनरीज काढायच्या आहेत. म्हणून शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त द्राक्षाची लागवड करावी. या द्राक्षाच्या वायनरीमध्ये भरपूर पैसा आहे असेही शेतकऱ्यांना सांगण्यात आले. ते ऐकून लोकांनी भरपूर द्राक्षाची लागवड केली आणि मी सुध्दा त्यात अडकलो. मलाही वाटले होते की, द्राक्ष लागवडीतून भरपूर पैसा मिळणार म्हणून मी तीन एकर क्षेत्रात द्राक्षाची लागवड केली. अशा प्रकारे राज्यात असलेल्या 58 वायनरीजनी शेतकऱ्यांकडून गेली तीन वर्षे व्यवस्थित द्राक्ष घेतले. यावर्षी मात्र या वायनरीजनी अचानक शेतकऱ्यांसोबत द्राक्ष खरेदीसंबंधी केलेला करार मोडला.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ...

सभापती महोदय, 40 टक्के द्राक्ष घेतली परंतु उरलेली 60 टक्के द्राक्ष घेण्यास आता वायनरीज तयार नाहीत. उरलेल्या द्राक्षांचे काय करावयाचे असे विचारले तर ते सांगतात तुम्ही त्या द्राक्षांचे काहीही करा.

सभापती महोदय, सिन्नर तालुक्यातील काही शेतकरी या ठिकाणी आलेले आहेत त्यांनी सांगितले की, चार टन द्राक्षे झाडावरुन काढली की, त्यातील एकच टन द्राक्ष वायनरीज घेतात उरलेल्या 3 टन द्राक्षाचे काय करायचे असा प्रश्न आता द्राक्ष उत्पादक शेतक-यांना पडलेला आहे. आता ही उरलेली द्राक्ष माणसे किंवा जनावरे सुध्दा खाऊ शकत नाही. त्या द्राक्षांचा बेदाणा सुध्दा तयार करता येत नाही. ती द्राक्ष गाळायची किंवा उकिरडयावर फेकायची एवढेंच आता शेतक-यांच्या हातात उरलेले आहे. (अडथळा) सभापती महोदय, 40 टक्के द्राक्षांच्या बागा वाळून गेल्या आहेत. मी किमान 10-15 चेअरमन्सला मी विनंती केली की, माझी तीन एकर द्राक्ष बाग आहे ती तरी किमान न्या ? परंतु कोणीही माझ्या बागेतील द्राक्ष घेऊन गेले नाहीत. आज सगळीच्या सगळी द्राक्ष बाग वाळून जात आहे. एका शेतक-याकडे दोन एकर द्राक्षाची बाग होती. त्याला एक मुलगा होता. तो मुलगा शिकला-सवरला, त्याचे एमपीएससीला सिलेक्शन झाले परंतु त्या मुलाने नोकरी केली नाही, त्या शेतक-याने 40 एकर अजून जमीन विकत घेतली आणि 40 एकरात द्राक्षाची बाग लावली. आज त्या शेतक-यांची 40 एकरातील द्राक्ष कोणीही विकत घेण्यास तयार नसल्यामुळे शेतकरी आणि त्याचा मुलगा रडू लागला आहे. यासंदर्भात आम्ही माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना भेटलो आणि त्यांना सांगितले तुम्ही द्राक्षाला काहीही भाव द्या परंतु आमचे द्राक्ष घेऊन जा असे सांगितले परंतु काही उपयोग झाला नाही. नाशिक जिल्हयातील 4-5 वायनरीजच्या सगळया टाक्या रिकाम्या आहेत, त्यांच्याकडे स्टॉक करण्यास जागा आहे परंतु ते द्राक्ष घेत नाहीत. कारण तुट आली की, त्यांना लुट करणे सोईचे होते. मुबलकता आला की, लिलाव करता येतो म्हणून या वायनरीज शेतक-यांची द्राक्ष घेत नाहीत. शेतक-यांचा माल चार दिवस घेतला नाही की, या वायनरीज 3-4 रुपये किलो दराने द्राक्ष विकत घेतील. कमी भावात द्राक्ष मिळावीत म्हणून या वायनरीजवाल्यानी अशी बदमाशी सुरु केली आहे. त्यामुळे यासंदर्भात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ...

शासनाने लक्ष घालण्याची नितांत आवश्यकता आहे. वायनरीजनेच द्राक्ष न घेण्याचा करार मोडलेला आहे. "वायनरीजने तोडला शब्द आणि शेतक-यांनी तोडल्या बागा" यासंदर्भात सकाळ वर्तमानपत्राचे कृषी मासीक ॲग्रोवनने ही बातमी छापलेली आहे. वायनरीजने शब्द तोडल्यामुळे शेतक-यांनी आपल्या द्राक्षाच्या बागा तोडायला सुरुवात केलेली आहे. एक एकर द्राक्ष बाग उभी करण्यासाठी 2 लाख रुपये खर्च येतो. एक एकर द्राक्ष बागेचे देखभालीसाठी 60-70 हजार रुपये खर्च येत असतो. एवढे पैसे खर्च करुन जर बाग जळायला लागली आणि ते उघडया डोळयानी पहावे लागले तर जसे मुल मरतांना माणूस अस्वस्थ होतो तसेच बाग जळतांना द्राक्ष बागायीतदार अस्वस्थ होतात. या ठिकाणी बसलेल्या एकाही सन्माननीय सदस्याच्या मनाला घाम फुटत नाही, द्राक्षांच्या संदर्भात कोणीही बोलावयास तयार नाही. आता तर यांना आचार संहिता हा सोयीस्कर शब्द सापडला आहे. आचार संहितेमध्ये जेवण बंद केले जात नाही, श्वास घेण्याचे बंद केले जात नाही . बाकी सगळी लफडें करण्यास आचार संहितेमध्ये मोकळीक आहे. वरुन बंद आणि खालून चालू असा प्रकार सध्या सुरु आहे. शेतकरी मरायला लागल्यावर यांना आचार संहितेची आठवण येते. (अडथळा) लोक जेव्हा शहाणे होतील तेव्हा या शासनाचा बदला घेतल्याशिवाय राहणार नाहीत. गेल्यावर्षी 40-45 रुपये किलो या दराने द्राक्ष विकली गेली. तुमच्याच पक्षाच्या लोकांनी सांगितले की, शेतक-यांनो द्राक्ष लावा. आपण सांगितले म्हणून आम्ही द्राक्षांया बागा लावल्या. परंतु आम्ही ज्यावेळेस द्राक्षाच्या बागा लावल्या तेव्हा आपण आमचा माल 3.50 रुपये किलो दराने घ्यावयास सुरुवात केली. द्राक्षाचे दर पाडण्याचा डाव आखला गेलेला आहे. महाराष्ट्रातील शेतक-याला तुम्ही द्राक्ष लावावयास सांगतात आणि परदेशातून वाईन आयात करतात. गांडूळ जसे दोन तोंडाने चालते तसा हा प्रकार आहे. एका बाजूला म्हणावयाचे की, आम्हाला महाराष्ट्रातील शेतक-याचे भले करावयाचे आहे, परकीय चलन मिळवून द्यावयाचे आहे आणि दुस-या बाजूने हळूच परदेशातील वाईन देशात आणावयाची असा प्रकार आपण सुरु केलेला आहे. आयात कर कसा काय कमी झाला? आयात कर आताच कसा काय कमी झाला? आयात कर कमी झाल्यामुळे परदेशातील वाईन महाराष्ट्रात आली व परदेशातील वाईन आल्यामुळे आमची जागा आटली. आमची जागा आटली म्हणून आम्हाला वायनरीजच्या कारखान्याच्या बाहेर काढले गेले.

यानंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल...

हे तुम्ही कुठे फेडणार आहेत ? मला येथे एक विनंती करायची आहे. आता आचारसंहितेचा बागुलवुवा बाजूला ठेवा. ज्या ज्या शेतकऱ्यांचे द्राक्ष बागेमध्ये वाळू लागले आहेत, त्यांचा आपण सर्व्हे करावा. ज्या कंपन्यांनी करार करून ते मोडले त्यांचे लायसेन्स रद्द करावे. वायनरीचे मालक तुमचे असतील ती गोष्ट वेगळी. त्यांच्याकडून नुकसान भरपाई वसूल करावी. त्यामुळे आपण एक सर्व्हे करावा. दुसरे ज्यांनी करार मोडले त्यांना शिक्षा करावी. तसेच आयात करण्याचे पाप का केले हेदेखील सांगावे. आज द्राक्षवाले तळमळू लागला आहे. श्री.देशमुख साहेब आपल्या अमरावती जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकरी देखील मरू लागला आहे. आमच्या भागातील ज्वारी उत्पादक शेतकरी मरू लागला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील अंगूर उत्पादक शेतकरी बरा आहे, पण त्याला आता आपण मरणाच्या रस्त्यावर आणून ठेवले आहे. त्याबद्दल तुम्हा सर्वांचे अभिनंदन. जे वाचले होते त्यांना देखील आपण मरायला घेऊन जात आहात. 90 टक्के आयात शुल्क खाद्य तेलावर होते. दोन महिन्यापूर्वी ते शून्य टक्के केले. काय मजा झाली. या देशामध्ये एक कोटी दहा लाख टन सोयाबीन उत्पादन झाले. त्यापैकी 28 लाख टन सोयाबीनचे उत्पादन महाराष्ट्रात झाले. ज्यावेळी आम्ही सोयाबीनची रास केली, रानात सोयाबीन तयार होते त्यावेळी बाजारात सोयाबीनचा भाव तीन हजार रूपये होता. ज्या दिवशी आमचे सोयाबीन तयार झाले त्यादिवशी बाजारात सोयाबीनचा भाव तेराशे रूपये झाला. तेव्हा आम्ही विचारले असे काय झाले ? तेव्हा आम्हाला सांगण्यात आले आयात शुल्क कमी झाले. ऑक्टोबर महिन्यामध्ये आयात शुल्क कमी झाले. देशातील शेतकऱ्यांनी 45 लाख मेट्रीक टन सोयाबीन एका महिन्यामध्ये बाजारात आणले. त्यामुळे देशातील सोयाबीन शेतकऱ्यांचे आठ हजार कोटी रूपयांचे नुकसान झाले. आमचे सोयाबीन स्वस्तात गेले. आम्हाला तेल महागात मिळाले. मधला मलिदा कोणी हाणला. चार लोकांनी मलिदा हाणला. एक बुंगे, एक अडाणी. चार व्यापाऱ्यांना जगविण्यासाठी सर्व सोयाबीन उत्पादकांची मान कापण्याचे पाप झाले. हे कोणी केले ? याचा विचार करावा लागणार आहे. माझ यासारख्या कार्यकर्त्याला अस्वस्थ वाटते. बारामतीमध्ये या देशातील कृषि मंत्र्यांना प्रश्न विचारला गेला की, पवार साहेब आयात शुल्क कमी झाल्यामुळे सोयाबीनचे भाव पडलेले आहेत,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल....

तर उत्तर काय मिळाले, एक महिन्याच्या आत पुन्हा आयात शुल्क लावण्यात येणार आहे. माझ्या सारख्या सामान्य शेतकऱ्याच्या मुलाचा आत्मा तळतळतो. शेतकरी आपला माल तयार करायचा. शेतातील माल घरात यायचा. घरातील माल बाहेर जायचा. पण आता शेतकरी संकटात आहेत. शेतकरी खळ्यावरचा माल बाजारात घेऊन चालला आहे. ही परिस्थिती माहिती असताना एक महिना आयात शुल्क लावण्यास उशीर का झाला ? याचा शोध मला लागत नाही. आपण म्हणता आपण शेतकऱ्यांच्या पाठिमागे आहोत. सोयाबीनवाला मेला, सूर्यफूलवाला मेला, शेंगवाला मेला, कापूसवाला मेला, आणि आता द्राक्षवाला मरू लागला आहे. यासंबंधी आपण गंभीरपणे विचार करावा. आज सगळे द्राक्ष उत्पादक शेतकरी मरणाच्या रस्त्याला लागले आहेत. त्या रस्त्याला त्यांना जाऊ देऊ नका. एवढीच माझी कळकळीची विनंती आहे. आता बोलताना श्री.टकले साहेबांनी सांगितले की, आचारसंहितेचा बाऊ या गोष्टीसाठी करू नका. तेव्हा आचारसंहिता आडवी न आणता शेतकऱ्यांना वाचविण्याचे काम तुमच्या हाताने होऊ दे एवढी माझी विनंती आहे.

.....

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधान सभेने निवडलेल्या) सभापती महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभी आहे.

सभापती महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात समाजातील विविध घटकांची काय परिस्थिती आहे याबद्दल अनेक मुद्दे मांडता येण्यासारखे आहेत परंतु अर्थसंकल्पाच्या चौकटीत बोलत असतांना मला प्रकल्प ग्रस्तांच्या प्रश्नासबंधी प्रथम शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. गेल्या दहा वर्षात प्रकल्पग्रस्तांचे किंवा धरणग्रस्तांचे प्रश्न मोठया प्रमाणात राज्यात उभे राहिलेले आहेत त्या संदर्भात संबंधित व्यक्तिना कोणत्याही प्रकारचा दिलासा अर्थसकल्पात देण्यात आलेला नाही. त्याचबरोबर जिल्हया जिल्हयात बंद पडलेले उद्योग, भारनियमन आणि नुकसान भरपाई देण्याच्या संदर्भात होत असलेली अक्षम्य दिरंगाई याबद्दल नुकतेच सान्माननीय सदस्य श्री पाशा पटेल यांनी अत्यत तळमळीने आपले विचार मांडलेले आहेत. शेतकरी असो, कामगार असो वा महाराष्ट्राची अस्मिता म्हणून ज्या विषयाला आपण मानत असतो . त्याही बाबतीत वारंवार आश्वासने देऊन त्या आश्वासनाचा भंग शासनाने केलेला आहे. श्री.जयंत पाटील हे जेव्हा वित्त मंत्री होते तेव्हा 21 मार्च 2005 रोजी केलेल्या भाषणातील 92 नंबरचा मुद्दा असा होता की, " मुंबई लगतच्या अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय शसनाने घेतला आहे आणि प्रस्तुत स्मारक उभारण्या संबंधात शासनाला शिफारशी व या कामाचे सनियंत्रण करण्याकरिता तांत्रिक समिती व मानस चित्रण समिती अशा दोन सामित्या नेमण्यात आलेल्या आहेत." गेल्या वर्षी माननीय मंत्रीमहोदय समुद्रात फेर फटका मारुन आले होते . त्यानंतर त्यांची लॉच समुद्रातच राहिली असती तर बरे झाले असते की काय असे म्हणण्याची स्थिती निर्माण झालेली आहे . 2009 सालच्या अर्थसंकल्पामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या संदर्भात एका शब्दानेसुध्दा उल्लेख केलेला नाही.छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी 200 - 300 कोटी रुपये खर्च करुन स्वातंत्र्य देवतेच्या पुतळयापेक्षाही सुंदर पुतळा उभा करणार आहोत अशा प्रकारची भूमिका शासनाने मांडली होती. अर्थसंकल्पाच्या संदर्भात मी काल पासून अनेक जणांच्या प्रतिक्रिया ऐकत आहेत तसेच त्यांची भाषणे ऐकत आहे. सभागृहातसुध्दा अनेक सन्माननीय सदस्यांनी भाषण केलेली आहेत. अगोदर मांडलेल्या मुद्याच्या संदर्भात पुनरावृत्ती करण्यात येऊ नये असे माननीय पीठासीन अधिकारी वारंवार सांगत असतात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा मुद्दा कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी मांडलेला नाही. या मुद्याचा फक्त आपणच उल्लेख केलेला आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, माझे भाषण आपण लक्षपूर्वक ऐकत आहात त्याबद्दल मी आपली आभारी आहे. मला असे सांगावयाचे आहे की, शिवाजी महाराजांच्या अस्मितेसंबंधीच्या मुद्यांचा निवडणुकीच्या वेळी जेव्हा जेव्हा आवश्यकता असते तेव्हा तेव्हा वापर केला जातो . गेल्या वेळी जेम्स लेनचा मुद्दा उपस्थित झाला होता. तो पळून गेला होता आणि नंतर तो सापडला नाही. त्या घटनेला पाच वर्षे झालेली असतांना देखील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासंबंधी जी अक्षम्य दिरंगाई करण्यात आली आहे. जी उपेक्षा करण्यात आली आहे त्याबद्दल आत्म परीक्षण करण्याच्या पलीकडे हे शासन पोहोचलेले आहे त्यामुळे जनता या संदर्भात जाब विचारील असे मला वाटते.

सभापती महोदय यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. नागरी विकास धोरण तयार करण्यात आले असल्याचे गेल्या वर्षी शासनाने जाहीर केले होते . जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान मिशन आणि केन्द्र सरकारच्या विविध योजनांचे राज्य सरकारकडे आलेले पैसे यासबंधी जेव्हा विचार करु लागतो तेव्हा हे चित्र स्पष्ट होते की, शासनाने तयार केलेल्या धोरणाचे या अर्थसंकल्पात कोठेही प्रतिबिंब उमटलेले दिसून येत नाही.

सभापती महोदय, यानंतर मला तिसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. बॅकवर्ड रिजन डेव्हलपमेन्ट फडासबंधी म्हणजेच मागास क्षेत्र अनुदान निधीचा मुद्दा उपेक्षित आणि दुर्लक्षित राहिलेला आहे गेल्या वर्षभरामध्ये या सभागृहात लक्षवेधी सूचना, नियम 93 ची सूचना, प्रश्न उपस्थित करुन कोणी तरी या मुद्याकडे शासनाचे लक्ष वेधील अशी माझी अपेक्षा होती . महाराष्ट्रातील भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, गोदिंया, नांदेड, हिंगोली, धुळे, नंदूरबार, अहमदनगर अमरावती, यवतमाळ आणि औरंगाबाद या बारा जिल्हयासाठी साडे तीन हजार कोटी रुपयांचे अनुदान मिळालेले आहे असा उल्लेख 2007 मध्ये करण्यात आला होता . बारा जिल्हयात सामाजिक विकासाचा निर्देशांक कमी आहे. म्हणून या जिल्हयासाठी हा निधी मिळाला होता. परंतु आज असे सांगण्यात आले आहे की यासाठी काही व्यवस्था करण्यात आलेली आहे. या बारा जिल्हयासाठी डेव्हलपमेन्ट कौन्सिल करण्याची आवश्यकता होती परंतु ते वेळेवर न झाल्यामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे...

आपल्याला प्रत्येक जिल्हयासाठी जो विकास निधी मिळावयास पाहिजे होता तो मिळालेला नाही. कोणत्या ठिकाणी किती निधीची गरज आहे हे पाहता केन्द्र सरकारकडून अजून निधी मिळावयास पाहिजे होता परंतु तोही मिळालेला नाही. आता असे सांगण्यात आले आहे की एकूण 330 कोटी रुपयांचे अनुदान खर्च करण्यात आले आहेत. मागास क्षेत्र अनुदान निधीचे 3 हजार 500 कोटी रुपये मिळणे अपेक्षित होते त्यापैकी आतापर्यंत किती पैसे मिळालेले आहेत आणि त्यापैकी किती पैसे खर्च करण्यात आलेले आहेत यासंबंधीची माहिती देण्यात यावी . जर शासनाची नियत साफ असेल तर या संदर्भात शासनाने श्वेत पत्रिका काढावी आणि पुढच्या अर्थसंकल्पाच्या वेळी ती सादर करावी. सर्व सन्माननीय सदस्य मागासलेल्या भागाचा विकास करण्यासाठी जास्तीत जास्त निधी मिळावा म्हणून वारंवार मागणी करीत आहेत .ज्या 12 जिल्हयासाठी अनुदान देण्यास केन्द्र सरकार तयार होते त्या जिल्हयाची नावे पाहिली तर आपल्या असे निदर्शनास येईल की, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, गोदिंया, नांदेड, हिंगोली, धुळे, नंदूरबार, अहमदनगर अमरावती, यवतमाळ आणि औरंगाबाद अशा बारा मागासलेले जिल्हयाची ती नावे आहेत.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ....

हे सगळे मागास म्हणता येतील असेच जिल्हे आहेत. या जिल्ह्यांसाठी जो निधी मिळायला पाहिजे होता तो निधी आपण डेव्हलपमेंट कौन्सिल न केल्यामुळे आणि या डेव्हलपमेंट कौन्सिलवर त्या जिल्ह्यातील सर्व पक्षीय लोकप्रतिनिधींनी निवडून येणे गरजेचे होते. ते करण्यामध्ये आपण अक्षम्य दिरंगाई केली त्यामुळे हा निधी वापरला गेला नाही आणि आपण फार मोठ्या अधिकारापासून वंचित राहिलो आहोत. म्हणून जेव्हा आपला सविस्तर असा अर्थसंकल्प चार महिन्यांनंतर येईल तेव्हा त्यावेळेस या निधीचा का उपयोग झाला नाही याबद्दल आपण श्वेतपत्रिका काढावी. तसेच या बाबतीत मंत्री महोदयांनी स्वत:च आढावा घेणे आवश्यक आहे की, हा जो निधी जिल्ह्यांना दिलेला आहे त्याचे काय झाले ? खरे तर यामध्ये जिल्ह्यांची काहीच चूक नाही. राज्यात डेव्हलपमेंट कौन्सिल करण्याच्या निर्णयाला उशीर लागल्यामुळे याबाबत अमलबजावणी झालेली नाही. पण मग त्यासाठी जे कोणी जबाबदार आहेत त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात, हा प्रश्न मला येथे उपस्थित करावासा वाटतो.

सभापती महोदय, माझा पुढील मुद्दा जेंडर रिस्पॉन्सिव बजेटचा आहे. नामदार अर्थमंत्री आता या सभागृहात उपस्थित नाहीत. पण केंद्र सरकारने 2006 सालापासून गेली 3-4 वर्षे जेंडर रिस्पॉन्सिव बजेट, ज्यातून विविध बारा विभाग ज्यामध्ये पाणी पुरवठा, आरोग्य, शिक्षण, आदिवासी कल्याण, समाजकल्याण, पुनर्वसन, ग्रामीण विकास, नागरी विकास, उच्च व तंत्रशिक्षण, रोजगार हमी योजना, अन्न व नागरी पुरवठा, वने आणि महिला-बाल कल्याण म्हणजे जवळपास सगळीच डिपार्टमेंटस् आहेत. या विभागांमधील योजनांचा किती निधी महिला हितासाठी वापरला जातो, कोणत्या निर्णयाचा स्त्री-हितावर विपरित परिणाम होतो आणि जेंडर लेन्स मधून या आर्थिक तरतुदी तपासणे गरजेचे असते. हे जेंडर रिस्पॉन्सिव बजेट राज्यामध्ये आम्ही स्वीकारू असे 2001 साली माननीय श्री.विलासरावजी देशमुख हे मुख्यमंत्री असताना जेव्हा राज्यात पुन्हा महिला धोरण जाहीर झाले तेव्हा सरकारने मान्य केले होते. तेव्हा 2001 पासून आज 2009 पर्यंतच्या 8 वर्षात दरवेळेस अर्थसंकल्पामध्ये जेंडर रिस्पॉन्सिव बजेटच्या बाबतीत मागणी केल्यावर 'आम्ही विचार करू' असे उत्तर मिळाले, परंतु प्रत्यक्षात काहीच पावले उचलली गेली नाहीत. या तुलनेमध्ये राज्यातील मुंबई, पुणे, ठाणे आणि संभाजी नगर म्हणजे औरंगाबाद या चार महानगरपालिका आहेत त्यांनी जेंडर रिस्पॉन्सिव बजेट स्वीकारून फार मोठ्या प्रमाणात महिला विकासासाठी तरतूद

..... 3डब्ल्यू 2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ....

करून व्यवस्था केली आहे. त्याचा मी अभिमानाने येथे उल्लेख करू इच्छिते. त्यांनी हे बजेट केवळ महिला व बालकल्याणापुरते 35 कोटी किंवा 50 कोटी असे किरकोळ बजेट न करता चांगले बजेट केले आहे. तेव्हा राज्यातील इतरही डिपार्टमेंटस् मधून महिला विकासापर्यंत कसे पोहोचता येईल या संदर्भात जेंडर रिस्पॉन्सिव बजेटचा प्रयोग तुम्ही राज्यात केव्हा करणार आहात ? आता यावेळेस तर याबाबत पूर्ण शिक्कामोर्तब झालेले आहे. शवपेटीवरील शेवटचा खिळा म्हणजे तुमचा हा अर्थसंकल्प आहे की ज्यामध्ये तुम्ही परत जेंडर रिस्पॉन्सिव बजेटचा काहीही उल्लेख केलेला नाही.

सभापती महोदय, महिला बचतगटांच्या बाबतीत सातत्याने म्हटले जाते की, चार टक्के व्याजाने या बचत गटांना कर्ज देण्याची घोषणा सरकारने केलेली आहे. पण या बाबतीत माझ्याकडे जी माहिती आहे ती स्टेट प्रिन्सिपल सेक्रेटरी, सहकार आणि मार्केटिंग डिपार्टमेंट, श्री.सुधीर कुमार गोयल यांची इंडियन एक्स्प्रेसमधील 14.2.2009 ची बातमी आहे. त्यात त्यांनी स्वत:च कबूल करून सांगितले आहे की, एकाही बचत गटाला 4 टक्के व्याजाने कर्ज मिळालेले नाही. कारण याबाबतीत बँकांनी असे सांगितले आहे की, याबाबत आम्हाला ज्या काही सूचना मिळाल्या त्यात त्रुटी असल्याने नाबार्ड कडून आम्हाला जोपर्यंत स्पष्ट असे परिपत्रक मिळत नाही आणि "Categorically asking banks to lend loans at 4 % to the groups" असे जोपर्यंत नाबार्ड आम्हाला कळवत नाही तो पर्यंत आम्ही बचत गटांना 4 टक्के व्याजाने कर्ज देऊ शकणार नाही असे स्पष्टपणे प्रधान सचिव श्री.सुधीरकुमार गोयल यांचे निवेदन आहे. म्हणजे शासन कितीही म्हणत असले तरी आजपर्यंत एकाही बचत गटाला 4 टक्के दराने कर्ज मिळालेले नसेल तर कशाच्या आधारे या महिलांची आणि त्यांच्या बचतगटांची दिशाभूल करीत आहोत ? हा प्रश्न मला येथे उपस्थित करावासा वाटतो. आता तुम्ही म्हणत असाल की, अशा प्रकारचे कर्ज आम्ही दिलेले आहे तर त्या बँकांनी स्वत:च्या जोखमीवर ते कर्ज काही बचतगटांना दिलेले आहे. तरी या संदर्भातील स्पष्ट अशी माहिती सभागृहासमोर येणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, माझा शेवटचा आणि महत्त्वाचा मुद्दा मला येथे मांडावयाचा आहे. यावरून हे शासन कोठे चालले आहे आणि या शासनाची कार्यसंस्कृती काय आहे हे समजून येईल. या बाबत मी दोन तीन गोष्टींचा उल्लेख करायचा आहे. सभापती महोदय, दोन दिवसापूर्वीच एक

..... 3डब्ल्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बातमी प्रकाशित झाली आहे. ग्रामीण भागामध्ये गावकऱ्यांनी स्वच्छतागृहांचा वापर वाढवावा यासाठी गावपातळीवर 'गुड मॉर्निंग' म्हणून एक मोहीम हाती घेण्यास जिल्हा परिषदांना सांगण्यात आले आहे. त्यामध्ये अंगणवाडी शिक्षिकांना काम सांगितले आहे. ते काम असे आहे की, उघड्यावर जे लोक संडासला बसलेले असतात त्यांना जाऊन त्यांनी उठवायचे आणि त्यांना सांगायचे की, तुम्ही अशा प्रकारे उघड्यावर विधी करण्यास बसू नका, तुम्ही यासाठी संडासाचा वापर करा. याबाबतीत रायगड आणि इतरही अनेक जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांनी निवेदन दिले आहे. एक तर रोज पहाटे चार साडेचारला त्यांनी उठायचे आणि गावच्या परिसरामध्ये जे लोक उघड्यावर प्रातर्विधी करण्यास बसलेले असतात त्यांना जाऊन सांगायचे की, तुम्ही येथे अशा प्रकारे बसू नका, संडासांचा वापर करा. हे किती भयानक असे काम आहे की जे मला येथे सांगण्यासदेखील बरोबर वाटत नाही. इतके भयानक काम त्यांच्या वाट्याला आलेले आहे की, त्यांनी जाऊन लोकांना संडास करताना उठवायचे आणि सांगायचे की, तुम्ही येथे संडासला बसू नका. ...

(यानंतर श्री. सरफरे ....3डब्ल्यू 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

उघडयावर शौचाला बसलेले लोक या कर्मचाऱ्यांना दगड मारतात, त्यांना वाटेल ते बोलतात. त्यामुळे त्या महिलांनी सांगितले की, हे काम आपण आम्हाला देऊ नका. अजूनही त्या अंगणवाडी शिक्षिकांना टारगेट देण्यात आले की, त्यांनी उघडयावर शौचाला बसणाऱ्या महिलांना जाऊन सांगायचे की, तुम्ही उघडयावर शौचाला बसू नका. सभापती महोदय, या संदर्भात बारामती तालुक्यातील सुपे या गावात घडलेली घटना वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाली आहे. त्याबाबत मी माहिती घेतली की, एवढया सर्व गोष्टी घडत असतांना बारामती तालुक्यातील सुपे या गावी गुड मॉर्निंग पथकाला पाहून घाबरुन पळणाऱ्या श्री. सुनिल गोविंद जाधव या ग्रामस्थाचा हृदयविकाराच्या झटक्याने रस्त्यातच मृत्यू झाला. मघाशी माननीय सदस्य श्री. पाशा पटेल म्हणाले की, ते शौचास बसले असतांना त्याठिकाणी भरारी पथक आलेले पहाताच ते पळू लागले, पळतांना ते रस्त्यात कोसळले. त्यांचे जवळच घर होते, घरातील लोकांनी श्री. जाधव यांना दवाखान्यात नेण्यासाठी निर्मल ग्राम पथकाकडे गाडीची मागणी केली. परंतु पथकाने त्यांना दवाखान्यात नेण्यास नकार दिला. निर्मल पथकाचे काम शौचास बसणाऱ्या माणसाला उठविणे हे असल्यामुळे हा माणूस मेला तरी ते पथक न थांबता आपले टारगेट पूर्ण करण्यासाठी शौचास बसलेल्या दुसऱ्या लोकांना उठविण्यासाठी त्यांच्याकडे धावत गेले. त्यामुळे त्या माणसाचा मृत्यू झाल्यामुळे लोकांचा संताप वाढला. त्यानंतर ग्रामस्थांनी त्या पथकावर हल्ला चढविला. त्या पथकातील सर्व कर्मचाऱ्यांनी सुपे गावातील पोलीस चौकीचा आश्रय घेतला. मृतदेह ताब्यात न घेण्याचा पवित्रा जाधव कुटुंबियांनी घेतल्यामुळे गावातील तणावामध्ये अधिकच भर पडली आहे. सभापती महोदय, हा विषय याठिकाणी मांडून मला नाईलाजास्तव सभागृहाचा वेळ घ्यावा लागला असला तरी ही गंभीर घटना आहे. एका बाजूला आत्महत्त्या होत असतांना कार्यसंस्कृतीचे दुसरे उदाहरण मी याठिकाणी मांडले आहे. माहिती व जनसंपर्क संचालनालयातील कर्मचाऱ्यांची जी कथा आहे ती अतिशय करुण आणि संतापजनक आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, श्री. कुळमेथे हे उपसंचालक होते. त्यांची प्रशासकीय चूक नसतांना त्यांना छोटया छोटया कारणास्तव मानसिक त्रास दिला जात होता. त्यामुळे एका आदिवासी अधिकाऱ्याचा बळी गेलेला आहे. इतकेच नव्हेतर अनेक कर्मचारी विविध आजारांनी त्रस्त आहेत. यासबंधी माझ्याकडे आलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, माहिती व जनसंपर्क संचालनालयातील अनेक कर्मचाऱ्यांचे मृत्यू रक्तदाब, ताणतणावामुळे आणि अनेक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे...

संशयास्पद प्रकारे झाले आहेत. आता आचारसंहिता लागू असली तरी श्री. कोळमेथे यांच्यासहीत माहिती व जनसंपर्क संचालनालयामध्ये घडलेल्या अनेक कर्मचाऱ्यांच्या मृत्यूला जे कुणी जबाबदार असतील त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. आणि त्यांच्याकडील चार्ज ताबडतोब काढून घेतला पाहिजे ही गोष्ट तातडीने करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा असा की, कार्यसंस्कृतीबाबत बोलत असतांना मंत्रालयातील कर्मचाऱ्यांचे असे निवेदन आहे की, पूर्वी मंत्रालयातील दवाखान्यात रोज 20 लोक वैद्यकीय तपासण्यासाठी येत असत. आज दिवसाला 200 अधिकारी वैद्यकीय तपासणी करुन घेण्यासाठी येतात. त्यातील बरेच अधिकारी उच्च रक्तदाब, ॲसिडीटी, व मानसिक तणावाने ग्रस्त असतात. त्यांचे असे म्हणणे आहे की, फक्त आय.ए.एस. अधिकाऱ्यांचीच काळजी घेतली जाते. त्यांची घरे मंत्रालयाजवळ आहेत. परंतु आमच्या कार्यालयीन वेळा आणि आमच्यावरील महत्वाच्या जबाबदाऱ्या लक्षात घेता या शासनाच्या दुप्रशासनाचे फटके जास्तीत जास्त कुणाला मिळत असतील तर ते मंत्री किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यापेक्षा कनिष्ठ स्तरावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना बसत आहेत. त्यांचा मानसिक छळ अनावर होत चालला असल्यामुळे त्यांची आपणाला हाक आहे. याकरिता मी सभागृहाचा वेळ घेतला त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करते. हे प्रश्न सभागृहामध्ये मांडण्यासाठी मला आमच्या नेतेमंडळींनी सहकार्य केले व सभागृहातील सर्व माननीय सदस्यांनी माझे विचार ऐकून घेतले त्यांचे मी आभार मानते. मी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत माननीय अर्थमंत्र्यांच्या भाषणामधून स्पष्टीकरण मिळेल अशी मला आशा आहे. किंबहुना, ग्रामीण पातळीवर सुरु करण्यात आलेले गुड मॉर्निंग पथक जरी आपण बंद करण्याचा निर्णय घेतला तरी बऱ्याचशा लोकांचा त्रास कमी होऊन त्यांना जगण्याचा अधिकार मिळेल एवढे बोलून माझे भाषण संपविते.

धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, याठिकाणी मांडण्यात आलेल्या अंतरिम अर्थसंकल्पाला मी पाठिंबा व्यक्त करते. त्याचबरोबर या अर्थसंकल्पावर आपले मत व्यक्त करण्यापूर्वी दि.17 मार्च 2009 च्या दै. लोकमतच्या पृष्ठ क्र. 6 वर प्रसिध्द झालेली बातमी याठिकाणी वाचून दाखविते. त्यामध्ये असे म्हटले आहे की,"नियोजन विभागात काम करणाऱ्या अनेक महिला कर्मचाऱ्यांना रविवारी सकाळी 10 च्या सुमारास मंत्रालयामध्ये बोलाविण्यात आले. या महिला कर्मचाऱ्यांना सायंकाळपर्यंत घरी जाता येईल असे वाटत होते. मात्र रात्री दीड वाजता तुम्ही घरी जाऊ शकता असे सांगण्यात आले.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एवढया रात्री घरी जाणे शक्य नसल्याने, या महिला रात्री मंत्रालयामध्येच थांबल्या होत्या आणि सकाळी 7.00 वाजता घरी गेल्या. यासंदर्भात संबंधित अधिकारी श्री.सोनी यांना विचारले असता, "जेव्हा काम असते, तेव्हा कर्मचाऱ्यांना बोलावून घेतले जाते" असे म्हणून त्यांनी फोन बंद केला. मला देखील ही बातमी वाचल्यानंतर धक्का बसला. एकीकडे याठिकाणी राज्य शासनाचे अर्थसंकल्पाच्या संदर्भात अभिनंदन करीत असताना,दुसरीकडे महिला कर्मचाऱ्यांकडून ज्यापध्दतीने काम करुन घेण्यात आले. त्याबाबतीत मी सभागृहाला अशी विनंती करीन की, संबंधित विभागाच्या माननीय मंत्री महोदयांनी या अधिकाऱ्यांच्या विरोधात ताबडतोब कारवाई केली पाहिजे आणि महिला कर्मचाऱ्यांचा जो अपमान झालेला आहे, तशा प्रकारच्या घटना भविष्यामध्ये पुन्हा होणार नाहीत या दृष्टीने माननीय अर्थमंत्र्यांनी दखल घेतली पाहिजे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पाच्या बाबतीत एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे आणि ती म्हणजे सर्वसामान्य माणसाला केंद्र बिंदू समजून अर्थसंकल्प तयार करण्यात आलेला आहे की नाही? या अंतरिम अर्थसंकल्पामधून एक बाब स्पष्ट होते की, यामध्ये शेतकरी, शेतमजूर,कामगार, महिला, बालकल्याण किंवा विमुक्त जाती व भटक्या जमाती, मागासवर्गीय आणि आदिवासी या सर्वांच्या विकासाच्या दृष्टीने विचार करुन हा अर्थसंकल्प बनविलेला आहे. म्हणून खऱ्या अर्थाने लोकाभिमुख अशा प्रकारचा हा अर्थसंकल्प आहे असे मला म्हणावयाचे आहे. यातील ज्या ठळक बाबी आहेत, ज्यामध्ये जागतिक मंदीचा फटका संपूर्ण देशाबरोबरच महाराष्ट्र राज्याला बसत असताना 2009-2010 मध्ये 8462 कोटी रुपयांची महसूली घट अपेक्षित असताना सुध्दा, खरे म्हणजे आपल्याला विकासाचा दर 9 टक्के ठेवावयास हवा होता. परंतु तो आपण 6.7 टक्क्यापर्यंत ठेऊ शकू अशा प्रकारची खात्री आपल्याला या अर्थसंकल्पाने दिलेली आहे. ही गोष्ट खरी आहे की, अमेरिकेसारख्या राष्ट्राला जागतिक मंदीचे फटके बसत असताना 5 घरांपैकी 2 घरे विक्रीसाठी काढली जात आहेत आणि जवळपास 5 गाडयांपैकी 2 गाडया विक्रीसाठी काढल्या जात आहेत अशी दयनीय अवस्था आहे. चायना सारख्या महासत्तेमध्ये सुध्दा 3 कोटी पर्यंत बेरोजगार निर्माण झालेले आहेत आणि तेथील लोकांना नोकऱ्या गमवाव्या लागल्या आहेत. अशा परिस्थितीत या मंदीचा फटका आपल्या देशाला आणि राज्याला बसला असला तरी तो आकडा लाखाच्या संख्येमध्ये आहे.त्यामुळे आपल्याला हा फटका कमी प्रमाणामध्ये बसत आहे आणि मंदीच्या परिस्थितीला कंट्रोल

. . . .3 वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यामध्ये आपण यशस्वी होत आहोत अशा प्रकारची खात्री अंतरिम अर्थसंकल्पाच्या माध्यमातून दिलेली आहे असे दिसते.

सभापती महोदय, आपल्याला दोन-तीन ठळक गोष्टी विचारात घ्यावा लागतील. त्या म्हणजे राज्याचा महसूल 80,710 कोटी, महसूली खर्च 89,173 कोटीचा असून, त्यामध्ये विकास योजनांसाठी 26 हजार कोटी रुपये असल्याचे दिसत आहे. जिल्हा योजनेमध्ये जवळजवळ 500 कोटीची वाढ केलेली आहे. नक्षलग्रस्त भागांसाठी 1386 कोटी रुपयांचा कृती कार्यक्रम आखलेला आहे.मुंबईमध्ये 17,800 प्रकल्पबाधित कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात येणार असल्याचे या आराखडयामधून दिसत आहे. तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी ज्या "जीवनदायी योजने"बाबत उल्लेख केलेला आहे, त्यामध्ये शाळकरी मुलांचा सहभाग करण्याच्या बाबतीत निर्णय घेतलेला आहे. याठिकाणी संबंधित विभागाच्या माननीय मंत्री महोदया उपस्थित आहेत. मला त्यांना विनंती करावयाची आहे की, बी.पी.एल.आणि 20 हजार रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळतो. तसेच याठिकाणी माननीय वित्त राज्यमंत्री उपस्थित आहेत. माझी अशी सूचना आहे की, याबाबतीत उत्पन्नाची मर्यादा वाढविली पाहिजे आणि ती 20 हजार रुपयावरुन किमान 50 हजार रुपयापर्यंत वाढविण्यात आली पाहिजे. तसेच यामध्ये आणखी दुसरा मुद्दा समाविष्ट केला पाहिजे की, ज्या आजारांची यादी देण्यात आली आहे, त्याची व्याप्ती देखील वाढविली पाहिजे. तसेच ज्या हॉस्पिटलमध्ये "जीवनदायी योजने"चा लाभ मिळतो, त्या हॉस्पिटलची संख्या देखील थोडी वाढविली पाहिजे. कारण बीड येथे रहाणाऱ्या माणसाला औरंगाबादपर्यंत किंवा मुंबईपर्यंत येणे कठीण असते. म्हणून स्वामी रामानंद तीर्थ हॉस्पिटल आहे किंवा बीड मधील काही दवाखाने असतील, कारण हल्ली चांगल्या प्रकारचे दवाखाने सुरु झालेले आहेत. तर अशा प्रकारे जर दवाखान्यांची जी यादी आहे, त्याची व्याप्ती वाढविण्याच्यादृष्टीने काय करता येईल ? याकडे माननीय मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, अपंगांच्या योजनांसाठी 183 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. तसेच दहशतवादाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या खर्चामध्ये देखील भरघोस वाढ केलेली आहे. फोर्स-1 पथकासाठी चार कोटी रुपयांचा निधी देण्यात आलेला आहे. तसेच पोलीस दलातील 11,021 पदे भरण्यासाठी 107 कोटी रुपये दिलेले आहेत आणि पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी 166 ....

. . . .3 वाय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोटी रुपये दिलेले आहेत. यापेक्षा मी जास्त आकडेवारीमध्ये जाणार नाही. परंतु निश्चितपणे एक गोष्ट लक्षात येते की, हा अंतरिम अर्थसंकल्प लोकाभिमुख आहे.

सभापती महोदय, मी शासनाचे आणखी एका गोष्टीसाठी अभिनंदन करते. याबाबतीत सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी देखील उल्लेख केलेला आहे. मंत्रिमंडळामध्ये बीड जिल्हयासाठी निर्णय घेतला आणि परळी-बीड-नगर रेल्वेसाठी 505 कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच माननीय कृषी मंत्री श्री.शरदचंद्रजी पवार यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली येथे माननीय रेल्वे मंत्री श्री.लालूप्रसाद यादव यांच्याकडे सर्वपक्षीय शिष्टमंडळ गेले होते. त्यानंतर केंद्र शासनाने देखील यासाठी 200 कोटी रुपयांची भरीव तरतूद केली आहे. त्याबद्दल मी केंद्र शासनाचे अभिनंदन करते. याठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी एका बाबींचा उल्लेख केला आहे. त्यानुसार बचत गटाला चार टक्के दराने कर्ज मिळण्याच्या बाबतीत अडचणी निर्माण होत आहेत ही गोष्ट खरी आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

तरी शासन धोरणात्मक निर्णय घेते. त्यानंतर त्यामध्ये काही अडचणी आल्या तर मार्ग काढले जातात. महाराष्ट्र शासनाने 4 टक्क्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. त्याबाबतीत नाबार्डकडून आणि बँकाकडून काही अडचणी येत असतील तर त्यातून सुध्दा महाराष्ट्र शासन निश्चितपणे काही मार्ग काढल्याशिवाय राहणार नाही याची मला खात्री वाटते. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी जन्डर सेन्सिटिव्ह बजेटच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याची महाराष्ट्र शासनाने गांभीर्याने दखल घेऊन पुढच्या अधिवेशनात या विषयावर सांगोपांग चर्चा करण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

दि.26 नोव्हेबर, 2008 रोजी मुंबई शहरावर जो हल्ला झाला तो हल्ला खरे म्हणजे मुंबई शहरावरचा नव्हता तर देशावरचा हल्ला होता. 22 वरिष्ठ अधिकारी, पोलीस व इतर कर्मचारी, सुरक्षा अधिकारी, सुरक्षारक्षक, कमांडोसह 142 निष्पाप नागरिकांना आपला प्राण गमवावा लागला. 9 दशहतवाद्यांचा त्यामध्ये मृत्यू झाला आणि 1 दहशतवादी पकडण्यामध्ये आपण यशस्वी झालो. या सर्व मृत व्यक्तिच्या कुटुंबियांना 5 लाख रुपये आणि जखमींना 50 हजार रुपये तसेच इतर बरीच मदत देण्याचे शासनाने जाहीर केलेले आहे. नक्षलवाद्यां बरोबर झालेल्या चकमकीत जर पोलीस दलातील कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबियांना देखील याच पध्दतीने मदत करण्याचे शासनाने घोषित केलेले आहे. या गोष्टीचे आपण सर्वांनी स्वागत केले पाहिजे. आघाडी सरकारची चार वर्षे पूर्ण झालेली आहेत. या चार वर्षाच्या कालावधीमध्ये आपल्याला मंदीचा फटका न बसण्यामागे जर केणते कारण घडले असेल तर ते या देशाचे कृषि मंत्री श्री. शरदचंद्रजी पवारसाहेब यांनी केंद्रा गेल्यानंतर शेतीच्या संबंधात ज्या योजना राबविल्या, जी निती अवलंबिली त्यातील काही बाबींचा स्पष्टपणे उल्लेख होणे गरजेचे आहे. अन्नधान्याच्या संदर्भात देश स्वंयपूर्ण झालेला आहे. दोन वर्षापूर्वी आपल्याला गहू विकत घ्यावा लागत होता. केंद्र शासनाने धान्याच्या आधारभूत किंमती वाढवून दिल्या त्याचा परिणाम आपल्याला आज असा दिसतो की, या देशातील गोडावून्स पूर्णपणे भरलले आहेत. यावर्षी धान्य विकत घेतले तर ते कुठे ठेवावयाचे असा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे आपल्या आजूबाजूच्या सहा ते सात राष्ट्रांपैकी ज्याठिकाणी अन्नधान्याची कमी आहे त्याठिकाणी अन्नधान्याचा पुरवठा करण्याचे फार पुढचे पाऊल आपण उचललेले आहे. सभापती महोदय मला या ठिकाणी काही बाबी सभागृहाच्या लक्षात आणून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

द्यावयाच्या आहेत. अन्नधान्य सुरक्षा मिशनमार्फत आपण पाच हजार कोटीचा कार्यक्रम हाती घेतला आहे. गव्हाला आणि धान्याला ज्या आधारभूत किंमती दिल्या त्याबाबत मी सांगू इच्छिते. भाजपचे सरकार केंद्रस्थानी असताना गव्हाच्या आणि धान्याच्या असलेल्या आधारभूत किंमती आणि केंद्रात युपीएचे सरकार आल्यानंतर त्या आधारभूत किंमतीमध्येझालेला जो बदल आहे त्यासंदर्भात दोन-तीन आकडे सभागृहाला सांगणे मला गरजेचे वाटते. श्री. पाशा पटेल यांना शेतकऱ्यांबद्दल प्रेम आहे. त्यांनी सोयाबिनची परिस्थिती सांगितली. त्याचप्रमाणे द्राक्षाचे उत्पादन वायनरीसाठी केलेले आहे याबाबतीत सांगितलेले आहे. त्याचबरोबर चांगल्या बाबीसुध्दा या सभागृहासमोर मांडावयास पाहिजे होत्या. केंद्रात भाजपचे सरकार असताना गव्हाची आधारभूत किंमत 630 रुपये होती आज ती 1080 रुपये देत आहोत. तांदुळाची आधारभूत किंमत 440 रुपये होती आज ती 990 रुपये देत आहोत. मकेची आधारभूत किंमत 505 रुपये होती आज ती 840 रुपये देत आहोत डाळीची आधारभूत किंमत 1400 रुपये होती आज ती 1700 रुपये देत आहोत. शेंगदाण्याची आधारभूत किंमत 1400 रुपये होती आज ती आपण 2100 रुपये देत आहोत. सूर्यफूलाची आधारभूत किंमत 1250 होती आज ती आपण 2100 रुपये देत आहोत. कपासाची आधारभूत किंमत 1800 रुपये होती. त्यांनी आज या ठिकाणी कापसाच्या बाबतीत चुकीचे धोरण राबविण्यात येत आहे असे सांगण्याचा प्रयत्न केला आज आपण कापसाला 2850 रुपये भाव दिला आहे. खरे म्हणजे 3000 रुपये भाव मिळायला पाहिजे होता. शासनाची पण तशी भूमिका होती. पण प्रत्यक्षात तसे जरी घडू शकले नाही तरी 2850 रुपये भाव देण्यामध्ये आपण यशस्वी झालेलो आहोत. 98 टक्के कापूस शेतक-यांनी नाफेड आणि सी.सी.आय.ला घातलेला आहे. याबाबतीत अशी मागणी आलेली आहे की, अजून पंधरा दिवस ही खरेदी पुढे चालू ठेवावी. त्या मागणीला मी पाठिंबा देते. भाजपचे राज्य होते त्यवेळी कृषि विकासाचा दर दीड टक्के होता. आज आपल्या देशामध्ये साडेचार टक्क्यापर्यंत कृषि विकासाचा दर गेलेला आहे. सर्वात महत्वाची बाब अशी की, खताची सबसिडी 51000 कोटी रुपयावरुन 1लाख 19 हजार कोटी रुपये इतकी वाढलेली आहे. जगामध्ये मंदीचा परिणाम म्हणून गॅसच्या, डिझेलच्या, पेट्रोलच्या किंमती वाढल्या. आपल्याही देशामध्ये त्याला सुरवात झाली

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

परंतु आपण त्याला रोखू शकलो. जगातील गॅस,पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीती झालेल्या वाढीच्या तुलनेत भारतातील गॅस,प्रट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत झालेली वाढ नगन्य आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ....

चायना आणि अमेरिकेच्या तुलनेमध्ये सुध्दा नगण्य आहे. सबसिडी वाढवून हे रोखण्यामध्ये आपण यशस्वी ठरु शकलो आणि या सर्वांचा परिणाम म्हणून आज आपण मंदीची लाट या महाराष्ट्रामध्ये सुध्दा रोखू शकत आहोत. शेतकऱ्यांना जे कर्ज दिले जाते त्या कर्जाच्या व्याजाचा दर केंद्र सरकारने 7 टक्के पर्यंत आणण्याचा प्रयत्न केला परंतु महाराष्ट्र सरकारने तो दर 6 टक्क्यापर्यंत आणून त्यामध्ये स्वत:चा वाटा उचलून शेतकऱ्यांना अत्यंत चांगल्या पध्दतीने कर्ज उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या ठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्येची नेहमी चर्चा केली जाते. पूर्वी 85 हजार कोटी रुपयांचे पीक कर्ज दिले जावयाचे. परंतु श्री. शरद पवार साहेब कृषी मंत्री झाल्यानंतर 2 लाख कोटी रुपयांपर्यंत पतमर्यादा वाढवली आणि पीक कर्ज देण्यासाठी ती रक्कम उपलब्ध करुन दिली गेली. पण तरी सुध्दा आत्महत्या थांबल्या नाहीत. विदर्भामध्ये दौरा केला गेला. पण शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत. तेव्हा लक्षात आले की, जोपर्यंत या शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज घेता येणार नाही तोपर्यंत या आत्महत्या थांबणार नाहीत. शेतकऱ्यांना जर पुन्हा कर्ज घेता आले नाही तर आपण केवळ पतमर्यादा वाढवून चालणार नाही. जो पतपुरवठा आपण करणार आहोत तो उचलण्याची क्षमता शेतकऱ्यांमध्ये असली पाहिजे. त्यावेळी खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विचार पुढे आला. म्हणून श्री. शरद पवार साहेबांनी पहिल्यांदा अकोल्यामध्ये या गोष्टीची घोषणा केली आणि देशामधील शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करीत असताना पाच एकरच्या खालील जे जवळपास साडेचार कोटी शेतकरी आहेत त्यांना केंद्राच्या या कर्जमाफीचा फायदा झालेला आहे. महाराष्ट्रामध्ये 72 हजार कोटी रुपयांपैकी 7 हजार कोटी रुपये आपल्याला मिळालेले आहेत. त्यातील 6208 कोटी रुपये महाराष्ट्र शासनाने उचललेले आहेत. अशा पध्दतीने 38 लाख शेतकऱ्यांना केंद्र शासनाच्या कर्जमाफीचा फायदा झालेला आहे आणि 40 लाख शेतकऱ्यांना राज्याच्या कर्जमाफीचा फायदा झालेला आहे. मुळामध्ये आपण आधारभूत किंमती वाढवून देणे, कर्जमाफी आणि या शेतकऱ्यांच्या जवळ असलेली उत्पादकता, त्या शेतकऱ्यांजवळ श्रम करण्याची असलेली ताकद, त्या श्रमाला आपण प्रतिष्ठा मिळवून दिली आणि त्यांच्या मधील गुंतवणुकीच्या तुलनेमध्ये शेती मालाला भाव देण्याचा प्रयत्न केला. या वर्षी एकाही कार्यक्रमामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .....

दगडफेकीसारखा कांदे फेकण्याचा प्रकार घडलेला नाही. या सर्वांचा परिणाम म्हणून आपण असे बघतो की, आज आपला कृषी क्षेत्रातील विकासाचा दर साडेचार टक्केपर्यंत जाऊ शकला आहे. महाराष्ट्रामध्ये सुध्दा या मंदीची लाट रोखण्यामध्ये आपण जे यशस्वी झालो त्याचे मूलभूत कारण म्हणजे या देशामध्ये पूर्वी कधीही राबविले गेले नव्हते असे कृषी विषयक धोरण राबविले गेले. चायनाच्या तुलनेमध्ये सुध्दा आज आपला देश आणि आपला महाराष्ट्र या मंदीला रोखण्यामध्ये यशस्वीपणे पुढे गेलेला आहे. महागाई निर्देशांक जो 12 ते 13 टक्केपर्यंत गेलेला होता तो आता 3.36 टक्क्यावर आणण्यामध्ये आपण यशस्वी झालेलो आहोत. यासंदर्भामध्ये मला एक गोष्ट सांगावयाची आहे की, नेहमी प्रत्येक गोष्ट नकारात्मक दृष्टीने बघू नये. सत्ताधारी पक्ष असेल किंवा विरोधी पक्ष असेल, ही दोन्ही शासनाची, प्रशासनाची चाके आहेत. न्याय व्यवस्था असेल किंवा शासन व्यवस्था असेल ही व्यवस्था लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी असते. ही व्यवस्था चालवित असताना लोकांसमोर नकारात्मक बाब जाणार नाही याची दक्षता घेण्याची भूमिका दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची असली पाहिजे. म्हणून 4 टक्के व्याजदराचा प्रश्न असेल, कर्जमाफीचा प्रश्न असेल, जे चांगले आहे त्याला चांगले म्हटले पाहिजे. परंतु एकीकडे ज्यांनी महाराष्ट्राचा गुजरात करण्याचे स्वप्न पाहिले, ज्यांच्याकडे विकासाचा एकही मुद्दा नाही, ज्यांच्याकडे बाबरी मशीद आणि रामाचा सेतू याच्या पलीकडे कोणताही मुद्दा नाही, जातीजातींमध्ये भांडणे लावावयाची, धर्माधर्मामध्ये भांडणे लावावयाची, देवादेवांमध्ये भांडणे लावावयाची आणि स्वत: मात्र सत्तेवर येण्याचे स्वप्न पाहावयाचे, विकासाचा कोणताही मुद्दा समोर नसताना या प्रवृत्तीपासून महाराष्ट्राचे रक्षण करणे हे या आघाडी सरकारचे काम आहे. या महाराष्ट्रातील शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार घेऊन जाणारी जनता, तुकोबारायांचा, ज्ञानेश्वर माऊलीचा विचार घेऊन जाणारी महाराष्ट्रातील जनता निश्चितपणे या धर्मवेड्या प्रवृत्तीपासून महाराष्ट्राचे संरक्षण केल्याशिवाय राहणार नाही. आज या देशातील शेतकरी सुध्दा या कृषी विषयक धोरणामुळे सक्षम झालेला आहे. त्यांच्यामध्ये राजकारणाबाबत अवेअरनेस आलेला आहे. भटक्या विमुक्त समाज असेल, मागासलेला समाज असेल, विद्यार्थी असतील, कर्मचारी असतील, महिला असतील या सर्वांसाठी पूरक धोरणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .....

राबविल्यामुळे येणाऱ्या भविष्यकाळात सुध्दा ते या आघाडी सरकारबरोबर राहतील आणि जातवेड्या आणि धर्मवेड्या लोकांना त्यांची जागा दाखवून दिल्याशिवाय राहणार नाही याची खात्री मला या ठिकाणी व्यक्त करावयाची आहे. मला आपण बोलण्याची संधी दिली त्याबद्दल पुन्हा एकदा मी आपले आभार मानते. माननीय मंत्रिमहोदयांना पुन्हा एकदा विनंती करते की, महिला कर्मचाऱ्यांवर ज्या अधिकाऱ्यांनी अन्याय केलेला आहे त्याची चौकशी करावी. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पूरक मागण्यांवरील आज चर्चा होणार आहे काय ?

तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव) : आजच्या कामकाजपत्रिकेवर पुरवणी मागण्यावरील चर्चेचा विषय आहे. अद्याप अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा संपलेली नाही. माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह ही चर्चा आज संपवायची आहे. त्यानंतर पुरवणी मागण्यावरील चर्चेला सुरुवात करण्यात येईल. उद्या विशेष बैठक घेऊन त्या बैठकीत ही चर्चा घेण्यात येईल.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2009-2010चा अर्थसंकल्प माननीय वित्त मंत्री महोदय श्री. दिलीप वळसे-पाटील आणि वित्त राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी या विधिमंडळाला सादर केलेला आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी आणि या अंतरिम अर्थसंकल्पाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हा अंतरिम अर्थसंकल्प एका आगळया वेगळया परिस्थितीमध्ये, जागतिक मंदी आणि आचारसंहितेच्या काळामध्ये मांडला गेलेला आहे. असे असताना अतिशय चांगल्या प्रकारचा अर्थसंकल्प शासनाने मांडलेला आहे. राज्य योजनेचे आकारमान 26 हजार कोटी पर्यन्त वाढविण्याचा मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला आहे त्याबद्दल शासनाला खास धन्यवाद द्यावेसे वाटतात. हा अंतरिम अर्थसंकल्प असल्यामुळे अनेक नवीन बाबींचा समावेश यामध्ये केलेला नाही असे सांगण्यात आले. परंतु ह्या नवीन बाबींचा उल्लेख अनेक सन्माननीय सदस्यांनी केलेला असून त्याचा मी पुनरुच्चार करणार आहे. हा अंतरिम अर्थसंकल्प मांडत असताना चलनवाढीचा दर 2.43 टक्क्यापर्यन्त कायम ठेवण्याचा केन्द्र आणि राज्य शासनाने प्रयत्न केलेला असल्यामुळे महागाई निश्चितच कमी झालेली आहे. त्यामुळे पुढच्या काळात महागाई संबंधीची चर्चा आपणाला येथे करावी लागणार नाही.

सभापती महोदय, 26 नोव्हेंबर 2008 रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये 22 पोलीस व पोलीस अधिकारी आणि 122 नागरिक मृत्यूमुखी पडले. या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर आणि राज्याच्या सागरी किना-याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून शासनाने उपाययोजना केलेल्या आहेत. माझे सहकारी सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांना मी सांगू इच्छितो की, हे संवेदनशील सरकार असल्यामुळेच दहशतवादी हल्ल्यानंतर लगेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख आणि उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी राजीनामे दिले. या आघाडी सरकारच्या मंत्रिमंडळामध्ये जबाबदारीने काम करणा-या शासनाच्या प्रतिनिधींचे मी अभिनंदन करतो. राज्य शासनाने राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या धर्तीवर राज्यामध्ये "फोर्स वन" गटाची स्थापना करण्यासाठी तरतूद केलेली आहे. दहशतवादी हल्ल्यामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या पोलीस जवानांच्या कुटुंबीयांना तातडीने सानुग्रह अनुदान देण्यात आले. ही बाब पोलीस दलाचे मनोबल वाढविणारी आहे. पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्याचे राज्य शासनाने ठरविलेले असून ही बाब अत्यंत

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महत्वाची आहे. राज्य सरकारच्या 14 लाख कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. यानुषंगाने मी शासनाकडे अशी मागणी करतो की, अनुदानित शाळांना वेतनेतर अनुदान ताबडतोबीने दिले जावे. वेतनेतर अनुदान मिळण्याच्या संदर्भात सर्व संस्थाचालकांनी आंदोलन केले होते. तसेच इमारतीचे भाडे दिले नाही तर एसएससी परीक्षेसाठी इमारत न देण्याचा निर्णय देखील संस्थाचालकांनी घेतलेला होता. शासनाने 2002 पासून इमारतीचे भाड्यापोटीचे पैसे दिलेले नाहीत. हे पैसे ताबडतोबीने दिले जावेत अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, शिक्षण सेवकांचा पगार फक्त 3 हजार रु. आहे. केन्द्र शासनाप्रमाणे 6वा वेतन आयोग आपण लागू करणार असल्यामुळे या शिक्षण सेवकांचा पगार देखील 5 ते 6 हजार रुपये इतका केला पाहिजे.

....नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार....

आय.टी.सी.जे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र आहेत, त्या ठिकाणी फक्त पाच हजार शिक्षक काम करीत आहेत. त्यांना वेतन अनुदान मिळण्यासाठी आम्ही नागपूर विधानभवनावर मोठा मोर्चा काढला होता. त्यावेळी माननीय तंत्र शिक्षण मंत्र्यांनी वेतन अनुदान देण्याची मागणी मान्य केली होती. यासंबंधीची सर्व फाईल पॉझिटिव्ह होती. परंतु नंतर अचानक लोकसभेची आचारसंहिता जाहीर झाली, त्यामुळे ती मागणी पूर्णत्वास आली नाही. माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, आमच्या आय.टी.सी.च्या शिक्षकांचे वेतन अनुदान आचारसंहिता संपल्याबरोबर मंजूर करावे. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी शेतक-यांच्या कर्जमाफीचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला. खरे तर आपल्या भारत देशाचे कृषि मंत्री माननीय श्री. शरदराव पवार यांचे नाव ग्रिनीज बुकात नोंदवावे लागेल. त्यांनी 72 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी शेतक-यांना दिली. पत पुरवठा तिप्पट केला. 2 लाख 80 हजार कोटी रुपयांपर्यंत पत पुरवठा केला. त्यांनी या देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केले. हरितक्रांतीचा नेता म्हणून आज त्यांची गणना होते आहे म्हणून त्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. महाराष्ट्रातील 78 लाख 15 हजार शेतक-यांसाठी 14 हजार कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. त्याचप्रमाणे संपूर्ण देशातील शेतक-यांसाठी 72 हजार कोटी रुपयांचे वितरण करण्यात त्यांनी केले. कमी दरात शेतक-यांना कर्ज देण्याची व्यवस्था देखील निर्माण केली आहे ही गोष्ट अतिशय महत्वाची आहे. शेतक-यांच्या व्याज दरात सवलत देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 243 कोटी रुपयांची प्रोव्हीजन केलेली आहे. त्यामुळे मी शासनास खास धन्यवाद देतो.

सभापती महोदय, कांदा हा काही फक्त सभेमध्ये मारण्यासाठी उपयोगी पडतो अशी परिस्थिती नाही. नाशिक जिल्हयामध्ये कांद्यांचे उत्पादन मोठया प्रमाणात होते. ज्यावेळी कांदा पिकाचे मोठया प्रमाणात उत्पादन होते त्यावेळी कांद्याचे भाव अतिशय कमी होतात. कांदा उत्पादकांसाठी शासनाने प्रति क्विंटल 50 रुपये अनुदान दिले. यासाठी 80 कोटी रुपयांची तरतूद केली. त्यामुळे देखील मी शासनास धन्यवाद देतो.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा उपस्थित नाहीत. नाशिक हे वाईन ग्रेस कॅपीटल आहे. मला माननीय मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे की, दिनांक 14 आणि 15 मार्च, 2009 रोजी नाशिक जिल्हयात जबरदस्त वादळी पाऊस झाला. या वादळी पावसामुळे अनेक द्राक्ष बागायतदारांचे प्रचंड प्रमाणात द्राक्ष पिकांचे नुकसान झाले आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार....

नाशिक तालुक्यात 24 गावांमध्ये जवळ जवळ 1 हजार हेक्टर क्षेत्र द्राक्ष, 100 हेक्टर गहू आणि 50 हेक्टर हरभरा एवढया पिकांचे नुकसान झालेले आहे. दिंडोरी तालुक्यात सुध्दा जवळ जवळ 20 गावांमध्ये 500 हेक्टर क्षेत्र द्राक्ष, 250 हेक्टर क्षेत्र गहू, 100 हेक्टर क्षेत्र हरभरा एवढया पिकाचे नुकसान झाले आहे. निफाड तालुक्यातील 22 गावांमध्ये देखील या वादळी पावसामुळे या तिन्ही पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. या वादळी पावसामुळे नाशिक जिल्हयात जवळपास 25 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. त्या नुकसानीचे ताबडतोबीने पंचनामे करण्यात येऊन नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई तात्काळ देण्याची व्यवस्था करावी अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, ग्रेस वाईनच्या बाबतीत मघाशी या सभागृहात चर्चा झाली. मागचा हंगाम जागतिक मंदीचा असल्यामुळे मागच्या वर्षी जी वाईन तयार झाली, ती वाईन संपूर्णपणे विकली गेली नाही. मागच्या वर्षाची 65 लाख लिटर वाईन शिल्लक राहिली होती, ती वाईन या वर्षी विकण्यामध्ये अडचण निर्माण झाली आहे. सन्माननीय सदस्य श्री.सय्यदा पाशा यांनी सांगितले की, द्राक्ष बागायतदारांकडे कोणी बघत नाही. नाशिक जिल्हयातील वाईनरीवाल्यांनी द्राक्ष बागाययतदारांचे कॉन्ट्रक्टचे रेट होते ते रेट 5 रुपयांनी कमी करु असे सांगितले. ही गोष्ट माझ्या निदर्शनास आणून दिल्यानंतर सर्व द्राक्ष बागायतदारांची एक बैठक घेतली आणि वाईनरीज्च्या मालकांना सज्जड दम दिला. जर आपण दर कमी केला तर तुमच्यावर आम्ही कारवाई करु. वाईनरीज् मालकांनी जी कपात सुचविली होती, ती कपात त्यांनी मागे घेतली.....

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नोंदी

डॉ.वसंत पवार.....

आजही ज्यांनी ज्यांनी कॉन्ट्रॅक्ट केलेले आहेत त्यांचे कॉन्ट्रॅक्ट सर्व वायनरीचे मालक पाळत आहेत. मग ती कॅबरनेट, सोविनन, सिराज, चार्डोनी वाईन असेल, थॉम्पसन किंवा शरद सिडलेस द्राक्ष असतील, त्याबाबतचे कॉन्ट्रॅक्ट योग्यरित्या चालू आहेत. परंतु यावेळी द्राक्ष उत्पादन जवळजवळ 5 हजार हेक्टर इतके जास्त झालेले आहे. आपल्या राज्यात 58 वायनरी सुरु झालेल्या असल्या तरी त्यांच्याकडे योग्य पध्दतीची प्रोसेसिंग व्यवस्था नाही. वायनरींना साठवणूक करण्यासाठी लागणारी बॅरल्स अधिक प्रमाणावर पुरविण्याची योजना शासनाने हाती घेणे गरजेचे आहे. ग्रेसपासून बेदाणा तयार करण्यास प्रोत्साहन देणे, ग्रेसपासून स्पिरिट तयार करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. निफाड सहकारी साखर कारखान्याने ग्रेसपासून स्पिरिट तयार करण्याची तयार केली आहे. परंतु शासनाने परवानगी दिली तर द्राक्षापासून स्पिरिट करण्याच्या दृष्टीने जे द्राक्षाचे अधिक उत्पादन झाले आहे ते वापरात येऊन द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांना न्याय देता येईल आणि त्यातून निश्चितपणे द्राक्ष वायनरींना चांगल्याप्रकारे पैसा मिळू शकतो.

सभापती महोदय, मी आपल्यामार्फत शासनाचे अभिनंदन करतो. शासनाने रस्त्यांची चौपदरीकरणाची कामे हाती घेतली आहेत. नाशिक-पुणे-मुंबई गोल्डन ट्रँगलचे काम दोन महिन्यात पूर्ण होण्याच्या मार्गावर असून यासाठी 6678 कोटी रुपयांची खाजगीकरणातून गुंतवणूक केलेली आहे. शासनाने सुध्दा 1766 कोटी रुपयांची गुंतवणूक या कामासाठी केलेली आहे. पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून सार्वजनिक बांधकाम विभागाने चांगल्या प्रकारचे काम केलेले आहे.

सभापती महोदय, वीज निर्मितीच्या क्षेत्रात महाराष्ट्र शासनाने फार चांगले निर्णय घेतले आहेत. जो एकूण खर्च आहे त्याच्या 20 टक्के निधी वीज निर्मितीसाठी वापरण्यात येणार आहे. साखर कारखान्यांच्या माध्यमातून सह वीजनिर्मिती यासाठी 5 टक्के ग्रेसने 1000 मे.वॅट वीज निर्मिती केली जाणार आहे.

सभापती महोदय, जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान योजना ही केंद्र शासनाची योजना असून या योजनेच्या माध्यमातून 1894 कोटी रुपये केंद्र शासनाने राज्य शासनाला उपलब्ध करुन दिले आहेत. राज्य शासनाने देखील 400 कोटी रुपये या योजनेंतर्गत हाती घेतलेल्या कामांसाठी

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार.....

उपलब्ध करुन दिले आहेत. राज्यातील अनेक महानगर पालिकांप्रमाणेच नाशिक महानगर पालिकेच्या क्षेत्रात देखील या योजनेची अंमलबजावणी सुरु आहे. ही कामे अधिकाधिक जोमाने पूर्ण होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पावले उचलण्याची गरज आहे.

सभापती महोदय, शाळातील मुलांना जीवनदायी योजनेमध्ये सहभागी करुन घेतल्याबद्दल मी शासनाने मन:पूर्वक अभिनंदन करतो. माननीय वित्तमंत्री हे पूर्वी उच्चशिक्षण व ऊर्जा विभागाचा कारभार पहात होते. त्यांच्या अनुभवातून त्यांनी अत्यंत चांगल्याप्रकारे काम केले आहे. 2004-05 या वर्षात राज्यात 150 अभियांत्रिकी महाविद्यालये होती. 2008-09 मध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयांची संख्या 221 इतकी झालेली आहे. या महाविद्यालयांची एकूण प्रवेश क्षमता 71 हजार इतकी आहे. म्हणजे प्रवेश क्षमता 25 हजार इतक्या विक्रमी संख्येने वाढली आहे. महाराष्ट्रातील 25 हजार मुलांना अभियांत्रिकी क्षेत्रात प्रवेश मिळणार आहे. त्याचप्रमाणे डिप्लोमासाठी जवळपास 71 हजार विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता असून महाराष्ट्रातील 35 हजार विद्यार्थ्यांना डिप्लोमाचे शिक्षण देता येणार आहे.

सभापती महोदय, पंढरपूर आणि तुळजापूर या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी शासनाने प्राधिकरणाची निर्मिती करण्याचे ठरविले आहे. मी शासनाकडे मागणी करतो की, नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी शासनाने प्राधिकरण निर्माण करावे. नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा भरतो. त्र्यंबकेश्वर हे ज्योतिर्लिंगाचे स्थान आहे तसेच नाशिकमध्ये काळाराम हे प्रसिध्द मंदिर आहे. प्रभू रामचंद्राच्या या स्थानी दिनांक 4 व 5 एप्रिल, 2009 रोजी रामरथाची यात्रा आयोजित केलेली आहे. आपण सर्वांनी त्याठिकाणी निश्चित यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

(नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार .....

महोदय, शासनाने महिला बचत गटांसाठी 4 टक्के दराने कर्जवाटप करण्याचा जो निर्णय घेतला तो अत्यंत अभिमानास्पद आहे. शालेय पोषण आहार योजनेमध्ये देखील सर्व बचत गटांना सहभागी करुन घेण्याचा शासनाचा प्रयोग भूषणावह असाच आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे जिल्हा परिषदांना यापूर्वी जास्त निधी मिळत नव्हता पण या बजेटमध्ये जिल्हा परिषदांसाठी 2500 कोटीची तरतूद शासनाने केली त्याबद्दल शासनाला मी धन्यवाद देईन. आणि या सगळ्या बाबतीत महत्वाचे असे की, महाराष्ट्र शासनाने शाहू, फुले, आंबेडकरांच्या ध्येयवादाप्रमाणे सर्वसामान्य माणसांसाठी अर्थसंकल्प मांडला, अत्यंत संवेदनशील असा अर्थसंकल्प मांडला त्याबद्दल मंत्रिमंडळ व महाराष्ट्र शासनाचे पुन्हा एकदा अभिनंदन करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : महोदय, सन 2009-10 च्या अंतरिम अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, काही महत्वाच्या बाबींकडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधणार आहे. शासनाने सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काल अंतरिम अर्थसंकल्पाच्या माध्यमातून राज्यासाठी तरतूद सादर केली. मला त्यासंदर्भात असे सुचवावयाचे आहे की, जी तरतूद सभागृहात घोषित केली त्यामध्ये केंद्रशासनाचा हिस्सा किती आणि राज्यशासनाचा हिस्सा किती आहे यासंबधीचा उल्लेख नाही. माझ्या माहितीप्रमाणे 2/3 पेक्षा जास्त रक्कम ही केंद्रशासनाची असते आणि फार थोडी रक्कम राज्यशासनाची असते. म्हणून त्याचे पूर्ण क्रेडिट राज्यशासनाला घेता येणार नाही असेही या निमित्ताने मला लक्षात आणून द्यावयाचे आहे. त्यापेक्षा गंभीर असे की सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून राज्यात शाळांच्या इमारती बांधतो. पण प्राथमिक शाळांमधील विद्यार्थी मात्र इंग्रजी शिक्षणाकडे वळू लागला. अशा प्रकारे कमर्शिअलायझेशन ऑफ एज्युकेशन, शिक्षणाच्या बाजारीकरणाकडे हा विद्यार्थी डायव्हर्ट होऊ लागला. त्यामुळे जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळा दिवसेदिवस नुसत्याच रोडावत चालल्या अशातला भाग नाही तर प्रत्येक खेड्यात पूर्वी मुलांचा एक आणि मुलींचा एक असे स्वतंत्र वर्ग असायचे त्यांचे आता एकत्रिकरण होत आहे तर काही ठिकाणी विसर्जीकरण होत आहे. खेड्यापाड्यात मुलींच्या शाळा बंद पडल्या आहेत आणि एका बाजूने केंद्र शासनाच्या भरवशावर शाळांच्या मोठमोठ्या इमारती बांधत आहोत ही तफावत दूर करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे जिल्हापरिषदांच्या जुन्या शाळांच्या दुरुस्तीसाठी मात्र राज्यशासनाच्या निधीचा वापर करावा लागतो. म्हणून अशा जुन्या इमारतींची दुरुस्ती देखील सर्व शिक्षा अभियानातून करण्याची व्यवस्था करावी, अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, राज्यातील तंत्रशिक्षणासंबंधीचा उल्लेखही या अर्थसंकल्पात केलेला आहे. त्या माध्यमातून शासनाने राज्यातील 150 इंजिनिअरिंग कॉलेजेसमध्ये वाढ करुन ती संख्या आता एकूण 221 एवढी झाली आहे. त्यामुळे इंजिनिअरिंगमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्येही पर्यायाने वाढ होत आहे. पण यामध्ये राज्यशासनाचा रोल किती आहे तर स्टॅट्युटरी सँक्शन आपल्या सरकारचे आणि इन्व्हेस्टमेंट मात्र फारच कमी आहे. यात काम करणाऱ्या प्राध्यापक वर्गाला मात्र वेतन अतिशय कमी आहे. अशा प्रकारे कॉलेजेसची क्वांटिटी वाढली मात्र क्वालिटीत फरक पडला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे.....

नाही. या कॉलेजेसच्या संदर्भातील एआयसीटीईचा रिपोर्ट बघितला तर ही कॉलेजेस बंद करावीत असे चित्र निर्माण झाले आहे आणि विद्यार्थी प्रवेश घेणे सुध्दा बंद करण्याच्या मार्गावर आहेत. म्हणून केवळ क्वांटिटी वाढविण्यापेक्षा क्वॉलिटी कंट्रोल करणारी यंत्रणा निर्माण केली तरच त्याचा फायदा होणार आहे. अन्यथा दुष्परिणामच भोगावे लागतील. त्याचबरोबर यातून सरकारचा महसूल वाढेल काय इकडे मात्र शासनाचे लक्ष नाही. विद्यार्थ्यांची फी सतत वाढत आहे परंतु त्यासाठी यंत्रणा कोणतीच नाही, ही यंत्रणा उभी करावी लागणार आहे. खऱ्या अर्थाने यातून आपण शिक्षण सम्राटच निर्माण करीत आहोत आणि त्यांनाच आपले सरकार समर्थन देत आहे परंतु त्याचा परिणाम काय होत आहे याकडे शासनाचे लक्ष नाही. अशा प्रकारे भरमसाठ फी भरुन जे विद्यार्थी बाहेर पडत आहेत त्यामुळे समाजाचा पायाच कुठेतरी बदलतो की काय अशी परिस्थिती आहे. कारण हे विद्यार्थी समाजाला सेवा देण्याच्या दृष्टीने बाहेर पडत नाहीत तर प्रत्येक सेवेचे पैशात मोजमाप करण्याचीच मानसिकता या शिक्षणातून त्यांची तयार होत आहे. म्हणून कॉलेजेस निर्माण करण्याबरोबरच शासनाने या परिस्थितीकडे सुध्दा लक्ष देण्याची गरज आहे. आपल्या राज्यात आय.टी.आय. ची संख्या वाढल्याचा उल्लेख अर्थसंकल्पात केलेला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे...

आयटीआयची संख्या वाढली असा उल्लेख करण्यात आलेला आहे. आयटीआयची संख्या वाढलेली आहे ही गोष्ट खरी आहे. मी अनेक आयटीआयला भेटी दिलेल्या आहेत. त्या आयटीआय मध्ये सध्या जे ट्रेड चालू आहेत त्या ट्रेडचे शिक्षण देणारा 50 टक्के स्टाफ सुध्दा त्या ठिकाणी उपलब्ध नाही. काही आयटीआयमध्ये 5-7-10 ट्रेड सुरु आहेत परंतु त्या ठिकाणी एक सुध्दा हेडऑफ नाही. त्यामुळे अशा ठिकाणी कसे तरी पुलऑन करण्याचे काम सुरु आहे. आयटीआयमध्ये योग्य त्या स्टाफची नेमणूक होण्याची आवश्यकता आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की, आयटीआयचा जो सिलॅबस फेलिंग आहे तो आऊट डेटेड आहे. त्यामुळे या बाबीकडे सुध्दा शासनाने लक्ष देण्याची नितांत गरज आहे. या आयटीआयमधून शिकून जो विद्यार्थी बाहेर पडतो त्याला अप्रेंटीस शिफ्ट देऊन त्याला उभे करण्यामध्ये शासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे. "शहाणे करुन सोडावे सकल जन" हे समर्थ रामदास पंथी तत्वज्ञान शासनाने अंगीकारले पाहिजे असे मला वाटते. आयुटीआयमधील मुलांना काही तरी शिक्षण देऊन आपण सोडून देत आहोत. आपण ज्या खाजगी आयटीआय दिलेल्या आहेत त्या ठिकाणी प्रचंड मनी मेकिंग होत आहे. खाजगी आयटीआयवर शासनाचे कोणत्याही प्रकारचे कंट्रोलींग नाही. मनी मेकींग बिझनेस असल्यामुळे खाजगी आयटीआय सुरु करण्याची मागणी शासनाकडे वाढलेली आहे त्यामुळे याकडेही शासनाने लक्ष देण्याची नितांत आवश्यकता आहे. जागतीक बँक प्रकल्पाअंतर्गत औद्योगिक प्रशिक्षणाचा दर्जा वाढविणे असा उल्लेख झालेला आहे. या ठिकाणी 75 आयटीआयचा उल्लेख झालेला आहे. 407 शासकीय आयटीआय असतील तर 407 आयटीआयमध्ये 75 आयटीआयचा त्यामध्ये समावेश झाला. यामध्ये आपली वील पॉवर कुठे तरी कमी पडलेली आहे, आमची ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ल्याकूना निर्माण झाला आहे असे मला वाटते. आम्ही जास्तीत जास्त आयटीआयचा त्यामध्ये का समावेश करु शकलो नाही याचा सुध्दा शोध घेण्याची आवश्यकता आहे. या सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील आयटीआयचा दर्जा वाढविण्यासाठी जर फंडींग मिळणार असेल तर ती चांगली गोष्ट होईल असे मला वाटते. आयटीआयच्या फंडींगमध्ये आपण कमी पडलो आहोत असेच आपल्याला म्हणावे

सभापती महोदय, कायम विना अनुदान तत्वाच्या संदर्भात शासनाने 17 डिसेंबर, 2008 रोजी या सभागृहात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आणि शिक्षण मंत्र्यांनी आठ दिवसात "कायम"

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे...

हा शब्द काढून टाकण्यात येईल असा शब्द या सभागृहाला दिला होता. हे शासन वेळोवेळी घोषणा करीत आहेत परंतु प्रत्यक्षात मात्र "कायम" हा शब्द काढून टाकण्यासाठी काहीही हालचाल झालेली नाही. उलट 3-4 वेळेला किती पैसा लागेल, कधी लागेल यासंर्भात मात्र माहिती संकलित करण्यात आली. ज्या कायम विना अनुदान तत्वाच्या शाळा आहेत त्या ठिकाणच्या संस्थाचालकांची, शिक्षकांची तसेच विद्यार्थ्यांची "कायम" हा शब्द काढून टाकण्याच्या संदर्भात हे शासन दिशाभूल करीत आहे.

सभापती महोदय, या महाराष्ट्रातील एम.ए.,बी.एड. झालेला शिक्षक वर्गाच्या शिक्षकांची संख्या सुमारे एक लाखाच्या घरात आहे. हे शिक्षक 5-10 वर्षापासून पाच पैसे न घेता काम करीत आहेत. आज जशा शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत तशाच आत्महत्या शिक्षक सुध्दा करु शकतील अशी परिस्थिती आता निर्माण झालेली आहे. एम.ए.,बी.एड. शिक्षण घेतलेल्या तरुणांचे काय चुकले असा त्यांच्या समोर प्रश्न निर्माण झालेला आहे. या शिक्षकांना वाटते की, आज मला पगार मिळेल, उद्या पगार मिळेल असे म्हणून ते गेल्या 5-10 वर्षापासून राबत आहेत. त्यामुळे यासंदर्भात मी शासनाला अशी विनंती करतो की, शिक्षकांच्या संदर्भातील वेळ अजूनही गेलेली नाही. या अंतरिम बजेटमध्ये शिक्षकांच्या संदर्भात अजून काही गोष्टींचा समाविष्ट करता येत असेल तर तो निश्चित करावा. या शाळा प्राथमिकच्या आहेत, माध्यमिकच्या आहेत, उच्च माध्यमिकच्या आहेत तसेच अनुदानित शाळेच्या वाढीव तुकडयांच्या संदर्भात आहे. हा मोठा बल्क आहे. त्यामुळे यासंदर्भात निश्चितपणे तरतूद करण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, वाढीव वेतनेतर अनुदानाच्या संदर्भात मंत्रिमंडळाची एक उपसमिती नेमली गेली. 12 टक्के,9 टक्के, 6टक्के नाही परंतु 5 टक्के देण्याचे निश्चित झाले परंतु अद्यापपावेतो यासंदर्भात काहीही तरतूद करण्यात आलेली नाही. मधाशी सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार साहेबानी वेतनेतर अनुदानाच्या संदर्भात या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. डॉ. वसंत पवार हे मोठया संस्थेचे प्रमुख आहेत परंतु ज्या छोटया संस्था आहेत, सिंगल स्कूल मॅनेजमेंट आहेत त्यांना खडू फळयासाठी सुध्दा पैसे मिळत नाहीत अशी परिस्थिती आहे. त्यामुळे खडू-फळयाच्या संदर्भात काय करावयाचे असा त्यांच्यापुढे प्रश्न पडलेला आहे. त्यामुळे वेतनेतर अनुदानाची तरतूद करण्याची नितांत गरज आहे असे मला या ठिकाणी सांगावेसे वाटते.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे...

सभापती महोदय, महाराष्ट्र छात्रसेनेचा प्रयोग 1995-96 मध्ये सुरु झाला. 1995-96 मध्ये शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना जे कपडे दिलेले आहेत त्यांना 12 वर्षापासून दुसरे कपडे सुध्दा देण्यात आलेले नाही. ही योजना आता फक्त नाममात्र सुरु आहे. त्यामुळे एमसीव्हीला निधी उपलब्ध करुन देऊन ही योजना बळकट करण्याची नितांत गरज आहे. विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यामुळे कार्यभार वाढलेला आहे आणि कार्यभार वाढल्यामुळे पदे वाढलेली आहेत. संपूर्ण राज्यात 700 ते 800 पदे वाढलेली आहेत. या वाढीव पदांना आणि तुकडयांना मान्यता देण्याचे अधिकार शासनाने आपल्याकडे घेतलेले आहेत. 18 ऑगस्ट रोजी शासनाने 410 वाढीव तुकडयांना अनुदानि त केलेले आहे. परंतु त्यांच्यासाठी अद्यापपर्यंत निधीची तरतूद केलेली नाही. अजून 700-800 तुकडयांची माहिती संकलित करण्याचा घोळ सुरुच आहे. यासंदर्भात 3-4 वेळेस आदेश निघाले परंतु यासंदर्भात काहीही माहिती निघाली नाही. सेंट्रल बिल्डिंग आणि आमचे प्रशासन नक्की काय करत आहे हा एक मोठा विषय आहे.

यानंतर श्री.भारवि..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे.....

मंत्रालयातून आदेश जातात आणि ते सेंट्रल बिल्डींगमध्ये कुजत पडून असतात. स्थानिकस्तरावर आमचे प्रशासन निद्रीत असते. मनिमेकींग करण्याकरिता टपलेले असते. तेव्हा तुकड्या आणि वाढीव पदांना मान्यता देण्याचे काम तातडीने, नितांत करणे आवश्यक आहे. त्यांना देखील आपल्याला तरतूद मिळवून द्यावी लागेल. कारण तेथे राबणारा शिक्षक गेली सात - आठ वर्ष राबतो आहे.

सहाव्या वेतन आयोगासंबंधी मी दोन मुद्दे उपस्थित करणार आहे. बारावी पर्यंतच्या कायम विनाअनुदानित शाळांसंबंधी शासनाने कोणतेही शौरी शास्त्र करू नये. हायर एज्युकेशनसंबंधी आपण तूर्तास नंतर विचार करू. पण प्रायमरी,ज्युनियर आणि सिनियर यांना आपण तातडीने अनुदान दिले पाहिजे. पाचव्या वेतन आयोगातील त्रुटी काढण्यासंबंधी फार गलथान कारभार आहे. मी एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधणार आहे. शासनाने पाचवा वेतन आयोग 1 जानेवारी 1996 पासून लागू केला. आयटीआयला पाचवा वेतन आयोग लागू करण्यासाठी सन 2004 चे साल उजाडले. ज्युनियरसाठी सन 2002 साल उजाडले. म्हणजे पाचवा वेतन आयोगसुद्धा राज्यातील शिक्षकांना सन 1996 मध्ये मिळाला नव्हता. फक्त 50-60 टक्के शिक्षकांना सुरूवातीलाच पाचवा वेतन आयोग मिळाला होता. 40 टक्के शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगापासून वंचित ठेवण्यात आले आहे किंवा त्याला कुठे तरी घाटा घातला आहे. हे सर्व दुरूस्त करून सहावा वेतन आयोग लागू केला पाहिजे. केंद्र शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना 24 प्रकारचे भत्ते लागू करण्यात आले आहेत. हे सर्व भत्ते महाराष्ट्रातील सर्व कर्मचाऱ्यांना लागू केले पाहिजेत, अशी आमची मागणी आहे. पण हकिम समितीने त्यावर बोळा फिरवला आहे आणि राज्य सरकारने देखील त्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्याकडे देखील मी आपले लक्ष वेधित आहे. शासकीय,निम शासकीय, आणि एडड असा कर्मचारीवृंद आहे त्यांना सरकारच्या फंडातून वेतन मिळणार आहे. फार तर कमी जास्त मिळेल. पण श्री.देशमुख साहेबांनी एक आदेश काढल्यामुळे शासनाचे काहीही नुकसान होणार नाही.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे....

त्याकडे मी माननीय अर्थ मंत्री आणि शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधणार आहे. आपण एक आदेश काढण्याची नितांत आवश्यकता आहे. मागच्या वेळी तसा आदेश न काढल्यामुळे महाराष्ट्रातील कायम विनाअनुदानित तत्त्वावरील सिनियर कॉलेजमधील प्राध्यापक वर्ग उद्ध्वस्त झाला. सहावा वेतन आयोग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना जसा लागू केला तसाच तो कायम विनाअनुदानित शाळां-कॉलेजेसना लागू केला पाहिजे, असा स्पष्ट आदेश आपण काढला पाहिजे. या आदेशाचा समावेश वेतन आयोगामध्ये न केल्यामुळे महाराष्ट्रातील अनेक सिनिअर कॉलेजेसमधील प्राध्यापकांना अजून चौथा आयोग मिळतो आहे, पाचवा वेतन आयोग मिळत नाही अशी माझी माहिती आहे. आपल्या डोळ्यापुढे चांगला प्राध्यापक वर्ग दिसतो. पण कमी वेतनामध्ये काम करणारा प्राध्यापक आपल्यापुढे येत नाही. त्यामुळे शासनाने आदेश काढला तर त्याचा शासनाच्या तिजोरीवर कोणताही ताण येणार नाही. पण आदेशामध्ये तसा उल्लेख करणे आपल्या प्रशासनाचे काम आहे. उच्च शिक्षण विभागाचे ते काम आहे. दुर्दैवाने ते काम करीत नाही. जाणीवपूर्वक ते काम बाजूला ठेवतात. त्याचे परिणाम प्राध्यापकांना भोगावे लागतात. ते होऊ नये म्हणून मी आपले लक्ष वेधित आहे. धन्यवाद.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकरण संस्था) :

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या सन 2009-2010 च्या अंतरिम अर्थसंकल्पावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

राज्य शासनाने शेतीतील सिंचनाचे महत्त्व ओळखून गेल्या तीन वर्षात 13,446 कोटी रूपये गुंतवणुकीतून 4.82 लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आहे, असे नमूद करण्यात आले आहे. विदर्भ हा मागासलेला भाग आहे. विदर्भातील सहा जिल्ह्यांमध्ये 5000 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेली आहे. यासाठी केंद्र शासनाने 3650 आणि राज्य शासनाने 1075 कोटी रूपयांचे पॅकेज जाहीर केल्यानंतर देखील आत्महत्या अजून पर्यंत थांबत नाही. त्यामुळे विशेष माहिती मी सभागृहाला देऊ इच्छितो. जिल्हा परिषद अकोलामध्ये पातूर पंचायत समिती व अकोला पंचायत समितीमध्ये अनुक्रमे विवरा या गावी कोल्हापुरी बंधाऱ्यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार उघडकीस आला आहे.सदर प्रकरणी चौकशीमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे सिद्ध झाले आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून सतत न्यूज पेपरमध्ये याबाबत एक मालिकाच सुरू आहे. कोल्हापुरी बंधारा - गावाचे नाव टाकळी खरब बंधारा क्र.1 मार्च 2008 मध्ये बिल काढले 18.39 लाखाचे. मार्च 2009 रोजी चौकशीमध्ये पुनर्मूल्यांकन केले असता ते फक्त 3.41 लाख रूपये आले आहे. म्हणजे जवळपास 14.38 लाख रूपये भ्रष्टाचार करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. टाकळी खरब ता.बाळापूर बंधारा क्र.2च्या कामामध्ये 22.53 लाखाचे बिल काढण्याल आहे. प्रस्तावित बिल होते रूपये 5.96 लाखाचे. म्हणजे रूपये 16.58 लाखाचा भ्रष्टाचार उघडकीस आलेला आहे. सस्ती ता.पातूर बंधारा क्र.3 येथे रूपये 19.87 लाखाचे बिल काढण्यात आले. प्रस्तावित बिल होते 4.19 लाखाचे. म्हणजे येथे रूपये 15.67 लाखाचा सरळपणे भ्रष्टाचार करण्यात आलेला आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया..

त्याचप्रमाणे पारस, तालुका बाळापूर येथील बंधाऱ्याच्या भितींच्या कामाचे 31.73 लाख रुपयांचे बिल काढण्यात आले असून एम.बी. मध्ये काहीच रेकॉर्ड केलेले नाही. अशा प्रकारे या कामांमध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे सिध्द झालेले आहेत असे एकूण बारा बंधारे असून उर्वरित बंधा-यांच्या कामांची चौकशी सुरु आहे. सदर प्रकरणी जबाबदार उप अभियंता श्री. कुलकर्णी, शाखा अभियंता श्री.चौहान व श्री. मावंदे यांना निलंबित करण्यात आलेले आहे. या तीनही खालच्या दर्जाच्या अधिका-यांना निलंबित केलेले आहे. विदर्भामध्ये पाच हजार शेतक-यांनी आत्महत्या केल्या असून सिंचनाचा अनुशेष असलेल्या भागातील बंधा-यांच्या कामामध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाला आहे. या भागातील सिंचन क्षमता शुन्य आहे आणि माननीय वित्त राज्यमंत्री सुध्दा याच भागातील आहेत. या कामातील भ्रष्टाचाराच्या संदर्भात कॅफो व ॲडिशनल सीईओ देखील जबाबदार असून त्यांची चौकशी करण्याची आवश्यकता आहे तेव्हा त्यांची देखील चौकशी करण्यात यावी यासाठी मी माननीय मंत्र्यांना निवेदन देणार आहे.

सभापती महोदय, या कामांमध्ये एवढया मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे हे सिध्द झाले आहे. 5 लाख रुपया ऐवजी 14 लाख रुपयांची बिले काढण्यात आली आहेत आणि त्यावर त्यांनीसुध्दा शिक्कामोर्तब केलेले आहे. अशा प्रकारे मागासलेल्या भागातील बंधा-याच्या कामात या अधिका-यांनी मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. रोजगार हमी योजने अंतर्गत धडक सिंचन विहीर योजना नुकतीच मंजूर झालेली आहे. आत्महत्याग्रस्त पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांसाठी सदर योजना होती परतु बार्शीटाकळी आणि अकोला तालुक्यात आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाना डावलून या योजनेतील लाभधारकांची यादी मंजूर करण्यात आलेली आहे. बार्शी टाकळी येथील श्री.काकड नावाच्या शेतक-याच्या घरातील एका व्यक्तिने आत्महत्या केली होती परंतु त्यांच्या कुटुबियांना ही विहीर मंजूर करण्यात आली नाही त्यामुळे त्याच्या घरातील व्यक्तीने हायकोर्टात रिट सादर केले होते की, आत्महत्याग्रस्त शेतक-यांना डावलून बाकीच्या शेतक-यांना या विहिरी मंजूर करण्यात आल्या आहेत. त्याबाबत उच्च न्यायालयाचे स्थगनादेश दिला व अशा प्रकारच्या डायरेक्शन दिल्या होत्या की, आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या कुटुबियांचा या योजनेत समावेश करण्यात यावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया..

सभापती महोदय, अकोला, बार्शी टाकळी आणि मूर्तिजापूर या तीन तालुक्यातील ख-या लाभधारकांना डावलून इतरासाठी 2 हजार 750 या विहिरी मंजूर करण्यात आल्या आहेत हे सिध्द झाले असून दिनांक 18.2.2009 ला माननीय जिल्हाधिकारी यांच्याकडे लघू सिंचन विभाग, जिल्हा परिषद यांनी असे पत्र पाठविले आहे की, "उपरोक्त विहिरीच्या बाबतीत पुढील कार्यवाही करण्यासाठी आम्ही असमर्थ आहोत." आमच्याकडे एवढया मोठया प्रमाणात तांत्रिक कर्मचारी नाहीत असे कारण पत्रात देण्यात आले होते. अशा प्रकारे 2 हजार 750 विहिरींच्या संदर्भात पुढील कार्यवाही करण्यासाठी आमच्याकडे कार्यवाही करण्यासंबधी जो प्रस्ताव देण्यात आलेला आहे त्यानुसार कार्यवाही करण्यास आम्ही असमर्थ असल्याचे अधिका-यांनी कळविलेले आहे. ही बाब मी माननीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. ख-या लाभधारकांना डावलून 2 हजार 750 विहिरी शेतक-यांना मंजूर करण्यात आलेल्या आहेत असे कळविल्यानंतर त्याबाबत जिल्हाधिका-यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही असे मला दुर्दैवाने सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, यां नंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. या अर्थसंकल्पात असे म्हटलेले आहे की, " प्रगतीशील औद्योगिक धोरण, उत्तम पायाभूत सुविधा आणि उद्योग व व्यापार या साठी अनुकूल वातावरण यांच्या बळावर महाराष्ट्र राज्याने भारतीय तसेच विदेशी गुंतवणूक दाराचे प्रथम पसंतीचे राज्य म्हणून आपला लौकिक कायम राखला आहे. 2008 मध्ये राज्यात सुमारे 81 हजार 65 कोटी रुपयांची गुंतवणूक असणारे आणि 1 लाख 88 हजार व्यक्तिना रोजगार मिळू शकेल इतकया क्षमतेचे 697 प्रकल्पाचे प्रस्ताव असलेली औद्योगिक अवोदन पत्रे व इरादा पत्रे केन्द्र शासनाकडे सादर करण्यात आली आहेत ". सभापती महोदय, या ठिकाणी माननीय वित्त मंत्री उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, विक्री कर विभागाने जे सरक्युलर काढलेले आहे त्याची झळ राज्यातील जवळ जवळ एक हजार उद्योगांना लागणार आहे व ते उद्योजक देशोधडीला लागणार आहेत. विक्रीकर आयुक्तांनी इंटरनल सरक्युलर काढले होते आणि त्या सरक्युलरच्या संदर्भात राज्यातील सर्व व्यापा-यांनी शासनाला एक निवेदनसुध्दा दिले होते.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया..

त्या सरक्युलरमध्ये असे म्हटले होते की,

" Internal Circular No.25A dated 22.12.2008, issued by the Commissioner of Sales Tax, for calculation of Cumulative Quantum of Benefits under Rule 31AA of the Bombay Sales Tax Rules,1959."

सभापती महोदय, ऑईल मिल्सच्या मालकांची किंवा ऑईलचा व्यवसाय करणा-या व्यापा-यांची मागील 15 वर्षाची रिकव्हरी काढण्यात आलेली आहे. या सर्व व्यापा-यांनी 2008 पर्यत आपली असेसमेन्ट करुन घेतलेली आहे असे असतांना "calculation of Cumulative Quantum of Benefits " च्या संदर्भात विक्रीकर आयुक्तांनी या व्यापा-याची वसुली काढलेली आहे. ऑईल केक आणि आईल मिलचा व्यवसाय हा तेजी मंदीवर अवलंबून असतो, त्यांचा व्यवसाय हा शॉर्ट टर्म असतो. 15 वर्षापूर्वी त्यांनी काय विकलेले आहे यासबंधीचे रिटर्न त्यांनी भरलेले आहे असे असतांना .....

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाजोरिया ...

आता हे सर्व बॅक डेटेड म्हणजे पूर्वलक्षीप्रभावाने काझे म्हणजे त्याच्यावर जवळपास एक कोटीची जबाबदारी येणार आहे, त्यामुळे त्यांचे सर्व धंदेच बंद पडणार आहेत. सभापती महोदय, हा हिशोब त्यांनी कशावरून काढला ? तर "It is brought to your notice that a circular referred to above has been issued, directing the Assessing Officers of the Sales Tax Department to compute the CQB of the dealers under Package Scheme of Incentives of 1993 as per the decision of the Tribunal in the case of Bhagwati Refineries Pvt.,Ltd. dated 8.12.2006." सभापती महोदय, भगवती रिफायनर प्रा.लि. या कंपनीच्या केसमध्ये ट्रायब्यूनलने असा निर्णय दिलेला आहे त्यावरून त्यांनी असे सांगितले आहे की, आयुक्तांनी हे सारे सीक्यूबी काढलेले आहे. परंतु त्यानंतर दुसऱ्या ट्रॅब्यूनलने असा निर्णय दिला आहे की, ही सीक्यूबी काढण्यात येऊ नये. परंतु दुसरा जो निर्णय 2007-08 मध्ये वेगवेगळ्या ट्रॅब्यूनलमधून देण्यात आलेला आहे तो निर्णय मात्र दुर्लक्षित करण्यात आलेला आहे. मात्र 2006 मध्ये भगवती रिफायनरी कंपनीच्या बाबतीत ट्रॅब्यूनलने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विक्रीकर आयुक्तांनी मागील 10-12 वर्षांपासूनची रिकव्हरी त्या व्यापाऱ्यांकडून काढावयास लावली आहे. अशा परिस्थिती बाकीच्या सर्व विक्रीकर अधिकाऱ्यांनी आणि नागपूर, नासिक इत्यादी जिल्ह्यातील विक्रीकर अधिकारी तसेच आयुक्तांनी आदेश दिलेले आहेत की, सीक्यूबी काढण्यात येऊ नये. तेव्हा मी या निमित्ताने माननीय वित्त मंत्र्यांना विनंती करतो की, अशा प्रकारे या व्यापाऱ्यांच्या बाबतीत जी मागील 10-12 वर्षांपासूनची सीक्यूबी काढण्यात आली आहे आणि त्याची त्यांच्याकडून रिकव्हरी करण्याचे सांगितले आहे त्याला आपण तात्काळ स्थगिती द्यावी. अन्यथा यातून हजारो ऑईल मिल ओनर्स आणि ट्रेडर्स देशोधडीला लागणार आहेत.

(वेळ संपल्याची घंटी वाजविण्यात येते.)

सभापती महोदय, मला या ठिकाणी आणखी दोनच मुद्दे उपस्थित करावयाचे आहेत, तरी आपण तेवढा वेळ मला वाढवून द्यावा. सभापती महोदय, संतश्रेष्ठ तुकाराम महाराज जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून देहू-आळंदी भंडारा डोंगर ते पंढरपूर पालखी मार्गातील पालखी तळ इत्यादी विकास कामांसाठी, यात्रेकरूंना प्राथमिक सोयी-सुविधा करून देण्यासाठी 434 कोटी रूपयांची तरतूद येथे दाखविण्यात आली आहे. पण ही तरतूद मागील वर्षी देखील दाखविण्यात आलेली

..... 4आय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. परंतु ज्ञानेश्वर माऊलींच्या सिद्धबेटसाठी 25 कोटी रूपयांची तरतूद या 400 कोटीमध्ये करण्यात आली होती. परंतु ही तरतूद पुन्हा पुन्हा अर्थसंकल्पात दाखविण्यात येत आहे. अशा परिस्थितीत मी आपल्या माध्यमातून सभागृहाला सांगू इच्छितो की, 3.4.2008 या दिवशी तत्कालीन महसूल मंत्री यांनी या सदनामध्ये लक्षवेधी सूचनेवरील उत्तरामध्ये घोषणा केली होती की, शासनाने देहू-आळंदी या तीर्थक्षेत्रासाठी 400 कोटीची तरतूद केलेली आहे. म्हणून सिद्धबेट ज्ञानेश्वर माऊलीसाठी या वर्षी 25 कोटी खर्ची घालणार आहे. परंतु दुर्दैवाने सांगावे लागत आहे की, या संपूर्ण वर्षभरामध्ये ही तरतूद खर्च झालेली नाही. पुन्हा माननीय अर्थमंत्री यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात यासाठी 434.73 कोटी रूपये दाखविलेले आहेत. खऱ्या अर्थाने अशा प्रकारे अर्थसंकल्पात त्याच त्या कामासाठी पुन्हा पुन्हा रकमा दाखविण्यात येत आहेत पण प्रत्यक्षात काहीही करीत नाही. आपण जनतेप्रमाणेच या राज्यातील 10 लाख वारकरी संप्रदायाची देखील यातून दिशाभूल करीत आहात. हा वारकरी समुदाय अध्यात्मिक विचारांचा आहे, त्याची आपण अशा प्रकारे दिशाभूल करू नका. साहित्यिक संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ.आनंद यादव यांनीही या वारकरी समुदायाची दिशाभूल केली होती पण शेवटी त्यांनाही राजीनामा द्यावा लागला आहे. आपणही या अर्थसंकल्पामध्ये या देहू-आळंदी आणि ज्ञानेश्वर माऊलींची दिशाभूल केली तर हे 10 लाख वारकरी आपल्याला, राज्य सरकारला आणि केंद्र सरकारला देखील सोडणार नाहीत हे मी या निमित्ताने आपल्याला सांगतो.

सभापती महोदय, राज्यातील वाढते नागरीकरण लक्षात घेऊन वेळोवेळी राज्य शासन आणि केंद्र शासन नागरी क्षेत्रातील विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देते. तसेच केंद्र सरकारने सुरू केलेल्या जेएनआरयूएम योजनेंतर्गत राज्याला आतापर्यंत 1894 कोटी रूपये प्राप्त झालेले आहेत. सभापती महोदय, माझ्या मताप्रमाणे भारत सरकारकडून राज्य शासनाला 4752 कोटी रूपये प्राप्त झालेले आहेत. ही माहिती केंद्र सरकारच्या नेटवर 6.3.2009 रोजी दाखविण्यात आली आहे. परंतु माझ्या माहितीनुसार या बाबतीत केवळ 1 हजार कोटी रूपये बीएसयूपीसाठी आणि फक्त 20 कोटी रूपये आयएचडीपीसाठी खर्च करण्यात आलेले आहेत. सभापती महोदय, यामध्ये केंद्र सरकारची टायलेंट स्कीम जी आलेली आहे त्यात आतापर्यंत एकही योजना या राज्य सरकारने लागू केलेली नाही हे दुर्भाग्य आहे. राजीव गांधी निवारा योजनेत एक लाख घरांचे

..... 4आय 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उद्दिष्ट असतानादेखील केवळ 200 ते 300 घरे या महाराष्ट्रात बांधण्यात आलेली आहेत, हे महाराष्ट्र शासनाचे दुर्भाग्य आहे.

(यानंतर श्री. सरफरे .... 4जे 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किशन बाजोरिया...

हे महाराष्ट्र सरकारचे दुर्भाग्य आहे. समाज कल्याण विभागामार्फत अनुसूचित जाती, नवबौध्दांसाठी 50 हजार घरे बांधून देण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. याकरिता लाखो अर्ज आल्यानंतर सुध्दा एकही घर महाराष्ट्रामध्ये पूर्ण करण्यात आले नाही हे मला याठिकाणी नमूद करावेसे वाटते. सभापती महोदय, वाल्मिकी-आंबेडकर योजनेकरिता आलेला निधी मागील पाच वर्षापासून पडून आहे, तो खर्च करण्यात आलेला नाही. केंद्र सरकारने त्याबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत की, हा निधी आपण जर खर्च केला नाहीतर जी.आर.एन.एम. च्या निधीमध्ये कपात करण्यात येईल आणि त्या निधीची वसूली व्याजासहीत आपणाकडून करण्यात येईल. असे असतांना याठिकाणी 1 हजार 75 कोटी रुपये खर्च केल्याचे सांगितले जात आहे ही विसंगती आहे. सभापती महोदय, झोपडपट्टी निर्मूलन करण्याबाबत सांगितले जाते. परंतु महाराष्ट्रामध्ये Maharashtra Regional Town Planning Act is associated with the Development Control Rules याची आपण थट्टा करीत आहात. एकीकडे झोपडपट्टी निर्मूलनाचा संकल्प जाहीर केला जातो. परंतु आमच्या पाच जिल्हयापैकी एकाही जिल्हयात झोपडपट्टी निर्मूलन झालेले नाही. उलट प्रत्येक नागरी क्षेत्रामध्ये गुंठेवारी रेगुलरायझेशन ॲक्ट आणि एम.आर.टी.पी. ॲक्टचा धज्जा उडविला जात आहे, त्याठिकाणी अनधिकृत बांधकामे सुरु आहेत याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे असे बोलून माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/पाचपोळ

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2009-10 चा अंतरिम अर्थसंकल्प सभागृहामध्ये मांडण्यात आला आहे. हा अर्थसंकल्प महाराष्ट्र राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने अतिशय चांगल्या प्रकारचा असल्यामुळे मी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करतो. त्याचबरोबर सन्माननीय वित्त मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील व सन्माननीय राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख साहेबांचे देखील मी अभिनंदन करतो.

सभापती महोदय, संपूर्ण जगामध्ये मंदीची लाट असतांना महाराष्ट्र राज्याला आणि देशाला या मंदीच्या लाटेची आर्थिक झळ बसलेली नाही असे जागतिक बँकेच्या अहवालात म्हटले आहे. जगामध्ये फक्त भारत आणि चीन या दोन देशांनी आर्थिक मंदीचा योग्य पध्दतीने मुकाबला करुन आपल्या देशातील जनतेला सावरण्याचा प्रयत्न केला आहे. हे सर्व पाहिल्यानंतर एक गोष्ट आपल्या लक्षात येते की, महाराष्ट्र सरकार आणि केंद्र सरकारने सत्तेच्या माध्यमातून योग्य प्रकारच्या योजनांची व धोरणांची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी केल्यामुळे आर्थिक मंदीचा फटका मोठया प्रमाणात आपल्याला बसलेला नाही हे याठिकाणी मला मुद्दाम नमूद करावेसे वाटते. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी कृषी खात्याची सूत्रे हातामध्ये घेतल्यानंतर या देशात कायम दुर्लक्षित राहिलेल्या जवळ जवळ 65 टक्के असलेल्या शेतकरी वर्गाकडे योग्य प्रमाणात लक्ष दिले जात नव्हते त्या शेतकऱ्यांना 65 हजार कोटीपासून 2 लाख 25 हजार कोटीपर्यंत वित्त पुरवठा उपलब्ध करुन दिला.. या आर्थिक वर्षामध्ये जागतिक पातळीवर अन्नधान्याचे उत्पादन कमी होत असतांना भारतामध्ये अन्नधान्याचे उद्दिष्ट वाढले आहे, हे या देशाचे आर्थिक चित्र जगाने पाहिले आहे. मागील वर्षी अन्न धान्याचे उत्पादन 220 दशलक्ष टन झाले असतांना यावर्षी त्यामध्ये आणखी 7 दशलक्ष टनाची वाढ होऊन 227 दशलक्ष टन अन्नधान्याचे उत्पादन झाले आहे. अशाप्रकारे अन्नधान्याच्या उत्पादनामध्ये झालेल्या वाढीबद्दल जागतिक परिषदेमध्ये या देशाचे माननीय पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग साहेबांचे कौतुक करण्यात आले. केंद्र सरकारने दिलेल्या 71 हजार कोटीपैकी जवळ जवळ 7800 कोटी रुपये कर्जमाफीच्या स्वरुपात केंद्र सरकारकडून या राज्याला मिळाले. मध्यंतरीच्या काळात 5 एकरावरील शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळत नव्हता म्हणून नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात आदरणीय श्री. पवार साहेबांनी महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना बोलावून आणि त्यांच्याबरोबर चर्चा करुन या राज्यामध्ये 5 एकरापेक्षा जास्त शेतजमीन असलेल्या शेतकऱ्यांना सुध्दा कर्जमाफी देण्याचा निर्णय घेतला.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे . . . .

महाराष्ट्र शासनाने 6208 कोटी रुपयांची कर्ज माफी देऊन, महाराष्ट्रातील जवळजवळ 1408 कोटी शेतकऱ्यांना म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासात कधी नव्हे एवढी कर्जमाफी मिळालेली आहे. अशा प्रकारे वेगवेगळया योजना राबवून शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांच्या समस्या दूर करण्याचा राज्य शासनाने प्रयत्न केलेला आहे. जर एखादा उद्योगपती वाहन घेण्यासाठी गेला तर त्याला 7 ते 8 टक्के दराने कर्ज उपलब्ध होत असे, परंतु आमचा शेतकरी शेतमालासाठी कर्ज घेण्याकरता गेला तर त्याला 12 टक्क्यापासून 16 ते 18 टक्क्यापर्यंत कर्ज उपलब्ध होत असे. पण आता स्थिती बदलली असून शेतकऱ्यांना 7 ते 8 टक्के दराने कर्जपुरवठा होत आहे. अशा प्रकारे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी आणि त्यांचे जीवन सुधारण्यासाठी महाराष्ट्र शासनाने वेगवेगळया योजना राबविल्या आहेत आणि त्याचे दुरगामी, चांगल्या प्रकारचे परिणाम दिसून येत आहेत, याबद्दल मी राज्य शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, मुंबईमध्ये दहशतवाद्यांनी हल्ले केले आणि त्यामुळे आपण होरपळून निघत आहोत.पण आपला देश हा जगामध्ये वेगाने पळणारा प्रगतीपथावरील देश होता आणि आपला जागतिक पातळीवरील महासत्ताक आहे हे काहींना पहावत नव्हते.या शहरावर हल्ला इ ाल्यानंतर काही लोक सांत्वन करीत होते,धीर देण्याचे काम करीत होते.पण अशा वेळी जागतिक पातळीवर काही देशांनी भारताची बदनामी करावयास सुरु केली की, भारत देश हा जगातील 20 असुरक्षित देशांपैकी एक देश आहे. त्यामुळे भारतामध्ये व्यापार आणि आर्थिक गुंतवणूक करण्यात येऊ नये असा अपप्रचार करण्यात येत होता, याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. परंतु महाराष्ट्र शासनाने योग्य पावले उचलून आणि मुंबई शहरामध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीचा योग्य प्रकारे मुकाबला करुन जागतिक पातळीवर आर्थिक व्यवस्थेच्या बाबतीत एक प्रकारचा विश्वास निर्माण केलेला आहे याबद्दल मी राज्य शासनाचे अभिनंदन करतो.

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपले भाषण लवकर संपवावे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय,माझी आपल्याला विनंती आहे की,आपण इतर सन्माननीय सदस्यांना भाषण करण्यासाठी जसा वेळ दिला,तसा तो मला देखील द्यावा. खरे म्हणजे आपल्याकडे अर्थसंकल्पावर भाषण करण्यासाठी वक्त्यांची जी यादी देण्यात आली होती,त्यामध्ये.....

. . . .4 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे . . . .

माझे नाव वरच्या क्रमांकावर होते. परंतु मला शेवटी भाषण करण्याची संधी दिलेली आहे. त्यामुळे माझ्यावर अन्याय करु नये अशी माझी विनंती आहे आणि आपण मला भाषण करण्यासाठी पुरेसा वेळ द्याल याबद्दल विश्वास आहे.

सभापती महोदय, मला दुसऱ्या एका गोष्टीबाबत देखील महाराष्ट्र शासनाचे कौतुक करावेसे वाटते. कारण अर्थसंकल्पामध्ये अनुसूचित जातीसाठी 1384 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. अनुसूचित जमातीसाठी 2214 कोटी रुपयांची तरतूद केलेली असून अशा प्रकारे एकंदर 3598 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे आणि देशाच्या इतिहासामध्ये इतर कोणत्याही राज्यांमध्ये एवढी मोठी तरतूद करण्यात आलेली नाही, ती तरतूद महाराष्ट्र शासनाने केलेली आहे. त्याचबरोबर ओ.बी.सी.आणि भटक्या विमक्त जमातीसाठी 726 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्रीमती अहिल्याबाई होळकर यांची नावे घेऊन त्यांची स्वप्ने साकार करणारे सरकार एवढी मोठी तरतूद करीत असताना, अशा चांगल्या गोष्टींचे कौतुक करावे, शासनाला शाबासकी द्यावसयास हवी होती, पण मला एका गोष्टीची खंत वाटली. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब यांनी असा आक्षेप घेतला की, महाराष्ट्र शासनाला ओ.बी.सी., अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांचा एवढा काय पुळका आला की, त्यांनी त्यांच्यासाठी एवढी हजारो-कोटी रुपयांची तरतूद करुन ठेवली आहे ? खरे म्हणजे ते स्वत: बहुजन समाजाचे नेते आहेत आणि महाराष्ट्रामध्ये चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. तेव्हा ज्या चांगल्या गोष्टी असतील, त्याचे कौतुक केले पाहिजे. या शासनाने गेल्या पाच वर्षामध्ये अनुसूचित जाती-जमातींसाठी जवळजवळ 12,920 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे.म्हणून तळागाळातील, सर्वसामान्य दुर्लक्षित जनता आहे, त्यांचा कसा विकास होईल ? त्यांची प्रगती कशी होईल ? यादृष्टीने महाराष्ट्र शासनाने प्रयत्न केलेला आहे. या शासनाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींसाठी 3598 कोटी रुपयांची तरतूद केली आहे, त्याबद्दल शासनाचे अभिनंदन केले पाहिजे. तसेच अजून 1 हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. तसेच ओ.बी.सी.व भटक्या विमुक्त जमाती साठी 626 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जमाती, ओ.बी.सी.यांची लोकसंख्या विचारात घेता 626 कोटी रुपयांची तरतूर अपूरी आहे. वेगवेगळया ....

. . . .4के-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे . . . .

योजनेतील लाभार्थींची संख्या गृहीत धरली तर ओ.बी.सी.आणि भटक्या विमुक्त जमातींची लोकसंख्या जास्त आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेडगे...

अनुसचित जाती जमातींसाठी 3598.90 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे त्याचप्रमाणे भटक्या व विमुक्त जातीसाठी भरीव तरतूद करावी अशी मी याठिकाणी विनंती करु इच्छितो.

त्यानंतरचा महत्वाचा मुद्दा असा आहे की, शासनाने शिक्षणासाठी आणि पाणलोट क्षेत्रासाठी भरीव तरतूद केलेली आहे. पण राज्यामध्ये काही भाग कायम दुष्काळी आहे. तो भाग आज सुध्दा महाराष्ट्र शासनाकडून दुर्लक्षित राहिलेला आहे. मग तो सांगली जिल्हयातील कवठेमंहकाळ असेल, आटपाडी असेल, सातारा जिल्हयातील मान असेल, मंगळवेढा असेल, सांगोला असेल, त्याठिकाणी आज सुध्दा पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची व्यवस्था करावी लागलेली आहे. शासन हजारो कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देते पण एखादी नैसर्गिक आपत्ती की, त्यासाठी जास्त प्रमाणात निधी वळविण्यात येतो. सभापती महोदय, हा कायम दुष्काळी भाग आहे. प्रत्येक वर्षी या भागातील जनतेला पिण्याचे पाणी असेल किंवा शेतीसाठी पाणी हवे असेल तर ते मिळविण्यासाठी अतिशय हालअपेष्टांना सामोरे जावे लागते. मला राज्य शासनाला विनंती करावयाची आहे की, या दुष्काळी भागासाठी जास्तीत जास्त भरीव तरतूद करुन अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

दुष्काळी भागातील शेतक-यांनी नैसर्गिक आपत्तीच्या विरोधामध्ये जाऊन आपल्या उदरनिर्वाहाचे साधन निर्माण केलेले आहे. मग तेथे फळबागा लावल्या असतील, डाळींबाचे उत्पन्न घेण्यात येत असेल, द्राक्षाचे उत्पन्न घेण्यात येत असेल, बेदाण्याचे उत्पन्न घेण्यात येत असेल, कलींगडाचे उत्पन्न घेण्यात येत असेल किंवा आणखी कुठल्या दूध उत्पादनाच्या योजना राबविल्या जात असतील पण त्याठिकाणी एखादी नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर त्यांना त्वरित नभरपाई मिळत नाही. शासन नैसर्गिक आपत्ती्च्या संदर्भात तरतूद करते पण खालची यंत्रणा योग्य प्रकारे काम करीत नसल्यामुळे शेतक-यांना नुकसानभरपाई मिळत नाही. दोन दिवसांपूर्वीच दिनांक 13 आणि 14 मार्च रोजी पावसाळयाचे दिवस नसतांना सुध्दा त्या ठिकाणी मोठया प्रमाणात पाऊस झाला. त्याठिकाणी द्राक्ष काढून रॅकवर बे-दाणे करण्यासाठी ठेवलेले होते. डाळींब काढलेले होते पण तेथे मोठया प्रमाणात पाऊस आल्यामुळे त्याचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. अशा प्रकारे नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर त्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी शासनाने भरीव तरतूद करावी अशी विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाचे पशुसंवर्धन खाते आहे. या राज्यामध्ये शेतीशी निगडीत व्यवसाय करणारा पशुपालक वर्ग हा मोठया प्रमाणात आहे. पण तरतूद करत असताना या वर्गाकडे थोडया प्रमाणात दुर्लक्ष होते. आज गाई-म्हैशींच्या पालनाच्या व्यवसायातून दूध उत्पादनामध्ये मदत होत आहे. शेळया-मेंढयाच्या व्यवसायातून मटनाच्या व्यवसायाठी मदत होत आहे. शेळया-मेंढया व्यवसायाच्या माध्यमातून "महाराष्ट्र राज्य आहिल्यादेवी शेळी-मेंढी महामंडळ" काम करीत आहे. सन 1978 साली हे महामंडळ स्थापन झालेले आहे पण सन 2009 सालापर्यंत या महामंडळाला महाराष्ट्र शासनाकडून सन 2004 साली फक्त 10 काटी रुपये मिळालेले आहेत. त्यापलीकडे या महाराष्ट्र शासनाकडून कुठलाही निधी मिळालेला नाही. या महामंडळावर शेतीपूरक उद्योग करणारा शेतकरीवर्ग, धनगर समाज तसेच महिलावर्ग मोठया प्रमाणात अवलंबून आहे.म्हणून या व्यवसायाकडे योग्य प्रमाणात लख देण्याची गरज आहे. फक्त घोषणा होऊन त्यांना पैसे मिळत नाहीत तर त्यासाठी भरीव तरतूद करण्यात यावी, अशा प्रकारची विनंती करतो आणि ख-या अर्थाने महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेसाठी, शेतक-यांसाठी कस्टकऱ्यांसाठी एक चांगला अर्थसंकल्प या ठिकाणी मांडला आहे त्याबद्दल मी पुन्हा एकदा महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

अशुधारित प्रत / शुद्धीकरणासाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : अध्यक्ष महाराज, महाराष्ट्र शासनाच्या सन 2009-2010 या वर्षाच्या अंतरिम अर्थसंकल्पाबद्दल मी याठिकाणी काही सूचना करणार आहे. माननीय वित्त मंत्र्यांच्या भाषणात मुंबईवरील दहशतवादी हल्ला याबाबतीत भरीव तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. पण या तरतुदी बाबत बोलावयाचे झाले तर कोकण हा किनारपट्टीवरील प्रांत असून या कोकणामध्ये अनेक वेळा असे हल्ले झाल्यानंतर स्पीड बोटी घेऊन या किनारपट्टीचे संरक्षण करण्यात येईल याबाबतच्या अनेक उपाययोजना करण्याचे फक्त त्या काळात बोलले जाते. परंतु त्यांनतर शासनाला त्याचा पूर्णपणे विसर पडतो असे सातत्याने आढळून आलेले आहे. सन 1993 चा बॉम्बस्फोट झाला त्यावेळी सुध्दा आर.डी.एक्स. कोकन किनारपट्टीवरुन आला अशा प्रकारच्या वृत्तपत्रातून बातम्या आल्या. त्यामुळे त्या किनारपट्टीच्या संरक्षणासाठी गस्ती नौका देण्यात येतील अशा प्रकारच्या घोषणा करण्यात आल्या पण प्रत्यक्षात या गस्ती नौका कोकणाला मिळाल्या नाही. दि.26 नोव्हेंबर,2009 रोजी मुंबईवर झालेला दहशतवादी हल्ला हा त्याची प्रचिती आहे. त्याठिकाणी आलेल्या बोटी आणि बोटीमधून झालेला हल्ला. या पार्श्वभूमीवरुन परत एकदा शासनाने या किनारपट्टीच्या संरक्षणासाठी गस्ती नौका घेणार अशा प्रकारची घोषणा केली.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ....

शासनाने तरतूद करण्याची घोषणा केली परंतु अद्याप त्या ठिकाणी त्या बोटी खरेदी केलेल्या नाहीत. डी.आय.जी. कोकणामध्ये आले होते. त्यांनी 12 गस्ती नौका घेणार आहोत असे घोषित केले. चार महिने होऊन गेले तरी त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची नौका आलेली नाही. त्या ठिकाणी स्पीड गस्ती नौका तातडीने घेऊन त्या किनारपट्टीच्या संरक्षणासाठी तातडीने द्याव्यात अशी मी सूचना करतो. आज देवगड किनारपट्टीवर केरळ आणि कर्नाटक राज्यातील ज्या अनोळखी बोटी येतात त्यामुळे मच्छिमारांच्या मनामध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. मच्छिमार भयभीत झालेले आहेत. या अनोळखी बोटी आल्यानंतर हा 26 नोव्हेंबरचा तर प्रकार नाही ना अशी भीती असते. शासन याकडे दुर्लक्ष करीत आहे. त्यावर कोणत्याही प्रकारची ठोस उपाययोजना करण्याची भूमिका शासन घेत नाही. त्यामुळे मच्छिमार हवालदिल झालेले आहेत. शासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबद्दल सभागृहात ऊहापोह झाला. परंतु कोकणामधील जे बागायतदार शेतकरी आहेत तसेच जे मच्छिमार आहेत त्या मच्छिमारांच्या बाबतीत शासन सातत्याने उदासीन राहिलेले आहे. समुद्रामध्ये मासे मिळत नसल्यामुळे आणि समुद्रामध्ये असलेल्या माशांच्या पोटात नवीन नवीन केमिकल्स आढळून येत असल्यामुळे त्या ठिकाणी आता मासे खाणारे सुध्दा कमी झालेले आहेत. समुद्रात मासे मिळत नसल्यामुळे ज्या मच्छिमारांनी कर्ज घेऊन बोटी घेतलेल्या आहेत, ज्यांची उपजीविका तेथील समुद्रातील मासेमारीवर अवलंबून आहे त्या मच्छिमारांवर अन्याय झालेला आहे. त्या ठिकाणी मत्स्यदुष्काळ जाहीर करण्याची मागणी सातत्याने केली जाते. त्या ठिकाणी प्रत्येक जिल्हयामध्ये मोर्चे काढलेले आहेत. मच्छिमारांकडून जे मासे पकडले जातात त्याचे मोजमाप करण्याचे जे सूत्र आहे ते फार पूर्वीपासून चालत आलेले आहे. ते सूत्र बदलण्याची मागणी सन्माननीय सदस्यांनी सातत्याने करुन सुध्दा त्याकडे दुर्लक्ष केले गेले. या हवालदिल झालेल्या मच्छिमारांकडे शासन दुर्लक्ष करीत आहे. अर्थसंकल्पामध्ये या मच्छिमारांसाठी कोणत्याही प्रकारची ठोस उपाययोजना केलेली नाही. मच्छिमारांना सानुग्रह अनुदान या अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 12 हजार मच्छिमारांना अनुदान देण्यात येणार होते परंतु फक्त 3 हजार मच्छिमारांना अनुदान दिले. 9 हजार 16 मच्छिमारांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

अनुदान देण्याचे शिल्लक राहिलेले आहे. त्याबाबतीत कोणताही ऊहापोह झालेला नाही. जे पॅकेज देण्यात आले त्यामध्ये अनेक त्रुटी आहेत. जे छोटे मच्छिमार आहेत त्यांना डावलले गेले आहे आणि नको त्या मच्छिमारांना अनुदान दिलेले आहे. विदर्भ-मराठवाड्यातील शेतकऱ्यांसारखे हे मच्छिमार आत्महत्येसाठी प्रवृत्त होऊ नयेत यासाठी शासनाने कोणतीही उपाययोजना केलेली नाही. सभागृहामध्ये ज्या ज्या घोषणा केल्या गेल्या त्या केवळ कागदावरच राहिलेल्या आहेत. त्या घोषणा अंमलात आणण्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. केंद्रीय डिझेल परताव्याचे 4 कोटी 25 लाख रुपये शिल्लक असताना 2 कोटी रुपये देण्यात आले आणि फक्त 11 लाख रुपयांचा वाटा सिंधुदुर्ग जिल्ह्याला दिला. त्या ठिकाणी वाटप करताना अधिकारी सुध्दा दुजाभाव करतात. जे लोक आडमार्गाने, गैरमार्गाने अनुदान मिळवू इच्छितात त्यांना अनुदान देतात आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मच्छिमारांवर अन्याय करतात. पंधरा दिवसांपूर्वी श्री. जाधव नावाचे एक अधिकारी ट्रॅप होऊन पकडले गेले. अशा प्रकारे मच्छिमारांसाठी आलेले अनुदान सुध्दा लाटण्याचा प्रयत्न केला जातो. मच्छिमारांना जे पॅकेज दिले जाते त्यामध्ये मच्छिमार संस्था 50 रुपये, 125 रुपये या अनुदानातून कापून घेतात. नियमाप्रमाणे या अनुदानातून एक पैसा सुध्दा कापून घेता येत नाही तरी सुध्दा त्या ठिकाणी सस्थां पैसे कापून घेतात. शासनाने मच्छिमारांच्या अनेक समस्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करुन मच्छिमारांना कोणत्याही प्रकारचे अनुदान न दिल्यामुळे मच्छिमारांनी बोटी घेण्यासाठी जे कर्ज घेतलेले आहे किंवा छोट्या मच्छिमारांनी विविध कामांसाठी जे कर्ज घेतलेले आहे ते माफ करण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. परशुराम उपरकर...)

नैसर्गिक आपत्तीमुळे राज्यातील धान, कापूस, सोयाबीन, संत्रा, मोसंबी व आंबा या पिकांच्या झालेल्या नुकसानभरपाईसाठी अनुदान देण्याची तरतूद अंतरिम अर्थसंकल्पामध्ये केलेली आहे. मासेमारीवर देखील नैसर्गिक आपत्ती येऊन मच्छिमारांचे नुकसान होते. मच्छिमारांसाठी अन्य राज्यामध्ये ज्याप्रमाणे विविध योजना राबविल्या जातात त्याप्रमाणे राज्य शासनाने देखील मच्छिमारांसाठी विविध योजना राबवून, नैसर्गिक आपत्तीच्या काळात त्यांना सानुग्रह अनुदान देऊन दिलासा द्यावा.

श्री. दिवाकर रावते : सत्ताधारी पक्षामध्ये केवळ मंत्री आणि एक नामनियुक्त सन्माननीय सदस्य बसलेले आहेत. सभागृहामध्ये गणपूर्ती ठेवण्याची सत्ताधारी पक्षाचीही तेवढीच जबाबदारी आहे. नामनियुक्त 12 सन्माननीय सदस्यांनी तरी सभागृहामध्ये हजर असले पाहिजे.

तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते) : सभागृहामध्ये आवश्यक ती गणपूर्ती आहे. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. परशुराम उपरकर :या राज्यामध्ये औद्योगिक गुंतवणुकीच्या बाबतीत राज्य शासनाने घोषणा केलेल्या आहेत. मी या निमित्ताने शासनाच्या हे निदर्शसनास आणून देऊ इच्छितो की, आमच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एमआयडीसी बंद पडत चाललेल्या आहेत. तेथे कोणतेही उद्योग चालत नाहीत. असे असताना नवीन एसईझेडसाठी जागा संपादन करण्याचा घाट या शासनाने घातलेला असल्यामुळे बागायतदारांमध्ये कमालिचा असंतोष निर्माण झालेला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये विमानतळ उभारण्यासाठी दोन वेळा निविदा काढण्यात आल्या. दोन वेळा मंत्री महोदयांच्या हस्ते नारळ फोडण्यात आले. असे असताना या विमानतळासंबंधीचा साधा उल्लेखही या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला नसल्यामुळे विमानतळ उभारणीच्या बाबतीत शासनाने सिंधुदुर्ग जिल्ह्यावर अन्याय केलेला आहे हे मी या निमित्ताने मुद्दाम नमूद करु इच्छितो.

सभापती महोदय, पाणी पुरवठ्याच्या योजनांसाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. युती शासनाच्या काळामध्ये नळपाणी पुरवठा योजनांवर कोट्यवधी रुपये खर्च करुन सिंधुदुर्ग जिल्हा टँकरमुक्त करण्यात आला. परंतु त्यानंतर आघाडी शासनाच्या काळात त्या नळयोजना बंद पडल्यामुळे त्या जिल्हयातील अनेक गावामधून पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे. या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. परशुराम उपरकर....)

गावामध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याबाबत सातत्याने मागणी करुन देखील टँकरने पाणी पुरवठा केला जात नाही. याबाबतीत, सिंधुदुर्ग जिल्हा हा टँकरमुक्त झालेला असल्यामुळे टँकरने पाणी पुरवठा करता येत नाही असे अधिकारी सांगतात. परिणामी पाणी टंचाई असलेल्या गावातील आमच्या भगिनींना वणवण भटकावे लागत आहे. तेव्हा टँकरमुक्त जिल्हा हे कारण पुढे न करता पाणी टंचाई असलेल्या गावाना शासनाने ताबडतोबीने टँकरद्वारे पाणी उपलब्ध करुन दिले पाहिजे.

सभापती महोदय, औद्योगिक प्रशिक्षण संस्थासंबंधी या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे. आताच्या वित्त मंत्र्यांकडे उच्च व तंत्रशिक्षण खाते असताना त्यांनी कोकणातील तरुणांना औद्योगिक प्रशिक्षण देण्यासाठी शिक्षक देण्याची घोषणा केली होती. परंतु त्यासंबंधीचा कोणताही नामोल्लेख या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला नाही.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

त्याचप्रमाणे जिल्हा नियोजन मंडळासाठी पूर्वी 40 कोटी रुपयांची तरतूद होती. परंतु निवडणुकीचे वर्ष डोळयासमोर ठेवून ती तरतूद 60 कोटीपर्यंत केली गेली आहे. ही 50 कोटी रुपयांची तरतूद शासनाकडून प्रत्यक्षात प्राप्त करुन देण्यात येणार आहे काय ? जिल्हा नियोजन मंडळास 60 कोटी रुपये देण्यात आले आहेत असे कागदोपत्री दाखवून शासन जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहे असे माझे स्पष्ट मत आहे. मच्छिमारांचा विकास करण्यासाठी तसेच कोकणातील विविध प्रोजेक्टसाठी आचारसंहितेचे कारण पुढे करुन शासनाने या अंतरिम अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही. शासनाने कोकण विभागाला या अर्थसंकल्पात पूर्णपणे भोपळा दिलेला आहे. कोकण विभागाच्या विकासाकडे शासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. म्हणून या अर्थसंकल्पाचा मी निषेध करतो आणि माझे भाषण संपवितो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, उद्योग प्रधान म्हणून या देशात नावलौकिक असलेला महाराष्ट्र आणि या देशाची औद्योगिक नगरी म्हणून ओळखली जाणारी मुंबई. मला खरोखरच एक गोष्ट सांगण्यास वाईट वाटते, ती म्हणजे शेतक-यांच्या आत्महत्येवर या सभागृहात अनेक सन्माननीय सदस्य बोलले. सीप्झसारखा एरिया शासनाने इकॉनॉमिकल झोन म्हणून जाहीर केला. या सीप्झमधील 70 टक्के कारखाने आता बंद पडलेले आहेत. त्यामुळे जवळजवळ 70 हजार कर्मचारी बेरोजगारीच्या मार्गावर आहेत. या अर्थसंकल्पामध्ये उद्योगधंद्यांच्या बाबतीत मोठमोठया घोषणा दिसून आल्या. रोजगार उपलब्ध करुन देणार अशीही घोषणा या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. जसे सीप्झमधील कर्मचारी बेकार झाले आहेत. त्याप्रमाणे पर्यटन व्यवसायाचे चित्र बघितले तर मुंबई शहरातील हॉटेल्स, एअरपोर्ट या क्षेत्रात काम करणारे कर्मचारी यांची परिस्थिती बिकट बनलेली आहे. 26/11 च्या दहशतवादानंतर हॉटेल्स व्यवसायाची परिस्थिती आजही पूर्ववत झालेली नाही. काही कर्मचा-यांमध्ये कपात करण्यात आली आहे, काही कर्मचा-यांच्या वेतनामध्ये कपात करण्यात आली आहे. अधिकारी आणि कामगार यांच्यामध्ये मोठया प्रमाणात कपात करण्यात आली आहे. या सर्व गोष्टीस शासन जबाबदार आहे. 26/11/2008 रोजी मुंबई शहरात दहशतवादी हल्ला झाला, त्यामध्ये 182 माणसे मारली गेली एवढयापुरता हा विषय मर्यादित नाही. त्या दहशतवादामुळे या शहरात भयंकर परिणाम झाले आहेत. यापूर्वी अशी स्थिती होती की, शहरी भाग चांगला असेल तर ग्रामीण भाग चांगला असावयाचा. पूर्वी ग्रामीण भागात 70 टक्के लोक रहात होते आणि 30 टक्के लोक शहरी भागात होते. परंतु नंतर परिस्थिती उलट झाली. शहरी भागात 70 टक्के लोक रहात आहेत आणि ग्रामीण भागात 30 टक्के एवढेच लोक सध्या रहात आहेत. ग्रामीण भागात लोकसंख्या कमी होत असून शहरी भागातील लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढत चालली आहे. ग्रामीण भागाचे उदाहरण द्यावयाचे झाले तर मी सिंधुदूर्ग जिल्हयाचे देतो. पर्यटन व्यवसायासाठी या अर्थसंकल्पात मोठया प्रमाणात तरतूद केलेली आहे असे दाखविण्यात आले आहे. परंतु या अर्थसंकल्पात सिंधुदूर्ग विमानतळाच्या कामासंबंधीचा उल्लेख केला गेलेला मला दिसून आलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी सांगितले की, मंत्री आले आणि विमानतळाच्या भूमिपूजनाचे नारळ फोडून गेले. परंतु तेथील विमानतळाचा प्रश्न तसाच प्रलंबित राहिलेला आहे. सिंधुदूर्ग जिल्हयात

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर...

दळणवळणाच्या बाबतीत पुरेशा सुखसोयी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. सिंधुदूर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून शासनाने घोषित केलेला आहे. परंतु त्या जिल्हयात हॉटेल व्यवसाय सुरु करण्याची परवानगी घ्यावयाची झाल्यास अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. ज्याला हॉटेल व्यवसाय सुरु करावयाचा असेल तो म्हणतो की, या ठिकाणी तो व्यवसाय न केलेला बरा. हॉटेल व्यवसाय करण्यासाठी जे उत्सुक आहेत त्यांच्याकडून परवानगी घेण्याबाबतच्या घटना ऐकल्या तर तेथील भयंकर परिस्थितीची जाणीव निश्चितपणे होते. "सरकारी काम आणि पाच महिने थांब" अशा प्रकारे सिधुदूर्ग जिल्हयातील अधिकारी वागत आहेत. याबाबतची वस्तुस्थिती काय आहे हे तेथे गेल्यानंतरच कळू शकेल. हॉटेल व्यवसाय सुरु करण्यासाठी परवानगी घेण्यासाठी व्यावसायिकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे पर्यटनाचा विकास बाजूला पडत चालला आहे. सिंधुदूर्ग जिल्हयात पर्यटनासाठी जेवढी तरतूद करावयास पाहिजे होती, तेवढी तरतूद झालेली केली गेली नाही ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, "नाशिक-पुणे-मुंबई" या रस्त्याच्या कामासाठी तरतूद खर्च केली त्याबद्दल या अर्थसंकल्पात सांगण्यात आले आहे की, भारत सरकारकडे पुणे-नाशिक चौपदरी रस्त्यास मंजुरी मिळण्यासाठी देखील पाठपुरावा करण्यात येत आहे...

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रक नाही

श्री.किरण पावसकर.....

त्यामुळे औद्योगिक केंद्रांना जोडलेल्या या रस्त्याचा पुणे, नाशिक व मुंबई दरम्यान सुवर्ण त्रिकोण उपयोगात आणता यईल. सभापती महोदय, मुंबई-गोवा या रस्त्यामुळे दुसऱ्या राज्यांना जोडला जाणारा त्याचबरोबर मुंबई-रायगड-रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयांना जोडणाऱ्या रस्त्याविषयी अर्थसंकल्पामध्ये एकाही रुपयाची तरतूद केलेली नाही किंवा केंद्र शासनाकडे पाठपुरावा केल्याबद्दलचे एक वाक्यही नमूद केलेले नाही. फक्त सिंधुदूर्ग जिल्हयाला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करायचे, मंत्र्यांनी हेलिकॉप्टरद्वारे जाऊन पुष्पवृष्टी करायची, यामधून रोजगार उपलब्ध होणार नाही. अशा प्रकारचे आश्वासन देऊन कोकणातील जनतेची फसवणूक करण्याचे काम राज्य शासनाकडून केले जात असल्याचे लक्षात येते. सुरक्षेच्या कारणास्तव राज्य शासनाने 166 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. संरक्षणाच्या दृष्टीने ही तरतूद अगदी तुटपुंजी आहे. संरक्षण म्हणजे फक्त मुंबई शहरापुरते मर्यादित नसून, मुंबई शहरातील जनतेपुरते मर्यादित नसून याठिकाणी कार्यरत असलेल्या सर्व उद्योगधंद्यांसाठी संरक्षण द्यावयाचे आहे. कारण दहशतवादाचे संकट समोर उभे राहिल्यानंतर अनेक परदेशी कंपन्यांकडून महाराष्ट्रात जी गुंतवणूक येत होती तिला ब्रेक लागला आहे. पुण्यातील हिंजेवाडी परिसरातील आय.टी.पार्कमध्ये जी डेव्हलपमेंट सुरु होती ती थांबली आहे. तेथील अनेक कंपन्यांमधील लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत.....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर अत्यंत महत्वाचे मुद्दे याठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करीत आहेत. या मुद्यांची नोंद घेतली जात नसल्यामुळे या मुद्यांना उत्तर कसे मिळणार?

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, राज्यातील लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. त्यासाठी कदाचित सरकार लाखो रुपये अधिवेशनावर खर्च करीत असेल, परंतु सरकारमध्ये बसलेल्या लोकांना याविषयी किंचित जरी आत्मियता नसेल तर आम्ही याठिकाणी बोंब मारुन सांगायचे कोणाला? जनतेला काय सांगायचे? तुमच्यासाठी काय बोललो आणि त्यातून काय निघाले?

श्री.रवीशेठ पाटील : सभापती महोदय, मी मुद्यांची नोंद घेत आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे. सन्माननीय मंत्री मुद्यांची नोंद घेत आहेत.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, एक वर्षापूर्वी अमेरिकेत मंदी आली. अमेरिकेत मंदी आत्यानंतर मुंबई आणि दिल्लीतील शेअर बाजार गडगडले. या मंदीची चाहूल आपल्याला हळूहळू जाणवू लागली होती. खऱ्या अर्थाने जेट एअरवेजमधील 800 अधिकाऱ्यांना एकाच दिवशी कामावरुन कमी करण्यात आले त्याचवेळी आपल्याला या मंदीची चाहूल लागली होती. सरकारला जागे करण्यासाठी मी सांगू इच्छितो की, कोणत्याही राज्यामध्ये आर्थिक स्थिती चांगली असते त्यावेळी क्रिमिनल ॲक्टिव्हीटी वाढतात. लोक गँगस्टरीझमकडे वळतात. ज्यावेळी आर्थिक स्थिती खालावते त्यावेळी खऱ्या अर्थाने क्राईम सुरु होतो तो व्हाईट कॉलरवाल्यांचा असतो. आजही मुंबई पोलिसांच्या क्राईम ब्रँचमध्ये आर्थिक गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असल्याचे दिसून येते. याचा अर्थ राज्यात मंदी आहे. मंदीत होरपळल्यामुळे चेक बाऊन्स होत आहेत. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी क्राईम ब्रँचमध्ये दाखल झालेल्या आहेत. वित्तमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात म्हटले आहे की, "मला नमूद करण्यास आनंद वाटतो की, महाराष्ट्र हे भारतातील प्रमुख औद्योगिक राज्य आहे."

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

जून, 2005 मध्ये विशाल प्रकल्पांचे धोरण घोषित करण्यात आल्यापासून 135 विशाल व तत्सम प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. या प्रकल्पांमध्ये सुमारे 1,53,900 कोटीची गुंतवणूक अपेक्षित असून त्यातून सुमारे 3.31 लाख नवीन नोकऱ्या निर्माण होणार आहेत. अशा प्रकारचे आकडे देऊन सरकार जनतेला काय सांगण्याचा प्रयत्न करीत आहे ? याचा बोध होत नाही. अशा प्रकारचे प्रकल्प राज्यात येणार असतील तर 14 एसईझेडसह देशात 43 एसईझेड अधिसुचित करण्यात आले आहेत. याबाबत माझा एकच साधा प्रश्न आहे की, 5000 मेगावॅट एवढ्या विजेची राज्यात तूट आहे, सध्या भार नियमन मोठ्या प्रमाणात सुरु आहे. ग्रामीण भागातील शेती पंप विजेअभावी चालत नाहीत, शेतकरी मरत आहेत. एका बाजूने शासन 3 लाख लोकांना रोजगार देणार असे सांगते परंतु सांगत असलेल्या विजेची बेरीज-वजाबाकी करुन पाहिली तर परळ, पारस, खापरखेडा आणि भुसावळ येथील वीज निर्मिती संच मांडणी क्षमता 2000 मेगावॅटने वाढविण्याच्या दृष्टीने विस्तारीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. राज्यात 5000 मेगावॅट विजेची कमतरता आहे. पण अर्थसंकल्पात सांगितल्यानुसार राज्यात नव्याने येणाऱ्या उद्योगांना शासन विजेचा पुरवठा कोठून करणार आहे ? तसेच अशा उद्योगांची निर्मिती करण्यासाठी भांडवल, जमीन, कामगार अशा प्रकारच्या महत्वाच्या गोष्टींची गरज असते तो विचार आपण केला आहे काय, याची पुर्तता कशी करणार आहात ? याचाही बोध होत नाही. केवळ निवडणुका आल्या म्हणून सरकार 3.5 लाख रोजगार उपलब्ध करुन देणार अशी घोषणा केली जाते की काय ? अशीच शंका निर्माण होत आहे. अशा उद्योगांना वीज देऊ शकत नसाल तर आपण अर्थसंकल्पात दिलेले ठोकताळे हे वीज निर्मितीपुरतेच मर्यादित आहेत असेच म्हणावे लागेल. कारण सध्या आहे एवढी वीज नवीन उद्योगांना पुरण्यासारखी नाही. तसेच बंद होत असलेले कारखाने आणि नवीन येणारे प्रकल्प त्यातून मिळणारा रोजगार आणि बंद झालेल्या कारखान्यातून बेकार झालेले लोक याचा विचार केला तर त्यात बेरोजगारांचीच संख्या जास्त असल्याचे दिसून येईल. संपूर्ण ग्रामीण भागातील लोक आजही खूश नाहीत, शेतकरी मरत आहेत, शहरी भागातील कामगार मरत आहेत, शिक्षकांच्या समस्या वाढत आहेत, शिक्षकांना विना अनुदान तत्वावर चालणाऱ्या शाळांवर काम करावे लागत आहे. माझ्याकडे सुध्दा 9500 शिक्षकांची युनियन आहे. आजही या शिक्षकांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

चार-चार, पाच-पाच वर्षे पगार मिळत नाही अशी अनेक उदाहरणे मी देऊ शकतो. अशा प्रकारे सरकार शिक्षक वर्गासाठी काही करु शकत नसेल, शेतकऱ्यांसाठी काही करु शकत नसेल, बेरोजगारांचा विचार करु शकत नसेल तर त्याचा अर्थ असा होतो की, केवळ बजेटच्या पुस्तकाच्या माध्यमातून राज्यात जास्तीत जास्त रोजगार मिळेल, राज्यात नवीन प्रकल्प येतील अशा प्रकारच्या घोषणा करुन, भुलथापा देऊन जनतेची फसवणूक करण्याचाच हा प्रयत्न आहे. एवढेच सांगतो आणि माझे भाषण संपवितो.

तालिका सभापती (प्रा.रामनाथ मोते) : माननीय सभापतींचे निदेश येईपर्यंत पुढच्या सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडण्यास सुरुवात करावी.

श्री. दिलीप वळसे-पाटील (अर्थ मंत्री) : महोदय, माझी अशी विनंती आहे की, उद्या सकाळी 10.00 ते 10.45 या वेळेत अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर ठेवावे. त्यानंतर पुरवणी मागण्यांवरील चर्चा घेण्यात यावी.

श्री. दिवाकर रावते : माझी अशी विनंती आहे की, माननीय सभापतींचे निदेश येईपर्यंत पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे सुरुवात करतील.

तालिका सभापती : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु करावी.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./ मु.शी.: सन 2008-09 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांना हे माहितच असेल की पूरक मागण्यांवरील चर्चेसाठी दोन दिवस म्हणजे आज बुधवार दिनांक 18 मार्च आणि उद्या गुरुवार, दिनांक 19 मार्च, 2009 हे दिलेले आहेत. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्रिनिहाय होत असल्याने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागांबाबत सदस्यांनी बोलावे. त्यानंतर मंत्री महोदयांना एकदम उत्तर देणे सुलभ होईल. चर्चा संबंधित बाबीपुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही, हे सदस्यांना सांगावयास नकोच.

कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे, हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. अन्यथा आज राहिलेल्या पूरक मागण्या व गुरुवार, दिनांक 19 मार्च, 2009 करिता असलेल्या सर्व मागण्यांवरील चर्चा गुरुवार, दिनांक 19 मार्च, 2009 राजी पूर्ण करावी लागेल.

<u>विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या</u>

तालिका सभापती : आता खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

1) मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या म्हणजे मागणी क्रमांक ए-1, ए-2, ए-3, एफ-2, एफ-3, क्यू-2 व क्यू-4.
2) उप मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या म्हणजे मागणी क्रमांक एच-3, एच-4, एच-5, एच-6, एच-8.
3) उद्योग, बंदरे व खार जमीन मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक-आय-3, के-3, के-7, के-10.
4) ग्रामविकास व पर्यटन मंत्र्यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक-एल-2 आणि एल-5.

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती.....

5) परिवहन, विमुक्त, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक- बी-3, बी-5, बी-9.

6) महसूल मंत्र्यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक-सी-1 व सी-2.

7) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून), लाभक्षेत्र विकास व पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक- आय-5, वाय-1, वाय-4, वाय-5 आणि वाय-6.

8) शालेय शिक्षण आणि विधी व न्याय मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक-ई-1, ई-2 व जे-1.

9) वित्त व नियोजन मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक- जी-6, जी-7, ओ-7 व ओ-9.

10) सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक - एन-2, व एन-3.

11) आदिवासी विकास मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक - टी-1, टी-2, टी-4, टी-5 व टी-6.

12) उर्जा (अपारंपारिक उर्जा वगळून) मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक - के-6, के-11.

13) वन मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक -सी-10.

14) अपारंपारिक उर्जा व फलोत्पादन मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक - डी-3.

15) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक - आर-1, आर-2.

16) उच्च व तंत्र शिक्षण आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक - एस-1, डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-5 व डब्ल्यू-6.

17) रोजगार हमी योजना आणि महिला व बालविकास मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक - ओ"3, एक्स-1, एक्स-2.

....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती .....

18) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक - एम-3.

19) पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, क्रीडा व युवक कल्याण आणि राजशिष्टाचार मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक -सी-5, सी-6, ई-3 व ई-4.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) सभापती महोदय, सन 2008-2009 च्या पूरक मागण्यांवर विचार मांडत असतांना मला असे सूचवावयाचे आहे की, गृहविभागाच्या बाब क्रमांक 5 मध्ये पोलीस दलाच्या आधुनिकीकरण व बळकटी करणासाठी 3,50,00,000/- एवढी तरतूद करण्यात आलेली आहे. मुंबईवर अलिकडेच जो दहशतवादी हल्ला झाला तो लक्षात घेता,राज्य गुप्तवार्ता विभागामध्ये सायबर सेल निर्माण करण्याचे ठरविण्यात आले आहे. मुंबईवर 26.11.2008 रोजी जो दहशतवादी हल्ला झाला तो हल्ला झाला नसता तर या शासनाला यासंदर्भात जागही आली नसती. खरे म्हणजे मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या अगोदरच यासंदर्भात विचार आणि तरतूद व्हावयास पाहिजे होती.या पुरवणी मागण्यांमध्ये मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा सगळीकडेच उल्लेख करण्यात आलेला आहे. पूर्वी सुध्दा मुंबईवर कुविख्यात गुंड दाऊद इब्राहीम याने समुद्र मार्गेच हल्ला केला होता, समुद्री मार्गेच त्याने आरडीएक्स आणून मुंबईत बॉम्बस्फोट घडवून आणले होते. समुद्री मार्गानेच पूर्वीचा हल्ला सुध्दा यशस्वी झाला होता. 1993 साली हा हल्ला झाला होता. हा हल्ला जेव्हा झाला होता तेव्हाच ख-या अर्थाने पोलीस दलाला सक्षम करावयास पाहिजे होते परंतु हा हल्ला होऊन 16 वर्षे उलटल्यानंतरही पोलीस दलाला आधुनिक शस्त्रास्त्रे दिली पाहिजे, पोलीस दलाला अधिक सक्षम केले पाहिजे याबाबत या शासनाला जाग आली.

सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या पृष्ठ क्रमांक 13 वर 51 मोटर वाहनांसाठी 86 हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु 51 मोटर वाहने 86 हजारे रुपयांना कशी काय मिळतात हे मला तरी अजून समजलेले नाही. साधी मोटरसायकल घ्यावयास गेलो तर एका मोटरसायकलसाठी कमितकमी 50 हजार रुपये लागतात.

तालिका सभापती श्री. रामनाथ मोते : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे पुरवणी मागण्यावरील चर्चेला ऑन लेग राहतील.

सभा□हाची बैठ□ आता स्थ□□ होऊ□ उद्या गुरुवार, दि□□ 19 मार्च, 2009 रोजी स□ळी 10.00 वाजता सभागृहाची बैठक पु□ भरेल.

(सभा□हाची बैठ□ सायंकाळी 6 वाजू□ 58 मि□□टां□, गुरुवार, दि□□ 19 मार्च, 2009 रोजीच्या स□ळी 10.00 वाजेपर्य□ स्थ□□ झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही